# स्मृतिस्थळ

संपादक

डॉ. शं. गो. तुळपुळे



सिटी बुक स्टॉल, पुणे

# स्मृतिस्थळ

( प्रस्तावना, टीपा, सूची व शब्दकोश यांसह )

संपादक

डॉ. शं. गो. तुळपुळे

एकमेव विक्रेते :

सिटी बुक स्टॉल

अप्पा बळवंत चौक, पुणे : ३०.

आवृत्ती पहिली
ऑगस्ट १९६९



मूल्य : **पाच रुपये**

प्रकाशक :
**डॉ. शं. गो. तुळपुळे**
यांचे करितां
**वि. गं. कुलकर्णी,**
३२३ सदाशिव, पुणे २

मुद्रक :
**म. बा. जोशी,** बी. ए.
ज्ञानविलास प्रेस,
२७ बुधवार पेठ, पुणे ३०.

# निवेदन

'स्मृतिस्थळ' हा ग्रंथ अनेक विद्यापीठांतून प्राचीन मराठी गद्याच्या अभ्यासासाठी नेमला जातो. त्याची एक संशोधित आवृत्तिही श्री. वा. ना. देशपांडे यांनी प्रसिद्ध केलेली आहे. परंतु त्यांच्या या आवृत्तीत 'स्मृतिस्थळा'-बरोबर 'वृद्धाचार'ही दिलेला असल्याने अभ्यासकांचा फार घोटाळा होतो. कारण परीक्षेला 'स्मृतिस्थळ' नेमलेले असते व त्याबरोबर आपण 'वृद्धाचारा'चाही अभ्यास करावयाचा किंवा काय असा प्रश्न विद्यार्थ्यांच्या पुढे पडतो. वास्तविक पाहता 'स्मृतिस्थळ' व 'वृद्धाचार' हे दोन निरनिराळे कालखंड दर्शविणारे स्वतंत्र ग्रंथ असून त्यांचा एकमेकाशी तसा संबंध नाही. महानुभाव मताप्रमाणे त्यांच्या चार प्रमाणांपैकी 'स्मृति' म्हणजे नागदेवाचार्यांचा वृत्तान्त असून त्यांच्या उत्तरकालीन आचार्यांच्या वृत्तान्ताला 'वृद्धाचार' म्हणतात. अर्थात् 'वृद्धाचार' हे प्रकरण स्वतंत्र असून त्याचा समावेश 'स्मृतिस्थळा'त होत नाही. परंतु हे दोन ग्रंथ एकत्र प्रसिद्ध झाल्याने संशयास जागा राहते व त्यामुळे 'स्मृतिस्थळा'चा अभ्यासक घोटाळ्यात पडतो. शिवाय, नागदेवाचार्यांच्या स्मृती तशा अनेक असून त्यांच्या अनेक पाठांपैकी 'स्मृतिस्थळ' हा एक पाठ आहे व तोच परीक्षेला नेमलेला असतो. परंतु श्री. देशपांडे यांच्या आवृत्तीत या पाठाबरोबर 'अज्ञात स्मृती' व 'स्मृतिसमुच्चय' या दोन इतर पाठांतूनही काही स्मृती परिशिष्टांच्या रूपाने दिलेल्या असल्यामुळे अभ्यासकांच्या घोटाळ्यात भर पडते. श्री. देशपांडे यांची आवृत्ती मुख्यतः संशोधनपर असल्यामुळे त्यांनी तीत या पाठांचा साक्षेपाने समावेश केला हे योग्यच झाले व त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. परंतु त्याबरोबर एकाच ग्रंथात ही सर्व प्रकरणे व संशोधन-साहित्य एकत्र केल्यामुळे 'स्मृतिस्थळा'च्या नवीन अभ्यासकाची दिशाभूल होते हेही खोटे नाही.

म्हणून मुख्यतः विद्यापीठातील विद्यार्थ्यांची सोय होऊन त्यांना केवळ 'स्मृतिस्थळा'चा अभ्यास करण्यास मदत व्हावी या हेतूने त्याची ही

आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. परंतु त्याबरोबरच तिला सविस्तर प्रस्तावना, अर्थस्पष्टीकरणात्मक टीपा व संपूर्ण, संदर्भयुक्त शब्दकोश या साधनांची जोड करून दिली असल्यामुळे ' स्मृतिस्थळा 'ची ही आवृत्ती प्राचीन मराठीच्या इतर अभ्यासकांनाही उपयुक्त होईल अशी आशा आहे. या कामी श्री. देशपांडे यांच्या उपर्युक्त आवृत्तीचा पुष्कळ उपयोग झाला हे येथे कृतज्ञतापूर्वक सांगणे अवश्य आहे.

' स्मृतिस्थळा 'चा पुढील पाठ रिधपूर येथील कै. महंत गोपीराजबुवा यांनी कांही वर्षांपूर्वी मजकडे पाठविलेल्या एका जुन्या पोथीच्या आधारे दिला आहे या पाठात एकूण २६० स्मृती असून इतर काही पाठांतून येणाऱ्या प्रारंभीच्या व अन्तीच्या अनुक्रमे श्रीचक्रधर व भटोबास यांच्या शिष्यांच्या याद्या त्यात नाहीत. तसेच भटोबासांच्या निधनानंतर दामोदरपंडितांनी रचिलेला धावाही त्यात नाही. ' स्मृतिस्थळा 'च्या दृष्टीने या याद्या व पंडिता-प्रमाणे आणखीही कोणी केलेले अशा प्रकारचे धावे वास्तविक पाहता ग्रंथ-बाह्यच आहेत. ' स्मृतिस्थळा 'चा तो भाग नव्हे. म्हणून ज्यात नागदेवाचार्यांचे चरित्र आले आहे असे ' स्मृतिस्थळ'च तेवढे वेगळे छापून काढण्याचे म. गोपीराजबुवा यांच्या मनात फार होते व त्यासाठीच त्यांनी आपणाजवळील एका पोथीचा उतारा त्यावेळी मला पाठवून दिला होता. त्याचे संपादन व प्रकाशन या ना त्या कारणामुळे लांबणीवर पडत गेले आणि आज तो प्रसिद्ध झालेला पहाण्यास म. गोपीराजबुवा जिवंत नाहीत याचे वाईट वाटते. म्हणून व ज्यांच्या प्रेरणेने आणि सहाय्यामुळे मी महानुभाव वाङ्मयाच्या अभ्यासाकडे वळलो त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेचे एक प्रतीक म्हणूनही हे संपादन मी त्यांच्या स्मृतीस अर्पण करीत आहे.

५८० सदाशिव, पुणे ३०<br>ता. १५ ऑगस्ट १९६९ }

शं. गो. तुळपुळे

महानुभाव वाङ्मयाचा अभ्यास व त्याचे प्रकाशन
या कामी मनोभावे झटणारे व सहाय्य करणारे

कै. महंत गोपीराजबुवा

यांच्या प्रेमळ स्मृतीस

# अनुक्रमणिका

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणें
( डे. व्हे. ट्रा. सोसायटी, पुणें )
११३३, सदाशिव पेठ, पुणें ३०

# प्रस्तावना

## 'स्मृतिस्थळ' व त्याचे स्वरूप

'स्मृतिस्थळ' हा महानुभाव पंथाच्या 'लीळाचरित्रा'दि प्राचीन चरित्रग्रंथांपैकी एक असून त्यात त्या पंथाचे पहिले आचार्य नागदेव किंवा भटोबास यांचे चरित्र, विशेषतः त्याचे उत्तरार्ध, आले आहे. 'स्थळ' म्हणजे ज्यात विवेचन केले जाते ते, म्हणजेच ग्रंथ व 'स्मृतिस्थळ' म्हणजे स्मृतिग्रंथ. परंतु येथे 'स्मृति' या शब्दाचा आठवण हा रूढार्थ घ्यावयाचा नसून तो येथे काही विशेष अर्थाने वापरलेला आहे. महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे साध्य जो परमेश्वर त्याचे साधन आचरावयास आप्तवाक्याची आवश्यकता असते व हे आप्तवाक्य म्हणजेच साधनास उपकारक असणारे 'प्रमाण' होय.[१] हे 'प्रमाण' त्रिविध आहे.[२] (१) श्रुति, (२) स्मृति, (३)

---

१. "फळश्रुतिश्रवणें फळप्राप्तिकारणें प्रवर्तला जो पुरुष त्यासि साधन आचरावया आप्तवाक्य होआवेंचि लागे: भणौनि प्रतिज्ञेउपरि प्रमाण बोलिले: तया प्रमाणाचें लक्षण त्यें ऐसें: अनुभवसाधनासि उपकारक तें प्रमाण:" (नेने: बत्तीस लक्षणाची टीप, पृ. ३)

२. "तत् त्रिविधम् । श्रुतिस्मृतिवृद्धाचारनिर्णयाख्यम्" (लक्षण-रत्नाकर, २).

वृद्धाचार. पैकी 'श्रुति' म्हणजे परमेश्वरोक्त, अर्थात् श्रीचक्रधरोक्त सूत्रे; नागदेवाचार्यांनी चक्रधरांच्या वाणीतून निघालेली वचने ऐकून इतरांना जे स्मरणपूर्वक सांगितले ती 'स्मृति'; आणि नागदेवाचार्यांच्या द्वारा ऐकून केशिराज बास इत्यादि पुढिलांनी जे सांगितले तो 'वृद्धाचार.' याप्रमाणे वरील तीन 'प्रमाणां'चे अर्थ आहेत.[१] त्यानुसार 'स्मृतिस्थळ' म्हणजे नागदेवाचार्यांनी चक्रधरांची वचने प्रत्यक्ष ऐकून सांगितलेला आचारधर्माचा ग्रंथ. त्यात नागदेवांच्या चरित्राचे उत्तरार्ध आले आहे असे प्रारंभी म्हटले ते याचसाठी. कारण त्यांच्याकडे मार्गाचे अधिकरणत्व किंवा आचार्यपद आल्यापासून पुढील कालखंडच 'स्मृती'चा होय. त्यापूर्वीचे त्यांचे चरित्र 'लीळाचरित्रा'त येऊन गेले आहे. म्हणून त्याचा आढावा पहिल्या स्मृतीत अगदी थोडक्यात घेऊन 'स्मृतिस्थळ' कार दुसऱ्या स्मृतीपासून त्यांचे आचार्य या भूमिकेवरील चरित्र सांगण्यास प्रारंभ करतात. असो. याप्रमाणे 'स्मृतिस्थळ' म्हणजे नागदेवांचे आचार्य-चरित ही व्याख्या एकदा स्पष्ट झाली म्हणजे त्याच्या मर्यादाही सुष्पष्ट होतात. त्या म्हणजे एका बाजूने 'श्रुति' व दुसऱ्या बाजूने 'वृद्धाचार' या होत. अर्थात् 'श्रुति', म्हणजे चक्रधरोक्त 'सूत्रपाठ', व 'वृद्धाचार' ही दोन स्वतंत्र प्रकरणे असून त्यांचा समावेश 'स्मृतिस्थळा'त होऊ शकत नाही. कारण हे शब्द त्या त्या कालखंडाचे द्योतक असून त्या कालखंडांच्या मर्यादा स्पष्ट आहेत. म्हणूनच 'मार्गरूढी'सारख्या 'वृद्धाचारा'नंतरच्या काळातील प्रकरणाचा संबंध जसा 'स्मृतिस्थळा'शी पोचत नाही, त्याप्रमाणे 'वृद्धाचारा' चाही पोचत नाही. हीच विभागणी

---

१. "परमेश्वरोक्त सूत्रमात्र अधिकरणासि (आचार्यासि) श्रुत जालें : भणौनि परमेश्वरोक्त सूत्रमात्र **श्रुति** शब्दें बोलीजे :॥ परमेश्वराचें विहरण वर्तन देखिलें तैसें स्मरौनि अधिकरणें साधिकरणाप्रति निरूपिलें जें लीळा-चरित्र ते **स्मृति** बोलीजे : ॥ परमेश्वराचा आणि अधिकरणाचा वृत्तांतु विचारु व्यवहारु तो साधिकरणीं केशवादि महानुभावीं बंधीं लिहिला तो **वृद्धाचारु** :॥ ऐसे श्रुति स्मृति वृद्धाचार भेदें त्रिविध प्रमाण जाणावें: ॥ (नेने: बत्तीस लक्षणाची टीप, पृ. ७).

'अन्वयस्थळ' कार पुढीलप्रमाणे सांगतात. " अनुसरलिया मार्गिका च्यारि प्रमाणें: श्रुति १ : स्मृति २ : वृद्धाचार ३ : मार्गरूढि ४ : सर्वज्ञाचें श्रीमुख ते **श्रुतिः** भटोबासांचें वर्तमान ते **स्मृतिः** रामेश्वरबासः परशरामबासः हीराइसे : नागाइसे हा **वृद्धाचार** : धारासीवकार ओंकारबास : गुर्जर शिवबासपर्येत **मार्गरूढी** :॥" 'मार्गरूढी' नंतरच्या प्रमाणाला 'वर्तमान' म्हणतात.

वरील चार (किंवा पाच) प्रमाणांत 'श्रुती'च्या खालोखाल 'स्मृती'ला, म्हणजे नागदेवाचार्यांच्या वचनांना प्रामाण्य आहे. याचे कारण म्हणजे नागदेवाचार्य हे चक्रधरोक्त शास्त्रात इतके पारंगत होते की त्यांच्या तोंडून त्या शास्त्राला सोडून असे काहीही निघणे अशक्य होते. या बाबतीत स्वतः चक्रधरांनी पुढील उद्गार काढले होते. " तुझेनि (नागदेवाच्या) मुखें अशास्त्रीय न निगे कीं : हा (नागदेव) काइ आपुलें बोलैल ? हा एथिचेंचि बोलैल कीं :" (सूत्रपाठ, विचार १५९–१६०). स्वतः नागदेवाचार्यांनीही एकदा " माझेनि मुखें जें निरूपण तेथ संशयो नाहीं " असे आत्मप्रत्ययाने म्हटले होते (स्मृ. २२५). म्हणून त्यांच्या वचनांना व त्याबरोबर 'स्मृतिस्थळा'ला प्रामाण्य लाभले आहे.

## 'स्मृतिस्थळा'चा काळ व कर्तृत्व

'स्मृतिस्थळ' हा ग्रंथ केव्हा व कोणी लिहिला हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. त्याविषयीचे निरनिराळे उल्लेख विचारात घेऊन " सध्याचे 'स्मृतिस्थळ' कुणाही एका लेखकाचे नसून त्यात अनेकांच्या पाठांतील कमीअधिक मजकूर मिसळला गेला असावा " असे त्याचे संशोधक श्री. वा. ना. देशपांडे यांचे मत झाले आहे (प्रस्तावना, पृ. ७) व ते बरोबर आहे. कारण एक तर या 'स्मृतीं'च्या निर्मितीविषयी परस्परविरोधी असे उल्लेख निरनिराळ्या 'अन्वयस्थळां'तून मिळतात. उदाहरणार्थ, नरेंद्रबासाने सातशे स्मृती 'जैसिया वर्तल्या तैशाचि' लिहिल्या; मालोबासाने पाचशे स्मृती आणि वृद्धाचार 'अन्वयीं लाविला'; परशरामबासाने स्मृतींचा दुसरा बंध तयार केला; इत्यादि. स्मृतींच्या या निरनिराळ्या संख्यांत मेळ घालणे शक्य नाही व नरेंद्राचा सातशे स्मृतींचा किंवा मालोबासाचा पाचशे

स्मृतींचा पाठ आज उपलब्धही नाही. तेव्हा वस्तुस्थिती अशी दिसते की, या स्मृती प्रथम कोणीतरी लिहून काढल्या व पुढे त्यांत कोणीकोणी भर घातली. ही भर नेमकी कोणी व कोणती घातली ते कळण्यास काही मार्ग नाही. पण इतके खरे, की या स्मृतींचा पहिला लेखक हा नागदेवाचार्यांचा समकालीन असणार. कारण एरव्ही त्याला त्यांच्या चरित्रातील बारीकसारीक प्रसंग अचूकपणे टिपता आले नसते. म्हणून निरनिराळ्या 'अन्वयस्थळां' तील उपर्युक्त उल्लेखांतून नरेंद्राचे नाव स्मृतींचा ('स्मृतिस्थळा'चा नव्हे) मूळ लेखक म्हणून पुढे येते. एक तर तो स्वतः चांगल्यापैकी ग्रंथकार होता. आपल्या 'रुक्मिणी-स्वयंवर' या काव्यग्रंथासह तो महानुभाव पंथात कसा आला त्याचा वृत्तांत 'स्मृतिस्थळा'त आलाही आहे (स्मृति ११३). दुसरे, तो नागदेवाचार्यांचा समकालीन होता, त्यांचे चरित्र त्याने दीर्घकाळपर्यंत, म्ह. सुमारे वीस वर्षे जवळून पाहिले होते. आणि मुख्य म्हणजे त्याने सातशे स्मृती लिहिल्याचा स्पष्ट उल्लेख तळेगावकरांच्या अन्वयस्थळात आहे ("पूर्वी नरेंद्रबासीं रुक्मिणीसैंवर केले : आन सातसें स्मृति जैसिया वर्तल्या तैस्याचि लिहिल्या:"). वरील सर्व कारणांमुळे नरेंद्र हा स्मृतींचा मूळ लेखक मानण्यास आधार मिळतो.[१] यात एक अडचण येते, व ती म्हणजे 'वृद्धाचारा'सारखा आघाडीच्या महानुभाव ग्रंथकारांची माहिती देणारा ग्रंथ नरेंद्राचा कोठेही उल्लेख करीत नाही ही होय. पण मग ही अडचण त्याच्या 'रुक्मिणी-स्वयंवर' या काव्यासंबंधीही येईल. म्हणून विरुद्ध पुराव्याच्या अभावी व वरील 'अन्वयस्थळा'तील उल्लेखावर विसंबून नरेंद्र हा स्मृतींचा मूळ लेखक होय असे म्हणता येईल. त्याच्या जोडीला परशरामाचे नाव श्री. देशपांडे घेतात (स्मृतिस्थळ, प्रस्तावना पृ. ३). पण ते तितके सयुक्तिक वाटत नाही. कारण तो पंथाचा चवथा आचार्य, अर्थात् नागदेवचार्यांचा समकालीन नाही. नागदेवानंतर, म्ह. शके १२३४ नंतर तीन वर्षेपर्यंत बाइदेवबास, त्यानंतर कवीश्वरबास व नंतर परशरामबास असा आचार्यपदाचा क्रम आहे. त्यामुळे

१. या बाबतीत म. मुरलीधरशास्त्री आराध्य (महानुभाव मासिक, वर्ष ८ वे, १९५५) व डॉ. कोलते (रुक्मिणीस्वयंवर, प्रस्तावना, पृ. ५१) यांचे मत निराळे असून नरेंद्राने स्मृती लिहिल्या हे त्यांना शक्य वाटत नाही.

परशरामाला नागदेवाचार्यांचे चरित्र ऐकूनच ठाऊक असणार, प्रत्यक्ष नव्हे. त्याच्या नावावर 'स्मृति' लिहिल्याचा उल्लेख आहे त्याप्रमाणे इतरांच्याही नावावर आहेत. पण तेवढ्यामुळे ते सर्वजण जसे स्मृतींचे मूळ लेखक ठरत नाहीत, तसाच परशुरामही ठरत नाही. फार तर तो पहिला संस्करणकार असू शकेल. स्मृतींच्या संस्करणाचे हे कार्य परशुरामाप्रमाणे इतरांनीही केले. त्यांत मालोबास, धाराशिवकर ओंकारबास, गुर्जर शिवबास व मलेकोयाबा ही नावे प्रामुख्याने येतात. अर्थात् संस्करणाचे हे कार्य पुढे बरीच वर्षे चालू असल्याने स्मृतींच्या मूळच्या संख्येत बदल होत राहिला व होता होता ती सध्या उपलब्ध असलेल्या 'स्मृतिस्थळा'च्या संख्येवर येऊन स्थिर झाली. सारांश, नरेंद्रबास हा स्मृतिग्रंथाचा मूळ लेखक व बाकीचे सर्वजण त्याचे शोधकार किंवा संस्करणकार ठरतात.

'स्मृतिस्थळा'त नागदेवाचार्यांचा वृत्तांत आलेला असून त्याची समाप्ती त्यांच्या निधनाच्या प्रसंगाने झाली आहे. अर्थात् त्याचा लेखनकाल नागदेवाचार्यांच्या नंतरचा असणार हे उघड आहे. त्यांचा मृत्युशक संशोधकांनी १२३४ असा निश्चित केला आहे. त्यांच्या स्मृती त्यानंतर वर्षा-दोन वर्षांत लिहिलेल्या असणार. म्हणजे त्यांचा लेखनकाल (स्मृतींचा, 'स्मृतिस्थळा'चा नव्हे) शके १२३४ च्या सुमारास येतो. त्यांच्या संस्करणाचे कार्य मात्र पुढे पाच-पंचवीस वर्षे तरी चालू होते.

## स्मृतींचे निरनिराळे पाठ व 'स्मृतिस्थळ'

श्री. वा. ना. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे 'स्मृतिस्थळ' हा एकच स्मृतिग्रंथ नसून स्मृतींचे निरनिराळे पाठ निर्माण झाल्याचा पुरावा मिळतो. वरील परिच्छेदात मूळ नरेंद्रबासाने लिहिलेल्या स्मृतींचे मालोबासादिकांनी संस्करण केल्याचा उल्लेख आलाच आहे. यापुढील काळात अशी आणखी संस्करणे झाली असतील व त्यांचा परिणाम या स्मृतींचे प्रस्तुतच्या 'स्मृतिस्थळा' प्रमाणे अन्य पाठ निर्माण होण्यात झाला. अशा प्रकारचे दोन पाठ श्री. देशपांडे यांना मिळाले असून त्यांचा उल्लेख त्यांनी अनुक्रमे 'अज्ञातस्मृति' व 'स्मृतिसमुच्चय' या नावांनी केला आहे ('स्मृतिस्थळ', प्रस्तावना, पृ. ३). परंतु त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे या दोन पाठांत काही

प्रक्षिप्त, संशयास्पद व आक्षेपार्ह स्मृती असल्यामुळे आणि त्यांत रचनाशैथिल्यही बरेच असल्यामुळे महानुभाव पंथातसुद्धा या पाठांना मान्यता नसून ती 'स्मृतिस्थळा' च्या पाठासच आहे. या तीन उपलब्ध व अनुपलब्ध अशा इतर पाठांचे मूळ एकच असणार यात शंका नाही. परंतु त्या मूळ पाठाची संस्करणे होत असतांना त्यात बदल होत गेले, त्यातील स्मृतींची संख्या कमीजास्त होत राहिली आणि त्यातील आशय मात्र फुगत चालला. या प्रवृत्तीतूनच स्मृतींचे वरील निरनिराळे पाठ जन्मले व त्यांच्यात मतभेदही पुष्कळच दिसू लागले. प्रस्तुत ज्या ग्रंथाचा विचार आपण करीत आहो त्या 'स्मृतिस्थळा'चा पाठ स्मृतींच्या इतर उपलब्ध पाठांहून अधिक प्रमाण व पंथात मान्यता पावलेला आहे इतकेच येथे पहाणे आहे.

स्मृतींच्या प्रस्तुत पाठावरून, म्हणजेच 'स्मृतिस्थळा' वरून, शोधकाराचा हात फिरलेला असावा असे त्यातील पुढील अंतर्गत पुराव्यावरून वाटते. (१) अनेक स्मृतींतून 'शोध' असे म्हणून अधिकचा मजकूर घातलेला आहे. क्वचित् कोठे सबंधच्या सबंध स्मृती 'शोध' रूपाची आहे. उदा०, " राजौर लक्ष्मीधरभटां श्रवणानुसरण:" ही १० वी स्मृती पहावी. (२) अनेक ठिकाणी 'वासना' भेद, म्ह. मतभेद, नोंदविले आहेत. (३) क्वचित् एखादी अन्यत्र नोंदलेली स्मृती शोधून ती येथे घातली आहे. उदा०, "आपलो भेटि अनुसरण" ही २३ वी स्मृती 'उत्तरार्धींची सोधूनि येथ घेतली' असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. (४) दोन स्मृती–२४० व २४७–'यथाप्रती' असे म्हणून नोंदल्या आहेत. म्हणजे त्या मूळ प्रतीत आढळल्या तशाच येथे दिल्या आहेत; त्यांचा शोध किंवा संस्करण केलेले नाही. यावरून 'स्मृतिस्थळ' कार त्यांच्याविषयी साशंक दिसतो. (५) वरीलपैकी एक स्मृती–२४७–श्रीगोविंदप्रभूंच्या वेळची, म्हणजे स्मृतिकालपूर्व असल्याने वास्तविक तिला येथे स्थान नाही; परंतु ती ऋद्धिपुरचरित्रात, म्ह. गोविंदप्रभुचरित्रात न आल्याने येथे म्ह. 'निंब-चरित्रा'त दिली आहे. (६) दादोसांच्या देहावसानाची २२१ वी स्मृती 'मार्गरूढी'च्या आधारे दिली आहे. आता 'मार्गरूढी'चा कालखंड हा 'स्मृती'च्या नंतरचा असल्याचे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. अर्थात् त्यातील भाग येथे आणण्यात 'शोध' काराचा हात

स्पष्ट दिसतो. (७) 'हें भटांमागां' असें २२२ व्या स्मृतीच्या अखेरीस स्पष्टपणें म्हटले आहे.

वरील सर्व पुराव्यावरून 'स्मृतिस्थळ' हा स्मृतींचा प्रस्तुत पाठ कोणाही एका लेखकाच्या हातचा नसून त्यात अनेकांचे 'शोध' व 'वासना' मिश्रित झाल्याचे दिसून येते. 'स्मृतिस्थळा'चे हे संस्करण कोणी केले ते समजणे दुरापास्त आहे. परशरामबास, मालोबास किंवा धाराशिवकार ओंकारबास या स्मृतींच्या 'शोध'कारांपैकी कोणीही ते केलेले नाही हे उघड आहे. कारण ते सर्व 'मार्गरूढी'च्या पूर्वीचे आहे आणि 'स्मृतिस्थळा'त तर 'मार्गरूढी'चा निर्देश आढळतो (स्मृ. २२१). त्यावरून व १०६ व्या स्मृतीतील "हे स्मृति मलेकोयाबा सांघति : आणि धर्मवार्ता करीति" या निर्देशावरून 'स्मृतिस्थळा'चे संस्करण करणारा मलेकोयाबाचा समकालीन असावा असा निष्कर्ष श्री. देशपांडे यांनी काढला आहे (प्रस्तावना, पृ. ७-८). उपाध्य आम्नायातील या मलेकोयाबाचा काळ शके १३५० च्या सुमारचा धरल्यास त्याच्या कोणा समकालिनाने तयार केलेला 'स्मृतिस्थळ' नावाचा स्मृतींचा हा पाठ १४ व्या शतकातील ठरतो.

## काही निष्कर्ष

वरील विवेचनावरून पुढील निष्कर्ष निघतात.

(१) 'स्मृतिस्थळ' हा एक स्वतंत्र ग्रंथ असून त्याचा 'वृद्धाचारा'शी संबंध नाही.

(२) 'स्मृतिस्थळा' तील स्मृतींचा मूळ लेखक नरेंद्रबास हा असून त्याने या स्मृती शके १२३५ च्या सुमारास लिहिल्या. मात्र त्याने लिहिलेल्या सर्व स्मृती 'स्मृतिस्थळा'त जशाच्या तशा न येतां त्यांवर भिन्न काळी भिन्न लेखकांचा संस्कार होऊन त्या आल्याने हे 'स्मृतिस्थळ' त्याचेच आहे असे म्हणता येत नाही. म्हणजे, नरेंद्र हा स्मृतींचा मूळ लेखक आहे, 'स्मृतिस्थळा'च नव्हे.

(३) 'स्मृतिस्थळ' हा नागदेवस्मृतींचा एकमेव ग्रंथ नसून तशा प्रकारच्या दोनचार ग्रंथांपैकी एक आहे. म्हणजेच स्मृतिसंग्रहाच्या अनेक

पाठांपैकी तो एक आहे. इतकेच, की इतर पाठांहून ' स्मृतिस्थळ ' हा पाठ अधिक प्रमाण व मान्यता पावलेला आहे.

(४) नरेंद्र हा जसा स्मृतींचा मूळ लेखक, तसे परशरामबास, मालोबास, इ. लेखक त्याचे ' शोध 'कार किंवा संशोधक आहेत. त्यांनी या स्मृतींतील उणिवा दूर करून त्यांना निर्दोष करण्याच्या कामी हातभार लावला आहे.

(५) प्रस्तुत ' स्मृतिस्थळा ' चा संपादक किंवा संस्करणकार हा १४ व्या शतकातील असावा. म्हणजे प्रत्यक्ष ' स्मृतीं 'ची निर्मिती १३ व्या शतकात नरेंद्राकडून व ' स्मृतिस्थळा'ची निर्मिती त्यानंतर शे-सवाशे वर्षांनी कोणा अज्ञात व्यक्तीकडून, असे अनुमान निघते.

**' स्मृतिस्थळा 'तील आशय**

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे ' स्मृतिस्थळ ' हे नागदेव किंवा भटोबास यांचे संपूर्ण चरित्र नसून त्याचा उत्तरार्ध आहे. कारण त्यात त्यांनी आपले ' अधिकरणत्व ' किंवा आचार्यपद चालविण्यास प्रारंभ केल्यापासून तो त्यांच्या निधनकालापर्यंतचा वृत्तांत आला आहे. प्रारंभीच्या स्मृतीत त्यांचे पूर्ववृत्त, वेध–बोध–अनुसरण, औट वर्षांचे ' सन्निधान ', आचार्यपदाचे ग्रहण व श्रीचक्रधरांची अखेर इतक्या गोष्टी सांगून ' स्मृतिस्थळ ' दुसऱ्याच स्मृतीपासून भटोबासांच्या चरित्राच्या उत्तरार्धाकडे वळले आहे. चक्रधरांच्या वियोगदुःखाने व्याकुळ होऊन रानोमाळ हिंडणाऱ्या नागदेवाला घेऊन त्याची चुलत बहीण महादाइसे ही रिधपुरास श्रीगोविंदप्रभूकडे येते व चक्रधरांचा सर्व परिवार तेथे त्यांच्या निधनकाळापर्यंत, म्हणजे सुमारे १०–१२ वर्षे, त्यांच्या सेवेत राहतो (स्मृ. २–५). गोविंदप्रभूंच्या पश्चात् नागदेवाचार्य रिधपूर सोडून आपल्या गुरुबंधूंसह गंगातीरी येतात व तेथील स्वामींच्या संबंधी स्थानांचे दर्शन घेतघेत डोंबेगावावरून निंबा येथे येऊन तेथे मठ करून स्थायिक होतात (स्मृ. ५–९). निंब्यास मठी बांधण्याचे कारण म्हणजे साधे नावाच्या चक्रधरशिष्येची प्रकृती. तिच्यासाठी भटोबास निंब्यास राहिले (स्मृ. ६५) व त्यांचे यापुढील बहुतेक सर्व आयुष्य तेथेच गेले. तेथे आल्यावर लौकरच केशिराज पंडित किंवा केसोबास (स्मृ. १२–१७), हिराइसे व

तिचे पति दामोदर पंडित (स्मृ. ५४, ५८) इत्यादि पुढे मान्यता पावलेली मंडळी त्यांना येऊन मिळाली व अशा रीतीने त्यांचे आचार्यत्व हळूहळू रूप घेऊ लागले, 'गुरुकुळ' तयार होऊ लागले. इतक्यात परचक्र आले, दिल्लीचा सुलतान चालून आला व त्यामुळे 'अवघे मंडळ हालविले', म्हणजे देशभर धामधूम माजली. या धामधूमीच्या काळात भटोबासांनी आपल्या वृद्ध आईला भावाच्या गावी आणि साधेला इतर अशक्त भक्तजनांसमवेत परळीस वैजनाथाच्या देवळात ठेवून ते स्वतः दूर निलंग्याकडे निघून गेले. पुढे परचक्राची धामधूम ओसरल्यावर ही सर्व मंडळी पुन्हा एकत्र आली आणि भटोबास आपल्या शिष्यवर्गासह पुनश्च निंबा येथे राहू लागले (स्मृ. ८३–८७). या काळात यादवराजा रामदेवराव धरला गेला होता तोही बहुधा लौकरच सुटला आणि बाह्यतः तरी सर्वत्र स्थिरस्थावर झाले. रामदेवरावाचे भविष्य भटोबासांनी वर्तविले ते याच वेळी (स्मृ. ८६). यानंतर भटोबास व त्यांचा शिष्यवर्ग यांचा नित्यक्रम पुन्हा सुरळीतपणे चालू झाला. मध्यंतरी ते एकदा ऋद्धिपुरासही जाऊन आले (स्मृ. १९०). दामोदरपंडितास गायनाची अनुज्ञा देऊन 'पंडिताचें गीत तें माझे हाकारे गा' या शब्दांत त्यांचे गाणे वाखाणणे (स्मृ. ९१), मठात राहून अनुचित वर्तन करणाऱ्या एका जोडप्यास मठातून बाहेर घालवणे व त्या प्रसंगी पंडितबास आणि केसोबास यांना 'आपले डोळे' म्हणून त्यांचा गौरव करणे (स्मृ. ९४–९५), केसोबासांची निर्मोहता पाहून 'केशवदेनि मार्गाते राखिले' म्हणून त्यांची पाठ थोपटणे (स्मृ. १०५), दुष्काळात भिक्षा कमी येते असे पाहून स्वतःचे 'म्हातारदाम' मठाकडे लावून देणे (स्मृ. १०७), कवी नरेंद्र यास त्याच्या 'रुक्मिणी-स्वयंवर' या काव्यासह आपल्या मार्गात समाविष्ट करून घेणे (स्मृ. ११३), केसोबासांचे पहिले गुरु केशवाचार्य ह्यांचा प्रथम स्वीकार व नंतर त्याग करणे (स्मृ. ११६–११८), कवीश्वर भास्कराकडून त्याच्या भागवतावरील रसाळ पुराणाचा आस्वाद घेणे (स्मृ. १२०,) चक्रधरस्वामी उज्जयनीत आहेत या वार्तेने हुरळून न जाता तिकडे जाण्याचे निर्धारपूर्वक नाकारणे (स्मृ. १३२), म्हाइंभटांच्या 'लीळाचरित्र' रचनेत त्यांना मार्गदर्शन करणे (स्मृ. १४१), रामदेवराव यादवाची राणी कामाइसे ही भेटीस आली असताना तिला

दीक्षा देण्याचे नाकारणे व तिच्या सक्तीच्या अग्निप्रवेशाच्या निमित्ताने धर्मचर्चा करणे ( स्मृ. १४५–१५० ), चक्रधरांसारखा दिसणारा कोणी पुरुष आला असतांना त्याच्या बाह्य रूपावर न जाता उलट त्याचे सोंग उघडकीस आणून आपल्या मार्गाची प्रतिष्ठा राखणे (स्मृ. १९२), इत्यादि स्मृती निंब्याच्या व या काळातील आहेत. येथून पुढे भटोबासांचे चरित्र उताराला लागलेले दिसते. त्यांचे एकेक गुरुबंधु जग सोडून जाऊ लागले. प्रथम 'भटो, मज देव होइल का ?' असे कारुण्यपूर्वक विचारून म्हाइंभट गेले (स्मृ.१९८) तेव्हा भटोबासांना उदास वाटून ते गंगातीरी आले व प्रतिष्ठान नमस्कारून पुन्हा निंब्यास परतले (स्मृ. १९९, २०१, २०५), तो लौकरच चक्रधरांचे पहिले भक्त दादोस, जानोपाध्ये व नाथोबा यांचे देहावसान झाले (स्मृ. २२१, २२४). पाठोपाठ ती धर्मरक्षक म्हातारी महादाइसाही गेली (स्मृ. २५४). साहजिकच आपल्या वेळच्या स्वामींच्या भक्तजनापैकी एकेक हे जग सोडून चालले हे पाहून भटोबासांना फार दुःख होऊन एकटे एकटे वाटू लागले असणार. अशा स्थितीत त्यांना एक दिवस ज्वर आला, तेव्हा आपण स्वामिकार्य निष्ठेने करीत असताना ज्वर का यावा हे त्यांना कळेना, म्हणून त्यांनी 'सिंहावलोकन' केले. स्वामिभक्तीच्या बळावर ते या ज्वरातून उठले (स्मृ. २५७), पण पुढे लौकरच त्यांना गोसावियांचा 'हाकारा' आला आणि त्यांचे कार्य चालविताना आपल्या हातून कोणी दुखावले असेल तर त्या सर्वांची क्षमा मागून भटोबासांनी श्रीचक्रधरांना आठवीत देह ठेवला (स्मृ. २५८–२६०).

'स्मृतिस्थळा'तील आशय वर फार स्थूलमानाने सांगितला. पण त्याला उपाय नाही. कारण एकतर भटोबासांचे हे स्मृतिरूप चरित्र चक्रधरांच्या 'लीळाचरित्रा' प्रमाणे व्यवस्थितपणे लिहिलेले नाही. त्यातील स्मृतींचे स्थळकाळ बहुतेक कोठेंही सांगितलेले नाहीत, किंवा त्यांचा क्रमही सांभाळलेला नाही. उदाहरणार्थ, शके १२१४ च्या सुमारास रचलेल्या नरेंद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवर' काव्याची नोंद ११३ व्या स्मृतीत येते, तर त्यानंतर काही वर्षांनी झालेल्या दिल्लीच्या सुलतानाच्या स्वारीचा वृत्तांत ८३ ते ८६ या स्मृतींत येतो. तसेच साधेसाठी निंबा येथे मठी बांधून भटोबास तेथे स्थायिक केव्हा झाले, केसोबास व दामोदरपंडित यांच्या

भेटीच्या पूर्वी की नंतर, ते कळण्यासही काही मार्ग नाही. अशा परिस्थितीत ' स्मृतिस्थळा 'च्या आधारे भटोबासांच्या उत्तर जीवनातील काही ठळक घटना सांगणेच तेवढे शक्य होते, त्यावरून त्यांचे संगतवार व कालक्रमयुक्त चरित्र कळू शकत नाही.

## ' स्मृतिस्थळा 'तील कालनिर्देश

' स्मृतिस्थळा 'त तीन कालनिर्देश आले आहेत : पहिला चक्रधरांच्या ' उत्तरापंथें गमना 'चा (स्मृ. १), दुसरा गोविंदप्रभूंच्या निधनाचा (स्मृ. ५), आणि तिसरा नागदेवचार्यांच्या देहावसानाचा (स्मृ. २६०). पैकी चक्रधरांच्या प्रयाणाचे ' स्मृतिस्थळा 'त उल्लेखिलेले वर्ष (शके ११९४) सांप्रदायिकांत मान्य असले तरी डॉ. कोलते यांच्यासारख्या संशोधकांनी ते न मानता शकवर्ष ११९६ हा स्वामींचा प्रयाणकाळ म्हणून निश्चित केला आहे (श्रीचक्रधर-चरित्र, पृ. ३१५–३१८). दुसरा कालनिर्देश गोविंदप्रभूंच्या निधनाचा असून त्यात शकांक दिलेला नाही, फक्त व्यय संवत्सर उल्लेखिले आहे. याविषयी सांप्रदायिकांतही निरनिराळी मते असून डॉ. कोलते यांनी हा शक १२०९ असा ठरविला आहे (गो. चरित्र, प्रस्तावना पृ. १६–१८). आपल्या दृष्टीने ' स्मृतिस्थळा 'तील नागदेवाचार्यांच्या मृत्युकाळाचा निर्देश महत्त्वाचा आहे. तो असा :– " शके १२२४ ॥ सुभक्रुत नाम संवत्सरे : ॥ : भाद्रपद वधि द्वादसि ॥ भटोबासांसी ईश्वरदर्शन जालें : ॥" (स्मृ. २६०). नागदेवाचार्यांच्या मृत्यूचा वरील सांप्रदायिक शक मान्य करता येत नाही. कारण एक तर ' मी वर्तें तवं मऱ्हाटें वर्तैल ' अशी भविष्यवाणी त्यांच्या तोंडून परचक्राच्या प्रसंगी निघालेली आहे (स्मृ. ८६), आणि मुख्य म्हणजे रामदेवराव यादवाच्या मृत्यूच्या वेळी ते जिवंत होते याचा पुरावा ' स्मृतिस्थळा 'तच कामाइसेच्या अग्निप्रवेशाच्या स्मृतीत मिळतो (स्मृ. १४९). आता रामदेवरावाचे लेख शके १२३२ पर्यंतचे मिळतात, त्या अर्थी तोपर्यंत तो जिवंत होता, इतकेच नव्हे तर राज्यावर होता. पुरुषोत्तमपुरी ताम्रपट शके १२३२ चा आहे. ' मऱ्हाटें ' म्हणजे यादवांचे राज्य शके १२३४ मध्ये नष्ट झाले. याचा अर्थ नागदेवाचार्य शके १२३२ ते ३४ च्या मध्यंतरी केव्हातरी निधन पावले. म्हणजे त्यांचा अंतकाल सांप्रदायिक शकाच्या सुमारे

दहा वर्षांनी पुढे जातो, व त्यामुळे 'स्मृतिस्थळा'त दिलेली त्यांच्या आयुष्य-मानाची विभागणीही थोडी बदलावी लागते. या नवीन कालगणनेप्रमाणे ते गोविंदप्रभूंच्या पश्चात् १६ नव्हे तर सुमारे २५ वर्षे जिवंत होते व त्यांनी एकूण ६० नव्हे तर सुमारे ७० वर्षे 'राज्य केले' असे ठरते.

## 'स्मृतिस्थळ'पूर्व नागदेव

'स्मृतिस्थळ' या ग्रंथाचा विषय नागदेवाचार्य किंवा भटोबास हा असल्यामुळे प्रथम त्यात आलेले त्यांचे चरित्रचित्र पाहिले पाहिजे. 'स्मृतिस्थळा'त भटोबासांचे दर्शन घडते ते नागदेवाचार्य म्हणून, महानुभाव पंथाचे पहिले आचार्य म्हणून. त्यापूर्वीचा त्यांचा इतिहास 'लीळा-चरित्रा'वरून कळतो. पूर्वायुष्यात 'मोकळा कासवटा' आणि केसांची 'आडवी वेणी' घालून फिरणारा नागदेव हा अनेक 'ढांढाळां'त म्हणजे व्यसनांत रमणारा एक छंदीफंदी मनुष्य होता. पण आपले पूर्वाश्रमींचे गुरु दादोस यांच्याकडून चक्रधरांचे नाव एकून त्याने त्यांची एक नव्हे तर सहा भेटी घेतल्या व त्यांत त्यांच्या ईश्वरत्वाची प्रचीती आल्यावर अखेरीस तो त्यांना अनुसरला, म्हणजे त्याने त्यांच्याकडून त्यांच्या मार्गाची दीक्षा घेतली (ली. उत्तरार्ध १). या प्रसंगी त्याने स्वामींना जे 'भाखेचें पोफळ' दिले त्याला शेवटपर्यंत जागून त्याने त्यांची व त्यांच्या मार्गाची सेवा आपल्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत एकनिष्ठतेने केली. अर्थात् 'लीळाचरित्रा'त नागदेव किंवा भटोबास हे मुख्यतः चक्रधरांचे शिष्य किंवा भक्त म्हणून दिसतात व त्यांच्या अंगच्या अनेक गुणांचा प्रत्ययही त्यात येतो. उदाहरणार्थ, बुद्धिमत्ता, भावनाप्राधान्य, गुरुभक्ती, शरणागती, व्यवहारदक्षता, स्वाभिमान, मार्गप्रेम, इत्यादि. अनुसरणाच्या, म्हणजे दीक्षाग्रहणाच्या वेळी सर्व गोष्टी हडसून खडसून झाल्याच होत्या; पण त्यानंतर सुद्धा स्वामींनी त्यांची परीक्षा अनेक प्रसंगांनी पाहिली व प्रत्येक वेळी ते तिला पूर्णपणे उतरले. अनुसरणानंतर लौकरच भटोबासांना रिधपूरला श्रीगोविंदप्रभूंकडे पाठवून देऊन स्वामींनी सहा महिनेपर्यंत त्यांच्या वियोगदुःखाचा कस पाहिला. भटोबासांना स्वामींचा हा वियोग तीव्रतेने जाणवला असे 'आंगुळियां दीस

लेखीत असे ' या त्यांच्या उल्लेखावरून दिसते (ली. उत्तरार्ध २). येथून पुढे स्वामींची सेवा त्यांनी ईश्वरसेवा या भावनेने केली. कर्ते-करविते तेच अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. साधे नदीवर सांडवा बांधण्याचे काम; पण ते सुद्धा भटोबास ' करितें ते नेणों कोण असे ' या भावनेनें करीत ( ली. उत्तरार्ध १६). ' श्रीचक्रधरुचि ठावो ' अशी त्यांची वृत्ती झाली होती व तिला अनुसरून एकदा खेळीमेळीच्या दगडफेकीत स्वामींनी हातात गुंडा घेऊन 'आतां तुझा कोणु गा राखैल ?' असे आव्हानपूर्वक म्हणताच त्यांच्या तोंडून ' आतां माझा श्रीचक्रधरु राखैल ' असे आत्मविश्वासाचे उद्‌गार सहज बाहेर पडले (ली. उत्तरार्ध १४१). त्यांच्या गुरुभक्तीची कल्पना देण्यास ' उत्तरार्धा 'तील ' ज्वरनिवृत्ती 'ची एक लीळाही पुरेशी आहे (क्र. १०८). त्या वेळी तापाची ग्लानी आलेली असतानाही ते स्वामिकार्यासाठी नेवाशाला न जेवताच गेले व तेथे पोचल्यावर स्वामींनी आपल्यासाठी शिदोरी पाठवून दिली हे पाहून ' गोसावीयांसि माझी चिंता ' असे कृतज्ञतेचे उद्‌गार त्यांनी काढले. पूर्वायुष्यात त्यांनी अनेक छंदफंद केलेले असल्यामुळेच बहुधा स्वामींनी त्यांच्याविषयी बोलताना ' नखाग्रापासौनि केसाग्रवेन्हीं सुळबुळीत विकारें भरला असे ' असे म्हटले असेल. परंतु त्याबरोबरच ' परि पोरु सीहाणा : उमटों नेदी : वेडेयाचे विकार बाहिर प्रकटति : सिहाणेयाचे आच्छादेति ' असेही म्हणण्यास स्वामी चुकले नाहीत (ली. उत्तरार्ध ९६). पण भटोबास चतुर असल्यामुळे आपले विकार ते बाहेर दिसू देत नसत इतकेच नव्हे, तर स्वामींच्या सहवासात ते हळूहळू निर्विकार होत गेले व त्यामुळेच शेवटी 'आता हा पहिला पुरीकर नागदेव राहिलेला नसून माझ्या जवळिकेने तो अगदी निराळा झाला आहे ' असे स्वामींनाही म्हणावे लागले (ली. उत्तरार्ध ४७१). एका काळचा अनेक ' धांडाळां 'चा हा नागदेव, किंवा स्वामींच्या भाषेत त्यांचा ' वानरा, ' त्यांच्या सहवासात पार बदलून गेला व स्वतः स्वामींनीच त्याला आपल्या मार्गाचे पहिले आचार्यपद दिले हे केवढे आश्चर्य ! पण भटोबासांच्या बाबतीत ते घडून आले आणि ' तैसा तूं परतारकु आचार्या नव्हेसि कीं : तूं प्राणियांतें अनिष्टापासौनि काढुनि इष्टीं लाविता आचार्या कीं गा ' हे चक्रधरांचे तेव्हाचे शब्द ( ली. उत्तरार्ध ४७७ ) त्यांनी आपल्या कृतीने सार्थ करून दाखविले.

भटोबासांच्या चरित्रातील या आचार्यपदपूर्व कालखंडाचा पहिल्याच स्मृतीत थोडक्यात आढावा घेऊन 'स्मृतिस्थळ'कारांनी त्याचे सार पुढील शब्दांत मार्मिकपणे सांगितले आहे. ते म्हणतात, "योग्य जाले : घडिले : मढिले : आचार्य करूनि माहादाइसे निरोवीली : मग गोसावीयांसि प्रवृत्यंतर जालें" (स्मृ. १). याप्रमाणे श्रीचक्रधरांसारख्या अवतारी पुरुषाच्या अनेक भेटी घेऊन त्याच्या ईश्वरत्वाची पूर्णपणे प्रतीती आल्यावर त्याला सर्वस्वाने अनुसरलेल्या व त्याच्या निकट सान्निध्यात उणीपुरी साडेतीन वर्षे काढून त्याचे 'अधिकरण' म्हणवून घेण्यास पात्र ठरलेल्या नागदेवाचार्यांचे त्यापुढील चरित्र 'स्मृतिस्थळ' सांगत आहे.

## 'स्मृतिस्थळा'तील नागदेवाचार्य

चक्रधरस्वामींच्या त्रिविध परिवारात भटोबास हे त्यांना अनुसरलेल्यांपैकी एक होते. पण 'प्रवृत्तीचा विशेष' त्यांच्या ठिकाणी असल्यामुळे आणि मुख्य म्हणजे ते मुळापासून घडून-मढून तयार झालेले असल्याने त्यांचे चरित्र 'स्मृतिस्थळ' आवर्जून सांगते (स्मृ. १). त्यात दिसून येणार त्यांचा पहिला मोठा गुण म्हणजे त्यांची चक्रधर-निष्ठा. स्वामींच्या निर्याणाने ते दु:खाने वेडे झालेले असतांना महादाइसे त्यांना गोविंदप्रभूकडे जाण्याचे सुचविते तेव्हां ते तिला स्पष्टपणे म्हणतात, "नेणों मा तुझा श्रीप्रभु : माझा देवो तो श्रीचक्रधरु:" (स्मृ. ३). स्वामिवियोगाचे हे दु:ख पुढे सुमारे पंधरा वर्षानंतरही त्यांच्या मनात तितकेच तीव्र होते याची साक्ष डोंबेगावच्या देवळातील स्वामींनी पीक टाकलेला चिरा पाहून ते व्यथित होतात त्या प्रसंगाने मिळते (स्मृ. ६). इतकेच काय, पण पुढे पैठणास आल्यावर तेथील स्वामींची स्थाने नमस्कारून ते लगोलग पुढे जाऊ इच्छितात; याचे कारण 'पैठण-रुधिपुरींचे भात मज वेळवति ना' असे तेच सांगतात (स्मृ. २०१). ही स्वामिनिष्ठाच त्यांच्या तोंडून "यें सृष्टीमध्यें येणें अवतारें श्रीचक्रधरें जो नुधरे तो कहींचि नुधरे" हा निर्धार त्रिवार वदविते (स्मृ. ३५). श्रीचक्रधर आणि त्यांची परंपरा यांच्याविषयी भटोबासांच्या मनात इतका अपार प्रेमादर आहे, की शपथ घेताना सुद्धा ते नेहमी 'गुरुकुळाची आण' वहातात (स्मृ. १११). त्यांचे शिष्य

त्यांना 'हां जी भटो' असे न म्हणता नुसते 'भटो' असे म्हणून संबोधीत. त्याचा खुलासा त्यांनी स्वतःच "जी जी ही वचने ईश्वरासंबंधी योजावयाची, माझ्यासारख्या जीवासंबंधी नाही" असा केला आहे (स्मृ. १२६ ). तसेच एखाद्या प्रसंगी आपले सांगणे आणि स्वामींचे वचन यांत विरोध आला तर 'गोसावीं म्हणितलें तेंचि करीं' असे ते आपल्या शिष्यांना स्पष्टपणे सांगत (स्मृ. ५९). कोणी संस्कृत भाषेत प्रश्न केला तर स्वतःला संस्कृत येत असूनही चक्रधरांचे धोरण लक्षात घेऊन "मला हे अस्मात्-कस्मात् कळत नाही. मज श्रीचक्रधरें निरूपिली मऱ्हाटी; तेव्हा काय ते मराठीत विचारा" असे ते निःसंकोचपणे सांगत (स्मृ. ६६). 'आपल्याला स्वामींचे सान्निध्य लाभले, त्यांनी आपले कोडकौतुक केले, म्हणून आपण त्यांना अनुसरलो हे ठीक झाले; पण आता ही नवीन मंडळी त्यांना न पाहताच अनुसरतात त्यांचे काय ?' असा प्रश्न एकदा महादाइसेने केल्यावर भटोबास तिला आत्मविश्वासाने म्हणाले, "जी गति स्वामींच्या सन्निधानातील भक्तांना तीच त्यांच्या पश्चातच्या भक्तांनाही होईल यात मुळीच शंका नाही." (स्मृ. १७५). स्वामींचे शब्द त्यांना इतके शिरोधार्य आहेत की कोणी ते उज्जैनीत वगैरे आहेत अशी वार्ता आणली तरी सुद्धा 'आता पुढील भेट नवीन अवतारात' या त्यांच्या वचनावर पूर्ण श्रद्धा ठेवून ते स्वतः तर तिकडे जाण्याचे मनातही आणत नाहीतच, पण इतरांनाही तसे करण्यापासून परावृत्त करतात (स्मृ. १३२, २३२). मग चक्रधरांसारखा दिसणारा कोणी समोर आला तर ते इतरांप्रमाणे हुरळून जात नाहीत यात नवल नाही (स्मृ. १९२). तसेच देवगिरीच्या एका वेश्येच्या घरचा पोपट हा ईश्वरावतार आहे हे ठाऊक असूनही तो 'विहित' अवतार नसल्यामुळे ते त्याचा विचारही करीत नाहीत (स्मृ. २१०). स्वतःच्या या चक्रधरनिष्ठेची जाणीव असल्यामुळेच, आपण त्यांनी सोपविलेली आचार्यपदाची जबाबदारी निष्ठेने सांभाळीत असतांना शेवटी आपणास ज्वर का यावा हे त्यांना कळत नाही व त्या प्रसंगी ते 'सिंहावलोकन' करू लागतात. त्यात त्यांना समाधान लाभते व त्या भरात 'हा मी श्रीचक्रधराचा वानरा !' असे आत्मप्रत्ययाने म्हणून ते स्वामींच्या

नावाचा जयजयकार करतात (स्मृ. २५७). अखेरच्या क्षणीही निरवणुकीच्या गोष्टी न करता स्वामींच्या तोंडची वचने कानावर पडावी असे त्यांना वाटते व त्याप्रमाणे दामोदरपंडिताशी ते 'सूत्रपाठा'तील काही भागावर चर्चा करतात. शेवटी तेही थांबते आणि चक्रधरांना आठवीत ते देह ठेवतात (स्मृ. २५९, २६०).

अशी भटोबासांची 'स्वामि'निष्ठा आहे. जिव्हाळ्याची, पण डोळस. त्यांच्या ध्यानीमनी एक 'गोसावी' आहेत, त्यांचे शब्द आहेत. ते बोलतात तेंही स्वामिवचनांच्या आधारेच, भाष्य करतात तेही त्यांवरच. भटोबासांची धारणाशक्ती चांगली होती. स्वामींचे शब्द त्यांनी आपल्या हृदयसंपुटात साठवून ठेवले होते. म्हणूनच 'उत्तरार्धा'त एका प्रसंगी स्वामींनी 'अवघेयांची निवणीं खोकरें : वानरेसाचें निवणें निर्गळ' असा अभिप्राय त्यांच्याविषयी व्यक्त केला होता (ली. ८८). तसेच एकदा पैठणला मुक्काम असतांना चक्रधरस्वामी आपल्या शिष्यांना म्हणाले होते, "माझ्या पश्चात् तुम्ही माझ्यासारख्या दिसणाऱ्या कोणाच्या तरी मागे जाल झालें !" त्यावर कोणी त्यांचे सौंदर्य, तर कोणी त्यांच्या कपाळावरील वण याप्रमाणे स्वामींना ओळखण्याच्या खुणा सांगितल्या. एकटे भटोबास म्हणाले, की "आम्ही आपल्या गोसाव्यांना त्यांच्या शास्त्राने, म्हणजे तत्त्वज्ञानाने ओळखू. कारण, 'आमचेया गोसावीयाचें शास्त्र कव्हणी ठाइं नाहीं :" (ली. उत्तरार्ध ३७६). चक्रधरांच्या 'शास्त्रा'वरील त्यांची ही निष्ठा 'स्मृतिस्थळा'तही पदोपदी दिसते. 'दासबोध' हे जसे रामदासस्वामींचे 'स्वतःसिद्ध स्वरूप', त्याप्रमाणे 'सूत्रपाठ' हा महानुभावांचा 'वचनरूपी परमेश्वर'च असून (स्मृ. २५०), त्याची चर्चा करणे हे 'अटना'च्या योग्यतेचे आहे (स्मृ. २५१) अशी भटोबासांची दृढ श्रद्धा होती. त्यामुळे 'स्मृतिस्थळा'त चक्रधरांच्या सूत्रांचा आधार घेतांना ते पदोपदी दिसतात (उदा०, स्मृ. २१, २७, ३७, ४५, १३२, १५२, २०६, इ०). परचक्र आले असतांना साधेला अशक्त भक्तमंडळींना घेऊन परळी येथे ठेवण्यात व दामोदरपंडितांना प्रथम गाणे वर्ज्य करण्यात त्यांनी असाच स्वामिवचनांचा आधार घेतला आहे (अनुक्रमे स्मृ. ८४, ८९). कधी ते या वचनांचे भाष्यकार होऊन

स्वामींच्या मनातील अभिप्राय स्पष्ट करून सांगतात आणि सर्वांचे शंका-समाधान करतात. उदाहरणार्थ, एकदा त्यांना तहान लागली असताना एकाने त्यांच्यापुढे डबक्यातील पाणी केले आणि वर 'भटो : बोडी गंगा समान सांघितलें कीं' असे म्हणून सूत्राचा आधार दिला. तेव्हा भटोबास म्हणाले, "डबक्यातील पाणी आणि गंगाजळ सारखे हे तत्त्व स्वतःसाठीं आहे, दुसऱ्यासाठी नव्हे. 'पुढीलासि संपादितां बोडी ते बोडीचि : गंगा ते गंगाचि :" (स्मृ. २८). तसेच एकदा 'जवं जवं जाणता तवं तवं नेणता' या चक्रधरांच्या वचनाचा अर्थ त्यांनी दामोदरपंडितांना मोठ्या मार्मिकपणे सांगितला (स्मृ. ६७). मात्र त्याबरोबरच स्वामींचे 'हे शास्त्र आपुलीया 'वेधयुक्ती न घोकावें', कारण केवळ पोथीतील अक्षरे वाचून परमेश्वराचा वेधबोध' होणार नाही; त्यासाठी गुरुमुखच पाहिजे अशीही त्यांची श्रद्धा होती (स्मृ. २०७).

त्यांच्याकडे आलेले मार्गाचे आचार्यपदही भटोबासांनी शेवटपर्यंत निष्ठेने व सेवाबुद्धीने सांभाळले. तसे करताना आपण स्वामींचे एक अधिकृत पाइक आहो, स्वतंत्र आचार्य नाही, ही भावना त्यांनी कधीही दृष्टीआड केली नाही. गंगाजलानेच गंगेची पूजा करावी त्याप्रमाणे 'परमेश्वर आपुली ब्रह्मविद्या देउनि अधिकरण करीति : मग आपुलें ज्ञान आपणचि आइकेति' याची त्यांना चांगला जाणीव होती (स्मृ. ४८). म्हणूनच एका प्रसंगी आपल्या शिष्यांना उद्देशून ते म्हणाले, की स्वामींनी आपणास 'अधिकरण' केले म्हणून आपण सर्वांचे गुरु, एरव्ही सर्वजण स्वामींच्या दृष्टीने श्रेष्ठच! (स्मृ. ९३). आपण त्यांची मुद्रा वागविणारे एक पाइक आहो ही जाणीव स्वतः चक्रधरांनीच भटोबासांच्या ठिकाणी निर्माण केली होती. आचार्यत्व किंवा अधिकरणपद देतांना ते त्यांना म्हणाले होते, "बोधदाता काइ तूं ? बोधदाता तो परमेश्वर" (स्मृ. १११, ली. उत्तरार्ध ४७८). ही जाणीव सतत बाळगल्यामुळे भटोबासांच्या दृष्टीसमोर नेहमी स्वामींचा सबंध 'मार्ग' किंवा पंथ असे व त्याची चिंता ते करीत. स्वामींनी प्रसाद म्हणून दिलेले वस्त्र इंद्रभट गुरुकुळास देत नाहीत हे पाहून ते स्पष्टपणे म्हणाले, "फुटा (वस्त्र) काइ त्याचेया बापाचा ? तो गोसावी असेखा

..२

गुरुकुळाचेया हेतु दीधला असे" (स्मृ. ६९). तसेच एकदा केसोबासांनी एक मोहाचा प्रसंग कौशल्याने टाळला तेव्हा सुद्धा भटोबासांनी त्यांची पाठ थोपटली ती त्यांनी 'मार्गातें राखिलें' म्हणून! (स्मृ.१०५). आणि पुढे चक्रधरांसारख्या दिसणाऱ्या ज्या एका तोतयाच्या बंडातून पंथ वाचला तेव्हाही त्यांच्या तोंडून 'मढु नागवला होता' असे आपल्या पंथाची काळजी वहाणारेच उद्गार निघाले (स्मृ. १९२). 'चिंता करितों विश्वाची' असे म्हणणाऱ्या रामदासांप्रमाणे भटोबास म्हणाले असते, 'चिंता करितों मार्गाची!' कोणी रिधपुरास निघाले तर ते त्याला प्रथम गोविंदप्रभूंच्या मानलेल्या लेकीला भेटून मग पुढे जाण्यास सांगत, आणि स्वतःहीं त्याप्रमाणेच करीत (स्मृ. १७८, १९०, १९१). केसोबासांनी स्वामींच्या तोंडच्या वचनांचे संकलन करून 'सूत्रपाठ', 'दृष्टान्तपाठ' वगैरे ग्रंथ सिद्ध केले हे पाहून भटोबासांना आनंद झाला तो आपले शास्त्र, म्हणजे तत्त्वज्ञान पक्के झाल्याचा! त्या प्रसंगी ते म्हणाले, "मज मागां शास्त्र जाये ना ऐसें तुवां केलें: येणें शास्त्रें पुढां मार्गाचे झगडे तुटतील:" (स्मृ. २२५). सारांश, मार्ग किंवा पंथ मुख्य, आपण गौण, ही जाणीव भटोबासांनी सतत ठेवली व त्यामुळेच त्यांच्या कर्तृत्वाला तेज आले. ही आचार्यत्वाची, मठपतीची धुरा त्यांनी फार कसोशीने सांभाळली. त्यासाठी ते पैशाअडक्यापासून अलग राहिले. 'तापसाचा हात' त्यांनी विटाळू दिला नाही (स्मृ. ५०). तसेच कोणी परमार्थात निश्चयाने पुढे पाउल टाकले तर त्यांनी त्याला मागे ओढले नाही. अशाच एका प्रसंगी वैराग्याचा निर्धार करणाऱ्या तरुण रामदेवास अनुलक्षून ते म्हणाले, "हा जेहीं पाउलीं उठिला आहे तें मी याचे पाये काइसेया मोडीन?" (स्मृ. ५६). मनुष्यस्वभाव सर्वत्र सारखाच असल्यामुळे त्यांच्या शिष्यवर्गात क्वचित् कुरबुरीही होत आणि त्यांत त्यांना 'बुझावणी' करावी लागे. आचार्यपदाची ही बाजूही त्यांनी चांगली सांभाळली असे काही प्रसंगांवरून दिसते (उदा०, स्मृ. ६४). सर्वात मुख्य म्हणजे आपले हे आचार्यत्व त्यांनी कोणास बोचू किंवा खुपू दिले नाही. एकदा दुष्काळ पडल्या वेळी भिक्षा थोडी येते हे पाहून त्यांनी आपल्या 'म्हातारदामा'चा उपयोग करून त्यातून आपली भिक्षा शिष्यांना घ्यावयास लावली (स्मृ. १०७). आणि शेवटी 'गोसावीयांचा व्यापारु

चालवितां कोण्हा माझें वेकास गेलें असैल : तरि तुम्हीं समस्तीं क्षेमा करावी' असे शिष्यवर्गाला हात जोडून म्हणून त्यांनी सर्वांचा अखेरचा निरोप घेतला (स्मृ. २५९). आचार्य नागदेवांचे हे अखेरचे दर्शन जितके धीरोदात्त तितकेच करुणरम्यही आहे.

आचार्यांची ही भूमिका पार पाडतांना भटोबासांना प्रसंगी कठोर व्हावे लागले आहे व शिष्यवर्गाच्या हितासाठी आणि पंथाच्या शिस्तीसाठी ते कठोर झालेही आहेत. मठाचा पैसा-अडका नीट सांभाळला नाही (स्मृ ५०), जेवणाच्या पंगतीत वाढप बरोबर केले नाही (स्मृ. ६६), आपले महात्मेपण कोणास विकले (स्मृ. ८२), मठात राहून शृंगारचेष्टा केल्या (स्मृ. ९५), आपल्याला न विचारता कोणी अधिकपणाने वागले (स्मृ. ११०), आपल्या वक्तृत्वाने 'मार्गा'बाहेरील लोकांना वेध लावला (स्मृ. १२०), नीट-नेटकी वस्त्रें परिधान करून मिरवले (स्मृ. १२२), सदा सर्वकाळ चर्चाच केली (स्मृ. १२४) किंवा कटकटी करीत बसले (स्मृ. १६१), एकदा 'मार्गा'त आल्यावर पुन्हा आप्तजनांशी संबंध ठेवला (स्मृ. २०६), किंवा मठातील भाजीपाल्याची नासधूस केली (स्मृ २१३), तर अशा प्रसंगी भटोबास शिष्यांवर रागावले आहेत, त्यांनी त्यांना 'सिक्षापन' केले आहे. पण त्याबरोबरच त्यांचे आपल्या शिष्यवर्गावर प्रेमही आहे व त्याची काळजीही ते वहातात. भानुभटाने त्यांना साधी सुपारी फोडून दिली तर ते त्याला आपला 'पोफळ–फोडणा' म्हणून गौरवितात (स्मृ. १५८), जिला तिच्या भांडखोर स्वभावामुळे त्यांनी घालवून दिले त्या रंभाइसेसाठी ते भोजनप्रसाद आवर्जून बाजूला काढून ठेवतात (स्मृ. १६२), तरुण रामदेव अंगात ताप असताना निष्ठेने विजनाला गेलेला पाहून केसोबासांना त्याच्या-वर लक्ष ठेवायला मागोमाग पाठवितात (स्मृ. ५९, ६०), साधे थकली हे पाहून तिच्यासाठी मठी बांधवितात (स्मृ. ६५), केसोबासांना बुद्धिमांद्य आले असताना त्यावर विशेष उपाययोजना सांगतात (स्मृ. ७१), दुष्काळात भिक्षा कमी येते हे पाहून भिक्षेला स्वतः हातभार लावतात (स्मृ. १०७), आणि चौऱ्याशी नरकांचे वर्णन ऐकून खिन्न झालेल्या साधेला परमनिष्ठ पुरुषाविषयी सांगून धीर देतात (स्मृ. २२०). वरील सर्व उदाहरणे

भटोबासांच्या शिष्यप्रेमाची आहेत. ते शिष्यपरीक्षाही अचूकपणे करीत. केसोबासांचे पहिले गुरु केशवाचार्य हे अनधिकारी असल्यामुळे भटोबासांच्या मनातून त्यांना दीक्षा देण्याचे नसले तरी केसोबासांच्या भिडेमुळे त्यांनी त्यांना दीक्षा दिली; परंतु लौकरच केशवाचार्य आपल्या मूळ पदावर आले व त्यामुळे भटोबासांना त्यांना 'जा' म्हणून सांगावे लागले (स्मृ. ११७–११८). त्याबरोबरच ते आपल्या शिष्यांना परमार्थ करण्यात प्रोत्साहनही देतात. तरुण रामदेवांचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांचे निर्धाराने परमार्थात पुढे पडणारे पाऊल मागे ओढणे भटोबासांना अनुचित वाटले (स्मृ. ५६). 'गीत विखो' असे सूत्र असतांना, दामोदरपंडितांचे गाणे भक्तीला पोषक होते हे पाहून त्यांनी 'पंडिताचें गीत ते माझे हाकारे गा' या शब्दांत त्यांचा गौरव केला (स्मृ. ९१), केसोबासांनी मोहाला तोंड देऊन आपल्या 'मार्गा'ची प्रतिष्ठा राखली याबद्दल त्यांची पाठ थोपटली (स्मृ. १०५), त्यांनी रचिलेले 'रत्नमालास्तोत्र' पाहून 'भले केलें केशवदेवा : तुवां वाक्पुष्पीं ईश्वरार्चन केलें' असे म्हणून त्यांचा गौरव केला (स्मृ. १४), इतकेच काय पण रानात एक भिक्षू ध्यानस्थ बसलेला पाहून त्याला दुरून प्रेमादराने दंडवत घातले (स्मृ. २२७). हे सर्व करण्यात भटोबास आपली आचार्यांची भूमिकाच पार पाडीत होते व तसे करतांना त्यांना व्यापक सहानुभूती ठेवावी लागत होती. जणु स्वामींचीच अपार करुणा त्यांच्यातही दाटून राहिली होती व त्यामुळे हे आचार्यपद सांभाळतांना कित्येकदा ते भावविवशही होतात. वृद्धांना अनुसरणाचा अधिकार नाही हे ठाऊक असूनही खेइभटांची निष्ठा पाहून ते कारुण्यबुद्धीने त्यांना दीक्षा देतात (स्मृ. १००), स्वामींच्या निर्याणानंतर आपण दुःखाने वेडेपिसे होऊन भटकत असतांना महादाइसेने आपणास कडेखांद्यावर वाहून रिधपुरास श्रीप्रभूंच्या दर्शनास आणले हे तिचे उपकार आठवून गुरुकुलाबरोबर नेहमी तिचीही आण घेतात (स्मृ. १११), आणि म्हाइंभटांच्या निधनसमयी त्यांच्या जवळ बसून 'तुम्हा जरि देवो नव्हे तरि कोण्हाही नव्हे' असे आश्वासन देऊन त्यांचे समाधान करतात (स्मृ. १९८). हे सर्व करीत असतांना भटोबासांना आपले आचार्यपद विसरूनही

चालण्यासारखे नव्हते. त्यामुळे ते सांभाळतांना त्यांना चातुर्य (Tact) या गुणाचा अवलंब वारंवार करावा लागला आहे. याचे एकच उदाहरण द्यावयाचे तर इंद्रभटाने बळकावलेले स्वामींच्या प्रसादाचे वस्त्र त्यांनी ज्या युक्तीने त्यांच्याकडून गुरुकुळास देवविले त्या प्रसंगाचे देता येईल (स्मृ.६९).

येथवर भटोबासांचे चित्रण केले ते महानुभाव पंथाचे पहिले आचार्य या दृष्टीने केले. व्यक्तिशः पाहताही त्यांचे व्यक्तिमत्त्व डोळयांत भरण्यासारखे आहे. मुख्य म्हणजे ते स्वतःला चांगले ओळखून आहेत. चक्रधरांनी त्यांच्याकडे आचार्यपद दिले असले तरी त्यांना स्वतःच्या मर्यादांची चांगली जाणीव आहे. म्हणूनच ते स्वतःला योगभ्रष्टही म्हणवून घेण्यास तयार नाहीत (स्मृ. १९). तसेच कोणी त्यांच्या पायांवर डोके ठेऊन दंडवत केले किंवा त्यांचे पाय धुवून पायवणी घेतले तर त्याला भटोबासांचा विरोध असे. कारण त्यांच्या दृष्टीने तो अधिकार फक्त ईश्वरी अवताराचा असून ते तर 'ईश्वराचे भक्त' होते (स्मृ. १२७–१२९). तसेच, अंगी वैराग्य बाणले असल्यामुळे निस्पृहता त्यांच्या ठिकाणी सहजच आली आहे. शिष्यांनी आपली श्रीमंती थाटाची पूजा केली तर तिचा स्वीकार करताना ते संकोचतात, इतकेच नव्हे तर डोळयांत आसवे आणून म्हणतात, "असतीपरी[१] ते काइ माझेया बापासि विहिली ?" (स्मृ. ४०). या वैराग्याच्या बळावरच त्यांनी रसनाही जिंकली होती. एकदा त्यांच्या पानात तुपाऐवजी चुकून करडईचे तेल वाढले गेले तेव्हा जेवतांना ते म्हणाले, "करडेल यैसा कांही मी स्वादु जाणें तरि रूपैची आण !" (९३). इतके ते 'नीरस' होऊन गेले होते. याचा अर्थ त्यांची रसिकता मेली होती असा नव्हे. जो मूळचा रसिक तो अखेरपर्यंत रसिकच राहणार या नियमाला भटोबास झाले तरी अपवाद नव्हते. इतकेच की चक्रधरांच्या पवित्र सहवासात त्यांच्या रसिकतेने निराळे वळण घेतले होते. छंदीफंदी जीवनाकडून ती विरक्त, भक्तिमय जीवनाकडे वळली होती. म्हणूनच आता भास्कर कवीश्वरांचे भागवतावरील रसाळ व्याख्यान ऐकताना भटोबासांचे अंतःकरण

---

१. साधकाचे आचरण कसे असावे याविषयी चक्रधरांनी केलेला उपदेश असणारे 'सूत्रपाठा'चे एक प्रकरण.

द्रवे, ' चंद्रमय ' होई (स्मृ. १२०). त्यांचे अंतरंग पुढेपुढे इतके भक्तिरसमय होऊन गेले होते, की त्याचे पडसाद त्यांनी भिक्षेसाठी उच्चारलेल्या शब्दात उमटे व तो ऐकून घरातील रडणारी लेकरे आपला हट्ट विसरून त्यांच्याकडे तन्मयतेने पहात रहात. ते सर्वांना वेध लावीत म्हणूनच त्यांची प्रसिद्धी ' वेधवंती नागदेवभट ' या नावाने झाली होती (स्मृ. २१९). ही वेधशक्ती त्यांच्या रसिक अंतःकरणाचीच द्योतक आहे. ' गीत विखो ' असा चक्रधरांचा आदेश असूनही त्यांनी दामोदरपंडितांना गाण्याची अनुज्ञा दिली व त्यांचे गाणे हे आपले ' हाकारे ' आहे असे म्हटले ते याच वृत्तीमुळे (स्मृ. ९०, ९१ ).

भटोबासांच्या ठिकाणी बुद्धी व भावना यांचे मोठे मनोज्ञ मिश्रण आढळते. त्यांच्या बुद्धिमत्तेची कल्पना त्यांच्या तोंडून अनेक प्रसंगी निघालेल्या मार्मिक उद्‌गारांवरून येईल. एकदा एक महात्मा रुसून जेवलाच नाही. तेव्हा भटोबास त्याला म्हणाले, " अरे, तू रुसून बसलास म्हणून तुझी पचनक्रिया थांबणार का आहे ? " (स्मृ. ४३). तसेच एकदा एक तरुण साधक चक्रधरांच्या 'संबंधी' स्थानांचे वर्णन ऐकतांना कंटाळल्याप्रमाणे दिसला तेव्हा ते त्याला म्हणाले, " अरे, ही दोन पावलांची झाडी ओलांडली की पुढें आनंदाचे साम्राज्य आहे " (स्मृ. ५७). खेइभटांच्या ' लोहबद्ध गाडा मोकळा कसा होईल ? ' या प्रश्नाला त्यांनी दिलेले ' द्रावक भेटे तरि लोहासि झरा फुटे ' हे उत्तर असेच मार्मिक आहे (स्मृ. ९८). केसोबास, पंडितबास आणि राघोभट हे तिघेजण नेहमी एकत्र असत हे पाहून ' एकि मूर्ति त्रय भागा : राम पंडित केशवद्या ' हे भटोबासांनी काढलेले प्रासात्मक उद्‌गारही त्यांच्या बुद्धिमत्तेचेच द्योतक आहेत (स्मृ. २५३). त्याप्रमाणेच ' तूं शृंघारीया कवि ' या कवीश्वर भास्कराविषयीच्या त्यांच्या अभिप्रायातही त्यांची रसिकता व मार्मिकता ही एकवटली आहेत (स्मृ. २४२). भटोबासांचे आपल्या शिष्यवर्गाविषयीचे सर्वच अभिप्राय अत्यंत मार्मिक आहेत. उदाहरणार्थ, ' म्हातारी माझेया धर्मासि रक्षण गा : ' हा महादाइसेविषयीचा (स्मृ. १६८), ' हिराइये विरक्ताची कसवटी गा : ' हा हिराइसेविषयीचा (स्मृ. २४१), ' पंडितांचें गीत ते माझे हाकारे गा : ' हा दामोदराच्या गाण्याविषयीचा

(स्मृ. ९१), 'हा मज कानाखुरांसकट अनुसरला गा :' हा अनंतकोचा-विषयीचा (स्मृ. १८७), इत्यादि अभिप्राय पहावे. त्यांच्या या गुणाची उत्कृष्ट साक्ष म्हणजे त्यांनी एका प्रसंगी केसोबास व पंडितबास यांचे केलेले समर्पक वर्णन. त्या वेळी ते म्हणाले, " सर्वांगीं काइ देखणें असे ? देखणें तें डोळेनिचि कीं : तैसे तुम्ही माझे डोळे कीं गा पंडिता केशवद्या : " (स्मृ. ९५). 'वराड माहेर : गंगातीर सासुरें' हे म्हणण्यातही त्यांच्या वरील गुणाचा उत्कर्ष दिसून येतो (स्मृ. २४६).

असे हे बुद्धिमान भटोबास तितकेच भावनिष्ठही आहेत. डोंबेगावच्या देवळातील स्वामींच्या पिकेचा चिरा पाहून ते स्वतः तर शोकाकुल होतातच; पण त्यामुळे बाइदेवाची झालेली अवस्था पाहून त्यांना अधिकच दुःख होते (स्मृ. ६). तसेच नाथोबाने जेथे देह ठेवला ती भूमी 'सत्त्वस्थ' असल्याने ते आपले आंथरूण तेथे घालण्यास सांगतात (स्मृ. २२४). त्यांच्या स्वतःच्या निधनाचा प्रसंग तर अत्यंत भावपूर्ण असून तेथे स्वामींचे कार्य पुढे चालवितांना आपल्या हातून कोणी दुखावले गेले असेल तर त्यांची हात जोडून क्षमा मागणारे भटोबास म्हणजे भक्तिभावाची व कारुण्याची मूर्तिच वाटतात (स्मृ. २५९). क्वचित् ते परखड दिसले (उदा., स्मृ. ४५, ९९, १५२, २१५), तरी त्यांच्या ठिकाणी नम्रताही आहे. एकदा कोणीतरी त्यांना विचारले, " भटो, तुम्ही काइ ईश्वर ? " त्यावर ते म्हणाले, " ना : आम्ही ईश्वराचे भक्त " (स्मृ. १२९). तसेच म्हाइंभट निधनसमयी त्यांचा पाय आपल्या कपाळावर ठेवू लागले तेव्हा भटोबास त्यांना तत्परतेने म्हणाले, " निडळावरि श्रीचरणु तो गोसावियांचा कीं : मियां निडळावरि हातु ठेवावा कीं : (स्मृ. १९८) रिधपूर आणि पैठण ही अनुक्रमे श्रीप्रभू व चक्रधरस्वामी यांची चरित्रस्थाने असल्यामुळे तेथे त्यांना कोणाकडून नमस्कारही घेववत नसे (स्मृ. २०१). भटोबासांना स्वतःला पारमार्थिक अनुभवही असावा असे त्यांच्या एका प्रसंगीच्या उद्गारावरून वाटते. 'तुमची मूर्ती झळझळीत दिसते त्याचे कारण काय ?' असे एकाने विचारल्यावरून ते त्याला म्हणाले, " माझ्या देहरूपी मंदिरांत जी वस्तु आहे तिची ही झळझळ आहे " (स्मृ. १०२). त्यांच्या अंतर्ज्ञानशक्तीची साक्षही अनेक स्मृतींवरून मिळते (उदा., स्मृ. ३६, ७२, ८५, ८६, १४६, ३०).

## नागदेवाचार्यांचे कर्तृत्व

'स्मृतिस्थळा'त दिसून येणारे नागदेवाचार्यांचे कर्तृत्व दुहेरी स्वरूपाचे आहे. एक पंथीय व दुसरे वाङ्मयीन. पण वास्तविक पाहता त्यांचे वाङ्मयीन कार्य हे त्यांच्या पंथीय कर्तृत्वाचेच एक अंग असल्यामुळे या दोहोंचा विचार एकत्र करणेच सोयीचे होईल. महानुभाव मार्गाच्या किंवा पंथाच्या दृष्टीने विचार करता नागदेवांना चक्रधरस्वामींचा निकटचा सहवास उणीपुरी साडेतीन किंवा चार वर्षे लाभला होता व तेवढ्या अवधीत त्यांनी त्यांचे तत्त्वज्ञान संपूर्णतः आत्मसात् केले होते. किंबहुना, स्वामींच्या सान्निध्यात राहून ते मूलतः बदलून गेले होते असे "एथचिया जवळिका आन जाला असे:" या स्वतः चक्रधरांनी प्रयाण करण्यापूर्वी काढलेल्या उद्‌गारांवरून स्पष्ट होते (ली. उत्तरार्ध ४७१). म्हणूनच त्यांच्या मार्गाचे पहिले आचार्यपद नागदेवांकडे आले व तेही "तूं प्राणियांतें अनिष्टापासौनि काढुनि इष्टीं लाविता आचार्या कीं गा:" या स्वामींच्यां आशीर्वादासह (ली. उत्तरार्ध ४७७). स्वामींच्या सहवासात आल्यापासूनचा नागदेवाचार्यांचा हा उज्वल इतिहास लक्षात घेऊनच 'स्मृतिस्थळ' प्रारंभीच त्यांचा "योग्य जाले: घडिले: मढिले:" या शब्दांत गौरव करते (स्मृ. १). 'स्मृतिस्थळा'त दिसून येणारे त्यांचे कर्तृत्व वरील अभिप्राय सार्थ करणारे आहे. त्यांच्या आचार्यपदाच्या कालावधीत महानुभाव पंथाचा प्रसार पुष्कळ होऊन त्याला एक प्रकारचे सुसंघटित स्वरूप आले हे नागदेवाचार्यांचे मुख्य कार्य होय. ते साध्य करण्यासाठी त्यांना व्यापक व उदार धोरण ठेवावे लागले, समाजातील सर्व थरांशी सहानुभूती ठेऊन त्यांतील लहानथोरांना जवळ करावे लागले. म्हणूनच केसोबासांनी स्वामींची 'उद्धरण' सूत्रे संस्कृत भाषेत गुंफण्याची कल्पना काढली तेव्हा "नको गा केशवदेया: येणें माझिया म्हातारीया नागवतील" असे म्हणून भटोबासांनी त्यांना मोडून काढले (स्मृ. १५). आचार्यांनी घेतलेला हा मराठी भाषेचा कैवार एका दृष्टीने सर्व मराठी जनतेचा कैवार होता. ते शूद्रादिकांनाही आपल्या मार्गाची दीक्षा देत (स्मृ. ५३), आणि 'शिखासूत्रा'चे, म्हणजे ब्राह्मण्याचे स्तोम माजविणाऱ्या लब्धप्रतिष्ठितांवर त्यांचा राग होता (स्मृ. ११८, १८८) तो याच उदार

भूमिकेमुळे. इतकेच काय पण धर्माच्या बाबतीत कोणी कोणाचा शिष्य नाही, उलट धर्मच सर्वांचा गुरु, 'धर्मँ वडिलेंही धाकुटेयाचें म्हणितलें करावें' अशी त्यांची भूमिका होती (स्मृ. ९६). पंथ किंवा संप्रदाय म्हटला की त्यात पुढाऱ्याकडून लोकसंग्रह व संघटना यांची अपेक्षा असतेच व तीही नागदेवाचार्यांनी पुष्कळ प्रमाणात पूर्ण केली असे दिसून येते. उदाहरणार्थ, मठात राहून शृंगारिक चाळे करणाऱ्या दांपत्यास, केसोबास व पंडितबास यांचा विरोध असतानाही, त्यांनी केवळ लोकसंग्रहाच्या बुद्धीने काही वेळ राहू दिले. त्यात हेतू हा, की "हळुहळु गुणा येतील (म्ह. मार्गावर येतील): ना तरि आपुलां अवगुणीं जातील:" (स्मृ. ९४). तसेच आपणाकडून दीक्षा घेतल्यामुळे निंदेचा विषय झालेल्या देमाइसेला तिच्या गावी पाठवून निंदकांचे तिच्या आचारनिष्ठेच्या दर्शनाने समाधान करविणे (स्मृ. १३४), डिडोरीचे गोविंद पंडित व अपर रामदेव यांच्यातील विरोध फेडून त्यांची 'बुझावणी' करणे (स्मृ. ६४), यांसारख्या स्मृतींतून ही लोकसंग्रहाचीच वृत्ती दिसते. मार्गात संघटना पाहिजे व त्या दृष्टीने त्यांनी 'सांघातधर्मा'वर दिलेला भर पाहण्यासारखा आहे ("म्हणौनि सांघातु देयावा : करावा :' स्मृ. २३४; "एकांकी पुरुषु आचारु करितां त्रसे : मैळे : बहुतांमाजीं जिज्ञासीतां उजळे :" स्मृ. २३५). नागदेवाचार्यांनी पंथाचा प्रसार केला, तशीच त्याची काळजीही वाहिली. पंथीयांना समाजात निष्कारण त्रास होतो हे पाहून त्यांनी त्यांच्यासाठी 'महात्मावेष' योजिला (स्मृ. ३०), आपल्या मागे चक्रधरांचे परशास्त्र जाऊ नये व मार्गात त्यावरून निष्कारण झगडे होऊ नयेत म्हणून त्यांनी केशवपंडितांकरवी त्या शास्त्राला अक्षरबद्ध करून व्यवस्थित आकार दिला (स्मृ. २२५), आणि स्वतःच्या आचार्यत्वाचे स्तोम न माजविता सर्वांना मेघवृष्टीने उपदेश केला (स्मृ. २२८). मात्र हे पंथाचे' कार्य करतांना त्यांनी तारतम्याचा किंवा सारासाराचा विसर स्वतःला कधीही पडू दिला नाही. म्हणूनच केशवाचार्यासारख्या अनधिकारी गुरूंना 'भिक्षा', म्ह. संन्यासदीक्षा देण्यास ते सहसा तयार होत नसत (स्मृ. ११७). कारण त्यांना पंथात खोगीरभरती करावयाची नव्हती. तसेच त्यांना बायकांचे बंडही माजवावयाचे नव्हते. कारण पूर्वी स्वामींच्या बाबतींत त्यामुळे

लोकापवादाचे मोहोळ कसे उठले व त्याचे परिणाम काय झाले तो इतिहास आचार्यांच्या मनात ताजा होता. म्हणूनच एका प्रसंगी त्यांनी " वरैताचिया (म्ह. विवाहित) बाइलां आणि लेकुरवाळियां मी भीक्षा देऊं भीत असे :" असे स्पष्टोद्गार काढले होते (स्मृ. ४९). तात्पर्य, दृष्टीसमोर सतत पंथ असल्यामुळे नागदेवाचार्यांनी आपले सर्वस्व त्यासाठी दिले आणि 'जन्मजीवित परमेश्वरा देयावें' हे चक्रधर-सूत्र (आचार ६८) खरे करून दाखविले.

ग्रंथनिर्मितीस प्रेरणा देऊन त्या कामी सर्वांना मार्गदर्शन करणे हे जे नागदेवचार्यांचे दुसरे कार्य ते वरील व्यापक कार्याचेच एक महत्त्वाचे अंग आहे. त्यांच्याकडून ग्रंथनिर्मितीची प्रेरणा मिळालेल्या लेखकांत मुख्यतः राजूरचे लक्ष्मीधरभट, केशवपंडित किंवा केशिराज बास व म्हाइंभट हे तिघेजण येतात. पैकी लक्ष्मीधरभटांनी 'आचारविचार लक्षणें' भटोबासांना 'पुसपुसों' केली असे १० वी स्मृती सांगते. केशिराज बासांनी रचिलेले 'रत्नमाला' स्तोत्र त्यांना इतके आवडले, की ते ऐकून त्यांनी " भलें केलें केशवदेया : गोसावीयांचीया अमोघा लीळा बांधलीया : तुवां वाक्पुष्पीं ईश्वरार्चन केलें " या शब्दांत त्यांचा गौरव केला (स्मृ. १४). या प्रसंगाने केशिराजांची प्रतिभाशक्ती त्यांच्या ध्यानात आली व त्यामुळेच त्यांनी त्यांना 'शास्त्रप्रकरणान्वय' लावण्यास, म्हणजे चक्रधरोक्त सूत्रांची व्यवस्थित मांडणी करण्यास संमती दिली. केशिराजांच्या या उद्योगातूनच पुढे 'सूत्रपाठ' व 'दृष्टान्तपाठ' हे दोन अमोल ग्रंथ निर्माण झाले (स्मृ. १६–१७). म्हाइभटांचा 'लीळाचरित्र' हा प्रसिद्ध ग्रंथराज तर नागदेवचार्यांच्या मार्गदर्शनानेच सिद्ध झाला. म्हाइंभट शोधून आणलेल्या स्वामींच्या लीळा भटोबासांपाशी संवादीत. त्यांत " होये तें भटोबास मानीति : नव्हे तेथ म्हणतिः ' हे श्रीमुखींचे शब्द नव्हेति : हे होति : " मग त्यांच्या सांगण्याप्रमाणे ज्याच्या अनुभवीच्या लीळा त्याला पुसून म्हाइंभट पुन्हा त्या सर्व भटोबासांपाशी संवादीत व अशा रीतीने त्यांना प्रामाण्य आणून नंतर त्यांची मांडणी करीत. याप्रमाणे पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागांत विभागलेले 'लीळाचरित्र' तयार झाले (स्मृ. १४१). याशिवाय नागदेवाचार्यांनी काही कवींना व लेखकांना उत्तेजनही दिले

आहे. विरहे लक्ष्मीधरबांच्या 'ज्ञानभास्कर' स्तोत्राची पोथी त्यांनी "पाहिली : वाचिली : आणि थोर मानवले" (स्मृ. १८), तर काळे कृष्णभटांनी रचिलेली गोपींची विरहगीते ऐकून व विशेषतः त्यांतील प्रत्ययकारी वर्णन पाहून ते त्यांना म्हणाले, 'कृष्णा : तेव्हेळीं काइ तूं तेथचि होतासि ?" (स्मृ. ११४). याप्रमाणे नागदेवाचार्य कोणास प्रेरणा, तर कोणास प्रोत्साहन देऊन वाङमयनिर्मितीच्या कार्यास हातभार लावीत. त्यांच्या 'मार्गा'च्या दृष्टीने तर हे त्यांचे कार्य महत्त्वाचे होतेच; पण मराठी भाषा आणि वाङमय या दृष्टीने सुद्धा त्यांचे हे उपकारच ठरतात. त्यांच्या या वाङमयीन कार्याविषयी डॉ. कोलते म्हणतात, ' " महानुभावांच्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांची जी अत्यंत व्यवस्थित रचना आढळून येते तिच्या मुळाशी नागदेवाचार्यांची प्रेरणा होती हे विसरता येत नाही.... स्वामींचे हे तत्त्वज्ञान संस्कृतमध्ये ग्रथित करण्याचा केसोबासांचा विचार होता, त्याला मोडता घालून सर्वसाधारण जनतेच्या उपयोगासाठी...मराठी भाषेतच ग्रंथरचना करण्याचे महत्त्व नागदेवाचार्यांनी आपल्या शिष्यवर्गाच्या मनावर बिंबवले; इतकेच नव्हे तर त्याचा आग्रह धरला. त्यामुळेच महानुभावांची ग्रंथरचना साधारणपणे मराठीतच होऊ लागली. " (श्रीचक्रधर-चरित्र, पृ. ७७). स्वतः नागदेवांनीं एकही ग्रंथ लिहिलेला नाही; परंतु अनेक ग्रंथकारांना प्रेरणा देऊन ते 'ग्रंथकारांचे ग्रंथकार' झाले यात काही शंका नाही.

याप्रमाणे चक्रधरांच्या प्रयाणानंतर त्यांच्या विचारांचा प्रसार नागदेवाचार्यांनी प्रवचने, निरूपणे, चर्चा, ग्रंथनिर्मिती, प्रवास, भेटीगाठी इत्यादि साधनांनी सुमारे तीस ते चाळीस वर्षे केला. या बाबतीत ते स्वतः निःशंक होते असे त्यांच्या वर्तनावरून व 'माझेनि मुखें जें निरूपण तेथ संशयो नाहीं' या त्यांच्या उद्‌गारांवरून वाटते (स्मृ. २२५). मात्र डॉ. कोलते म्हणतात त्याप्रमाणे पंथप्रसाराचे हे कार्य त्यांनी प्रत्यक्षपणे केले असे नसून ते त्यांच्या अलौकिकत्वामुळे झाले, हेच अधिक खरे. इतरांना वेधून घेण्याच्या त्यांच्या सामर्थ्यामुळे त्यांना 'वेधवंती नागदेव' म्हणत हे प्रसिद्धच आहे (स्मृ. २१९). त्यातच त्यांच्या व्युत्पन्नतेची भर पडल्याने व मुख्य

म्हणजे चक्रधरांचे शब्द त्यांच्या ध्यानामनात खोलवर रुजून बसले असल्याने, त्यांची वाणी सहजच प्रभावी ठरे आणि त्यामुळे पंथप्रसाराचे कार्य त्यांनी न करताही त्यांच्या हातून ते झाले. पुन्हा एकदा " बोधदाता काइ तूं ? बोधदाता परमेश्वर " हे चक्रधरस्वामींचे वचन खरे ठरले व पूर्वीचा अनेक ' ढांढाळांचा ' नागदेव त्यांच्याच कृपेने नागदेवाचार्य झाला; इतकेच नव्हे, तर स्वामींचा मार्ग त्याच्या नावाने, म्हणजे ' भटमार्ग ' म्हणून ओळखला जाऊ लागला.

## नागदेवाचार्यांचा परिवार : व्यक्तिदर्शन

वेधवंती नागदेवभटांकडे आकर्षित होऊन अनेक जण त्यांच्या ' मार्गा 'त आले तरी त्यांचा स्वतःचा परिवार असा बेताचाच होता. त्यातील ठळक मंडळी म्हणजे महादाइसा, बाइदेवबास, म्हाइंभट, केसोबास, हिराइसा, दामोदरपंडित आणि कवीश्वर भास्करभट. पैकी **महादाइसा** ही त्यांची चुलत बहीण आणि ' जिज्ञासक व चर्चक म्हातारी ' म्हणून ' लीळाचरित्रा 'त ( उत्तरार्ध ४७३ ) गौरविली गेलेली चक्रधर–शिष्या. ' देवेंविण पिसा ' झालेल्या नागदेवाला तिनेच पाठुंगळी घेऊन रिधपुरास श्रीगोविंदप्रभूकडे आणले (स्मृ. २–४). तिची स्वतःची चक्रधरनिष्ठा अपूर्व आहे. आपला भाऊ आपलो हा स्वामींच्या पश्चात् त्यांचे नाव सोडून देव्हारे मांडून बसतो हे पाहताच ती त्याच्या घरातून बाहेर पडते (स्मृ. २३). तसेच एकदा भिक्षा मागतांना एका लेकराच्या तोंडून ' श्रीचक्रधरू ' हे नाव ऐकताच ती त्याला झाडूनपुसून कडेवर घेते. का ? तर ' सृष्टीमध्यें देवो दुर्लभु : कां देवातें आठवी तो दुर्लभु : ' म्हणून ( स्मृ. ६२). तिच्यात जशी कवित्वशक्ती आहे ( स्मृ. १२३ ), तशीच ही शक्ती म्हणजे देवाची देणगी असल्याची जाणीवही आहे. म्हणूनच 'धवळयां'च्या उत्तरार्धाच्या रचनाप्रसंगीं "मज काइ करवैल? तै गोसावीं वरु दीधला म्हणौनि स्फुरलें " असे नम्रतेचे उद्‌गार ती काढते (स्मृ. १७४ ). तिचे साधे बोलणे सुद्धा मार्मिक आहे. एकदा नागदेवांच्या पायावरील केसतोड तिने प्रसादाचे वस्त्र फाडून बांधला तेव्हा ते रागावले असे पाहून ती म्हणाली, ' प्रसादाने प्रसाद बांधला यात माझे काय चुकले ?' (स्मृ. २२ ). तसेच महादाइसा शिस्तप्रियही आहे. नागदेवाचार्यांच्या

मठातील शिस्त तीच सांभाळीत असे. वयाने व अधिकारानेही ज्येष्ठ असल्यामुळे ती कोणाचीच भीड ठेवीत नाही. एकदा दिवसा निजल्याबद्दल तिने केसोबासांना " जया एकु वैरी तो दिहां निद्रा न करी : मां तुम्हां तवं चौदा वैरी असतां कैसें निजतां ?" असे म्हणून जेथे चापले होते ( स्मृ. १०४), तेथे इतरांची काय कथा ? ती अव्रूनमधून भिक्षुकांची 'विजनें पडताळीत' म्हणजे त्यांची ध्यानस्थाने पहात हिंडत असे व त्यांत कोणी आचारधर्माला सोडून वागतांना दिसले तर ती त्याची चांगली कानउघडणी करीत असे ( स्मृ. १६६, १६७ ). म्हाइंभटासारख्यानाही तिने या बाबतीत 'विजन' कसे असावे ते सांगून मार्गदर्शन केले आहे (स्मृ. १६९). म्हणूनच स्वतः नागदेवाचार्यांनी तिच्याविषयी बोलतांना 'म्हातारी माझेया धर्मासि रक्षण गा' असे उद्‌गार काढले होते (स्मृ. १६८). अशी ही 'धर्मरक्षक, प्रीतिरक्षक' महादाइसा खांडुकाचे निमित्त होऊन देव आठवीत नौगावास मरणोन्मुख होऊन पडली होती तेव्हा नागदेवांचार्यांनी जे म्हटले ते अगदी खरे आहे. ते तिला म्हणाले, " रूपै : देहपर्यंत उचित स्मरण न चुकसीचि: पहिलेया दिसापासौनि सेवटील दीसपर्यंत देवो तो तुवांचि आठविला:" (स्मृ. २५४). **बाइदेवबास** हे वास्तविक नागदेवानंतर झालेले पंथाचे द्वितीय आचार्य आणि प्रसिद्ध 'पूजावसरा'चे लेखक. पण त्यांचे चित्रण प्रस्तुतच्या 'स्मृतिस्थळा'त फारच विरळपणाने आले आहे याचे आश्चर्य वाटते. ते फार भावनाप्रधान असावेत. डोंबेगावच्या देवळातील स्वामींच्या पिकेचा चिरा पाहून ते तेथे दुःखाने लोळण घेतात (स्मृ. ६), आणि पुढे, आपण बेलोपुरावरून गेल्यास तेथील स्वामींचे प्रयाणस्थान पाहून त्यांचा देहपात होईल या भीतीने भटोबास तिकडे जाण्याचे टाळतात ( स्मृ. ९ ). बाइदेव कोण होते ते कळण्यास वरील दोन स्मृती खरोखर पुरेशा आहेत. याच्या उलट **म्हाइंभटांची** गोष्ट आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. त्यांच्या ठिकाणी अभिमान प्रथमपासूनच होता. चक्रधरांच्याकडे येण्यापूर्वी आपण इतर विद्वानांना कसे तृणवत् लेखतो त्याचे प्रतीक म्हणून ते पायात गवताची वाकी घालीत असत हे प्रसिद्धच आहे. तो त्यांचा अभिमान 'स्मृतिस्थळा'तही क्वचित् डोकावतो. एकदा कोणीतरी 'योगभ्रष्ट कसा असतो ?' असे विचारले

असता ' आमचीये दशेचा ' असे म्हणण्यास त्यांना कोणताही संकोच वाटला नाही ( १९ ). आता त्यावर भटोबासांनी त्यांना मोडून काढले ही गोष्ट वेगळी ! मात्र भटोबास त्यांची योग्यता ओळखून होते. म्हणूनच त्यांनी एका प्रसंगी ' म्हाइंभटासारिखें पात्र ', म्हणजे थोर महात्मा, असे म्हणून त्यांना गौरविले आहे ( स्मृ. ६९ ). असो. या अभिमानाबरोबर त्यांच्या ठिकाणी प्रत्युत्पन्नमतित्वही होते. एकदा त्यांचे पोथीवाचन ऐकून एका विद्वानाने उपहासाने 'अबद्ध' असे त्रिवार म्हटले. तेव्हा म्हाइंभटांनी उत्तर दिले, " तोंड अबद्ध तरि वाचिजाये : पोथी अबद्ध तरि फाडिजायेः " (स्मृ. १७२). तसेच एकदा ते विहिरीवर पाणी भरीत असताना एक विद्वान त्यांना म्हणाला, " शूद्रस्य शुभं नास्ति : " त्यावर म्हाइंभटांनी (स्वतः ब्राह्मण असून ) त्याला ठणकावले, " ब्राह्मणस्य विशेषतः " (स्मृ. १७३). त्यांच्या कवित्वशक्तीची आणि गुरुबंधुत्वाच्या भावनेची साक्ष त्यांनी व लक्ष्मीधरभटांनी मिळून वृद्ध महादाइसेला ' धवळयां ' च्या पुढील भागाच्या रचनेत मदत केली त्या प्रसंगावरून मिळते (स्मृ. १७४). म्हाइंभटांना स्वतःप्रमाणे आपल्या गुरुकुळाचाही अभिमान होता. त्यामुळेच, एकदा उमाइसेने कोथळोबाला शूद्र म्हणून हिणविले तेव्हा त्यांनी त्याचा कैवार घेऊन त्याचे पंथामधील उच्च स्थान तिला पटवून दिले (स्मृ. १९३). ' स्मृतिस्थळा ' त उल्लेखिलेले म्हाइंभटांचे मोठे कार्य म्हणजे ' लीळाचरित्रा'ची रचना. या कामी त्यांनी किती कष्ट घेतले, कोणाकोणाच्या मनधरण्या केल्या, स्वामींच्या लीळा गोळा कशा केल्या, नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाने त्यांतील खऱ्याखोटयाची पारख कशी केली आणि शेवटी पूर्वार्ध–उत्तरार्धांत विभागलेले ' लीळाचरित्र ' कसे सिद्ध केले ते येथे थोडक्यात पण मार्मिकपणे सांगितले आहे (स्मृ. १३९–१४२). हे महत्कार्य करून म्हाइंभटांनी ' माझे कांही वोखटें नेघावे ' असे क्षमायाचनापूर्वक म्हणत आणि ' तुम्हां देवो होईल ' हा भटोबासांचा आशीर्वाद घेत देह ठेवला (स्मृ. १९८). **केसोबास** किंवा **केशवपंडित** यांजविषयीही ' स्मृतिस्थळ ' पुष्कळ सांगते. ते या पंथात आले तेच मुळी ' स्मृतीं ' च्या काळात आले. केसोबास कोण, कोठील हे ' स्मृतिस्थळा'ला ठाऊक नाही. एक दिवस हे ' विद्वांस व्याख्याते '

नागदेवाचार्यांकडे आले आणि त्यांच्या सान्निध्यात राहिले इतकेच ते सांगते (स्मृ. १२). केसोबासांचा प्रपंचाविषयी निर्वेद मात्र अपूर्व दिसतो. त्यांच्या घरच्यांनी त्यांना पुन्हा संसारात अडकविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण प्रत्यक्ष त्यांच्या बायकोनेही ' आता हे योगीये जाले : यांचें पाप मज लागत असे ' म्हणून त्यांना अनुज्ञा दिली. खरोखरच भटोबासांनी म्हटल्याप्रमाणे ते ' शुकयोगींद्र ' ठरले (स्मृ. १३). त्यांच्या विरक्तीची कसोटी आणखी एकदा लागली आणि त्या प्रसंगी त्यांनी ज्या रीतीने मोहास तोंड दिले ते पाहून ' केशवदेयाने आमचा मार्ग राखला ' असे सार्थ उद्‌गार भटोबासांनी काढले स्मृ. १०५). केसोबास स्वतःप्रमाणे इतरांच्या बाबतीतही असेच कडक असत. एक जोडपे मठात राहून भलते चाळे करते हे पाहून त्यांनी भटोबासांना त्या दोघांना घालवून देण्यास सांगितले आणि भटोबास तसे एकदम करीत नाहीत हे पाहिल्यावर त्यांनी इतरांसमवेत मठत्याग केला. याच प्रसंगी ' तुम्ही माझे डोळे कीं गा ' हे बिरुद त्यांना नागदेवाचार्यांकडून मिळाले (स्मृ. ९५), व ते खरोखरच या भटमार्गाचे डोळे झाले. मठात शिस्त ठेवण्याचे काम महादाइसेप्रमाणे त्यांनीही केले. कोणी भीक्षान्न पात्रात न घेता झोळीतूनच जेवला (स्मृ. १५९), किंवा कोणी मठात कांदे रांधले (स्मृ. १६०) तर केसोबास त्यावर रागावत. त्याबरोबरच त्यांच्या ठिकाणी क्षमावृत्तीही होती म्हणूनच व्यसनी वंकीला चक्रधरांची आठवण आहे असे पाहून त्यांनी त्याला आपल्या पंगतीला घेतले (स्मृ. १३१). केसोबासांच्या बुद्धिमत्तेची व ग्रंथकर्तृत्वाची साक्ष तर ' स्मृतिस्थळा 'त पदोपदी मिळते. ' रत्नमाला ' हे संस्कृत स्तोत्र रचून त्यांनी स्वामींच्या अमोघ लीळा एकत्र गुंफून त्या वाक्पुष्पांनी ईश्वरार्चन केले (स्मृ. १४). ओढा संस्कृताकडे असल्याने (" केशवदेयासि संस्कृती सरळीः " इति भटोबास, स्मृ. ८८) त्यांच्या मनातून चक्रधरांची सूत्रेही संस्कृत-श्लोकबद्धच करावी असे होते. पण गुर्वाज्ञा प्रमाण मानून ते संस्कृतकडून मराठीकडे वळले (स्मृ. १५), आणि चक्रधरोक्त 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ' यांसारखी अमोल लेणी त्यांनी मराठी भाषेच्या अंगावर चढवली (स्मृ. १६, १७). चक्रधरस्वामींचे ' शास्त्र ' म्हणजे तत्त्वज्ञान ग्रंथनिविष्ट करून त्याला

सुसंबद्ध आकार देण्याचे केशव पंडितांचे हे महत्कार्य पाहूनच नागदेवाचार्यांनी 'मज मागां शास्त्र जाये ना ऐसें तुवां केलें' असे कृतज्ञतेचे उद्गार काढले (स्मृ. २२५). केशवपंडितांची तशी योग्यताही होती, त्यांचे पूर्वीचे गुरु थट्टेने म्हणाले त्याप्रमाणे त्यांना भटोबासांच्या सहवासात खरोखरच 'तृतीय सिंग' निघाले होते (स्मृ. ११६), आणि मुख्य म्हणजे त्यांच्या धारणाशक्तीवर व कर्तृत्वावर भटोबासांचा विश्वास होता. ते म्हणतच, की "माझें शास्त्र पंडितां-केशोदेयांसि चर्चा करितां उजळे :" (स्मृ. ६८). उलट केसोबासांनाही 'भटोबासांचें बोलणे म्हणजे ईश्वरवाणी'च होती (स्मृ. २३७) व त्यामुळे ते नेहमी त्यांच्या निरूपणांची चर्चा करीत बसत. म्हणूनच क्वचित् प्रसंगी त्यांना आचार्यांची बोलणीही खावी लागत. असेच एकदा ते व दामोदरपंडित चर्चा करण्यात रंगून गेले असतांना भटोबास तेथे येऊन त्यांना म्हणाले, "हां गा सर्वकाळ जरि चर्चाचि करावी : तरि देवातें केधवां स्मराल ?" (स्मृ. १२४). केसोबासांचे मोठेंपण हे, की त्यांनी अशा प्रसंगांनी आपल्या श्रद्धेला धक्का लागू दिला नाही. ते भटोबासांशीच केवळ नव्हे, तर त्यांच्या भटमार्गाशी अत्यंत एकनिष्ठ राहिले. त्यांच्या या निष्ठेचे एकच उदाहरण द्यावयाचे तर इतर महात्म्यांप्रमाणे अनवाणी न चालता आपण पायांत वहाणा घालतो म्हणून आपण भटमार्गीचे महात्मे नाही अशी शंका कोणास येताच केसोबासांनी "ऐसा येहीं वाहानीं मी भटमार्गीचा महात्मा नव्हे," असे म्हणून तत्काळ पायांतील वहाणा काढून फेकून दिल्या (स्मृ. २१८). निष्ठा म्हणतात ती ही! त्यानंतर हिराइसा. ही दामोदरपंडितांची बायको. भटोबासांच्या मार्गात प्रथम ती आली (स्मृ. ५४). तिच्या दृढनिश्चयाची त्यांनी स्वतः सांगितलेली एक आठवण खरोखरच अपूर्व आहे. विशेष म्हणजे ही आठवण ती पंथात येण्यापूर्वीची आहे (स्मृ. ७९). म्हणूनच भटोबास तिला 'विरक्ताची कसवटी' म्हणत (स्मृ. २४१). तिचा स्वभावही कडकच होता. 'तू पुढे हो, मी मुलाचे लग्न करून मागाहून येतो' असे म्हणून नंतरही पंथात न येता संसारातच गुरफटून राहाणाऱ्या आपल्या नवऱ्याला तिने जो निरोप पाठविला तो तिच्या कडकपणाला साजेसाच होता. ती म्हणाली, "जिये चुलीची खीर खादली : तिये चुलीची काइ राख खाल ?" या तिच्या निरोपासरशी

**दामोदरपंडित** "आता ही कोपली" असे समजून लगोलग संसारत्याग करून भटोबासांकडे आले व मार्गप्रविष्ट झाले (स्मृ. ५८). पंडित (पंथात ते याच नावाने प्रसिद्ध आहेत) बुद्धिमान होते, विद्वान होते, उत्तम गायकही होते. पण नागदेवाचार्यांकडे आल्यावर लौकरच त्यांना आपल्या अज्ञानाची जाणीव झाली व आचार्यांनीही त्यांना 'जवं जवं जाणता, तवं तवं नेणता' या चक्रधरांच्या वचनाची आठवण करून देऊन हळूहळू आपल्या शास्त्रात निष्णात केले. ते इतके, की त्यांचे शास्त्र केसोबासांप्रमाणे पंडितांशी चर्चा करीत असतांनाच उजळे (स्मृ. ६७, ६८). तसेच केसोबासांप्रमाणे पंडितांनाही त्यांनी आपले 'डोळे' म्हटले आहे (स्मृ. ९५). पण दामोदर-पंडितांचा खरा ओढा गाण्याकडे होता. त्यामुळे ते एकान्तात जाऊन धावे, ओव्या, चौपद्या असे काहीतरी गात बसत. प्रथम नागदेवाचार्यांनी त्यांना 'गीत विखो' या सूत्राधारे गाण्याला बंदी केली (स्मृ ८९); पण पुढे एकदा पंडितांचे कारुण्याने ओथंबलेले भावपूर्ण गायन त्यांच्या मागे उभे राहून ऐकल्यावर त्यांचे हृदय हलले आणि त्यांनी अपवाद करून "पंडिता: आजिलागौनि तुज गीत गावेया अनुज्ञा गा:" असे म्हणून त्यांच्या गाण्या-वरील बंदी काढून घेतली (स्मृ: ९०) इतकेच नव्हे तर त्यांच्या गायनाने लोक आकृष्ट होतात हे पाहून 'पंडिताचें गीत तें माझे हाकारे गा' असे ते अभिमानाने म्हणू लागले (स्मृ. ९१). दामोदर पंडितांचा व केसोबासांचा विशेष स्नेह होता (स्मृ. २५३). त्यामुळेच पुढे पंडितांनी आपल्या 'वच्छहरण' या प्रसिद्ध काव्यात त्याचा कर्ता म्हणून केसोबासांचे नाव घातले. असो. याच काळात नागदेवाचार्यांकडे येऊन त्यांचे अनुयायित्व पत्करलेले दुसरे मोठे कवी म्हणजे **भास्करभट बोरीकर**. पंथात ते कवीश्वर म्हणूनच प्रसिद्ध आहेत. त्यांची बुद्धी तीव्र, वाणी रसाळ आणि रूप देखणे. त्यामुळे त्यांच्या व्याख्यानांना गर्दी लोटे. इतकेच काय पण त्यांचे भागवतावरील व्याख्यान ऐकताना प्रत्यक्ष नागदेवाचार्य डोलत, त्यांचे अंत:करण द्रवून अवघे 'चंद्रमय' होऊन जाई. म्हणूनच त्यांनी त्यांना पुढे 'गीते' वर व्याख्यान करण्यापासून परावृत्त केले (स्मृ. १२०, १२१). कवीश्वरांचे देखणेपणही आपल्या मार्गाच्या चौकटीत बसत नाही असे पाहून आचार्यांनी त्यांना साधे ठिगळाचे वस्त्र पांघरण्यास सांगितले होते (स्मृ.

१२२). 'तूं शृंघारीय कवि' या कवीश्वरांविषयीच्या अभिप्रायाचे मूळ वरील गोष्टीत असावे ( स्मृ. २४२ ). कारण अद्यापि त्यांचे 'शिशुपाळवध' हे शृंगारिक काव्य निर्माण झालेले नव्हते. ते पुढे 'वृद्धाचारा' च्या काळात झाले. असो. कवीश्वरांना काव्यरसाइतकाच तर्कही प्रिय होता व त्यामुळे त्यांच्या ठिकाणी वादविवादाची आवड प्रकर्षाने दिसते. एकदा भटोबासांनी 'नको' म्हणून सांगितले असतानाही ते पैठणला जाऊन तेथे पुराण सांगणाऱ्या एका पंडिताला वादात जिंकून आले. या प्रसंगी त्यांनी एकाच श्लोकाचा अर्थ दहा निरनिराळ्या प्रकारांनी लावून दाखविला आणि 'तुम्ही कोण ?' या प्रश्नाचे उत्तर तत्काळ एक संस्कृत श्लोक रचून दिले ( स्मृ. २०४ ). कधीकधी मात्र वादाच्या भरात त्यांची मर्यादा सुटे आणि मग प्रत्यक्ष नागदेवाचार्यांशीही अधिकपणा करून ते त्यांची प्रसन्नता गमावून बसत. अशा प्रसंगी केसोबास त्यांना उपदेश करून वळणावर आणीत (स्मृ. २३७).

याशिवाय आणखी काही त्रोटक व्यक्तिचित्रेही 'स्मृतिस्थळा' त आढळतात. उदाहरणार्थ, वयाने लहान असूनही कडक वैराग्य धारण करणारा आणि 'भटो, मी तुमचे ऐकू की चक्रधरस्वामींचे ऐकू ?' असे म्हणून नागदेवाचार्यांना निरुत्तर करणारा **रामदेव** ( स्मृ. ५६, ५७, ५९-६१ ); तसेच त्यांच्याशी वाद करून, त्यांना अडचणीत टाकून, आपला नमस्कार स्वीकारावयास लावणारी रामदेवाची आई **आकाइसा** ( स्मृ. १३० ); 'आमच्या कविकुळास बोल लागेल' असे म्हणून आपल्या काव्याचे कर्तृत्व यादवराजाकडे देण्याचे स्वाभिमानाने नाकारणारा नरेंद्र (स्मृ. ११३); द्रव्याची कढई उघडी पडलेली पाहून आता चक्रधरस्वामींच्या पश्चात् तिचा उपयोग काय असे म्हणून ती तुच्छ लेखणारा त्यांचा जुना शिष्य **नाथोबा** (स्मृ. २२३); तसेच 'चक्रस्वामीविण तें गंगातीर तांबाजाळीं जळताये रे' असे म्हणून तिकडे न फिरकणारी भाबडी **आउसा** (स्मृ. १९९); जन्मभर स्वामींचा मत्सर करून शेवटी सुद्धा त्यांच्या मार्गाचा आणि नागदेवाचार्यांचा उपहास करणारा **दादोस** ( स्मृ. २२१ ); 'दोही देवांचा' संबंध असलेला आणि 'जेथ पायें हाणितलेयां सीस नेणे' अशा निर्जन स्थानी जाऊन ध्यान करणारा **कोथळोबा** ( स्मृ. १९३, १९५ ); भटोबासांच्या शास्त्रात तयार

असलेली **रेमाइसा** (स्मृ. १३८); ईश्वर आणि ईश्वराचे चिंतन करणारा हे दोन्ही सारखेच दुर्लभ असल्यामुळे, साऱ्या गुरुकुळाने टाकलेल्या व्यसनी वंकीला तो चक्रधरांचे नाव आठवतो म्हणून जवळ करणारी **कटक देमाइसा** (स्मृ. १३१); आपल्या नवऱ्याचे स्वहस्तानें दुसरीशी लग्न लावून देऊन स्वतः संसारत्याग करून भटमार्गात येणारी **लुखाई** (स्मृ. ९७); आपल्या लुगडयाच्या परवंटयात पाण्याचा डो बाळगून भटोबासांच्या तहानभुकेची चिंता वहाणारी परंडयाची **गौराई** (स्मृ. २००); 'दोही देवांचा' संबंध आणि भटोबासांसारखा भाऊ असतांना अजूनही स्पृश्यास्पृश्याचा विचार मनात आणणारी **उमाइसा** (स्मृ. १९३); इत्यादि.

वरील सर्व लहानमोठी व्यक्तिचित्रें पाहून 'लीळाचरित्र'काराप्रमाणे 'स्मृति'कारही मोजक्या शब्दांत ती ती व्यक्ती समोर उभी करण्याच्या कामात निष्णात आहे याचा प्रत्यय येतो. विशेषतः चरित्रविषय जे भटोबास किंवा नागदेवाचार्य त्यांचे चित्रण त्याने अशा प्रत्ययकारी रीतीनें केले आहे, की ते वाचून आपण त्यांना प्रत्यक्ष न पाहताही पाहू शकतो, अजमावू शकतो.

## 'स्मृतीस्थळा'तील भटमार्ग

'स्मृतिस्थळा'त महानुभाव पंथाचा उल्लेख सर्वत्र 'भटमार्ग'या शब्दाने केलेला आहे. उदा०, "आम्ही भटमार्गीचे महात्मे जालों:" (स्मृ. ५३), "अवघे भटमार्गीचे महात्मे होति:" (स्मृ. २१८), इत्यादि. 'भट' म्हणजे नागदेवभट किंवा भटोबास, व त्यांचा मार्ग तो 'भटमार्ग.' वास्तविक हा मार्ग चक्रधरप्रणीत. परंतु 'स्मृति' काळात त्याचा प्रसार नागदेवाचार्यांनी इतका केला, की तो मार्ग किंवा पंथ त्यांच्याच नावाने ओळखला जाऊ लागला. हा त्यांच्या व्यक्तिमाहात्म्याचा प्रभाव म्हटला पाहिजे. असो. या मार्गाची आचार व विचारसरणी 'स्मृतिस्थळा'त नागदेवाचार्यांच्या मुखाने अनेक ठिकाणी व्यक्त झाली आहे. अर्थात् हे 'शास्त्र' किंवा तत्त्वज्ञान मूळचे चक्रधरांचे व त्यांच्या सूत्रांतून प्रकट झालेले. त्याचाच अनुवाद नागदेवाचार्य 'स्मृतिस्थळा'त प्रसंगाप्रसंगाने करतात. त्यांचा स्वतःचा चक्रधरसूत्रांचा अभ्यास सूक्ष्म व गाढ होता, आणि विशेषेकरून स्वतः स्वामींनी त्यांना

घडवून मढवून अधिकरण किंवा आचार्यपदासाठी योग्य केले असल्याने त्यांच्या मुखातून नेहमी त्यांचीच वाणी येते, ते त्यांच्याच शब्दांत बोलतात. 'भटोबासांचें बोलणें ईश्वरवाणी कीं' हा केसोबासांचा अभिप्राय (स्मृ. २३७) अगदी बरोबर आहे. सारांश, 'स्मृतिस्थळा'त नागदेवाचार्यांच्या मुखाने चक्रधरांचेच तत्त्वज्ञान ऐकावयास मिळते. त्याचे त्यात उमटलेले पडसाद येथे थोडक्यात पहावयाचे आहेत.

हा पंथ 'पंचकृष्ण' मानतो[१] व त्यांचा उल्लेख येथे 'पांचास्य (म्ह. पंचमुखी) गुरुकुळ' असा केलेला आहे (स्मृ. १११, २५९). त्यांचे स्मरण मोक्षदायक असल्याने "येहीं पांचै नामीं जो झाडातळीं जन्म क्षेपी : तो जरि वायां जाये तरि मियां धाडिला होये" असे नागदेवाचार्यांनी आश्वासनपूर्वक म्हटले आहे (स्मृ. ३२). तसेच पंचकृष्णांचे हे सर्वच अवतार मोक्षदायक असले तरी त्यांच्या मते श्रीचक्रधरांचा अवतार अनन्यसाधारण होता असे त्यांच्या "ये सृष्टीमध्यें येणें अवतारें श्रीचक्रधरें जो नुधरे तो कहींचि नुधरे" या उद्‌गारांवरून वाटते (स्मृ. ३५). मात्र चक्रधरांचा हा अवतार यापुढे त्या स्वरूपात दिसणे शक्य नाही, आता त्यांची 'नवेयासि' म्हणजे नवीन अवतारातच भेट होणार, असे त्यांनी उज्जैनीच्या वार्तेच्या प्रसंगी म्हटले आहे (स्मृ. १३२). हा मार्ग 'सकळां पर जो परमेश्वर' त्याचा असून (स्मृ. १३८), या चक्रधरोक्त मार्गाचे माहात्म्य असे आहे, की त्यात 'केली क्रिया' वाया जात नाही; भक्ती, ज्ञान किंवा वैराग्य यांपैकी कशाला तरी ती कारणीभूत होते (स्मृ. १२५, २३०). या मार्गात पाऊल टाकणाऱ्याने 'जवं जवं जाणता, तवं तवं नेणता' (म्ह. जाणणे हे नेणणे होय) हे ओळखून यावे (स्मृ. ६७). मात्र दोन पावले दाट झाडी ओलांडल्यावर पुढे सुखाचे साम्राज्यच आहे (स्मृ. ५७). म्हणून जो या मार्गात आपले सर्वस्व देऊन पडला त्याचे पाय मागे ओढू नयेत (स्मृ. ५६).

कर्म चतुर्विध आहे : नित्य, नैमित्तिक, काम्य व निषिद्ध. पैकी नित्यनैमित्तिक कर्मे प्रतिदिनी होणाऱ्या पापाच्या परीहारार्थ गेली, काम्य कर्मे

१. श्रीकृष्ण चक्रवर्ती; श्री दत्तात्रेयप्रभु; श्रीचांगदेव राउळ; श्रीगोविंदप्रभू; व श्रीचक्रधर हे ते पंचकृष्ण होत.

ते ते फळ देऊन गेली, व निषिद्ध कर्मे तर बोलूनचालून निषिद्ध, म्हणजे नरकाची जोड करून देणारी. अर्थात् कर्माने मोक्ष हा सिद्धान्त खोटा ठरतो. कारण ईश्वराला अर्पण करता येईल असे कर्मच शिल्लक उरत नाही (स्मृ. १३८). म्हणून कोणी कोणाचा नाही हे ओळखून जीवाने सर्व सोडून 'आपुलें चिंतावें,' म्हणजे देवाचे नामस्मरण करावे (स्मृ. ३३). या ब्रह्म-विद्येच्या उपदेशी भक्तांचे साधन 'चरितार्थ' झाले, म्हणजे सिद्धीस गेले, तर त्याला ईश्वरप्राप्ती होईल, आणि 'गळित' झाले तर मुख्य देवतेचे फळ मिळेल (स्मृ. १७०). तसेच वेध, बोध आणि अनुसरणाची तळमळ असेल तर अशा भक्ताला 'देहविद्या', म्ह. देह चिरायू होण्याची विद्या होईल, वेध-बोध आहे पण अनुसरणाची तळमळ नाही त्याला 'सृष्टिशून्य' जाईल, आणि बोध नाहीं पण अनुसरणाची तळमळ आहे तेथे असा भक्त पुत्र होऊन जन्मेल व मग ईश्वर त्याला ज्ञान देईल (स्मृ. १५०). अनु-सरणाचे महत्त्व इतके आहे, की 'तोंडीं तांबुळ आणि माथां फुलें' असा एखादा उपभोगी भक्त अनुसरण करण्यास निघाला आणि तितक्यात मरण पावला तरी त्याच्या हातून आचरण न होताही त्याला ईश्वरगती मिळेल, असे नागदेवाचार्यांचे आश्वासन आहे (स्मृ. २५२).

हे 'अनुसरण' केव्हा करावे? प्रपंचाचा त्याग करून देवासाठी आयुष्य केव्हापासून वेचावे? तर शक्य तो लौकर. कारण देहान्ती झोळी घेणे हे 'अर्धोदक', म्हणजे अर्धवट संन्यास घेणे आहे (स्मृ. २४). साठीच्या पुढील पुरुषाला अनुसरणाचा अधिकार नाही असे श्रीचक्रधरस्वामींचे वचनच आहे. पण त्यातूनही ईश्वराची प्रवृत्ती कोण जाणणार? घुणाक्षरन्यायाने वृद्धासही अनुसरण घडून मोक्ष मिळेल, कोणी सांगावे! (स्मृ. १००). हे 'परशास्त्र' आत्महितासाठी, निदान ही अनित्य सृष्टी कशी रचली आहे ते जाणण्यासाठी तरी अभ्यासावे (स्मृ. १५४). तसेच ते आपल्या बुद्धीने न अभ्यासिता गुरुमुखानेच ऐकले पाहिजे. कारण केवळ अक्षरांपासून वेध-बोध होणार नाही. वेधबोधाची सबीजता गुरुमुखातच आहे (स्मृ. २०७). या परधर्मात 'एकमुखता' असावी, म्हणजे परधर्म हाच गुरु समजून त्यात वडिलानेही धाकट्याचे ऐकावे (स्मृ. ९६). तसेच या मार्गात येणाऱ्यांत

घडवून मढवून अधिकरण किंवा आचार्यपदासाठी योग्य केले असल्याने त्यांच्या मुखातून नेहमी त्यांचीच वाणी येते, ते त्यांच्याच शब्दांत बोलतात. 'भटोबासांचें बोलणें ईश्वरवाणी कीं' हा केसोबासांचा अभिप्राय (स्मृ. २३७) अगदी बरोबर आहे. सारांश, 'स्मृतिस्थळा'त नागदेवाचार्यांच्या मुखाने चक्रधरांचेच तत्त्वज्ञान ऐकावयास मिळते. त्याचे त्यात उमटलेले पडसाद येथे थोडक्यात पहावयाचे आहेत.

हा पंथ 'पंचकृष्ण' मानतो[1] व त्यांचा उल्लेख येथे 'पांचास्य (म्ह. पंचमुखी) गुरुकुळ' असा केलेला आहे (स्मृ. १११, २५९). त्यांचे स्मरण मोक्षदायक असल्याने "येहीं पांचै नामीं जो झाडातळीं जन्म क्षेपी : तो जरि वायां जाये तरि मियां धाडिला होये" असे नागदेवाचार्यांनी आश्वासन-पूर्वक म्हटले आहे (स्मृ. ३२). तसेच पंचकृष्णांचे हे सर्वच अवतार मोक्ष-दायक असले तरी त्यांच्या मते श्रीचक्रधरांचा अवतार अनन्यसाधारण होता असे त्यांच्या "ये सृष्टीमध्यें येणें अवतारें श्रीचक्रधरें जो नुधरे तो कहींचि नुधरे" या उद्‌गारांवरून वाटते (स्मृ. ३५). मात्र चक्रधरांचा हा अवतार यापुढे त्या स्वरूपात दिसणे शक्य नाही, आता त्यांची 'नवेयासि' म्हणजे नवीन अवतारातच भेट होणार, असे त्यांनी उज्जैनीच्या वार्तेच्या प्रसंगी म्हटले आहे (स्मृ. १३२). हा मार्ग 'सकळां पर जो परमेश्वर' त्याचा असून (स्मृ. १३८), या चक्रधरोक्त मार्गाचे माहात्म्य असे आहे, की त्यात 'केली क्रिया' वाया जात नाही; भक्ती, ज्ञान किंवा वैराग्य यांपैकी कशाला तरी ती कारणीभूत होते (स्मृ. १२५, २३०). या मार्गात पाऊल टाकणाऱ्याने 'जवं जवं जाणता, तवं तवं नेणता' (म्ह. जाणणे हे नेणणे होय) हे ओळखून घ्यावे (स्मृ. ६७). मात्र दोन पावले दाट झाडी ओलांडल्यावर पुढे सुखाचे साम्राज्यच आहे (स्मृ. ५७). म्हणून जो या मार्गात आपले सर्वस्व देऊन पडला त्याचे पाय मागे ओढू नयेत (स्मृ. ५६).

कर्म चतुर्विध आहे : नित्य, नैमित्तिक, काम्य व निषिद्ध. पैकी नित्य-नैमित्तिक कर्मे प्रतिदिनी होणाऱ्या पापाच्या परीहारार्थ गेली, काम्य कर्मे

१. श्रीकृष्ण चक्रवर्ती; श्री दत्तात्रेयप्रभु; श्रीचांगदेव राउळ; श्री-गोविंदप्रभू; व श्रीचक्रधर हे ते पंचकृष्ण होत.

ते ते फळ देऊन गेली, व निषिद्ध कर्मे तर बोलूनचालून निषिद्ध, म्हणजे नरकाची जोड करून देणारी. अर्थात् कर्माने मोक्ष हा सिद्धान्त खोटा ठरतो. कारण ईश्वराला अर्पण करता येईल असे कर्मच शिल्लक उरत नाही (स्मृ. १३८). म्हणून कोणी कोणाचा नाही हे ओळखून जीवाने सर्व सोडून 'आपुलें चिंतावें,' म्हणजे देवाचे नामस्मरण करावे (स्मृ. ३३). या ब्रह्मविद्येच्या उपदेशी भक्तांचे साधन 'चरितार्थ' झाले, म्हणजे सिद्धीस गेले, तर त्याला ईश्वरप्राप्ती होईल, आणि 'गळित' झाले तर मुख्य देवतेचे फळ मिळेल (स्मृ. १७०). तसेच वेध, बोध आणि अनुसरणाची तळमळ असेल तर अशा भक्ताला 'देहविद्या', म्ह. देह चिरायू होण्याची विद्या होईल, वेध-बोध आहे पण अनुसरणाची तळमळ नाही त्याला 'सृष्टिशून्य' जाईल, आणि बोध नाहीं पण अनुसरणाची तळमळ आहे तेथे असा भक्त पुत्र होऊन जन्मेल व मग ईश्वर त्याला ज्ञान देईल (स्मृ. १५०). अनुसरणाचे महत्त्व इतके आहे, की 'तोंडीं तांबुळ आणि माथां फुलें' असा एखादा उपभोगी भक्त अनुसरण करण्यास निघाला आणि तितक्यात मरण पावला तरी त्याच्या हातून आचरण न होताही त्याला ईश्वरगती मिळेल, असे नागदेवाचार्यांचे आश्वासन आहे (स्मृ. २५२).

हे 'अनुसरण' केव्हा करावे ? प्रपंचाचा त्याग करून देवासाठी आयुष्य केव्हापासून वेचावे ? तर शक्य तो लौकर. कारण देहान्ती झोळी घेणे हे 'अर्धोदक', म्हणजे अर्धवट संन्यास घेणे आहे (स्मृ. २४). साठीच्या पुढील पुरुषाला अनुसरणाचा अधिकार नाही असे श्रीचक्रधरस्वामींचे वचनच आहे. पण त्यातूनही ईश्वराची प्रवृत्ती कोण जाणणार ? घुणाक्षरन्यायाने वृद्धासही अनुसरण घडून मोक्ष मिळेल, कोणी सांगावे ! (स्मृ. १००). हे 'परशास्त्र' आत्महितासाठी, निदान ही अनित्य सृष्टी कशी रचली आहे ते जाणण्यासाठी तरी अभ्यासावे (स्मृ. १५४). तसेच ते आपल्या बुद्धीने न अभ्यासिता गुरुमुखानेच ऐकले पाहिजे. कारण केवळ अक्षरांपासून वेध-बोध होणार नाही. वेधबोधाची सबीजता गुरुमुखातच आहे (स्मृ. २०७). या परधर्मात 'एकमुखता' असावी, म्हणजे परधर्म हाच गुरु समजून त्यात वडिलानेही धाकट्याचे ऐकावे (स्मृ. ९६). तसेच या मार्गात येणाऱ्यांत

राजस–तामस असे सर्व प्रकारचे लोक असतात; पण त्यांनी सत्त्वस्थांचा आदर्श समोर ठेवून त्यांच्याप्रमाणें वागावें (स्मृ. ३१). तसेच मानापमानाचे पाप चुकविण्यासाठी मार्गातील वडीलकी मानून ज्ञानवृद्धांच्या आधीन व्हावे (स्मृ. २२६). या मार्गात ईश्वरस्मरण हे मुख्य असल्याने सर्वकाळ जर चर्चाच केली तर देवाला आठविण्यास वेळच मिळणार नाही; म्हणून ' जे काळीचें ते काळीं ' करावे (स्मृ. १२४). तसेच घरात राहून प्रपंच करीत देव आठविण्यापेक्षा रानात जाऊन, झाडातळी बसून प्रपंचाचे मनोरथ करणे अधिक चांगले ! किंबहुना तेथें झोप घेतली तरी चालेल; पण प्रपंचात राहून देव आठविणे अशक्य ! त्यासाठी ' विजन ', म्हणजे एकान्तवासच पाहिजे (स्मृ. ३३). तसेच ' अटन 'ही आवश्यक असून ते कसे करावे याविषयी काही नियम आहेत. त्यातील तात्पर्य असे, की देवाची ' संबंधी स्थानें ' नमस्कारीत अटन करावे (स्मृ. ११५) व आपले श्रेष्ठत्व किंवा नष्टत्व प्रगट होणार नाही तोपर्यंतच एका ठिकाणी राहावे, अधिक नाही (स्मृ. २१४). साधकाने राजस–तामस माणसांचा संसर्ग करू नये; कारण त्यामुळे धर्महानी संभवते (स्मृ. २०८). तसेच त्याने सत्यव्रती होऊन सुहृद, गोत्रज किंवा मार्गातील परिवार यांपैकी कोणाशीही खोटे बोलू नये. अर्थात् यालाही काही अपवाद आहेत (स्मृ. २११). त्याची रहाणी साधी असावी. ' धड वस्त्र न पांघुरावे : थिगळांचे प्रावर्ण आणि भिक्षेचे अन्न ' ही दोन्ही अवीट असल्यामुळे तीं सेवावी (स्मृ. २३१). भोजनक्रियेत सुद्धा जरठ–कोमल पुरुषाचे तारतम्य ठेवावे (स्मृ. १३५).

याशिवाय, भिक्षेची वेळ सोडून इतर वेळीं गावात जाऊ नये व भिक्षा सुद्धा ओळखीच्या घरी वरचेवर मागू नये (स्मृ. ३४); ' महात्मा ' व ' वासनिक ' यांनी एका ताटात जेवू नये; कारण " विषयाचीये येकासनीं न बैसावें " असे चक्रधरांचे वचन आहे (स्मृ. ३७); चुली घालून उगीच पसारा वाढवून काळ व्यर्थ घालवू नये (स्मृ. ४१); एकवेळ कीर्तीसाठी वैराग्य केले तरी चालेल, पण पाय पसरून सुखासीन होऊन राहू नये (स्मृ. ४४); नित्य विधीबरोबर नैमित्तिक विधिही आचरणात आणावा, कारण त्याचे महत्त्व निराळे आहे; मलिन झालेल्या नित्य विधीला नैमित्तिक

विधी उजळतो (स्मृ. ४७); तीर्थास गेल्यावर देवाच्या तेथील लीळा आठवाव्या (स्मृ. ३९); आठ महिने हिंडून चातुर्मास एका प्रदेशात काढावा (स्मृ. २९); देवाचा प्रसाद जसा मिळाला तसाच नमस्कारावा; त्याची मोडतोड करू नये. कारण तसे केल्यास त्याची प्रसन्नता जाईल (स्मृ. १५६); इत्यादि आचारविषयक अनेक विचार 'स्मृतिस्थळा'त आले आहेत. त्या सर्वांचे सार एकच व ते म्हणजे परमेश्वराचे दास्य. 'सेनपुंजी', म्हणजे शेण गोळा करणारी मुलगी जशी हाताने, पायाने, शब्दाने, दृष्टीने शेणाचा पडलेला पो आपला म्हणून सांगते, त्याप्रमाणे भक्ताने सर्वप्रकारे देवाचे दास्य करावे (स्मृ. ४६). ते जो जीव करील तो अवताराचा, म्ह. देवाचा, आणि अवतार त्याचा असे होऊन जाईल (स्मृ. २४९).

याप्रमाणे 'स्मृतिस्थळा'त नागदेवाचार्यांच्या मुखाने अवतरलेली भटमार्गाची तात्त्विक विचारसरणी आहे. ती मूळची चक्रधरस्वामींची असली तरी भटोबासांच्या मुखातून बाहेर पडतांना ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा घेऊन उमटते यात काही शंका नाही.

## 'स्मृतिस्थळा'तील समाजदर्शन

'स्मृतिस्थळ' हा ग्रंथ 'लीळाचरित्रा'च्या मानाने पुष्कळच लहान असल्यामुळे त्यात तत्कालीन समाजाचे दर्शन तितक्या प्रमाणात घडत नाही. शिवाय चक्रधरांची ज्याप्रमाणे अखंड भ्रमंती चालू असे तसेही नागदेवाचार्यांचे नाही. ते थोडेफार हिंडत असले तरी सर्वसाधारणपणे एकाच ठिकाणी, म्हणजे निंब्यास, मठ करून राहिले. त्यामुळेही 'लीळाचरित्रा'च्या समाजदर्शनातील वैचित्र्य येथे आढळत नाही. तरीपण तत्कालीन परिस्थितीचा थोडाफार कानोसा 'स्मृतिस्थळा'वरून घेता येतोच. तो राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अशा तिहेरी स्वरूपात घेण्याचा प्रयत्न पुढे केला आहे.

(१) **राजकीय:**—'स्मृतिस्थळा'च्या काळात महाराष्ट्रावर देवगिरीच्या रामदेवराव यादवाची राजवट चालू होती असे त्याच्या निरनिराळ्या उल्लेखांवरून दिसते (स्मृ. ८६, ११३, १४५–१४९). त्याच्या राजवटीत झालेल्या यावनी आक्रमणाचा 'स्मृतिस्थळा'तील निर्देश ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे. 'दिल्लीचा सुलतान चालून आला, त्याने अवघे मंडळ

हालवले, त्या धामधुमीत देश उध्वस्त झाला, ‘ तुरुक ’ आले आणि सगळीकडे पळापळ झाली, शत्रूने रामदेवरावाला धरले पण नंतर बहुधा खंडणी घेऊन सोडून दिले, आणि अशा रीतीने शेवटी प्रत्यक्ष राज्यान्तर न होता हे परचक्र शमले व शांततेची गुढी उभारली गेली ’ असे या चारपाच स्मृतींवरून कळते (स्मृ. ८३–८७). त्यांत उल्लेखिलेली दिल्लीच्या सुलतानाची स्वारी हीं श्री. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे शके १२१६ मधील अल्लाउद्दीन खलजीची किंवा शके १२२८ तील त्याचा दक्षिणेतील सेनापती मलिक काफूर याची स्वारी नसून ती मलिक काफूरचीच पण शके १२३२ मधील स्वारी असावी असे वाटते. कारण त्यात रामदेवरावाला धरल्याचा स्पष्ट उल्लेख असून पुढे त्याला सोडल्याचे नागदेवाचार्यांच्या भविष्यवाणीवरून सूचित केले आहे (“ रामदेवो धरीला : परि सुटैल :” स्मृ. ८६). रामदेवराव त्यानंतर फार दिवस राज्यावर राहिला नाही त्याचा अखेरचा उपलब्ध लेख, पुरुषोत्तमपुरी ताम्रपट, शके १२३२ चा आहे. ‘ स्मृतिस्थळा ’तच त्याच्या निधनाचाही जो उल्लेख येतो (स्मृ. १४९) त्यावरूनही हे परचक्र, त्यात झालेली रामदेवराव यादवाची धरपकड व सुटका आणि अखेर त्याचा मृत्यू या सर्व घटना वर्ष-सहा महिन्यातील असल्या पाहिजेत. शिवाय वरील ८३ व्या स्मृतीत निर्देश आहे तो दिल्लीच्या ‘ सुलताना ’चा आहे, आणि दिल्लीच्या अल्लाउद्दीन खलजीचा मुलगा कुतुबुद्दीन (जो पुढे लौकरच विजापूरचा सुलतान झाला) हा त्या सुमारास दक्षिणेत होता हे विजापूरच्या शके १२४२ च्या लेखावरून कळते.[१] तो लेख या खलजी कुतुबुद्दीनचाच आहे. कृष्णमुनीच्या ‘ अन्वयस्थळात ’त (ओ. १३७) ज्या खालसैयाच्या धाडीचा उल्लेख येतो ती हीच स्वारी असण्याची शक्यता आहे. ‘ स्मृतिस्थळा ’तही “ तया गावां धाडि आली ” असा एक धाडीचा उल्लेख आहे; पण तो फार मोघम स्वरूपाचा असल्याने विचारात घेता येत नाही (स्मृ. ७७). परचक्राच्या वरील स्मृतीतील (क्र ८६) रामदेवराव यादवाविषयीचा भटोबासांचा अभिप्राय अर्थपूर्ण आहे. त्यावरून त्याने संतामहंतांचे वाईट केले होते व त्याचे प्रायश्चित्त

१. शं. गो. तुळपुळे : प्राचीन मराठी कोरीव लेख, क्र. ५२ (पृ. २६१–२७०).

तो आता भोगीत होता असे दिसते. याचा आणि चक्रधरस्वामींचा वध झाला असेल तर त्या घटनेचा काही संबंध नसेल ना ? या कल्पनेला भटोबासांचे ' परि हे हातवणी : जेवण ते पुढां उरलेचि असे " हे उद्‌गार पुष्टी देतात. असो. राजकीय दृष्टया रामदेवराव यादवाची राणी कामाइसा हिच्याविषयीच्या स्मृतीही महत्त्वाच्या आहेत (स्मृ. १४५–१४९). त्यावरून ती वांझ होती व पतीच्या पश्चात् स्वतःची इच्छा नसतांनाही बलात्काराने सती गेली इतके कळते. राजकीय दृष्टया आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे वृत्ती व वृत्यन्तर. यांचा उल्लेख १५१ व्या स्मृतीत आढळतो. त्यात शेगावच्या कोणा पाठकाची वृत्ती, त्याने भटमार्गात येऊन संन्यास घेतल्यामुळे, त्याच्या मुलाकडे कशी गेली व तसे होण्यात अडचणी कोणत्या आल्या ते सांगितले आहे. त्यावरून तत्कालीन शासनपद्धतीचे हे अंग लक्षात येते.

(२) **सामाजिकः**— ' स्मृतिस्थळा 'तील समाज ' लीळाचरित्रा 'तील यादवकालीन मराठी समाजाहून निराळा नाही. त्याचेच दर्शन येथे पुन्हा एकदा घडते. हा समाज धर्मप्रवण असल्याने नानाप्रकारची देवळे (उदा., काष्ठाचा मढ ८, देउळी १८, लिंगाचे देऊळ १०५), त्यांत चालणारी पुराणे (' तो पिंपळेस्वरीं पुराण सांघों लागला ', स्मृ. २०४), गुरुपूजन (४०), ' राहाणे ' आणि ' देव्हारे ', म्हणजे अंगात दैवत वगैरे येण्याचे प्रकार (२३) इत्यादि उल्लेख ' स्मृतिस्थळा 'त आढळतात. ' चोळीका महात्मा ' हा उल्लेख वाममार्गी शाक्त पंथाचा द्योतक असून तो निंद्य मानलेला आहे (स्मृ. ९९). अर्थातच हा समाज चातुर्वर्ण्य मानणारा आहे. त्यामुळे उमाइसेसारखी संन्यासिनी सुद्धा आपल्या भांड्यातील पाणी आपलाच एक शूद्र गुरुभाऊ प्याला हे पाहून त्याच्यावर रागावते (स्मृ. १९३). सामाजिक सुरक्षितताही बेताचीच दिसते. दिल्लीच्या सुलतानाची स्वारी म्हणजे बोलून चालून परचक्र; तेव्हा त्या धामधुमीत सबंध देश उध्वस्त होऊन सर्वत्र पळापळ झाली यात नवल नाही ( स्मृ. ८३–८५ ); पण एरव्हीसुद्धा एखाद्या गावावर अकस्मात् धाड येते व त्यामुळे तेथील जीवित असुरक्षित होते (उदा., स्मृ. ७७). त्या समाजातील व्यवसाय पाहता 'सेनपुंजी', म्हणजे शेण गोळा करणारी (४६ ), सैपाकीण ( ११० ), वेव्हारा ( १०५ ), चांभार (१३८),

पुराणिक ( १४५ ) व ' सामान्य स्त्री ' म्हणजे वेश्या ( २१० )यांचे उल्लेख आढळतात. पैकी सैपाकिणीला एका वेळच्या सैपाकासाठी भटोबासांनी कोरडे चार रुके दिल्याचा उल्लेख आहे. तत्कालीन ग्रामरचना पाहता पुर, पाटण, गव्हाण, हाळी, पाळी, गडी व सिडी असे गावांचे निरनिराळे प्रकार उल्लेखिलेले सापडतात (स्मृ. ५१ ). न्यायपद्धतीचा एकच उल्लेख असला तरी तो महत्त्वाचा आहे. ज्याच्या मुलीशी गोविंदप्रभूंचे लग्न ठरले होते पण प्रत्यक्ष झाले नाही त्या ईश्वरनायकाने त्यांच्या पश्चात् आपल्या मुलीच्या वाटणीसाठी ' वेव्हार ' म्ह दावा लावला व त्यात तो हरला असा हा उल्लेख आहे (स्मृ. ११). चोर म्हणून संन्याशाला धरण्याचे प्रकारही घडत (उदा., स्मृ. २०, ३०), व त्यामुळेच नागदेवाचार्यांना आपल्या पंथीयांसाठी ' महात्मावेष ' योजणे भाग पडले ( स्मृ. ३० ). दुष्काळ अधूनमधून पडत व तेव्हा भिक्षा सुद्धा कमी मिळे (" दृभीक्ष पडलें : भिक्षुकांसि भिक्षा नाहीं : झोळिये दोनिचारि कोरके येति : " स्मृ. १०७). वस्तू ' गहाण ' ठेऊन कर्ज काढण्याची पद्धती होती (स्मृ. १९८). ' म्हातारदामा 'चा उल्लेख फार महत्त्वाचा आहे (स्मृ. १०७). त्यावरून वृद्धांसाठी काही आर्थिक योजना असावी असे वाटते; पण तिचे नेमके स्वरूप कळत नाही. तेव्हाच्या स्त्री-जीवनाचे काही ओझरते उल्लेख आढळतात. त्यावरून नवऱ्याने बायकोला मारहाण करणे (१३७), बायकोने नवऱ्याला सोडून गुरु करून त्याच्या मठात येऊन राहणे (९७) आणि अशा स्त्रीची गावात निंदा होणे (१३४) हे प्रकार जुने दिसतात. तसेच आपले प्रवचन मठातील बायकांना चांगले कळत नसल्याने त्यांना पोथीतील वचने त्यांच्या अर्थासह घोकविली पाहिजेत हे नागदेवाचार्यांचे उद्गार तेव्हाच्या स्त्रीवर्गाची बौद्धिक पातळी सुचवितात (स्मृ. १७१). सतीची चाल होती, इतकेच नव्हे तर सती जाण्याचा बलात्कारही होई असे राणी कामाइसा हिच्या वृत्तान्तावरून कळते (स्मृ. १४९). स्त्रियांत वेश्याव्यवसाय रूढ होता (स्मृ. २१०). तत्कालीन खाद्यपदार्थांत रोटिया-भरीत (४१), सेवैया-सरवळीया (४१), मांडे–पुरीया (११०), व पोळी-वरण्-कढी-भात-पत्रशाक (१०७) व कुहिरीच्या शेंगा (१०१) यांचे उल्लेख आढळतात. वस्त्रांत फुटा (६९ इ०), जाडी ( ८ ), पाटाउ–पासवडी (४०), ' सिवणी ' म्ह. शिवलेली बंडी (१२२), व कांबळे

(१०५); **पात्रांत** कापराची सेंद, म्ह. डबी (८), जासलवट, म्ह. पळी (४६), व डो, म्ह. नारळाचे पात्र (२००); **अलंकारांत** तोडगळसुरी (९७), विरोदी (१४६), गांठी (१५६), मुदी (१५३, १९८) व वेढें (१२६); आणि **नाण्यांत** रुके (११०), सोनटके व चौथरीया आसू (११३) यांचे उल्लेख सापडतात. 'कवडा–पोफळ' हींही नाण्यांप्रमाणे वापरात होती (५०). रोग दोनच उल्लेखित आहेत : एक केसतोड (२२) व दुसरा खांडूक (२५४). पैकी केसतोडावर पाणिकापड बांधणे हा उपाय रूढ होता, 'खांडूक' मात्र साधेसुधे नसून काळपुळीच्या व्रणाप्रमाणे असावे. कारण ते झाल्यामुळेच महादाइसा मरण पावली.

(३) **सांस्कृतिक :–** 'स्मृतिस्थळा'तील समाजाला स्वतःची अशी संस्कृती आहे, स्वत्व आहे. ज्ञानेश्वरांसारखा महापुरुष नुकताच होऊन गेलेला असताना या समाजात भटमार्गाकडे वळणारे केसोबासांसारखे पंडित भेटतात हे त्याच्या जिवंतपणाचे लक्षण होय. एका दृष्टीने पाहिल्यास या समाजाच्या अंधश्रद्धेची उदाहरणे पुष्कळ मिळतात. मुद्गल हे दैवत वांझ स्त्रियांना पुत्र देते ही कल्पना राणिवसातही मान्य दिसते (स्मृ. १४५). तसेच कामाइसे-सारख्या यादवनृपाच्या राणीला तिची इच्छा नसतांना 'बळाधिकारा'ने सती जावे लागते (स्मृ. १४९). पण अंधश्रद्धेच्या या प्रकाराबरोबरच त्या समाजातील बौद्धिक हालचालींचेही थोडेफार दर्शन 'स्मृतिस्थळा'त घडते. पैकी शिक्षणविषयक निर्देशाच्या दृष्टीने १३८ वी स्मृती उल्लेखनीय आहे. देवळांतून चालणाऱ्या पुराणांचा उल्लेख वर आलाच आहे. विशेष म्हणजे कामाइसेसारख्या राणीकडे सुद्धा रोज पुराणिक येऊन पुराण सांगत (स्मृ. १४५). वाद, चर्चा वगैरे तर नित्य चालत. या संबंधात पैठण येथील पिंपळेश्वराच्या देवळात पुराण सांगणाऱ्या एका अहंमन्य विद्वानाशी वाद करून कवीश्वर भास्करभटांनी त्याला कसे पराभूत केले तो समग्र वृत्तांत सांगणारी स्मृती विशेष उल्लेखनीय आहे (स्मृ. २०४). तिच्यावरून त्या काळातील वादपद्धतीची चांगली कल्पना येते. तसेच एकदा गंगेच्या घाटावर बसून 'संस्कृत व्याख्या' करणाऱ्या कवीश्वरांच्या वक्तृत्वाने अवघे नगर कसे आकर्षित झाले ती हकीगतही वाचण्यासारखी आहे (स्मृ. १२०),

पुराणिक ( १४५ ) व ‘ सामान्य स्त्री ’ म्हणजे वेश्या ( २१० )यांचे उल्लेख आढळतात. पैकी सैपाकिणीला एका वेळच्या सैपाकासाठी भटोबासांनी कोरडे चार रुके दिल्याचा उल्लेख आहे. तत्कालीन ग्रामरचना पाहता पुर, पाटण, गव्हाण, हाळी, पाळी, गडी व सिडी असे गावांचे निरनिराळे प्रकार उल्लेखिलेले सापडतात (स्मृ. ५१ ). न्यायपद्धतीचा एकच उल्लेख असला तरी तो महत्त्वाचा आहे. ज्याच्या मुलीशी गोविंदप्रभूंचे लग्न ठरले होते पण प्रत्यक्ष झाले नाही त्या ईश्वरनायकाने त्यांच्या पश्चात् आपल्या मुलीच्या वाटणीसाठी ‘ वेव्हार ’ म्ह दावा लावला व त्यात तो हरला असा हा उल्लेख आहे (स्मृ. ११). चोर म्हणून संन्याशाला धरण्याचे प्रकारही घडत (उदा., स्मृ. २०, ३०), व त्यामुळेच नागदेवाचार्यांना आपल्या पंथीयांसाठी ‘ महात्मावेष ’ योजणे भाग पडले ( स्मृ. ३० ). दुष्काळ अधूनमधून पडत व तेव्हा भिक्षा सुद्धा कमी मिळे (“ दृभीक्ष पडलें : भिक्षुकांसि भिक्षा नाहीं : झोळिये दोनिचारि कोरके येति : ” स्मृ. १०७). वस्तू ‘ गहाण ’ ठेऊन कर्ज काढण्याची पद्धती होती (स्मृ. १९८). ‘ म्हातारदामा ’चा उल्लेख फार महत्त्वाचा आहे (स्मृ. १०७). त्यावरून वृद्धांसाठी काही आर्थिक योजना असावी असे वाटते; पण तिचे नेमके स्वरूप कळत नाही. तेव्हाच्या स्त्री-जीवनाचे काही ओझरते उल्लेख आढळतात. त्यावरून नवऱ्याने बायकोला मारहाण करणे (१३७), बायकोने नवऱ्याला सोडून गुरु करून त्याच्या मठात येऊन राहणे (९७) आणि अशा स्त्रीची गावात निंदा होणे (१३४) हे प्रकार जुने दिसतात. तसेच आपले प्रवचन मठातील बायकांना चांगले कळत नसल्याने त्यांना पोथीतील वचने त्यांच्या अर्थासह घोकविली पाहिजेत हे नागदेवाचार्यांचे उद्‌गार तेव्हाच्या स्त्रीवर्गाची बौद्धिक पातळी सुचवितात (स्मृ. १७१). सतीची चाल होती, इतकेच नव्हे तर सती जाण्याचा बलात्कारही होई असे राणी कामाइसा हिच्या वृत्तान्तावरून कळते (स्मृ. १४९). स्त्रियांत वेश्याव्यवसाय रूढ होता (स्मृ. २१०). तत्कालीन खाद्यपदार्थांत रोटिया-भरीत (४१), सेवैया-सरवळीया (४१), मांडे–पुरीया (११०), व पोळी-वरण्-कढी-भात-पत्रशाक (१०७) व कुहिरीच्या शेंगा (१०१) यांचे उल्लेख आढळतात. वस्त्रांत फुटा (६९ इ०), जाडी (८), पाटाउ–पासवडी (४०), ‘ सिवणी ’ म्ह. शिवलेली बंडी (१२२), व कांबळे

(१०५); **पात्रांत** कापराची सेंद, म्ह. डबी (८), जासलवट, म्ह. पळी (४६), व डो, म्ह. नारळाचे पात्र (२००); **अलंकारांत** तोडगळसुरी (९७), विरोदी (१४६), गांठी (१५६), मुदी (१५३, १९८) व वेढें (१२६); आणि **नाण्यांत** रुके (११०), सोनटके व चौथरीया आसू (११३) यांचे उल्लेख सापडतात. ' कवडा–पोफळ ' हींही नाण्यांप्रमाणे वापरात होती (५०). रोग दोनच उल्लेखित आहेत : एक केसतोड (२२) व दुसरा खांडूक (२५४). पैकी केसतोडावर पाणिकापड बांधणे हा उपाय रूढ होता, ' खांडूक ' मात्र साधेसुधे नसून काळपुळीच्या व्रणाप्रमाणे असावे. कारण ते झाल्यामुळेच महादाइसा मरण पावली.

(३) **सांस्कृतिक** :–' स्मृतिस्थळा 'तील समाजाला स्वतःची अशी संस्कृती आहे, स्वत्व आहे. ज्ञानेश्वरांसारखा महापुरुष नुकताच होऊन गेलेला असताना या समाजात भटमार्गाकडे वळणारे केसोबासांसारखे पंडित भेटतात हे त्याच्या जिवंतपणाचे लक्षण होय. एका दृष्टीने पाहिल्यास या समाजाच्या अंधश्रद्धेची उदाहरणे पुष्कळ मिळतात. मुद्गल हे दैवत वांझ स्त्रियांना पुत्र देते ही कल्पना राणिवसातही मान्य दिसते (स्मृ. १४५). तसेच कामाइसे-सारख्या यादवनृपाच्या राणीला तिची इच्छा नसतांना ' बळाधिकारा 'ने सती जावे लागते (स्मृ. १४९). पण अंधश्रद्धेच्या या प्रकाराबरोबरच त्या समाजातील बौद्धिक हालचालींचेही थोडेफार दर्शन ' स्मृतिस्थळा 'त घडते. पैकी शिक्षणविषयक निर्देशाच्या दृष्टीने १३८ वी स्मृती उल्लेखनीय आहे. देवळांतून चालणाऱ्या पुराणांचा उल्लेख वर आलाच आहे. विशेष म्हणजे कामाइसेसारख्या राणीकडे सुद्धा रोज पुराणिक येऊन पुराण सांगत (स्मृ. १४५). वाद, चर्चा वगैरे तर नित्य चालत. या संबंधात पैठण येथील पिंपळेश्वराच्या देवळात पुराण सांगणाऱ्या एका अहंमन्य विद्वानाशी वाद करून कवीश्वर भास्करभटांनी त्याला कसे पराभूत केले तो समग्र वृत्तांत सांगणारी स्मृती विशेष उल्लेखनीय आहे (स्मृ. २०४). तिच्यावरून त्या काळातील वादपद्धतीची चांगली कल्पना येते. तसेच एकदा गंगेच्या घाटावर बसून ' संस्कृत व्याख्या ' करणाऱ्या कवीश्वरांच्या वक्तृत्वाने अवघे नगर कसे आकर्षित झाले ती हकीगतही वाचण्यासारखी आहे (स्मृ. १२०),

त्या समाजाच्या अभिरुचीची ती द्योतक आहे. व्याख्याने व पुराणे यांप्रमाणे ग्रंथनिर्मिती हेही संस्कृतीच्या मोजमापाचे एक साधन आहे व त्या दृष्टीने पाहिल्यासही हा समाज सुसंस्कृत दिसतो. ' स्मृतिस्थळा 'त, आणि विशेषतः ' वृद्धाचारा 'त, अनेक ग्रंथांच्या निर्मितीचा इतिहास आलेला असून त्यावरून तो काळ वाङमयीन संपन्नतेचा दिसतो. एक ' स्मृतिस्थळ ' घेतले तर त्यात आपल्या गुरुबंधूंच्या साहाय्याने ' धवळयां 'चा उत्तरार्ध रचणारी महादाइसा (१७४), पंथीयांच्या जवळ एकेका लीळेची भीक मागून चक्रधरस्वामींचे समग्र ' लीळाचरित्र ' सिद्ध करणारा म्हाइंभट (१३९–१४२), ' सूत्रपाठ ' व ' दृष्टान्तपाठ ' रचून स्वामींच्या शास्त्राचे व्यवस्थापन करणारे केशिराज पंडित किंवा केसोबास (१४–१७), भटमार्गात येतांना आपले ' रुक्मिणी-स्वयंवर ' काव्य बरोबर घेऊन येणारा स्वाभिमानी नरेंद्र (११३), ' आचारविचार लक्षणें ' करणारा राजूरकर लक्ष्मीधरभट (१०), अनुक्रमे ' रामायण ' व ' नलोपाख्यान ' रचणारें नरेंद्राचे भाऊ सालकवी व नृसिंह-कवी (११३), कृष्णवियोगाची गीते रचणारा काळे कृष्णभट (११४), ' अप्राप्तिपर पदें ' रचून गाणारी नौगावची नाईकबाई (१६५), ' दिस गेले वायांविण ' ही पदे करणारा नामदेव शिंपी (?–२४४), व कवित्वस्फूर्ती असणारी साकाई (३३) इतक्या ग्रंथकारांची व त्यांच्या ग्रंथांची माहिती मिळते. याशिवाय नागदेवाचार्यांच्या नंतरच्या काळात रचना करणाऱ्या बाइदेव, कवीश्वर भास्कर, गोपाळपंडित किंवा अनोबास, दामोदरपंडित, हरगर्व वगैरे आणखी काही ग्रंथकारांची माहिती ' स्मृतिस्थळा 'त आढळते ती निराळीच. म्हणूनच श्री. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे बिनीच्या महानुभाव ग्रंथकारांची माहिती देणारे प्राचीनतम साधन या दृष्टीने ' स्मृतिस्थळा 'ची अपूर्वता डोळ्यात भरते. ज्या काळात वरील सर्व ग्रंथ निर्माण झाले तो सांस्कृतिक दृष्ट्या संपन्नच म्हटला पाहिजे. विशेषतः नरेंद्रासारखा कवी, की ज्याने ' ना राजे हो : आमुचेया कविकुळा बोलु लागैल ' असे म्हणून आपले काव्य सुवर्णद्रव्याच्या मोबदल्यात राजाच्या नावावर प्रकट करण्याचे नम्रतापूर्वक नाकारले, असा स्वाभिमानी ग्रंथकार ज्या देशाने, काळाने व पंथाने आपणांस दिला त्यांचे आपण सदैव ऋणी असले पाहिजे.

## भाषाविशेष

'स्मृतिस्थळा'च्या भाषेत यादवकालीन मराठी भाषेची सर्व वैशिष्टये दृष्टीस पडतात. ही वैशिष्टये त्यातील शब्द व त्यांची रूपे यांच्या आधारे पुढीलप्रमाणे दाखविता येतील.

(१) **प्राचीन शब्दभांडार** :– स्मृतिस्थळा' वरून ओझरती नजर टाकल्यास त्यात 'ज्ञानेश्वरी' किंवा 'लीळाचरित्र' यासारख्या प्राचीन ग्रंथांतून नित्य येणाऱ्या अनेक जुन्या मराठी शब्दांचा आढळ होतो. उदा०, अवकास(=शौचविधी), अवचटें, अवसर, अवस्था (=तळमळ), असिक (=सर्व),आइती आइसें, आउठ, आखर, आंगसीक, आति(=आहे),आपणपें, आफळणे, आरुतें, आरोगण, आळुमाळ, उघाणी, उपंगळी, उपानौ, कटकटा, कणव, कसवटी, काइसेन (तृ.), काहचा (च.), कें (=कोठे), कै (=केव्हा), कोनटा, खळी, खांडें (=तरवार), खावणी (=मनोगत), गारी (=खड्डा), गोमटें, चांग, चाटा, चाड, चोखाळणे, चोजविणे, जगती, जाडी (=कांबळे), जासलवट (=पळी), झळंबणे, डांढाळ (=छंद, व्यसन), डिंभ, डो (=पात्र), तण, तातलें (=तापलें), तेंव्हळीं (=तेव्हा), थडी, थिल्लर (=डबके), दांडी (=पालखी), दादुलेपण, दारवठा, दी (=दिवस), दिवी, दुन (=दुप्पट), देसावरि (=परदेशी), दारसंका, धाडी, धुरा, नावेक, निक (=चांगले), निच (=नित्य), निर्वडी, निलळता, निऱ्हां, पडिताळणे, पढियणे, पसाय (पसाइता), पाग, पाटाव, पांती, पायेवणी, पोफळफोडणा, बडुवा (=सेवक), बंबाळ, बारसी (=द्वादशी), बाहीरवाहिरीं, बिढार, बीजें (करणे), बुंथी, बेंबीळ, बोडी, भलतेथ, भलतेधवां, भानवस, भीतरीं (=आत), भेण (=भीतीने), मढ (देऊळ), मा (=मग), मालगंठी, मोहर (=सन्मुखता), येर, रांधणे, राणा (=गुरव), राहाटी, राहावा, रिगणे, लवलवौनि, लो, लोहे, वचणे, वरैत, वसो (=बैल), वाखाणणे, (=व्याख्यान करणे), वाटाउ, वास (–पहाणे), वासना (=मत), विळ (=सायंकाळ), वेव्हारा, वोखटें, सरणे (=मरणे), विवर ('सविवर) =तपशीलवार), सळ (=अभिमान), साउले, सांघात, सांपें (=सांप्रत), सियाळ (=हिवाळा), सिवणी (=चिमणी), सीस (=मस्तक), सुनें,

सेनपुंजी, हरिखणे, हळु (=हलकें), हाकारा, हाटवटी, हातरिती, हातवणी, हेळा (=निंदा), होड (=पैज), इ०

(२) **पंथीय पारिभाषिक शब्द** :– प्रत्येक पंथाची स्वतःची अशी एक परिभाषा असते व त्या परिभाषेतील शब्द त्या पंथातील लेखकांच्या लिहिण्यात वरचेवर येतात. या दृष्टीने 'स्मृतिस्थळा' तील पुढील काही शब्द उल्लेखनीय आहेत. त्यांचे संदर्भ व अर्थ पुढे शब्दकोशात दिले आहेत. अधिकरण, अनुसरणे, अनुसरला-ली लें, बोधवंत, दर्शनीए, वासनिक, विजन, भिक्षा, अटन, श्रवण, वेध-बोध, स्थिति, स्थान, महात्मा, भिक्षुक, व्यक्तिभंग, शास्त्र इ० तसेच, काही शब्द विशिष्ट पंथीय अर्थाने वापरले आहेत. उदा०, चरितार्थ (=पूर्ण; सफळ: " साधन चरितार्थ करी " (१७०); पात्र (=श्रेष्ठ व्यक्ती : " म्हाइंभटासारिखें पात्र " ६९). तसेच काही ठिकाणी 'दीढु वेढा संबंध' (२५), किंवा 'खळीयेचें प्रमाण' (१०९) यासारखे काही 'लीळाचरित्रा'तील उल्लेख केल्याने ग्रंथाला पंथीयत्व आले आहे. मात्र त्यामुळे पंथीयेतरांस तो दुर्बोध होऊन बसतो. त्याप्रमाणेच गडी, सिडी, हाळी, पाळी इ० काही ग्रामवाचक शब्दांतील अर्थभेद स्पष्ट करून सांगितला आहे (स्मृ ५१). मधूनच हा 'स्मृति'कार पाणिकापड (२२), म्हातारदाम (१०७), द्वारकेचा रामहाट (११३) यांसारखी नवीन बनवलेल्या शब्दांची नाणीही वापरात आणतांना दिसतो. मात्र मुसलमान या अर्थी त्याने वापरलेला 'तुरुक' हा शब्द (८४, ८५) त्या काळात रूढ असावा असे " इतुकीयानंतर तुरकान जालें...। रामदेवरायाचें राज्य गेलें ..।।" या एका जुन्या नोंदीवरून वाटते. [१]

(३) **संस्कृतचा स्पर्श**:–वरील 'तुरुक' या शब्दाचा एकमेव अपवाद वगळल्यास 'स्मृतिस्थळा'ची भाषा परकीय शब्दांपासून सर्वस्वी अस्पृष्ट आहे. तसेच तिचे मराठपणही पाहण्यासारखे असून त्याची कल्पना पुढे दिलेल्या निवडक वाक्प्रचारांवरून व सुभाषितवजा म्हणींवरून येईलच. मात्र स्मृती लिहिणाऱ्याचा ओढा संस्कृतकडे असावा असे त्याने क्वचित् प्रसंगी केलेला संस्कृत शब्दांचा अकारण वापर पाहून वाटते. उदाहरणार्थ, " दुखें

१. भारत इतिहास संशोधन मंडळ, इतिवृत्त, शके १८३४, पृ. १३५.

**मुर्च्छाप्रपन्न** होति" (१८) ; "गोसावीयांचीया **अमोघा अमृतश्रावि‍या** लीळा सांघीतलीयाः" (६१) ; "पिंता सवर्तमान नव्हताः" (७५) ; "तरि तुमचेया पापा **पुरश्चरण** होतें:" (११३); "नैमित्यकें कर्म तियें **प्रतिदिनीचेया प्रतिवाया परीहारार्था** गेली:" (१३८). परंतु यांसारखे काही अपवाद सोडल्यास 'स्मृतिस्थळा'ची भाषा 'लीळाचरित्रा'च्या भाषे-इतकीच सोज्वळ व शुद्ध 'मऱ्हाटी' आहे यात शंका नाही.

(४) **शब्दघटना**दृष्टचा विचार केल्यास 'स्मृतिस्थळा'च्या भाषेत पुढील ठळक प्रकार दिसून येतात :–

१. **अभ्यस्त व अंशाभ्यस्त शब्द :** पुसपुसों (१०, १६, १७), वायेंवायें (३४), वायांवायां (४१), ढसढसां–ध्व (४५), बाहीरबाहिरीं (९७), लवलवौनि (१३१), कसकस (२४१).

२. **जोडशब्द :** घडीले-मढीले (१), वेधबोध (१), सातपांच (=काही थोडे; १३), उठणे-बसणे (३१), धूपार्ति–मंगळार्ति (४०), अशक्त-अक्षेम (४७), कवडापोफळ (५०), मासादीसा (५६, ७१), झाडौनि-पुसौनि (६२), जोगी-जंगम (५९), वरीष-दीस (९७), मळचाणि (७३), संत-महंत (८६), गीतमात (८९), उठिबैसी (९४, ९५), व्रतनेम (९७), आइकौनि–परिसौनि (१३, ११६), कडिये-खांदिये (१११), नेसवीलें-पांगुरवीले (१११), घे-दे (१२४, २२८) सेणमाती (१३१), सेवादास्य (१५५), लाळिले-ताळिले (१७५, १९६), हळवैली-पळवैली (१७५), खानपान (१७७), दैवभाग्य (१९३), घनदाट (२३३), इ० वरील यादीत जसे भिन्नार्थी शब्दांनी साधलेले जोडशब्द आहेत, तसे एकार्थी शब्दांनी साधलेलेही आहेत. यादवकालीन मराठी भाषेची ही एक विशेष लकब म्हणता येईल.

३. **विरोधी शब्द :–** माहेर-सासुर (४६, १३७), नित्य–नैमित्यक (४६, ४७), गोमटें-वोखटें (४७), जाणता–नेणता (६७), पुढील-मागील (८५), वडिल–धाकुटा (९६), जडणे–उजडणे (९८), दादा–बाइ (१०६, १६६), दुर्भिक्ष–सुकाळ (१०७), जरठ–कोमल (१३५), ऊन–सिळें (१३६), भरणे–फेडणे (२००), श्रेष्ठत्व–नष्टत्व (२१४).

४. **शब्दाचे स्त्रीलिंगीकरण**:– क्वचित् ‘ब्राह्मण’ या पुल्लिंगी नामापासून ‘ब्राह्मणी’ (१३, २५, १८६), ‘महात्मा’ यापासून ‘महात्मी’ (१३७) यांसारखी स्त्रीलिंगी नामे लेखक बनवितो. पैकी ‘ब्राह्मणी’ हा शब्द त्या काळात बायको किंवा पत्नी ( अर्थात् ब्राह्मणाची ) या संकुचित अर्थाने रूढ होता, स्त्रीलिंगी ब्राह्मण या अर्थाने नव्हे.

(५) **काही व्याकरण–वैशिष्टये** :– शब्दरूपांच्या दृष्टीने विचार करता ‘स्मृतिस्थळा’च्या भाषेतील पुढील वैशिष्टचे उल्लेखनीय आहेत.

१. ‘**वरि**’ या शब्दयोगी अव्ययाचा **तृतीयार्थी** उपयोग : “फोकवरि मारिले” (३०); “बोळेवरि (दूध) पाजीले” (२).

२. ‘**आं**’ **कारान्त तृतीया** : पुल्लिंगी आकारान्त नामाची ‘आं’-कारान्त रूपे फार क्वचित मिळतात. उदा० “**महात्मां** वासनिकाचां ताटीं न जेवावें : (३७)

३. ‘**न**’ **प्रत्ययान्त तृतीया** : ही रूपे अर्वाचीन रूपांच्या जवळ येतात. उदा० ‘नृसिंह कविन’ (११३), ‘कोथळोबान’ (१९३).

४. ‘**पसि**’ या शब्दयोगी अव्ययाचा **पंचमीसाठी** उपयोग : “येंतुलेनि मागीलापसि सावध जाले :” (२); “मनोरथापसि तेथ निद्रा कीजे:” (३३).

५. ‘**आं**’ **कारान्त सप्तमी** : पुल्लिंगी आकारान्त नामांची ही रूपे पुष्कळ येतात. उदा० “एकी गावीं **मळां** रोटीया केलीया :” (७२)

६. ‘**वरि**’ या शब्दयोगी अव्ययाचा **चतुर्थीसाठी** उपयोग : हा प्रकार ‘स्मृतिस्थळा’ शिवाय इतरत्र विशेष दिसत नाही. “मी तुम्हांवरि वीष खाइन :” (७५); “भटोबासीं दृढत्वावरि हे गोष्टि सांघीतली: ”(७९).

७. **संबोधनाची रूपे** : ही अतिशय अनियमितपणे होतात. उदा०, केशवद्या (९५); पंडिता (२५९); भटो (२५८); पंडितो (१४५); आउवे (१९९); दादो (२२१); रूपै (२५४).

८. **सामान्यरूपाचा अभाव** : हा मुख्यतः पुल्लिंगी ओकारान्त नामांच्या रूपांत जाणवतो. उदा०, गोल्होतें (३३); नाथोतें (१४१); नाथोचें (२२४).

९. **'उनि' प्रत्ययान्त भविष्याची रूपे** : ही रूपे म्हणजे यादव-कालातील महानुभाव गद्याचे एक वैशिष्टय आहे इतरत्र ती फार क्वचित मिळतात. जसे, " मागाल ते **देउनि** " (=देऊ, १०७); आमचें कांही घेयाल तरि **पाजूनि** (=पाजू, १४०); "आम्ही शब्द **घडउनि** (=घडवू): तुम्ही गा" (१७४).

१०. **अकरण रूपांची घडण** : 'न' हा उपसर्ग लागून अकरणवाचक रूप बनतांना मूळ धातूतील आद्य स्वर ऱ्हस्व करण्याची प्रवृत्ती सर्वत्र दिसते. उदा०, 'न संडीति' ( सांडणे, १३ ); 'न संगतीचि' ( सांगणे, ४७); 'न मने' ( मानणे, १२४ ); 'नेदूं' ( देणे, ६९ ); इत्यादि.

(६) **वाक्प्रचारवैभव** :– भाषेचे वैभव जसे तिच्यामधील शब्द-संपत्तीवरून तसेच वाक्प्रचारांच्या विविधतेवरूनही कळते. किंबहुना नुसते शब्द निर्जीव असून ते वाक्प्रचारांत किंवा वाक्यांत योजिले जातात तेव्हाच त्यांत जिवंतपणा येतो. या दृष्टीने 'स्मृतिस्थळा'तील निवडक वाक्प्रचार पुढे अकारविल्याने दिले आहेत. त्यांपैकी काही थोडे 'लीळाचरित्रा'दि गद्य ग्रंथांतूनही आढळतात.

**अनुवाद करणे** (स्पष्टीकरण करणे) ८६, ८८; **अंतःकरण जाणे** (खिन्नता येणे; उदास वाटणे) ६; **अंतःकरण चंद्रमय होणे** (द्रवणे; रसार्द्र होणे) १२०, १२१, २०४; **अन्याकार होणे** (शरम वाटणे) ८०; **अभंग देणे** (ग्रंथाच्या मुद्रिकेत दुसऱ्याचे नाव कर्ता म्हणून घालणे) ११३; **अवसरी करणे** (वाट पाहणे; चिंता वहाणे) ९९; **अवस्था प्रकटणे** (दुःखाने विमनस्क होणे) २; **आंग मोडणे** (नेट देणे; जोर करणे) २५७; **आड पडणे** (क्षमायाचनार्थ लोळण घेणे) १३१; **आण वाणे** (शपथ घेणे) १११; **आदिभाव चुकविणे** (अनिच्छा, विरोध दर्शविणे) १४९; **आपोसन धरणें** (भोजनास आरंभ करण्याचे खोळंबणे) ६३; **उठणें बैसणे** (वागणक करणे) ३१; **उवायां जाणे** (लघुशंका करणे) १०५; **कटकट करणे** (भांडण काढणे; वाद घालणे) १६१; **कळासीं बसणे** (बरोबर पटणे; अचूक वाटणे) २०४; **काज मांडणे** (लग्नकार्य काढणे) ६४; **कानाखुरां-सकट अनुसरणे** (सर्वस्व देणे) १८७; **कानावर हात ठेवणे** (अज्ञान

६१; **लग्न लागलेले असणे** (नित्यसंबंधवाचक) १८१; **वडपिंपळीं लावणे** (अंत्यक्रिया करणे) १०८; **वास पाहणे** (कडे किंवा दिशेने पाहणे) २०, ३०; **विजन करणे** (ध्यानासाठी रानावनात जाणे) ७, ३०; **विनयोगा नेणे** (उपयोगास आणणे) २२३; **विसंवाद असणे** (न पटणे) ६४; **वृत्ति पाळणे** (वतनाचे सत्तान्तर करणे) १५१; **वोखटी क्रिया** (मारहाण वगैरे) २०; **शरीर संपादणे** (अंग सुजणे) ३०; **संग्रह भंगणे** (विक्षेप येणे) ६५; **संभ्रम करणे** (आदरातिथ्य करणे) ७९; **सातरा पसरणे** (भिक्षा मागणे) २२३; **सिंहावलोकन करणे** (गतकाळाचा आढावा घेणे) २५७; **सुरंग मिरवणे** (शृंगारिक चेष्टा करणे) ९५; **हात झाडणे** (शरणागती पतकरणे) १३; **हातरिती होणे** (वैधव्य येणे) १; **होड सारणे** (पैज मारणे) २५३; **क्षेणु देणे** (आमंत्रण करणे) ६४.

## वाङ्मयीन विशेष

'स्मृतिस्थळ' हा 'लीळाचरित्रा' प्रमाणेच महानुभाव पंथाचा एक प्राचीन चरित्रग्रंथ आहे. या चरित्रग्रंथांची निर्मिती कोणत्या हेतूने व कशी झाली या प्रश्नावर डॉ. कोलते यांनी उद्धृत केलेल्या 'इतिहास' प्रकरणातील विस्तृत उताऱ्यावरून[१] चांगला प्रकाश पडतो. एकदा "भटो, तुम्ही निरंतर काइसयाचें स्मरण करीत असां ?" असे म्हाइंभटाने विचारल्यावरून आपण चक्रधरांच्या 'शास्त्रा'चे व त्यांच्या 'चरित्रा'चे स्मरण करीत असतो असे भटोबासांनी त्याला सांगितले. "एथिचीं चरित्रें आठवीजेति : आइकीजेति : उच्चारीजेति : तेंही एक स्मरणचि कीं गा :" चक्रधरस्वामींची ही चरित्रे पुढिलांना स्मरता यावी म्हणून जसे 'लीळाचरित्र' निर्माण झाले, त्याप्रमाणेच त्यांनी स्वतः 'अधिकरण' किंवा 'आचार्य' केलेले जे नागदेव किंवा भटोबास त्यांचे स्मृतिरूपाने लिहिलेले चरित्र 'स्मृतिस्थळ' म्हणून अवतरले. कारण त्यांच्या तोंडूनही ईश्वरवाणीच प्रगट होत होती व त्यामुळे ती स्मृतींच्या रूपाने जतन करून ठेवणे अगत्याचे होते. साहजिकच केवळ प्रेरणा व प्रयोजन याच बाबतींत नव्हे, तर त्याची रचनापद्धती पाहताही 'स्मृतिस्थळ' या आद्य चरित्रग्रंथांच्या चौकटीत बसते. हे चरित्र-

१. श्रीगोविंदप्रभु-चरित्र, आ. २ री, प्रस्तावना, पृ. २१-२४.

वाङ्मय स्मृतींच्या किंवा आठवणींच्या रूपाने निर्माण झालेले असून त्यांपैकी बहुतेक आठवणी त्या त्या चरित्रनायकाच्या सान्निध्यात असलेल्या त्याच्या निकटवर्तीयांनी लिहिलेल्या आहेत. तसेच त्यांचा संग्रह त्या त्या चरित्रात कथनपद्धतीने केलेला आहे. भक्तांनी आपापल्या अनुभवाच्या ' लीळा ' किंवा ' स्मृती ' सांगावयाच्या, ' कथन ' करावयाच्या आणि चरित्रकाराने त्या जशाच्या तशा लिहून घ्यावयाच्या या पद्धतीने हे सर्व चरित्र-ग्रंथ रचले गेले. साहजिकच यामुळे त्यांत एक प्रकारचा घरगुतीपणा आला असून त्यांना अपरोक्ष किंवा साक्षात् अनुभूतीची जोड मिळाली आहे. मात्र त्याबरोबरच या चरित्रग्रंथांचे नायक एक परमेश्वरी अवतार तरी किंवा त्याचे ' अधिकरण ' तरी असल्यामुळे ही चरित्रे त्यांच्या गौरवार्थच लिहिलेली आहेत. साहजिकच त्यांचा गौरव करणाऱ्या तेवढ्याच ' लीळा ' किंवा 'स्मृती' या चरित्रग्रंथांतून दिसतात, ज्यामुळे त्यांच्याविषयीची पूज्यबुद्धी ढळेल अशा आठवणी त्यांत नाहीत. तसेच आधुनिक चरित्रग्रंथांतून जो रचनेचा व्यवस्थितपणा असतो तोही तेथे अभावानेच जाणवतो. कारण 'लीळाचरित्रा'दि ग्रंथ त्या अर्थाने चरित्रे नसून त्यांचे स्वरूप आठवणींच्या संग्रहाचे आहे, आणि आठवणींचे संग्रह हे कधीच सुव्यवस्थित नसतात हे आपण आजही पाहतोच. अशा परिस्थितीत या प्राचीन चरित्रग्रंथांतून त्या त्या व्यक्तीचे व तिच्या कार्याचे समग्र आणि संपूर्ण दर्शन घडले नाही तर त्याबद्दल चरित्रकाराला दोष देता येणार नाही. कारण तो स्वतः चरित्रकार म्हणण्यापेक्षा आठवणींचा संकलनकार आहे व त्याची जबाबदारीही चरित्रनायकाचे संपूर्ण दर्शन घडविण्याची नसून त्याच्याकडे आलेल्या विविध प्रकारच्या आठवणींच्या मालमसाल्यातून खऱ्याखोटयाची, बऱ्यावाइटाची, योग्यायोग्याची निवड करून त्यांची एक माळ गुंफण्याची आहे. तसेच हे कार्य करताना त्याला चरित्रनायकाच्या विभूतिमत्त्वाला फार जपावे लागते. बाकी जपावे लागते हे म्हणणेही तितके बरोबर नाही. कारण तो त्याचाच अनुयायी असतो, भक्त असतो व त्यामुळे त्याचे विभूतिमत्त्व त्याच्या हातून आपोआप प्रगट होते. त्यासाठी त्याला निराळा प्रयत्न करावा लागत नाही.

वर या चरित्रवाङ्मयाची जी वैशिष्टये सांगितली ती बहुतेक सर्व ' स्मृतिस्थळा ' स लागू पडतात. महानुभाव पंथाच्या आद्य आचार्यांचे हे

चरित्र स्मृतिरूप असून त्यातील स्मृती अनेकांच्याकडून गोळा केल्याचा पुरावा त्यातच मिळतो. अर्थात् त्याचे स्वरूप संकलनात्मक असून रचनेचा ठाकठीकपणा किंवा सुव्यवस्थित मांडणी यांची अपेक्षाही त्यात नाही. म्हणूनच ' म्हाइंभट दास्या होड घाली म्हणणें ' यासारखी एखादी गोविंद-प्रभूंच्या काळातील आठवण येथे खुशाल ' स्मृति'काळात मिरवू शकते (स्मृ. २४७). साधा आठवणींचा कालक्रमही जेथे या संकलनकाराने सांभाळलेला नाही तेथे रचना, मांडणी, आकार वगैरे गोष्टींचे नावही नको. पण वर म्हटल्याप्रमाणे नरेंद्राकडून, स्मृतींच्या या पहिल्या संकलनकाराकडून, तशी अपेक्षाही नाही. त्याच्याकडून अपेक्षा एवढीच आहे, की ज्या स्मृती त्याने संग्रहित केल्या त्यांतील ' साच आणि लटिके ' त्याने पाहिलेले असावे, व त्यांतून चरित्र-विषयाची म्हणजे नागदेवाचार्यांची मूर्ती उठून दिसावी. यांपैकी पहिली अपेक्षा पूर्ण करण्याचे काम नरेंद्रापेक्षा त्याच्यानंतर येणाऱ्या संस्करणकारांनी केले असावे असे ' स्मृतिस्थळा ' त पदोपदी घालण्यात आलेले ' शोध ' आणि ' वासना ' पाहून वाटते. त्यामुळे या चरित्राला प्रामाण्य किती प्रमाणात प्राप्त झाले आहे ते सांगणे हे पंथाच्या इतिहासकाराचे काम आहे. दुसऱ्या अपेक्षेची मात्र पूर्ती झाली आहे असे मोकळेपणाने म्हणता येते. ' स्मृतिस्थळ ' वाचून नागदेवाचार्य किंवा भटोबास हे कोणत्या योग्यतेचे होते आणि त्यांचे कर्तृत्व काय या गोष्टींवर चांगला प्रकाश पडतो. इतकेच नव्हे तर या चरित्र-ग्रंथातील प्रत्येक स्मृतीतून त्यांची मूर्ती साकार होत जाते आणि शेवटी ' स्वामिकार्य पुढे चालवतांना माझ्याकडून कोणाची आगळीक झाली असेल तर त्या सर्वांनी मला क्षमा करावी ' असे म्हणून देह ठेवणाऱ्या या एकनिष्ठ गुरुभक्त तपस्व्याचे कधीही पुसले न जाणारे असे एक संपूर्ण चित्र आपल्या मनःपटावर उमटते. आचार्य नागदेवांचे हे दर्शन घडवीत असतांनाच 'स्मृति'-कार, अहेतुकपणेच का होईना, पण आणखीही काही गोष्टी साधतो. आचार्यांच्या परिवारातील महादाइसे, म्हाइंभट, केसोबास, दामोदरपंडित, हिराइसे यांसारख्या श्रेष्ठ भक्तांची स्वभावचित्रे तर तो काढतोच; पण चक्रधरांचे ' शास्त्र ' आचार्यांच्या तोंडून प्रसंगाप्रसंगाने मार्मिकपणे सांगून त्यांच्या एकंदर चरित्राला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून देतो. नागदेवाचार्य चक्रधारांच्या ' शास्त्रा ' त निष्णात होते, स्वतः स्वामींनी त्यांना

घडविले-मढविले होते. किंबहुना म्हणूनच पंथाचे पहिले आचार्यपद त्यांच्याकडे आले. अशा व्यक्तीचे चरित्र तत्त्वज्ञानावाचून लिहिणे म्हणजे चक्रधरांवाचून ' लीळाचरित्र ' लिहिण्यापैकीच झाले असते. तेव्हा ' स्मृतिस्थळा ' त नागदेवाचार्यांच्या मुखातून चक्रधरांचेच का होईना पण तत्त्वज्ञान यावे हे योग्यच म्हटले पाहिजे.

अशा या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान असणाऱ्या स्मृती प्रथम लिहून काढणारा नरेंद्र हा एक कविवर आहे. " सकळां कवीपरीस हा कवि चतुर " हा त्याच्याविषयीचा एक अभिप्राय ' स्मृतिस्थळा 'तच नोंदविलेला आहे (स्मृ. ११३). अशा भाषाप्रभूने कोणाच्याही आठवणी लिहिल्या तरी त्या रसाळ उतरतात. मग येथे तर चरित्रनायक नागदेव आहेत, चक्रधरांच्या दैवी सान्निध्यात निराळेच होऊन गेलेले व त्या ' वचनरूप परमेश्वरा 'ला नित्य हृदयात बाळगणारे पंथाचे आद्याचार्य आहेत. स्मृतिविषय आणि स्मृतिकार यांचा हा योग मणिकांचन योगाप्रमाणे अपूर्व असून त्यामुळेच ' स्मृतिस्थळा 'ला उज्ज्वलता लाभली आहे. त्याच्या यशाचे मर्म या गोष्टीत आहे. ' स्मृतिकारा 'ची भाषा कशी कमावलेली आणि किती परिणामकारक आहे याची थोडी कल्पना यावी म्हणून पुढे त्याच्या ग्रंथातून काही **निवडक वाक्ये** दिली आहेत. ती वाचून त्यांचा होणारा परिणाम प्रत्येकाने स्वतःच्या मनाशी अनुभवावा. कंसांतील आकडे स्मृतींचे क्रमांक दर्शविणारे आहेत.

"नेणों मा तुझा श्रीप्रभुः माझा देवो तो श्रीचक्रधरुः " (३)

" नको गा बाइदेया : दुखें अंतःकरण जाइलः " (६)

" आतां हे योगिये जाले : यांचें पाप मज लागत असे : " (१३). (केसोबासांच्या पत्नीचे उद्‍गार.)

" माझा केशवु शुकयोगींद्र कीं गा : " (१३)

" भलें केलें केशवदेया : गोसावियांचीया अमोघा लीळा बांधलीया : तुवां वाक्‌पुष्पीं ईश्वरार्चन केलें : " (१४)

" नको गा केशवदेया : येणें माझिया म्हातारीया नागवतील : " (१५)

" (योगभ्रष्ट) तवं माझीये दशेचा नव्हे : मां तुमचिये दसेचा काइ होइल ?" (१९)

" गृहस्मरणापसि झाडातळीं मनोरथ आठवीसि तें निकें : मनोरथापसि तेथ निद्रा कीजे तें निकें : " (३३)

" कवणाचा गोल्हो : कवणाची सिती : तूं आपुलें चिंती वो साकुबाई : " (३३)–साकाइसेला अनुलक्षून.

" ये सृष्टीमध्यें येणें अवतारें श्रीचक्रधरें जो नुधरे तो कहींचि नुधरे : मा नुधरे : मा कहीचि नुधरे : " (३५)

" कीर्तीचें तऱ्ही वैराग्य करो कां गा : परि पाये न पसरो : " (४४)

" जिये चुलीची खीर खादली : तिये चुलीशी काइ राख खाल ?" (५८)

" सृष्टीमध्यें देवो दुर्लभु : कां देवातें आठवी तो दुर्लभु : " (६२)

" तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणें गा : मज श्रीचक्रधरें निरूपिली मऱ्हाटी : तियांचि पुसा : " (६६)

" हें महात्मेपण विकणें म्हणा : " (८२)–गौराइसेला अनुलक्षून.

" हे हातवणी : जेवण तें पुढां उरलेंचि असे : " (८६)–रामदेवराव यादवाला अनुलक्षून.

" पंडिताचें गीत तें माझे हाकारे गा : " (९१)

" सर्वांगीं काइ देखणें असे ? देखणें तें डोळेनिचि कीं : तैसे तुम्ही माझे डोळे कीं गा पंडिता केशवद्या : " (९५)

" हां गा केशवदेया : जया एकु वैरी तो दिहां निद्रा न करी : मां तुम्हां तवं चौदा वैरी असतां कैसें निजतां ?" (१०४)–महादाइसेचे उद्गार.

" एकें अनिष्ट आलेयां आपणयातें राखीलें : एकें एकातें राखीलें : केशवदेनि मार्गातें राखीलें गा : " (१०५)

" ना राजेहो : आमचेया कविकुळा बोलु लागैल : " (११३)–नरेंद्राचे राजसभेतील स्वाभिमानपूर्ण उद्गार.

" तूं म्हणतासि : आणि माझें अंत:करण अवघें चंद्रमये होताये : " (१२१)–कवीश्वरांप्रत भटोबास.

" हां गा सर्वकाळ जरि चर्चाचि करावी : तरि देवातें केधवां स्मराल ? " (१२४)

" या भीक्षुकाचां पात्रीं एक सीत संपादीलेयां मेरु संपादीलेयाचें गोमटें होए : " (१२५)–भिक्षेचे माहात्म्य.

" भटो : तुम्ही काइ ईश्वर ? " " ना : आम्ही ईश्वराचे भक्त : " (१२९)

" कोथळा तेथ जाइल : जेथ पायें हाणीतलेयां सीस नेणिजे : " (१९५)

" तुम्हां जरि देवो नव्हे : तरि कोण्हाही देव नव्हे : " (१९८)–म्हाइंभटाप्रत.

" चक्रस्वामीविण तें गंगातीर तांबाजाळीं जळताये रे : " (१९९)–आउसेचे उद्‌गार.

" पैठण-रुधिपुरीचे भात मज वेळवति ना गा : "(२०१)

" हीराइये विरक्ताची कसवटी गा : इचां कसीं उतरला तो विरक्त :'. (२४१)

" वराड माहेर : गंगातीर सासुरें गा : " (२४६)

" तोंडीं तांबुळ माथां फुलें : यैसा उपभोगी अनुसरणा निगे : आणि तेधवांचि सरे : तया नाचरतांचि ईश्वरगति गा : " (२५२)

" गोसावीयांचा व्यापारु चालवितां कोण्हा माझें वेकास गेलें असैल : तरि तुम्ही समस्तीं क्षेमा करावी : " (२५९)–भटोबासांचे अखेरचे उद्‌गार.

याप्रमाणे स्मृतिकाराच्या वाणीची झळक आहे. ती वाणी जशी गोड आहे, तशीच प्रसंगी कडकही आहे. सुखदु:खांचे उद्रेक ती अचूकपणे टिपते, लहानथोरांविषयींचे अभिप्राय मार्मिकपणे व्यक्त करते, शास्त्राला मोहकता आणते आणि थोडक्यात पुष्कळ सांगते. क्वचित् ती प्रासात्मकही होते आणि मग " धर्म तरि दैवगति : आणि भटां तरि नमस्कारे ये खंति : " अशा प्रकारची प्रास जुळविलेली वाक्ये ती सहज बोलून जाते (१३०). शब्दचित्रे

तर ती उत्कृष्टच काढते. या दृष्टीने यावनी आक्रमणाच्या सपाटद्यात देशभर झालेल्या धुळधाणीचे लेखकाने केलेले वर्णन उल्लेखनीय आहे (स्मृ. ८३ ते ८६). तसेच निरूपणाच्या ओघात मार्मिक अशी **सुभाषिते** लिहून जाणे हा साहित्याचा एक गुण मानतात व तो 'स्मृतिस्थळ' वाचतांना अनेकदा जाणवतो. पुढील सुभातिषतवजा म्हणींतून किंवा म्हणीवजा सुभाषितांतून भाषेची ही सारवत्ता कशी जाणवते याचा अंदाज प्रत्येकाने स्वतःशी घ्यावा.

" देहान्तीं झोळी घेइजे तें येथचें अर्धोदक बोलीजे गा : " (२४)

" मुंगीयांचे मढें तें मुंगांचि काढावें कीं गा : " (५९)

" आतां येथौनि पुढीलाची रेघ आणि मागीलाचा अनुतापु : " (१३१)

" अन्नाचीया चाडा तरि ब्राह्मणाचीया घरा जावें : वाहानाचीया चाडा तरि चर्मकाराचीया जावें : " (१३८)

" वोहटळीची गोटी वोहटळां येईल कीं वो : " (१६२)

" तोंड अबद्ध तरि वाचिजाये : पोथी अबद्ध तरि फाडिजाये : " (१७२)

"ईश्वरपरायेणा परमेश्वरस्मरणीं सदा पर्व असे : " (१७६)

" अर्ध कुपीं : अर्ध सुपीं : " (२१३)

" पिसेया पिंपळगावो काइ दूरि ? " (२३२)

" वरवडाची क्रिया भीतरीं येइल : " (२४३)

याप्रमाणे 'स्मृतिस्थळा'तील भाषेचे स्वरूप आहे. ती अलंकारादिकांनी नटलेली नसून साधीसुधीच, पण विलक्षण प्रभावी आहे. नरेंद्र हा वास्तविक पाहता साहित्यशास्त्रात मुरलेला ग्रंथकार. त्याचे 'रुक्मिणी-स्वयंवर' हे काव्यही रसालंकारांनी खचून भरलेले. तेव्हा साहजिकच अपेक्षा अशी की त्याचे गद्यही तसेच सालंकृत असणार. परंतु ते तसे नाही, इतकेच नव्हे तर अगदी साधेसुधे, व्यावहारिक गद्याच्या सीमारेषेवर घोटाळणारे असे आहे. पण तेही रोचक वाटते याचे कारण त्यात लेखकाने ओतलेले स्वतःचे भावपूर्ण व डोळस जीवन. त्यामुळे, नरेंद्राच्या या भावनिष्ठ व्यक्तिमत्त्वामुळे, 'स्मृतिस्थळा'ला वाङमयीन सौंदर्य प्राप्त झाले आहे. त्यातील सर्वच

स्मृती त्याच्या हातच्या असतील असे नाही, हे खरे. पुढील 'शोध'कारांचा हात त्यांवरून फिरल्याच्या खुणा प्रत्यक्ष ग्रंथातच सापडतात हे आपण पूर्वी पाहिलेच. तरीसुद्धा 'स्मृतिस्थळा'चा बव्हंश नरेंद्राच्या हातचा असणार याविषयी शंका वाटत नाही. स्मृती मुख्यत्वेकरून नरेंद्राच्या असल्या पाहिजेत हे सिद्ध करणारे काही पुरावे आपण यापूर्वी विचारात घेतले. स्मृतींचे वाङ्मयीन सौंदर्य हा त्या संबंधातील आणखी एक पुरावा आहे. "भाषाशैलीच्या दृष्टीने पाहता 'लीळाचरित्रा'दि सर्वच चरित्रग्रथ 'स्मृतिस्थळा'पेक्षा सरस वाटतात " असे श्री. वा. ना. देशपांडे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात. साधेपणा व एक प्रकारची अपरोक्षता ( Directness ) या बाबतींत कदाचित् 'स्मृतिस्थळा'पेक्षा 'लीळाचरित्र' सरस ठरेल. परंतु कृत्रिमता न येऊ देता भाषेला वाङ्मयीन रूप कसे द्यावे ते 'स्मृतिस्थळा'-वरूनच कळते. हा साहित्यगुण 'लीळाचरित्रा'त तितक्या प्रमाणात नाही. 'स्मृतिस्थळा'त तो पदोपदी आढळतो याचे कारण हेच, की त्याचे कर्तृत्व बव्हंशी नरेंद्राकडे जाते व नरेंद्र हा एक अनुभवी, मुरलेला ग्रंथकार आहे. 'स्मृतिस्थळा'ची ही साहित्यशोभा येथे विस्ताराने दाखविण्यास सवड नसल्याने त्यातील काही विशेष सरस स्मृतींचा निर्देश करून हे प्रकरण आटोपते घेऊ.

**काही विशेष उल्लेखनीय स्मृती**:—चक्रधरांच्या वियोगाने वेडापिसा झालेला नागदेव ( २ ते ४ ) ; स्वामींच्या पिकेचा चिरा आणि बाइदेवबास (६); विरक्त केसोबासांच्या पुढे हात टेकणारे त्यांचे आप्तजन (१३); नातवंडांत रमलेल्या साकाइसेला वैराग्याचा उपदेश (३३); वैराग्याने फुगलेला महात्मा (४५); इंद्रभटाकडून गुरुकुळास करविलेले प्रसाद-वस्त्राचे दान (६९) ; परचक्र-वर्णन (८३ ते ८५) ; भटोबासांचे 'हाकारे' झालेले पंडितांचे गायन (८९ ते ९१); आचार्यपद न मिरवणारे नागदेवाचार्य (९३) ; त्यांचे दोन डोळे : पंडित आणि केसोबास (९४, ९५ ) ; नवऱ्या-कडून दंडवत घालून घेणारी लुखाई (९७); भटोबासांच्या देहमंदिरात झळकणारी 'वस्तु' (१०२) ; मोहाच्या प्रसंगाला तोंड देऊन 'मार्ग' राखणारे केसोबास (१०५, १०६ ) ; दुष्काळात आपले 'म्हातारदाम' देऊ

करणारे नागदेवाचार्य (१०७) ; कृतज्ञ भटोबास (१११) ; नरेंद्र व त्याचे 'रुक्मिणी-स्वयंवर' (११३) ; कवीश्वरांना निघालेले 'तृतीय शिंग' (११६) ; आपला नमस्कार घ्यावयास लावणारी आकाइसा (१३०) ; अनुतापदग्ध वंकी (१३१) ; उज्जैनीत चक्रधर (१३२) ; 'लीळाचरित्रा'ची रचना (१३९ ते १४२) ; चक्रधरांचा तोतया (१९२) ; म्हाइंभटांचे देहावसान (१९८) ; 'तो मी कवी भास्करू' (२०४) ; महादाइसेचा मृत्यू (२५४) ; नागदेवाचार्यांची अखेर (२५७ ते २६०).

## समारोप

याप्रमाणे 'स्मृतिस्थळा'च्या अभ्यासाची अनेक अंगे आहेत. त्यांचे स्थूल दिग्दर्शन करणे इतकेच येथे शक्य होते व ते येथवर यथामती केले. वास्तविक 'स्मृतिस्थळा'सारखे चरित्रग्रंथ स्वतंत्रपणे अभ्यासिण्याचे नसून ज्या एका मालिकेतील ते दुवे आहेत त्या संपूर्ण मालिकेच्या संदर्भातच त्यांचा विचार व्हावयास पाहिजे. श्रुती, स्मृती, वृद्धाचार आणि मार्गरूढी या चार निरनिराळ्या कालखंडांतील दुव्यांनी सिद्ध होणारी ही मालिका म्हणजे 'भटमार्गा'चा किंवा महानुभाव पंथाचा संगतवार इतिहास असल्याप्रमाणे असून त्याचा अभ्यास साकल्याने होणे अवश्य आहे. अशा अभ्यासाची पूर्वतयारी म्हणून 'लीळाचरित्रा'दि ग्रंथांच्या सखोल व सूक्ष्म अध्ययनाचे महत्त्व आहे. या दृष्टीने 'स्मृतिस्थळा'ची ही पाहणी एकंदर महानुभाव पंथाच्या व त्याच्या चरित्रवाङ्याच्या अभ्यासाला उपकारक होईल अशी आशा आहे. पंथाच्या इतिहासाच्या दृष्टीने 'स्मृतिस्थळा'चे एक वैशिष्टय हे, की तो ग्रंथ कालदृष्टया 'लीळाचरित्र' आणि 'वृद्धाचार' यांच्या मध्ये येतो व त्यामुळे त्याचे दुवे या दोन्ही ग्रंथांत सापडतात, तसे ते शोधावेही लागतात. साहजिकच त्याचा अभ्यास या संपूर्ण चरित्रवाङ्मयाच्या अभ्यासाला केवळ पोषकच नव्हे तर अवश्य ठरतो. 'स्मृतिस्थळा'चे वाङ्मयीन मोल तर अनन्यसाधारण असून ते त्याला प्राप्त धरून देणारा त्याच्या फार मोठ्या भागाचा लेखक नरेंद्रबास हा ग्रंथकार म्हणून मान्यता पावलेला आहे हे या ग्रंथाचे दुसरे वैशिष्टय होय. त्यामुळे त्याच्या या गद्य कृतीवरही त्याच्या कवित्वशक्तीचा ठसा उमटणे अटळ होते आणि त्याप्रमाणे तो उमटलाही

आहे. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे ' स्मृतिस्थळ ' हे नागदेवाचे, एका काळच्या छंदीफंदी पण पुढे चक्रधरांच्या सहवासात आमूलाग्र पालटून आद्याचार्यपदाचा मान मिळवणाऱ्या नागदेवचार्यांचे चरित्र आहे. त्यामुळे या ग्रंथाला विशेष मान्यता आहे. कारण चक्रधरांचा संदेश अधिकृतरीत्या त्यातच पहावयास मिळतो. नागदेवचार्यांकडे आपल्या मार्गाचे पुढारपण सोपवितांना स्वामी त्यांना म्हणाले होते, " तैसा तूं परतारकु आचार्या नव्हेसि की गा : तूं प्राणियांते अनिष्टापासौनि काढ़ुनि इष्टीं लाविता आचार्या कीं गा : " (ली. उत्तरार्ध ४७७). त्यांच्या बोलण्यातील सूचना ध्यानात घेऊन नागदेवाचार्यांनी आपले उर्वरित आयुष्य त्यांचा ' व्यापार चालविण्या 'त, म्हणजेच आर्त व जिज्ञासू जीवांना परधर्माची वाट दाखविण्यात घालविले. हे जीवितकार्य करीत असतांना त्यांनी स्वतःच्या हृदयात साठविलेला ' वचनरूप परमेश्वर ' त्यांच्या उपयोगी पडला व त्याच्या आधारे त्यांनी ती उत्तरापंथाने निघून गेलेली ईश्वरवाणी पुन्हा सर्वांना ऐकवली. ' स्मृतिस्थळा 'त ती ऐकावयास मिळते म्हणून त्याचे माहात्म्य !

---

# स्मृतिस्थळ

श्री परेशाय नमः ॥

**गोसावीयांचा त्रीवीध परीवार :** संनिधानीं गोसावियाचा त्रीवीध परीवारः एक अनुसरले : १ : बोधवंत : २ : एक दर्शनीए : ३ : * ऐसा त्रीवीध परीवार गोसावीयांचा : तयांत प्रवृत्तीचा विसेखु तो भटांचां ठाइं : का जें मूळीहूनि घडीले : मढीले : संनिधाना योग्य केले : तो आता सविवरु सांघता असीजेति : ॥ भटोबासांचे पीते ते माहादेवभटः ते पुरीचेः भटोबासां चौघे भावंडे : वडील सारंगपाणीभटः वैंजोबाः उमाइसेः उसाइसें तीयें हातरीतीं जालीं: सारंगपाणीभट ते वाटे मारलेः माता आबाइसें तेही रांवसगावीं सीधनाथीं तेणें दुखें गंफा केलीः तेथ होतीः तवं दादोस आलेः तयांपासौनि काहीं अवघेयां गोमटें जालें: तेहीं गोसावियांचे गुण सांघीतले : मग दादोस गोसावियांचेया दर्शनासि नीगालेः सरीसीं आबाइसेंः उमाइसें : भटोबासः माहादाइसें: ऐसीं श्रीनगरां आलीं: गोसावियासीं दर्शन जालें: तेथ अधीकचि वेधु संक्रमलाः याउपरी भटोबासां आणिक सा भेटी जालीयाः साहावीए बोधु जालाः सातवीएं अनुसरण जालें: बतीसां वरुषां अनुसरलेः च्यारि वरुषें सन्निधान जालें: त्यांतु सा मास श्रीप्रभूचां सन्निधानी गेलेः आउठ वरुषें आमचया गोसावीयांचां सन्निधानी भरलीं: योग्य जालेः घडिलेः मढिलेः आचार्य करूनि माहादाइसें नोरोवीलीं: मग गोसावीयांसीं प्रवृत्यंतर जालें ॥ शके११९४ श्रीमुख संवत्सरी माहो मासीं शुध चतुर्थी सोमवारीं ॥१॥

**भटोबासां ईश्वरवियोगें अवस्था :** ॥ गोसावी बीजें केलेयांउपरि भटोबास वीरहें नीगोनि गेलेः अवस्था प्रकटलीया : ते कव्हणाहीं चोजवतां नाः मग माहादाइसें शोधीति शोधीति गंगातीरीहूनि परेश्वरपुरा गेलीं: श्रीप्रभुगोसावियांसी दर्शन जालें: मग दुख करूनि पुसिलेः 'जी जीः श्रीचक्रधरें सांडिले आणि नागदेवही दिसेना जीः' गोसावीं वीनती स्वीकरीलीः श्रीप्रभु-

---

*येथे पुष्कळ पोथ्यांतून वरील त्रिविध परिवारातील व्यक्तींची नावे दिलेली आहे.

गोसावी म्हणितलें: 'अवो मेली भानखेडयासि जाय म्हणे: ' आणि माहादाइसीं म्हणितलें: 'जी जी: ' आणि तैसीचि नीगालीं: श्रीचरणीं लागलीं: भानखेडयासीं गेलीं: तवं काहीं देखति ना: मग रानें डोंगर शोधीति: गोपाळातें पुसिलें: तेंहीं सांघितलें: 'होये देखिला होता: आम्ही तयाचां तोंडीं कुरंधनें पीळूं: ' मग महादाइसीं सोधूनि काढीले: सावधु केले: ओळंबे झाडीले: पांगुरवीले: पाटकुळीए वाउनि गावांजवळि आणीले: मग एकी ठाइ बैसउनि आपण गावांतु गेलीं: दूध आणिलें: बोळेवरि पाजीले: येतुलेनि मागीलापसि सावध जाले: ॥ २ ॥

**माहादाइसें श्रीप्रभु अवतार प्रकासीं 'माझा श्रीचक्रधरु ' म्हणणें:** ॥ मग माहादाइसीं म्हणितलें : 'नागदेया: गोसावियांपासि चाला जावो: ' भटोबासीं म्हणितलें: 'कें असति गोसावी: ' माहादाइसीं म्हणितलें: 'हे नव्हेति रुधिपुरीं: श्रीप्रभुगोसावी बोलाउं पाठवीलें असे: ' भटोबासीं म्हणितलें: 'नेणों मा तुझा श्रीप्रभु: माझा देवो तो श्रीचक्रधरु ओ: ' तवं माहादाइसीं म्हणितलें: 'नागदेया तूतें गोसावीं श्रीप्रभूसि नीरोविले असे कीं: आणि मज तुज नीरोविलें असे कीं: चाल: ' म्हणौनि पाटकुळीए वाउनि नीगालीं ॥ ३ ॥

**श्रीप्रभुसन्निधाना गमन:** ॥ मग तेथौनि नीगाले: एकी वासना : ॥ हळुहळु चालूं लागले: ॥ मार्गी चालतां लोकु वोळखति: मग म्हणती: 'हा तो नव्हे: श्रीचक्रधर देया ओ: म्हणौनि हातीं भीक्षा मागे: ' तवं माहादाइसें म्हणति: 'बा देवेंवीण पीसा जाला बा: ' यापरि रुधिपुरासि आलीं: तवं श्रीप्रभुगोसावीं पांच पिंपळीयांकडे सकाळीचि बीजें केलें: तेथ खेळत होते: तवं माहादाइसें भटोबासाते घेउनि आलीं: श्रीप्रभु देखौनि म्हणितलें: 'आवो मेली जाए: यें त्यें नव्हेति: श्रीचांगदेओराउळांचीं: ' भटोबासां: माहादाइसां थोर दुख जालें: श्रीप्रभुगोसावीं आस्वासिलें: 'मेला जाए: अस अस म्हणे:, मग श्रीप्रभुगोसावियांचां सन्निधानीं चौदा वरुषें राहीलें: म्हाइंभटही आले: अवघींचि भक्तिजनें आलीं: सन्निधानीं होतीं: दास्य करूं लागलीं: ॥ ४ ॥

**श्रीप्रभुप्रवृत्यंतरें भटोबास गंगातीरागमनि तीर नमस्करणे:** ॥ ऐसां बहुतेकां दीसां व्येय संवत्सरीं माघ मासीं वधि चवथीचां दिसीं श्रीप्रभुगोसावींहीं प्रवृत्यंतर केलें: भटोबासां: भक्तिजनां: थोर दुख जालें: मग तेणेंचि

दुखें भटोवास गंगातीरासि आले: सरीसे लक्ष्मीधरबा: बाइदेवोबा: माहादाइसें: कोथळोबा: पोमाइसें: साधें मुख्य आणीकेंहीं: ऐसे रावसगावापासौनि डोंबेग्रामवेऱ्ही थडी नमस्करीली: प्रतीष्ठानीं पंचरात्रीं घातली: आवघे नगर सव्य घालौनि नमस्करीलें: मग वृधासंगमा–जोगेश्वरीहूनि खडकाळीए आलें: मग पेहरासंगमा नेउरगावींहूनि छिन्नपापासि आले: छिन्नस्थळीं मुख्य सकळ स्थानें नमस्करीली: छिन्नस्थळीएसि नावेक बैसले: मग नीगाले: ॥ ५ ॥

**बाइदेवोबा प्रसादग्रहणीं अती दुख नीराकरणें**:॥ मग भटोबास समस्तां सीष्यांसहीत डोंबेग्रामांतु आले: जगतीचा दारवठां दंडवत घातलें: तैसेंचि पूर्वाभिमुख मठां आले: तवं तेथ पूर्वी गोसावीं भितभंगीचेया चीरेयावरि पीक घातली होती : ते भटोबासीं देखिली: आन थोर दुख जाले: तेथ मुख लावीलें: प्रसाद घेतला: तवं बाइदेओबास आले : हे कैं भटोबासांपासि अनुसरले होते तें नेणिजे: भटोबासीं तया पीकीचें ज्ञान केलें: 'हे घेया गा बाइदेया गोसावियांचेया प्रसादाची पीक:' ते देखौनि बाइदेवोबासीं भूमीवरी आपणयांतें घातलें: आवघेयां अधिक दुख जालें: तेंविचि बाइदेवोबा प्रसाद घेति: मुख सोललें: भटोबासीं वारीलें: संबोखीलें: भटोबासीं म्हणितलें: 'नको गा बाइदेया: दुखें अंत:करण जाइल:' म्हणौनि हातीं धरूनि उठवीले: मग दोन्ही मढ नमस्करीले:॥६॥

**राजमठीं सप्तरात्र घालणें**:॥: मग समस्तांसहित छीन्नस्थळिये विजन करीति: वादाठाणीं देगावीं भिक्षा करीति: विळचां राजमठीं निद्रा करीति: ऐसे सप्तरात्र घातलें:॥७॥

**उंबरवट काढूनि तीर्थत्रय करण**:॥: मग एक दीं: भटोबासीं सुतार बोलाविला: आणिक उंबरवट घडविला: तो मठु अवघाचि काष्ठाचा: उंबरवटु तोही काष्टाचाचि होता: तो भटोबासीं काढीला: तेथ आणिकु घातला: मध्यें जयावरि श्रीचरणु ठेवीति: तयाचें थोरलें पात्र केलें: दोही सेवटांचिया धाकुटीया दोनि पातॢलिया केलीया: उरला तयाचे मणि करूनि समस्तां नमस्करावेया दीधलें: आणि मोठें पात्र तें आपण अंगीकरीलें: तयांतु प्रसादाचा फुटा: वांकि: सांकळें: कांबि: दोन्ही जाडीचे विशेष: श्रीप्रभुगोसावियांचि प्रसादवस्त्रें: कापुराचि सेंद यैसें आवघें घालीति: तें देहपर्यंत

नमस्करीलें:॥: शोधु:।: एकि पातृली ते चक्रपाणिबासि मागां भटोबासांचेनि नावें भीक्षा केली तैं तयासि कविस्वरबासि दीधली: कवणाजवळि आली ते नेणिजे:॥ : तथा सोधु:॥: येचि काळीं भटोबासीं छीन्नस्थळी काढीलीं घेतली: आणि खांब: द्वारसंका: कवाडें कवणीए वेळें काढिलीं हें नेणिजे:॥८॥

**बाइदेवोबा दुखातिसयो दर्शनें बेलोपुरा न वचणें**:॥: मग एक दीं भटोबासीं निगतां म्हणितलें: 'आतां बेलोपुरा जाइजैल तरि बाइदेयाचें देह जाइल:।' एकी वासना: पिकेवरूनि म्हणितलें:।: म्हणौनि न वचतिचि: तेथौनिचि मुरडले :॥९॥

**राजौर लक्ष्मीधरभटा श्रवणानुसरण** :॥: **शोधः** ॥ एक दीं राजौर लक्ष्मीधरभटांसि भटोबासांचें दर्शन जालें: कवणिपरी हें नेणिजे: तयासि श्रवण जाले: भीक्षा केली: मग तया राजौरकर लक्ष्मीधरबा यैसे म्हणति: मग तेहीं भटोबासां विद्यमान पुढां **'आचार-विचार लक्षणें'** केलीं: **'प्रकरणिचीं लक्षणें'** केलीं : भटोबासां पुसपुसों: ॥१०॥

**म्हाइंभटां भेटि**:॥: शोध:।: भटोबास गंगातीरां निगतां समै ईश्वर-नायेकें वेव्हारु लाविला: तयाचिया कन्या आपुला विवाहो करूं नाहीं दीधला: तेणें कारणें म्हाइंभट मागां राहीले: देउळवाडां वेवहार सांघितला: ईश्वर-नायेक निरोतर केले: ॥ शोधु: ॥ गोसावियांची प्रवृत्ति काइ कव्हणा जाणितली जात असे: ॥ एकी वासना:॥: वाटा दीधला:॥: मग म्हाइंभट मागौनि गंगा-तीरा आले: आउसे तेथचि राहीली: मग म्हाइंभटां भटोबासां गंगातिरीं भेटि जाली: ॥ ११ ॥

**केसोबासां भेटि**: **अनुसरण**: ॥ केसोबास ते कवणिये गांविचें हें नेणिजे:॥ एकी वासना:।: पापदंडी रामपुरीचे:॥: ते विद्वांस व्याख्याते: एक दीं ते भटोबासांपासि आले: भीक्षा केली: भटोबासां थोर पढियेति: भटोबासांचां सन्निधानि राहीले: ॥ १२ ॥

**तथा संबंधी–संबंधु-प्रदानि माझा केसव सुकयोगिंद्र म्हणणें**:॥ मग एक दीं केसोबासांचि संबंधियें आइकोनि नेयावया आलीं: भाउ गोपाळदेव: आणि सासुरे यैसें प्रतिकूळत्वें नेवों आलें: केसोबासातें नेलें: भिक्षा सांडवं आदरिली: तवं ते काहीं केलेयांही न संडीतिचि: मग तेहीं असिकें विद्वांस

बालाविलें: चर्चा करवीलि: तेंही ते निरोत्तर केलें: मग विद्वांसींहीं हात झाडीले: तेहीं म्हणितलें: ' हे आम्हां जिणवति ना: आतां यांची ब्राह्मणि यांतें जिणैल: तरि जिकतीं: आतां यें दोघें येका घरांत कोंडावि: ' मग कोंडीली: तेथ तीयें बाजेवरि निजति तरि ते खालि निजति: तियें खालि निजति तरि आपण बाजेवरि निजति: यापरी रात्रि जाये: दिवसा गंगेकडे जाति: तेथ दृष्टीची राखणें घालीति: केसोबास गंगे विजन करीति: तेथ '**रत्नमाळा-स्तोत्रें**' करीति: मग गावांतु येति: यापरि सातपांच दिवस जाले: मग ब्राह्मणीं म्हणितलें: ' आतां यांसि जावों द्या: आतां हे योगीये जाले: यांचे मज पाप लागत असे: ' मग अवघां केसोबासां अनुज्ञा दीधलि: निगाले: भटोबासांसीं भेटि जाली: मागील सांघितले: तें आइकौनि-परीसौनि भटोबासी म्हणितलें: 'माझा केशव शुकयोगींद्र किं गा:' म्हणौनि थोरचि प्रसंसीले: ॥१३॥

**तथा ' रत्नमाळा ' स्तोत्रदर्शनीं ईश्वरार्चनप्रसंसा :॥** मग केसोबासिं '**रत्नमाळा**' केलीया: तिया भटोबासांपासि वाचिलीया: तवं तेथ एकि ठाइं देउळवाडेयाचेनि भावें हनुमंतवाडा घातला होता : तो आइकौनि भटोबासी म्हणितले: ' तो हनुमंत नव्हे किं गा: तो देउळवाडा: भलें केलें केसवदया: गोसावियांचीया अमोघ लीळा बांधलीया: तुवां वाक्पुष्पीं ईश्वरार्चन केलें: ' ॥ १४ ॥

**तथा ' उद्धरणस्तोत्र ' बंध निष्करणें:॥** '**रत्नमाळा**' चि पोथी वाचूनि केसोबासिं भटोबासांते पुसिलें: ' हा भटो यैसेचि '**उद्धरण**' बांधों:' तवं भटोबासिं म्हणितलें: ' नको गा केशवदया: येणें माझिया म्हांतारीया नागवतिल: मग केशोबास संस्कृतबंधु न करीतीचि: ॥ १५ ॥

**तथा ' शास्त्रप्रकरणान्वया 'नुज्ञा ॥** मग मागौतें केसोबासिं पुसिलें: ' भटो तरि शास्त्रप्रकरणान्वयो लावूं: ' तें भटोबासि मानिलें: मग म्हणितलें: ' तरि जें जेथचें तें तेथीचें माझेनि विचारें लावावे गा:' मग केसोबासिं भटोबासांतें पुसपुसों अनुक्रमें '**प्रकरणान्वयो**' लाविला: जें जयाचें नाम तें तया ठेविलें: ॥ १६ ॥

**तथा ' दृष्टांतप्रकरणान्वया ' नुज्ञा: ॥** मग केसोबासिं अवघें अन्वयो लावूनि माघौते भटोबासातें पुसिलें: ' भटो तरि '**दृष्टांतां**'अन्वयो लावूं:'

भटोबासीं मानिलें: मग केसोबासिं भटोबासांतें पुसपुसों **'दृष्टांतप्रकरणां'** ही अन्वयो लाविला: दृष्टांतीं दृष्टांतिक केलें: अवघेया दृष्टांता लापिका लाविलीया: यातें '**दहावें प्रकरण**' म्हणति: ॥ शोधु:। तैसेचि भटोबासांतें पुसपुसों तीं सतां '**आचारा**' आणि तीं सतां '**विचारा**' ही अन्वयो लाविला: ॥ लापिका संबंधें: ॥ तथा शोध: ॥ मग येथ राजौरकर लक्ष्मीधरबायें केसोबासांचा वचनक्रम घेउनि लक्षणें केलीं: यैसा शास्त्रा संबंधु लाविला: ॥ १७ ॥

**विरहें लक्ष्मीधरभटीं ईश्वरविरहें 'ज्ञानभास्कर' प्रसंसा:** ॥ एक वेळ वरहें लक्ष्मीधरबा अटना गेले: अटनिं थोर विरहो भरला: ते यैसे हींडत हींडत पाथरीसमीप बाबूळगावां आले: तेथ विहीरीचिये रवणियेवरि देउळी: तीये देउळीयेआंतु बैसोनि 'ज्ञानभास्कर' केलें: करीतां येकाधिये वेळे दुखें मुर्च्छाप्रपन्न होति: मग माघौते सावध होति: भिक्षे जाति: येकाधां दीसिं तैसेचि पडीले असेति: मग तेथचा राणा ये: तो तयांते उठवि: सावधां करी: यापरी स्तोत्र जालें: मग भटोबासांचिये भेटी आले: पोथी भटोबासांचां हातिं दीधली: भटोबांसीं पाहीली: वाचीली: आणि थोर मानवले: तोखले: ते शब्द न येतिचि: ॥ १८ ॥

**लक्ष्मीधरबा–म्हाइंभटां संवादीं योगभ्रष्ट निर्वचणें** ।। एक दीं लक्ष्मीधरभटीं म्हाइंभटाते पुसिलें: 'योगभ्रष्ट तो कवणिये दसेचा:' म्हाइंभटी म्हणितलें: 'आमचीये तुमचीये दसेचा:' तें आइकौनि भटोबासीं म्हणितलें: 'आतां तवं माझीये दसेचा नव्हे: मां तुमचीये दसेचा काइ होइल:' मग तेही म्हणितले: 'तरि भटो तो कवणिये दसेचा:' भटोबासीं म्हणितले: 'चीमुटीलेयां दुखवेती ना तिये दसेचा:' आणि ते बुझौनि गेले: ॥ १९ ॥

**म्हाइभटां तस्करबंधनिमित्तें मौननिषेधु:** ॥ एकवेळ म्हाइंभट लक्ष्मीधरभट भटोबासांतें पुसौनि अटना गेले: तवं एकी ठाई चोर म्हणौनि धरीले: काहीं वोखटी क्रीया संपादूं आदरीली: तवं लक्ष्मीधरबायें म्हाइंभटाची वास पाहीली: आणि म्हाइंभटीं म्हणितलें: 'ज्वरो वा शस्त्रो वा:।' आणि तेही म्हणितलें: 'आरे हे विद्वांस:' मग सोडीले: मग भटोबासांपासि आले: तवं एकिं भटोबासांपुढां सांघितलें होते: मग भटोबासीं म्हणितलें: 'हां गा

हा ठावो वेन्हीं मौन्यचि: ' ॥ शोधु: ॥ 'जो परीहारु देउं आला तो देयावा कि गा: ' ॥ २० ॥

**कृष्णभटां प्रश्नें श्रमनिवृतिवाक्य निरूपण:** ॥ शोधु: । येकवेळ भटोबास शिष्यांसहीत इंद्रभटांचेया गावां आले: इंद्रभटीं अवघेयांचे पाय धुतले: ॥ मग काळेया कृष्णभटांचे पाये धू गेंले: तवं तेहीं म्हणितलें: 'तुम्ही कैसे पाये धों आलेति: ' तवं इंद्रभटिं म्हणितलें: 'धों येति: पुसा भटांतें: ' मग तेहीं भटोबासांतें पुसिलें: 'भटो गुरूसि सिष्याचें पाये धों येति: ' भटोबासी म्हणितलें: 'येति: ' कृष्णभटिं म्हणितलें: 'कैसे येति: ' भटोबासीं म्हणितलें: 'श्रमनिवृतिचेनि वचनें येति: ' तेव्हेळीं तेहीं धों दीधले: ॥ २१ ॥

**भटोबासां क्षतबंधनि माहादाइसें सेवावचनस्वीकारू:** ॥ एकवेळ भटोबासांचां पाइं केंसतोडु निगाला: माहादाइसीं म्हणितलें: 'नागदेया केसतोडु बांधावा: ' तवं भटोबासीं म्हणीतलें: 'कांइसेनि बांधों: ' तेव्हेळीं माहादाइसीं प्रसादाचे वस्त्र फाडूनि पानकापड करूनि बांधला: तवं भटोबासीं म्हणीतलें: 'हें काइ रूपै: प्रसादाचें वस्त्र कैसे फाडीलें: बांधले: ' तवं माहादाइसीं म्हणितलें: 'नागदेया प्रसादें प्रसाद बांधीजताये:' आणि भटोबास उगेंचि राहीले: ॥ २२ ॥

**आपलो भेटि अनुसरण:** ॥ आपलो ते माहादाइसांचे भाउ: तयासी गोसावियांचे सन्निधान जाले होते: मग गोसावी बोजें केलेयावरि ते राहाणे घालीति: देव्हारे करीति: एक दी माहादाइसें अटनविशेषें तयातें पडीताळा-वेया गेलीं: घरांतु रीगों बैसली: तवं समोर देवतें देखिलीं: आणि 'श्रीचक्रधरू ' म्हणौनि निगालीं: हे नाम तयांचा कानि पडीलें: आणि तैसेचि ते गेले: अवघीं देवतें पाटिये घातलीं: पाणियातु घालूनि आले: मग माहा-दाइसें तयांते घेउनि भटोबासांपासि आलीं: तयांसि भटोबासांपासौनि बोधु जाला: मग अनुसरलें: सेवटवरी सन्निधींसि होते: माहादाइसां थोर सुख जालें: ॥ तयांसि पुर्वी खडकाळियें गोसावी वरु दीधला होता: जे 'सेवटि होइल: ' ते साच जाले: ॥ हे स्मृति उत्तरार्धीचि सोधूनि येथ घातलि असे ॥ २३ ॥

**वासनिका देहांतीं झोळी अर्धोदककथन:** ।। एकवेळ भटोबासीं प्रस्तावेयाअनुरूप चांगदेवभटांतें म्हणितलें: 'देहांती झोळी घेइजे: ते येथचे अर्धोदक बोलीजे गा:' ।। २४ ।।

**वृश्चिकदुखदर्शनें देवतासंबंधी माहादेवोबानुसरणिं वरप्रदान:** ।। एकवेळ देवतासंबंधी माहादेवोबा आपुलां घरीं जेवित होते: तयांकारणें तयाचि ब्राम्हणि मिठ आणूं गेली: तवं तेथ ते विंचुवें खादली: आणि माहादेवोबायें म्हणितलें: 'हेचि जरि सर्पु खाता तरि कवणि मायेचां पोटीं रीगतां:' मग माता आकाइसें: माहादेवोबा: आणि तयाचि ब्राम्हणि यैसीं तिघे भटोबासांपासि आलीं: भिक्षा केली: भटोबासि म्हणितलें: 'तुझी भिक्षा सिधी जाईल:' मग गुरुकुळ तयांतें 'देवतासंबंधी माहादेवोबा' यैसे म्हणति: तयासि दीढु वेढा श्रीप्रभूचा संबंध होता म्हणौनि: हे आकाइसाचे पुत्र: भटोबासांचे माउसभाउ: यांतेचि 'गोरीचा गोरा' म्हणणे: ।। २५ ।।

**चांगदेवभट प्रीतिविधानश्रवणिं सूचिकानुवादु:**।। एकवेळ चांगदेवभट साता वासनिकांचे जेविले: मग भिक्षा करूनि गंगे जेवीले: ते एकीं भटोबासापुढां सांघितलें: भटोबासि आइकौंनि म्हणितले: 'तो सूचकु चांगदेवो किं गा:'।। एकी वासना: । : 'तो तोष्यु चांगदेवो किं गा:' ।। २६ ।।

**आवडी आवांका निराकरणें:** ।। एकवेळ दुर्भीक्ष पडलें होते: भटोबास अटना गेले होते: एकी ठाइं काला केला: जेउं बैसले: जेवितां भटोबासांचि दृष्टि चुकवूनि एकीं आपुला काला जेंवितां भटोबासांचां पात्रीं घातला: तवं तें आर्णिकिं देखिले: मग म्हणितलें: 'हे काइ: भटासि उसीटें अन्न कैसे घातलें' : यावरि भटोबासी म्हगितलें: "सौजन्यें दोषु नाहीं: कां ना गोसावीं म्हणितलें असे: 'आवडी आवांका नाहीं:" आणि ते उगेचि राहिले: भटोबास तें जेविले ।। २७ ।।

**माहात्माउदकप्रदानिं बोडि गंगा विभेदनिरूपण:** ।। एक दीं भटोबासांसि तृषा लागलि: एकांते उदक मागीतलें: तेवं तेहीं थीलरीचे उदक गाळूनि आणिलें: भटोबासां संपादीलें: भटोबासीं घेतलें: मग म्हणितलें: 'मज पाजिलें यैसें आणिकासी न पाजावें हो:' तवं तेहीं म्हणितलें: 'भटो: बोडि गंगा समान सांघितलें किं:' भटोबासीं म्हणितले: 'तें आपणयासि: पुढीलासि

संपादितां बोडि ते बोडिचि: गंगा ते गंगाचि: ऐसी बुद्धी होआवी किं: भावें हीन तें दैवें हीन: ' ॥ २८ ॥

**माहात्मेयां चातुर्मासि व्यवस्थाकथन: ॥** : एकवेळ भटोबासीं म्हणितले: ' आठ मास हींडावें: मग चातुर्मासीकारणें एकी प्रदेसीं दोनि च्यारि गांवं पाहावें: येरे ठाइं न पळे तरि येरि ठाइं राहावें: ' ॥ २९ ॥

**काळेयां कृष्णभटां जनविरोधप्रदार्नि मौन्यनिषेधु: ॥** : काळे कृष्णभट अर्टनि चोर म्हणौनि धरीलें: फोकवरि मारीले: काहीं सरीर संपादिलें: तंव एकिं म्हणितलें: ' हे वेधवंती नागदेवभटांचे नव्हेति: ' म्हणौनि सोडीले: तें भटोबासीं आइकिलें: मग म्हणितलें: ' यैसें काइ केलें कृष्णयें: येवंपर्यंत मौन्यचि: ' मग भटोबासीं गोसावी सांघितला तो असन्निधान माहात्मवेषु रचिला: येरव्ही सन्निधानवेषु होते: ॥ ३० ॥

**रजतम निर्वचनपूर्वक सत्वस्थपरी सांघणें: ॥** एक दीं भटीं म्हणितलें: ' श्रीचक्रधराचा परिवारु राजस तामस असे: परि सत्वस्थ उठीति बैसति तैसेयाचि बैसावें उठावें: ' ॥ ३१ ॥

**पंचनामपूर्वक क्षेपणें प्रसंसा: ॥**: एक दी भटोबासीं म्हणितलें: 'आळुमाळु विधिनिषेधाचें ज्ञान जालेयां येहीं पांचै नामीं जो झाडातळिं जन्म क्षेपी: तो जरि वायां जाये तरि मियां धाडिला होये: ' ॥ ३२ ॥

**साकाइसा गृहस्मरणनिषेधें विजनप्रकाशीं कवणचा गोल्हो म्हणणें: ॥** साकाइसें तियें वासनिकें: हातरितीं: भटोबासांचीं सिष्यें: भटोबास तयांचेया गावां गेले होते: गोल्हो तो तयांचें नातोंड: एक दीं: साकाइसातें भटोबासीं म्हणितलें: ' साकाइ तूं विजना कां न वचसि: ' तिहीं म्हणितलें: ' भटो मी घरीं गोल्होतें जवं जवं खेळवि: तवं तवं देवो आठवतो: ' भटोबासीं म्हणितलें: ' गृहस्मरणापसि झाडातळीं मनोरथ आठविसि तें निकें: मनोरथापसि तेथ निद्रा कीजे: ते निके: ॥: ' यावरि भटोबासीं म्हणितलें कीं आणिका काळीं म्हणितलें हें नेणिजे: ॥: ' कवणाचा गोल्हो: कवणाची सिती: तूं आपुलें चिंती वो साकुबाइ: ' यैसें म्हणितलें: आणि हास्य केलें: सिती तेही तयांची नाति:॥ मग एकु दिसु तेहीं आपुलेया पुत्रावरूनि भटोबासांपुढां दोनि वोविया म्हणितीलीया: " **गोविंदु नाहीं जयांचां वंसीं: ते पाथर कुसीं: निफन्नले: ॥**

**विउनिया वांझ जालियें वो मायेः पुत्र न धरीचि पायेः गोविंदाचेः ।। "** या भटोबासीं आइकिलीयाः ।। ३३ ।।

**महात्मेयां विधिव्यतिरिक्त ग्रामगमननिषेधुः** ।। एक दीसु भटोबासीं म्हणितलें: ' भीक्षाअवसरावांचौनि महातमां गांवांतु न वचावें गा: आणि बारसीचां दीसीं वासनिकांचेया घरां भिक्षे जावें: आणि अभ्यागतां: असक्तां: अक्षेमांकारणें तरि भलतेधवांचि जावें:।।:' शोधु:।।: ' वांचौनि वायें वायें वोळखीचेया घरा न वचावें: ' यैसें सांघितलें: यांतु बहुत असे: ।। ३४ ।।

**अवतारु विशेषें उद्धरण प्रसंसा:** ।।: एक दीसु भटोबासीं म्हणितलें: ' यें सृष्टीमध्य येणें अवतारें श्रीचक्रधरें जो नुधरें तो कहींचि नुधरे: मा नुधरे: मा कहींचि नुधरे: ' ।। ३५ ।।

**रूपदेवोबा मिठाची पिसवी निषेधुः** ।। : एक दीसु भटोबासीं म्हणितलें: ' आळुमाळु तऱ्हीं रूपदेया विरक्तः परि मिठाची पीसवी वाहातो गा: ' तवं येरीं म्हणितलें: ' भटो केवि जाणा:' ' हां गा: श्रीचक्रधराचेनि प्रसादें इतुलेही नेणें: ' ।। ३६ ।।

**अनुसरलेंया वासनिका परस्परें पात्रीं भोजननिषेधुः** ।। एकु दिसु भटोबासीं म्हणितलें: ' महातमां वासनिकाचां ताटीं न जेवावें: आणि वासनिकीं महात्मेयाचां पात्रीं न जेवावें: आपुलेनि दोषें तया धर्महानिः तयाचेनि आपणयां: कां पां: विषयांचीये येकासनिं न बैसावें म्हणितलें: म्हणौनि: ' ।। ३७ ।।

**भोजनअवस्वरीं स्वयंदास्यपूर्वक करवतिस्वीकारु ।।** एकु दीसु भटोबासांपुढां पांतीसि सांघाती करवती ठेवूं विसरले: ते भटोबास जेवत जेवितां उठले: येरां यैसे जालें: काइ वमन करूं गेले: तवं भटोवास आपुली करवती घेउनि आले: उदक घेतलें: येरां दैन्य जालें: मग सांगाती सावध वर्तति: ।।३८।।

**संबंधस्थान नमस्करणिं लीळास्मरणानुवाद** :।।: एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: ' तीर्थीं जाइजे तेथचीया लीळा आठविजतिः तेथ तें स्मरण: ' ।।३९।।

**वासनिक पुजास्वीकारीं अनुतप्तांतःकरणें ' असतीपरी ' प्रकाशणें** ।। : भटोबासांसि एकि वासनिकीं सुवर्णपुष्पीं पूजा केली: पाटावु पासवडी वाइली: मोतीयांचा चौक भरीला: मग धूपआर्ति मंगळआर्ति करूं

आदरीली: येतुलेनि भटोबासीं वारीलें: डोळां आस्वपात आणिलें: वासनिकीं म्हणितलें: 'भटो: दुख कां करीता:' भटोबासी म्हणितलें: 'हां गा 'असतीपरि' ते काइ माझेया बापासि विहीली:' आणि ते उगेचि राहीले: ॥ ४० ॥

**चुली भानवसी निषेधपूर्वक भीक्षुत्वज्ञान करणें ॥** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: 'महात्मां चुली भानवसीं न घलावियाः प्रस्तावा पडैल तरि इटोला मांडावा: अभ्यागतें येतील तरि रोटीया भरीत करावें: सेवैयां सरवळैयां काळु जावों नेदावा: वाया वाया सीवणें न करावें: काळु वृथा न धाडावा: सुईसंग्रहो न व्हावा: कांटेनि सिवावें: नख न फेडावें: हातीं पैका न घेयावा:' यैसे नीरूपीलें: ॥ ४१ ॥

**पूर्वयामे अशनदर्शनें ब्राह्मणा शूद्राचारुप्रकाशीं भिक्षा देणें:॥:** एकवेळ भटोबास मार्गे जातां सकाळिचि जेविले: तें येकें ब्राम्हणें देखीले: मग म्हणितलें: 'हें काइ येवढेयाचि वेळा कैसें:' तवं भटोबासीं म्हणितलें: '**स्वग्रामे सकळाचारं चान्यग्रामे तदर्धकम् । नगरे पादमेकं च पथि शूद्रवदाचरेत्:** ॥ १ ॥ मग तेणें भीक्षा केली: ॥ ४२ ॥

**रुसला माहात्मा पचनक्रिये चुकला म्हणणें :॥:** एकवेळ भटोबासातें एकीं वासनिकीं समस्तांसहीत जेवावेया नेलें: एक महात्मे रुसूनि न जेवितिचि: तें कोन्हा न मनेचि: मग भटोबासीं म्हणितले: 'रुसौनि तऱ्हीं पचनक्रीये चूको कां गा:' आणि ते उगेचि राहीले: ॥ ४३ ॥

**तथा कीर्तिपर वैराग्य तऱ्ही निकें म्हणणें :॥** एकु दीसु भटोबासीं: म्हणितलें: 'कीर्तीचें तऱ्ही वैराग्य करों गा: परी पाये न पसरो:' ॥ ४४ ॥

**अनुचरोदक स्वीकारीं उपाहासश्रवणें माहात्मा निभर्षणें: ॥** एकु दीसु अवघेयांसमवेत भटोबासांसि येंकि अभ्यागत केलें: तेथ भटोबास समस्तां भिक्षुकांसहीत गेले: एकु वीतरागु वैराग्याचेनि भरलेपणे राहीला: भटोबोस-मुख्य समस्त जेउनि आले: मग कोण्ही पाणि पीत होते: तवं तेहीं राभस्यें म्हणितलें: 'घेया घेया बाप माझे ढसढसां:' तें भटोबासीं आइकिलें आणि कोपले: भटोबासीं म्हणितलें: "येतासि कां गा: मां वाटीभरि तुपां जेवितासि

तरि प्रीतीचें प्रमाण राखतें: आतां तुझा कोण राखोल: गोसावीं म्हणितलें: ' एकु सेवितु जाये एकु न सेवित जाये: " मग ते अनुतापले ।। ४५ ।।

**नित्य नैमित्यकु विधिप्रकासीं सेनपुंजो दृष्टांतकथन: ।।** एकु दीसु भटोबासीं निरूपण केलें: ' राजसां: तामसां: अटनचि प्रधान: आणि सत्वस्थां सुश्रुसा प्रधान: नित्य विधि माहेर: नैमित्य विधि सासुरें: जासलवटस्थानीं होआवे: सेनपुंजी असे ते येकु पो पायें माझा म्हणे: एकु हातें माझा म्हणे: एकु शब्दें माझा म्हणे: यैसें एकु दृष्टी माझा म्हणे : यैसें दास्य करावें गा: ' ।। ४६ ।।

**तथा निमीत्यक करणीये प्रसंसा: ।।** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: ' निमित्य विधि करावा गा: मज आउठां वरीषां निमित्य विधि करीतां जें गोसावी सांगितलें तें सोळा वरीखां भांडारेकारां न संगतीचि: म्हणौनि नित्य विधी मैळलेयां: नैमित्य विधी आचारें उजळीजे: ।। आणि नवेयासि सांघातु: आणि असक्ताची सुश्रुषा ये दोन्ही अवघडें: गोमटेया कारण: तैसेंचि वोखटें- याहीं: म्हणौनि चांग प्रयत्नें असक्तां अक्षमाचें करावें: जैसें कोथळेनि केलें श्रीप्रभूचें:।। अधीकरणाजवळीके असीजे तवं जिज्ञासा कीजे: शास्त्र अभ्यासीजे: कां विदेसीं अटन कीजे: मध्ये वृथा काळ वाया जावों नेदीजे:' ।।४७।।

**अधिकरणा ज्ञानदानीं गंधर्व उपपत्ति कथन: ।।** एक दीसु भटोबासीं म्हणितलें: ' परमेश्वर आपुली ब्रह्मविद्या देउनी अधिकरण करीति: मग आपुलें ज्ञान आपणचि आइकेति: एदर्थी उपपत्ति गंधर्वाची: गंधर्व आपुली गंधर्वकळा देउनी आपणचि आइकति: तैंसें ईश्वर आइकति: आणि गोसावीं गंधर्वकळा पाठीचेया वासाची उपपत्ति दीधली: ' ।। ४८ ।।

**सभर्तृका स्त्रीयें काळसंख्याज्ञानें अनुसरण सांघणें: ।।** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: ' वरैताचिया बाइलां आणि लेंकुरवाळियां मीं भीक्षा देउं भीत असे: परि वरैताचिये बाइलें दोनि मास का तीनि भीक्षा नेदावी:' ।।४९।।

**आचार्य-पदार्थ-निरवडी सुश्रुषितानुज्ञा: ।।** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: 'आचार्याचें कवडा पोफळ ते सुश्रुषितेंचि ठेवावें: तापसाचा हातु विटाळूं नेंदावा:' ।।५०।।

**उचितानुचित स्थान निर्वचुः ॥** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: 'लज्जाहरणा वस्त्र नाहीं: क्षुधाहरणा अन्न नाहीं: तया गांवातें 'सीडी' म्हणिजे:।: यें दोन्ही असति तयांतें 'गडी' म्हणिजे:।: चालतीं घरें: चालतीं उखळें: चालतीया चुली: तयांतें 'पाळी' बोलीजे:।: जेवावेया तळी नाहीं: वाढावेयां पळी नाही: तयातें 'हाळी' बोलीजे: तैसेंचि विकल्पु संपूर्ण असे: तया गांवातें 'पुर' बोलीजे:।: विकारमिश्रितु विकल्प असे तयातें 'पाटण' बोलीजे:।: सांत हाटवटी नाहीं यातें 'गव्हाण' बोलीजे:।: हें असे तो 'गाव' बोलीजे:' ॥५१॥

**माहात्मास्तवनश्रवणें आयुष्यांतु अप्राप्यानुवादुः ॥** एकु दीसु एका माहात्मेयाचा आचारु देखौनि समस्त वानूं निघाले: तवं भटोबासीं म्हणितलें: 'हां गा वाणितां काइ: गडदे पडीला:' यावरि भटोबासीं छद्रोंबासांची गोष्टी सांघितली: ॥५२॥

**अनुसरण–दृढत्व–श्रवणें अदृष्टार्थीये प्रसंसा: ॥** भटोबासांपासि एकीं सूद्रीं भीक्षा केली: तयांचि स्त्री एकीं गांवि दीधली होती: ते अटनें अवचटें तया गावां गेले: भीक्षा करूं आले: तवं ते बाइ भीक्षा घेऊनि आली: तीया वोळखीलें: आणि भीयालि: घरांतु जाउं बैसली: तवं तेहीं महात्मा म्हणितलें: 'हां गा भीवों नका: आम्ही भटमार्गीचे महात्मे जालों: तुम्ही सुखें राज्य करा:' मग तेहीं महानुभावीं गाउं सांडीला: आणिके गांवि नेमु सारीला: मग तयाचां सांगातीं भटोबासांपुढें सांघितलें: भटोबासीं तोखोनि म्हणितलें: 'अदृष्टार्थीये जे असति तयांचीं करणें तियें ऐसीचि किं:' ॥५३॥

**हीराइसां अनुसरण: ॥** हीराइसे तें पंडीतबासांची स्त्री: तयां दोघां भटोबासांपासौनि श्रवण: एकु दीसु हीराइसीं पंडीतांतें म्हणितलें: 'पंडितो: तुम्ही भीक्षा करा: कां मज करूं देयां:' तिहीं म्हणितले: 'तुम्हीं करा: मी पुत्राचा विवाहो करीन: मग भीक्षा करीन: तुम्ही जा:' मग हीराइसें भटोबासांपासि आलीं: भीक्षा केली: भटोबासांचां सन्निधानिं राहिलीं: ॥५४॥

**बोरीकरां भानुभटां अनुसरण: ॥** एकवेळ बोरीकरा भानुभटां भटोबासांचें दर्सन जालें: कवणिपरी जालें तें नेणिजे: भटोबासांपासौनि श्रवण जालें: भीक्षा केली: भटोबासां थोर पढीयेति: तयांचे आधील गुरु

तयां नांव केसवाचार्यः मग प्रकरणानुरूप भटोवासीं भानुभटांचें नावं 'कविस्वर' ठेविलें: तैसेंचि प्रकरणानुरूप 'भटो' ऐसें म्हणतिः ॥५५॥

**रामदेवां परीछेदें आकाइ-हेतु-पाळाणं परतारकु आचार्यानुवादु:॥** यें कवणें आकाइसे आणि रामदेव हें नेणिजे: रामदेव ते धाकुटियेचि दसेचे: आकाइसांचे पुत्र: तेहीं भटोबासांपासि भीक्षा केली: आकाइसें तियें वासनिकें: रामदेवां विराम प्रधानः तेहीं अत्यंत परीछेदु केला: ते जाणौनि माता आकाइसें तेहीं भटोबासांते प्रार्थीलें: 'भटो: तुम्ही माझें मासा दीसा जेवावें:' भटोबासीं तयाचा हेतु जाणौनि मानिलें: मग तेंहीं बरवीं अन्नें निफजवीलीं: भटोवासांसि ताट केलें: पांतीं रामदेवासी वाढिले: तवं ते नेघतिः मग दुसरा दीसीं ते वेळ चुकउनि गंगे जाउनि जेविले: मग भटोबासीं जेवुनि म्हणितलें: 'आकाइ: येवढें माझें उसीटें रामाकारणें ठेविः' तवं रामदेव आलें: आकाइसीं म्हणितलें: 'हें घे रामा: भटोबासां जेवितां उरले तें तुज ठेविलें:' तेहीं घेतलें : परी जेवितीचिना: मग तिसरां दीसीं भोजनापूर्वि भटोबासीं म्हणितलें: रामा आजि तूं मी एकवट जेउं: मजकारणें इतुके ऐसें आइकः घेइ:' तऱ्ही ते नेघतीचि: मग भटोबास जेविले: मग चवथा दीसीं म्हणितलें: 'रामा: आजि मज इतुके आगळें जालें: तरि माझा इतुका ऐसा उसीटा घांसु घे:' म्हणौनि भटोबास जेवितां उठिले: तयांते ऐसे धरीतां एक सित खालि पडलें : तें रामदेवीं तोंडीं घातलें : मग भटोबासांतें म्हणितलें: 'आतां नेघें भटो: आतां घें तरी भटांचिचि आण:' मग भटोबास बैसलें: मग केसोबांसें म्हणितलें: 'हें काइ जालें या रामासि : तरि भटांचा हातु कैसा लोटिला: आणि भटो: यांते काहीं म्हणा ना:' तवं भटोबासीं म्हणितले : 'हां गा हा जेहीं पाउलीं उठिला आहे ते मीं याचे काइसेया मोडीन : मीं काइ एकाधा परतारकु': मग आंचवूनि बैसले : आणि म्हणितलें : "हां गा या आकाइया मज प्रार्थूनि म्हणितलें : 'ते कां ना : रामु काहीं नेघे तरी माझे पांती तऱ्ही घेइल' : तवं हा नेघे : 'तऱ्ही उसीटें तऱ्ही घेइल' : हा तेंहीं नेघेंचि : तऱ्ही याचें हे कां मीं भंगीनः" येतुलेनि केसोबास उगेचि राहिले : ॥ : शोधु ॥ भटोबासही नेघतीचि ॥ ५६ ॥

**तथा निरूपणीं साध्यप्रसंसा:** ॥ एकु दीसु भटोवास रामदेवांसि निरूपण करीत होते : तवं रामदेविं म्हणितलें : 'भटो : नको नको::

गोसावियांचे निजैले बैसले ठाये कां दाखवाल : काइ आम्हा अनुष्ठता ये ' : भटोबासीं म्हणितलें : ' हां गा जरि ननुष्ठे तरि गोसावियांचा दारवठा कां उघडता : घेया घेया बाप माझे: पाउले दोनि माट झाडि : मग पुढां साम्राज्य कीं :। पांगुळ तो अंधाचां पाइ ईश्वरप्राप्तीसि जाये : अंधु तो पांगुळांचां पाइ चैतन्यप्राप्तीसि जाये ' : यैसें निरूपीलें : ॥ ५७ ॥

**पंडितां अनुसरण** :॥ : पंडितबासिं पूर्वी हीराइसांतें म्हणितलें होतें : जे : ' तुम्ही अनुसरा: मी पुत्राचा विवाहो करीन : मग येइन ' : मग हीराइसें आलीं : अनुसरलीं : तिहीं मागां पुत्रा वीवाहो केला : आणि माघौते घरीं राहीलेचि होते : मग येकवेळ हीराइसिं पंडितासि सांघौनि पाठवीलें : जें " पंडितांतें यैसें म्हणावें : ' जिये चुलीची खीर खादली : तिये चुलीची काइ राख खाल : " मग निगाले : तेहीं जाउनि तैसेंचि सांधितलें : पंडितबासिं म्हणितलें : 'आतां कोपलीं : आतां निगावे लागैल ' : मग निगालें : तवं येरीकडे भटोबासीं म्हणितिले : ' आजि कोण्ही विजना जाउं नको गा : आजि पंडीतां सामोरें जावें लागैल ' : मग भटोबास भीक्षुकांसहीत सामोरें गेले: तवं पैलाकडूनि पंडित आले : भेटि जाली : बीढारा आले : भोजनसमैं भटोबासीं म्हणितलें : ' पंडितो : या: सांघातें जेउं : ' तिहीं म्हणितलें : ' निवृतां सांघातें प्रवृतां जेउं नये : ' भटोबासीं म्हणितलें : ' तुम्ही म्हणत असा ते तैसेंचि : परि जे म्हणौनि आलेति तेणें ये : ' पंडितबासीं म्हणितलें: ' तें होइल तेव्हेळीं ' : भटोबासीं म्हणितलें : ' तें जालेंचि बोलीजे ' : मग एकत्र जेवीले : तियेचि दीसि तिसरां प्रहरीं भीक्षा केली : ॥ ५८ ॥

**रामदेवां अटनि निर्गमनीं शरीरोष्णतानुवादु** : ॥ मग एकु दीसीं रामदेवीं भटोबासांते म्हणितलें : ' भटो मीं अटनासि जाइन ' : भटोबासी म्हणितले : ' हो कां जाये ' : मग ते निगाले : भटोबासीं निगतां क्षेम दीधलें : तवं तयांचें आंग उन लागलें : भटोबासीं म्हणितलें : ' रामा : तुझे आंग उन्ह आहे गा ' : ' हो भटो : म्हणौनिचि जातो ' : भटोबासीं म्हणितलें : ' रामा : जोगीया जंगमाचें मरें तें तेंचि काढीति : जैसें मुंगीयांचें मढें ते मुंगांचि काढावे कीं गा ' : तवं रामदेवि म्हणितलें : 'भटो तुम्ही म्हणतां तें करूः कीं गोसावीं म्हणितलें असे तें करूं ' : भटोबासीं म्हणितलें : ' गोसावीं म्हणितलें तेचि करी: तेणें मातें उद्धरीसि:' येतुलेनि रामदेव निगाले: ॥ ५९॥

**पंडित : केसोबासांतें सवें पाठवणें** : ॥ रामदेव निगाले तेव्हेळि तयासि ज्वरू आला होता : भटोवासीं केसोबासा पंडितबासांतें म्हणितलें : ' तुम्ही यातें दृष्टीचीये आळवि राखा : आणि बुद्धिचि पथ्य करा ' : तिहीं म्हणितलें : ' हो का ' : मग मागीलाकडौनि तेहीं निगाले : ते रामदेवातें टाकूनि आले : केसोबास रामदेवांपुढें काहीं श्लोकु वाखाणिति : पंडितबास काहीं धृवा वोवि चौपदी म्हणति : तें रामदेवां काहींचि चित्तीं न लगे : मग भीक्षे जाति : मागौनि पंडित केसोबासही जाती : तयातें दृष्टी सूनि भीक्षा करीति : कव्हणि सोपस्कर भीक्षा घेउनि ये तेथ म्हणति : ' हे भीक्षा एकला माहात्मा येइल तयांचां पात्रीं घालावी ' : यापरी कां अपजौनि निरोप देती : तवं रामदेव तेथ येति : तेथ उष्ण भात घालीति : येरी दीसीं रांमदेव तो गावं सांडीति : आणिका गावां जाति : तेथही पंडित केसोबास पथ्याचा उपावो करीतिः ते अटन भंगु नेदीति : ॥ ६० ॥

**तथा केशव मयंकादि आगमनि काहाळेकांड पतनानुवादु** : ॥ मग यैसा एकु दीसु अमृते मायांबा तयांसीं भेटि जाली : तिहीं गोसावियांचीया अमोघा अमृतश्राविया लीळा सांघितलीया : तेणें रामदेवाचें अंतर्बाह्य निवालें : येतुलेनि रामदेवीं तोखौनि म्हणितलें : ' भलें केलें माइदेवा : तुवां गोसावियांचीया अमोघा अमृतश्राविया लीळा सांघितलीया : मीं बैसे तेथ एकु रूं रूं करी : एकु ठकठक करी : तुवां मातें निववीलें ' : येतुलेनि तेणेंचि काळें कीं एका दो दीसां हे नेणिजे : रामदेवां देहावसान मांडलें : देहावसानसमइं केंसोबांसीं ' **महावाक्य** ' व्याख्यान सांघितलें : येतुलेनि देहावसान जालें: तिहीं निक्षेपु केला : मग तिघै भटोबासांपासि आले : येतां देखौनि भटोबासीं म्हणितलें : ' माइदेवो : केशवदेवो : पंडितु आले : पंडिताचें पाउल हारीं न पडे : रामाचें काहाळेंकांड पडलें ' : तवं ते आले : : भटोवासां भेटि जाली : पंडितबासि केशोबासि क्षेमवार्ता सांघितली : रामदेवाचें अवघेंचि बोल सांघीतलें : ' माइदेवा : तूं आलासि : मातें तुवां निववीलें ' : भटोबासीं अवघे आइकौनि म्हणितलें : ' जैसें आपणयातें धिक्करीजे तैसेचि पुढीलातें धिक्करीजे : हें सौजन्याचें कार्य की गा ' : ॥ ६१ ॥

**' श्रीचक्रधरु ' उच्चारश्रवणें महादाइ अपत्यालिंगन देणें** : ॥ : एकु दीसु : महादाइसा भीक्षा करीतें असति : सरीसि एकें आइसें असति : तवं

एकें लकरुवें 'श्रीचक्रधरु' ऐसें उच्चारीलें : तें आइकौनि महादाइसां थोर सुख जालें : तयातें झाडूनि पुसौनि कडिये घेउनि आळंगीलें : सरिसिं आइसें होतीं तेहीं म्हणितलें : 'हां आइ ऐसें काइ केलें' : महादाइसीं म्हणितलें : 'सृष्टीमध्यें देवो दुर्लभु : कां देवातें आठवी तो दुर्लभु' :।। शोधु :।: मग तयातें खालि ठेउनि भिक्षा मागीतली : ।। ६२ ।।

**रामदरां पंडित : केशवदेव आपोसनें : भटोबास सिष्यां कोपणें** :।: :।: एकवेळ भटोबास आवघेयांसमवेत रामदरेयासि गेले : रामदरा नमस्करीला : : मग तेथचि खडकावरि भोजना बैंसले : तवं भटोबासांचा सिष्यीं एकीं अवघेयांसि वाढीलें : पंडित : केसोबासांसि वाढूं विसरले : अवघां घांस घेतलें : पंडित केसोबास उगेचि : तें भटोबासीं देखीलें : भटोबासीं म्हणितलें : 'तुम्हीं कां गा आपोसन धरीलें' : तवं एकीं म्हणितलें : 'भटो येथ वाढिलें नाहीं' : मग भटोबास वाढीत होते तयांवरि कोपले : सेवटीं म्हणितलें : 'जैसा तैसा क्रियेचा विनयोग नसतां बोलीलि क्रीया समयोचित काइसेन आठवैल' :।: शोधु :।: मग तयांसि वाढीलें : मग तेही जेउं लागले : ।। ६३ ।।

**वासनिकां बुझावणी करणें** : ।। : डींडौरी गोविंदपंडित : आणि अपर रामदेव यांसि भटोबासापासौनि श्रवण : ते रावंसगावि होते : एकमेकां नावेक विरोधु होता : एक वेळ तेथ भटोबास गेले : उभे वर्ग भेटले : गोविंदपंडितीं भटोबासांसि अभ्यागता म्हणितलें : आणि अपर रामदेवांही निमंत्रण दीधलें : तिहीं भटोबासां नुपलखत उगेंचि अंगीकरीलें : मग अवघी आइत जाली : पांती जालीया : अपर रामदेवांतेंही बोलाविलें : भटोबासांचीये पांतीं जेवीलें : मग येरी दासीं अपर.रामदेविहीं भटोबासांसि अभ्यागत केलें : तेहीं गोविंदपंडितांसि निमंत्रीलें : तेही आले : भटोबासांचीये पांतीं जेवीले : परि उपलखूं नाहीं दीधलें : मग भटोबास प्रतिष्ठाना आले : मग केतुलेयां एकां दीसां अपर रामदेवांचां घरीं काहीं काज मांडलें : आधीला दीं रामदेव गोविंदपडितासि क्षेणु देवों आले : तवं क्षेणु ते न घेतिचि : गोविंदपंडितीं म्हणितलें : 'तुम्हां आम्हां विसंवादु असे : आम्हीं तुमचा क्षेणु नेघों' : रामदेवीं म्हणितलें : 'तुम्हीं आमचां घरीं जेवीलेति कीं' :

गोविंदपंडीतीं म्हणितलें : ' आम्हीं तूमचां घरीं नाहीं जेविलों : तें आम्हीं भटांचिये पांतीं जेविलों : विसंवादु तो उरला असे ' : मग रामदेवीं आपुलें कार्ये केलें : मग केतुलेनि काळें अपर रामदेव आणि डींडौरी गोविंदपंडित यैसें भटोबासांचीये भेटिसि आले : सरिसे नरेन्द्रकविही होते : भेटि जालीया : ॥ शोधु ॥ मग कव्हणीं भटोबासांपासि सांघितलें : एक म्हणति आधींचि आइकिलें होतें : ॥ मग भटोबासीं निरूपण केलें : एकमेकांचा विरोध फेडीला : बुझावणी जाली : मग ते गेले : ॥ ६४ ॥

**साधां अक्षमत्वगर्मानं निबां वास करणें** : ॥ : साधें बहुतें अक्षमे जालीं : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : ' साधें अक्षमें जालीं : आतां मढी करावी लागैल : ना तरि संग्रहो भंगैल ' : तेव्हेळीं निबां मढी बांधिली : तेथ साधे असति : भटोबासही राहावा करीति : ॥ ६५ ॥

**केशव–पंडितां प्रश्नें अस्मात्कस्मान्निराकरणें** :॥: एकु दीसु भटोबासांसि पंडितः केसोबासीं संस्कृतभाषा प्रश्नु केला : त्यावरी भटोबासीं म्हणीतलें : 'पंडिता: केशवदेया: तुमचा 'अस्मात् कस्मात्' मीं नेणें गा: मज श्रीचक्रधरें निरूपिली मऱ्हाटीं : तियाचि पुसा:' मग तिहीं मानिले : ॥ ६६ ॥

**पंडिता अभ्यासि उमटु-प्रसंसा** : ॥ : एक वेळ भटोबास पंडितबासांसि '**उद्धरण**' घोकवीत होते : तवं एक वाक्य पंडितबास विसरले: तें वाटे जातां पंडितबासीं भटोबासांतें म्हणितलें : 'भटो हें वचन कैसें:' भटोबासीं म्हणितलें: ' वैसों : मग सांघों:' तवं गंगे ब्राह्मण बैसले होते तेहीं म्हणितलें : ' यत्क्रियते तत्कर्म : ' यैसें अवघें उच्चारीलें : तवं भटोबासीं म्हणितलें :: 'पंडिता तूं पुसित होतासीं तें हें गा:' तेहीं म्हणितलें: ' भटो तें हें नव्हे कीं: तुम्ही परावाचा बोलाल तें होये:' याउपरि भटोबासीं म्हणितलें: 'पंडितासि ये मार्गींचा उमटु जाला गा:' पंडितबासीं म्हणितलें: 'भटो मज इतुकें दीस यैसें होतें जें मीं तुमचीये मार्गींचें अवघेचि जाणे: परी आतां यैसें जालें जें ये मार्गींचें काहींचि नेणें: यैसें जाणितलें भटो:' तवं भटोबासीं म्हणितलें: "पंडिता जाणितलें तें आताचि गा: कां ना गोसावीं म्हणितलें : 'जवं जवं जाणता तवं तवं नेणता:' ॥" शोधु :। मग भटोबासीं आपुलेनि मुखें सांवितलें : तें तेही घोकीलें : ॥ ६७ ॥

**म्हाइंभट–लक्ष्मीधरबा–व्यावृत्ति केशवपंडित प्रसंसा** : ।। एक वेळ पंडितबास केशवबास भटोबासांसि चर्चा करीत होते : भटोबासीं तोखौनि म्हणितलें : 'माझें शास्त्र म्हाइंभटा लक्ष्मीधरभटाचेनि नुजळेचि : तें पंडितां केसोदेयांसि चर्चा करीता उजळे:' यैसें तोखलें : ।। ६८ ।।

**इंद्रभट फुटा न प्रदायेनीं मार्गहेतु प्रकासपूर्वक फुटा मागणें** :।। एक वेळ म्हाइंभट हेतु धरूनि इंद्रभटां भेटावेया सुरेगावां गेले: इंद्रभटांसि भेटि जाली : ।। शोधु: ।। तेहीं अतीत केलें : तें अंगीकरीलें : ।। मग इंद्रभटांतें म्हणितलें : 'इंद्रभटो तुम्हां गोसावीं प्रसन्न होउनि फुटा दीधला असे : तो तुम्ही प्रसन्न होउनि गुरुकुळासि द्यावा:' इंद्रभटीं म्हणितलें: 'हा मज गोसावीं प्रसन्न होउनि दीधला असे: मीं नेदीं:' म्हाइंभटीं म्हणितलें : 'ना द्यावा :' निहीं म्हणितलें : 'आम्हीं नेदूंचि:' मग म्हाइंभट भटोबासांपासीं आले : क्षेमवार्ता सांघितली : अवघे आइकौनि भटोबासीं म्हणितलें : 'फुटा काइ त्याचेया बापाचा : तो गोसावीं असेखा गुरुकुळाचेया हेतु दीधला असे : म्हाइंभटासारीखें पात्र मागे आणि नेदीजे:' मग भटोबासचि आले : वळेंचि असिका मागौनि घेतला : मग भटोबासीं अर्धु फाडूनि वेगळा केला : तो इंद्रभटांसि दीधला : आणि अर्धु तोही इंद्रभटांचां हातीं दीधला : आणि म्हणितलें : 'इंद्रेया आतां हा अर्धु तूं प्रसन्न होउनि आम्हा मार्गासि दे:' इतुलेनि इंद्रभटांसि सुख जालें : मग इंद्रभटीं साष्टांग दंडवत घालौनि अर्धं फुटा भटोबसांसि दीधला : मग भटोबासीं समस्तांसि वीभागूनि दीधला : :।। शोधु :।। मग भटोबास निंबेया आले : ।। तथा शोधु : ।। मग इंद्रभटां मागां तोही अर्धु मार्गांतु आला : ।। एक म्हणति कविश्वरीं आणिला : ।।६९।।

**माहात्मेया सप्रसादें अटन निराकरणें** : ।। एक वेळ एक महात्मे अटना निगाले :।। शोधु ।। इंद्रभट निघाले ।। तयांपासि गोसावियांचा फुटा होता : तवं भटोबासी म्हणितलें : 'तुम्हां एकलेयां अटन करावेया अनुज्ञा नाहीं ' : ।। शोधु : 'इंद्रभटो तुम्ही एकलेयां न वचावे : ।। तुम्हापासि गोसावियांचा फुटा असे : म्हणौनि वारीलें : ' ते राहीले : एकले न वचतिचि : ।। ७० ।।

**प्रज्ञा–प्रकाश–प्रश्नें केसोबासां विधि निरूपण** : ।। एकवेळ केसोबासांसि अनस्फूर्ति ऐसी वाटली : काहीं काळीं नें काळीं आठवे ना: मग एकु

दीसु भटोबासांतें पुसिलें : ' भटो सांपें कीं मज स्फूर्ति नाहीं : काहीं वेळेचें आठवे ना ' : मग भटोबासीं म्हणितलें : ' तुवां मासादीसा अटन करावे : झोळीये पात्र न घलावे : तीन पाहार विजन करावे : तिसरां पाहारीं भीक्षा : नदीं भोजन करावें : खांड देउळीये कां वृक्षमुळीं निद्रा कीजे : मग तुमचा अविधि परिहरैल : मग मागौती स्फूर्ति होईल ' : मग तेंहीं तैसेंचि केलें : आणि उजळता आली : स्फूर्ति जाली : ॥ ७१ ॥

**वाळुके रामदेवां रसुनिराकर्णि अनुचितप्रकाशपूर्वक शिक्षापण :** ॥ एकवेळ वाळुके रामदेव अटना गेले : आणि एकी गांवि मळां रोटीया केलीया : सद्यस्त तूप भरीत यैसें जेविले : मग केतुलेनि काळें भटोबासां भेटावेया आले : भेटले : अभ्यागता म्हणितलें : मग पांतीं तूप वाढितां नेघतिचि : भटोबासीं म्हणितलें : ' घेया ना भटो ' : ' नको : न साहे ' : मग भटोबासीं म्हणितलें : ' हां गा रामा : आपुलीया वासना मळां तूप रोटिया भरित जेउं ये : आणि माझें घेवू नये : यैसा कवण बुझू ' : येरीं म्हणितलें : ' भटो केवि जाणा ' : ' हां गा श्रीचक्रधराचेनि प्रसादें मी येतुलेंहीं नेणे ' : मग तेहीं अनुतापु केला : मग अवघे जेवीले : ॥ ७२ ॥

**तथा वस्त्रक्षाळणि दास्यत्व निरूपण :** ॥ एकु दीसु तेचि अभ्यागतांचीं वस्त्रें धूत होते : तैसीयेचि परीचि तेथ भटोबास आले : मग म्हणितलें : ' रामा आपुलें धुइजे : तेथ मळधाणि फेडिजे : ॥ आणि पुढीलांचें वोपवावें : तपवावें : तें सौजन्यपर दास्यत्व ' : यैसें निरूपण केलें : मग तेंहीं बरवीं धुतलीं ॥ ७३ ॥

**कविश्वरीं विजन-प्रत्यागीं उचितप्रसंसा :** ॥ एकू दीसु कविश्वरबास विजना गेलें : तवं जेथ बैसावें तेथ मुंगीयाची हारि आली : मग आणिका ठाया गेले : तवं तेथ गोरूं चरूं आली : आणिका ठाया गेले : तेथ सत्वा नैएचि : मग वीजन न फळे : म्हणौनि बीढारा आले : तवं अभ्यागत आले असति : मग भटोबासांपुढां मागील सांघीतलें : भटोबासीं आइकीलें : मग म्हणितलें : ' आलेति : हें उचित स्फुरलें ' : ॥ ७४ ॥

**अनंतदेव-देहत्याग-श्रवणीं प्रवृत्त्यंतर निरूपण :** ॥ अनंतदेव कवणिये गावींचे हें नेणिजे : परि भटोबासांपासौनि तयांसि श्रवण होतें : निंबेया

प्रांतीं समीपचि तयांचा गावुं : ते धाकुटेंचि परायेचे : पिता संवर्तमान नव्हता : माता होती : ऐसा एकु दीसु ते भटोबासांचिये भेटिसि आले : आणि भीक्षा केली : तें आइकौनि तयांची माता नेयावेया आली : ते न वचतीचि : मग माता भटोबासांतें म्हणितलें : 'भटो यातें धाडा : ना तरि मीं तुम्हावरि वीष खाइन' : भटोबासीं म्हणितलें : 'अनंता मजकारणें जाए गा' : गेले : तवं तयां ज्वरु आला : माता म्हणितलें : 'बा अनंता वांचसि' तेहीं म्हणितलें : " जैसें भटोबासांतें म्हणितलें : 'धाडा : नातरि मीं वीष खाइन' : तैसेंचि काळासि म्हणसिल तरि वांचैन " : तैसेंचि तेहीं देह ठेवीले :: तें भटोबासीं आइकिलें : मग म्हणितलें : 'अनंतासारीखा सिष्य जाये : आणिक गुरु तरि पोटीं सुरी सोये : माझेनि निमित्तें गेला' : तवं एकिं भटोबासांतें पुसिलें : 'तयांसि काइ होइल' : भटोबासिं म्हणितलें : 'ते पुरुषु होउनि जन्मती : मग दर्शन होइल' : यैसें निर्वचीलें : ।। ७५ ।।

**गौराइसां निरूपणिं कोथळोबा झाड कथन** : ।। एकु दीसु भटोबास उंबरीं गौराइसांसि '**आचारस्थळ**' घोकवीत होते : परि तयांसि नैये: नुमटे : मग भटोबासीं म्हणितलें : 'गौराइ तुज तरि ये ना : तूं जाये : मां तुजसीं झाडचि बोलैल' : मग तीयें अटना गेलीं : तवं अटनि कोथळोबास भेटले : तेहीं तयांप्रति '**असतीपरी**' वाखाणिली : तें भटोबासीं आइकौनि म्हणितलें : 'कोथळा काइ बोलता : तें झाडचि बोलिलें किं' : ।। ७६ ।।

**तथा अटनि साहाये अनुवादु** : ।। उंबरीं गौराइसां अटन करीतां एकु दीसु एका गावां जातां मार्गीं कांटा मोडला : तेणें चालोंचि नैये यैसे जालें : तियें पाय धरुनि वाटे बैंसलीं असति : सरीसीं एकें आइसें असति : तवं जयां गावां जात होती : तियेचि वाटेंपुढौनि घोडेनिसिं एकु आला : तयांतें बैसलेयां देखौनि म्हणितलें : 'आइ कवणा गावां जाता' : 'बा पैला गावां जात असो : तवं पाइं कांटा मोडला : तेणें चालों न ये : म्हणौनि बैसलीयें' : तवं तेणें म्हणितलें : 'आइ तया गावां धाडि आली : तेथ जाउं नका : आतां या मागिलाचि गावां जावों' : म्हणौनि घोडयाखालि उतरला : तयांतें विनवूनि बैसविलें : आणि घोडेया वाउनि मागीला गावांचेया आखरा आणीले : तेथ उतरीलि : आणि आपण निगाला : मग

हें केतुलेनि काळें भटोबासीं आइकिलें :॥ शोधु :। आणि म्हणितलें : 'गौराइसां थोर साहृच जालें गा ' ॥ ७७॥

**दीवसाचां भोजनिं संग्रहें तांबुळ नेघणें** : भटोबास दीवसां भोजन करीति : परी तांबूळ नेघति : संन्यास संग्रहो भंगैल म्हणौनि : ॥ ७८॥

**हीराइसां दृढत्वानुवादु** :॥: एकु दीसु भटोबासीं दृढत्वावरि हे गोष्टि सांघितली : भटोबासीं म्हणितलें : " हीराइयेसीं भेटों गेलों : तवं तयांची लेंकी असक्ति होती : आम्ही आलों: संभ्रमु केला : येथोचित अभ्यागत केलें : आम्ही जेवू बैसलों तवं ते सरली : ते कोण्हा नेणतां तैसीचि गुंडूनि ठेविली : अवघीं जेवीलीं : मग मागिलाकडूनि हीराइ जेविली : ॥ कवीबासः॥ आपणेयां सांगातें जेववीली : ॥ मग ' आताचि होती वो ' म्हणौनि संग्रहेंचि रडीनली " : यैसी गोष्टि भटोबासीं सांघीतली : ॥ ७९ ॥

**विरूपाख्य महादेवोबा पंगती बैसका-ज्ञान करणें** :॥ एक वेळ भटोबास अवघेयांसमवेत पांतीं जेउं बैसले असति : तवं रूपदेवोबा वरुतें पांतीं विरूपाख्य महादेवोबा बैसले होते : तयांतें देखौनि केसोबासीं म्हणितलें : ' तुम्ही येथौनि उठा : पैऱ्हा बैसा ' : आणि ते उठिले : परि नावेक अन्याकार जाले : मुख विवर्ण केलें : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : ' यैसें हीमट तोंड करितासि तरि आधीं कां भीक्षा न करीसींचि : वृद्धानुक्रमें वर्तावे ' : आणि तयांचें फीटलें : अनुतापलें : ॥ ८० ॥

**महात्मेया प्रश्नें पदार्थीं वासनादि भावो निषेध** : ॥ एकु दीसु एकीं वासनिकीं वाणिचा हुरडा आणि साकर आणीली : तो भटोबासीं अवघेयांसि बांटवीला : तवं एकीं माहात्मां पुसिलें : ' भटो यैसें खावों ये ' : भटोबासीं म्हणितलें : ' आधीं खाये : मग पुस ' : तेंहीं खादला : मग पुसिलें : भटोबासीं म्हणितलें : ' आपुलेया वासना मीठ वीखो ' : मग तयांसि निरूपण केलें:॥८१॥

**माहात्मा नामपूर्वक घृतयाचनिं गौराइ-सिक्षापण** : ॥ एकु दीसु भटोबासीं गौराइसाकरवि तूप वीकत घेववीलें : तेहीं घेतलें : मग जयांचें तूप तयांचा भांडां : दोनी पळीया तूप उरलें : तें गौराइसीं मागीतलें : ' हें आम्हा माहात्मेयांसि देया ' : तेंहीं दीधलें : आणिलें : तें भटोबासीं सांडवीलें :

'हे तूप नको घेवों : हें माहात्मेपण विकणें म्हणा' : म्हणौनि सिक्षापीली : मग तेहीं तें सांडीलें : ॥ ८२ ॥

**राजीक–उपद्रवें आबैसां वैजोबा-भुवनि राहवणें** : ॥ एकवेळ दीलीचा सुलतान चालीला : अवघें मंडळ हालवलें : भटोबासीं आवाइसांतें म्हणितलें: 'आबै तुम्ही वैजोबाचां गावि राहा' : तिहीं म्हणितलें : 'ना नागदेया : गोसावीं संबंधु वारीला असे कीं' : भटोबासीं म्हणितलें : 'तुम्हासि दोहीं देवांचा संबंधु : तेथचें सन्निधानदास्य : आणि मजसारीखा पुत्रु : आणि संबंधु तो कोणासि : तो बेंबीळासि कीं' : ॥ शोधु : ॥ 'आणि हे एकी अडणि' : ॥ मग आबाइसीं मानिलें : वैजोबाचां गावीं राहीलीं : भटोबासीं म्हणितलें : 'देसु उचलला होइल : आणि तुम्ही गुढयासरीसें यावें : मजपासि धाकुनलीया बाइया असति : तरि मीं पुढां घाटावरि जाइन' : म्हणौनि भटोबास निगाले : ॥ ८३ ॥

**परकीये साधांतें राहावणें** : ॥ भटोबास घाटावरि जातां परळी पातले : तवं मागीलाची दाटि जाली : मग भटोबासीं साधांतें म्हणितलें : 'येल्हो तूं येथ राहे : तुज गोसावी वरद असति' : साधीं मानिलें : मग अक्षमें तेतुकीं साधापासि राहीलीं : भटोबास दुरांतरें निगाले : साधे वैजनाथाचां देउळीं राहीलीं : अक्षमें तेतुलीं आंतु घातलीं : साधें द्वारेंसि काठी टेकूनि बैसली : तवं ते तुरुक आले : ते म्हणति : 'येथ कोण आहाति' : साधे म्हणति : 'येथ मीं श्रीचक्रधररायाची दासी येल्हो असे' : यैसें म्हणति : आणि ते देखति : जाति : यापरी जेतुकीं होतीं तेतुकीं अन्येंहीं आदिकरूनि साधाचेनि वांचलीं : ॥ ८४ ॥

**शकटभंगानुवादें आबैसें धरीतां चुकली म्हणणें** : ॥ भटोबासां गेलेयां मागां असीका देसु उचलला : गुढेयासरिसें वैंजोबा गाडेनिसिं निगालें : सरीसीं आबाइसें : महेश्वरपंडीत असति : वाटे पळतां गाडा मोडला : ते तेथचि राहीले : तवं मागौनि तुरुक आले : ते म्हणति : 'ये पुढीलांचीं' : पुढील म्हणति : 'ये मागीलांचीं' : यापरी वाचलीं : तवं भटोब्रासीं म्हणितलें : 'वैजोबाचा गाडा मोडला गा : परि तिये धरीता चुकलीं : तें कां : ना माझीया स्मरणा खंडना नव्हेचि : तेणें वांचलीं' : तवं एकीं

म्हणितलें : 'भटो तुम्ही केवि जाणा' : भटोबासीं म्हणितलें : 'हां गा श्रींचक्रधराचेनि प्रसादें मीं इतुकेंहीं नेणें' : ॥ तया आश्चर्य जालें :॥ ८५॥

**राजाभविष्यानुवादु :**॥ भटोबासीं दुरि प्रदेशांतर केलें :॥ एक म्हणति निलंगेयासि गेले : ॥ येरीकडे रामदेवो तेहीं धरीला : तें आइकौनि भटोबासीं अनुवादु केला : भटोबासीं म्हणितलें : 'रामदेवो धरिला : परि सुटैल' : जवळिलीं म्हणितलें : 'तें कां भटो' : भटोबासीं म्हणितलें : 'ना मीं वर्ते तवं मऱ्हाटें वर्तैल' : यावरि भटोबासीं हा श्लोकु म्हणितला : '**यस्मिन् देशे वसेत् ज्ञानी योगी स्वाध्यात्मचेतसः। तन्मंडळं पवित्रं च प्रयाति निमिषाद्धृवं**' : ॥१॥ 'आणि धरीला तो संतामहंतांचेया वोखटेया प्रवर्तला म्हणौनि : परि हे हातवणी : जेवण तें पुढां उरलेंचि असे' : ॥ ८६ ॥

**राज्यांतरशमनीं पुनः निंबां वासु करणें :॥ : शोधु :**॥ मग केतुलेया एका काळा निर्भय जालेयानंतरें मग भटोबास गंगातिरासि आले : साधांसि भेटि जाली : कवणीं स्थानीं तें नेणिजे : मग साधांसहित माघौते नींबेयासि आले : तेथ राहिले : ॥ ८७ ॥

**केशव : पंडित बोलणा भाषाभेद कथन :**॥ : एकु दीसु प्रस्तावेया-अनुरूप भटोबासीं म्हणितलें : 'केशवदेयासि संस्कृती सरळि : आणि पंडीतासि संस्कृती मऱ्हाटिया सरळि' : यैसा अनुवादु केला : ॥ ८८ ॥

**विजनिं पंडितां गीतगायेनि निषेधु :**॥ : पंडितबासीं गीतमातुचां ठाइं बहुत भरु धरीला : विजनिं बैसति : आणि धुवा : वोवी : चौपदी : गीतु : यैसें आवडे तें म्हणति : एकु दीसु विजनिं बैसोनि गात असति : तवं भटोबास विजनें पडताळीत आले : तवं तयातें गातां आइकिलें : भटोबासीं म्हणितलें : 'पंडिता आजिलागौनि तूं गीत गावों नको गा : गोसावीं वारीलें असे : गीत विखो म्हणौनि' :॥ १ ॥ मग तैलागौनि पंडितबास न गाति : यैसा नेमु केला : ॥ ८९ ॥

**तथा गीतगायनानुज्ञा :**॥ एकु दीसु पंडितबास विजनि बैसले असति : तवं भटोबास विजनें पडताळीत तेथ आले : तयांची दृष्टी चुकवूनि मागां उभे ठाकले : तवं पंडितबासांसि थोर दुख भरलें असे : दुख करीताति : आणि तेविचि हा गीतु म्हणताति :

**आणिका बोलना : लो न लागो श्रवणा : रूप तरि नयेना : आवडो तुझें ।। १ ।। ध्रुवपद :।।**

**तूं पर दैवं : इतुलें जाणें : बहुतें विघ्नें : जाकलीति : ।। जीवें मीं कहीं : न विसंबे तुज : हेंचि द्यावें मज गोविंदराजा : ।। २ ।।**

**निरंतर करी : मीं तुमचें स्मरण : ऐसेंचि यो कां माझेया मना : गोविंदराजा ।। ३ ।।**

**आणिकीं बुझवितां : डिंभ न बुझावें : मायेलागी रोवें : तें काइ अपराधी : ।। ४ ।।**

**माझी सें न संडी : आर्तादानीं : नागदेया स्वामी : श्रीचक्रपाणि :।।५।।**

यैसा गीतु निर्वेदपूर्वक गाइला : तो भटोबासीं उभेयां ठाकूनि अवधाचि आइकिला : मग यैसें पुढां येउनि म्हणितलें :"पंडिता आजिलागौनि तुज गीत गावेया अनुज्ञा गा : गोसावीं म्हणितलें असे: 'ये भींती विकारु होआवा तरि देमतीयें गीत गातां विकारु होआवा " : यैसी श्रुति उच्चारूनि भटोबासीं अनुज्ञा दीधली : ।। ९० ।।

**तथा गायेनश्रवणें ब्राह्मणा अनुसरणि हाकारा म्हणणें** : एकु दीसु पंडितबास धुवा म्हणत होते : तो आइकौनि एकें ब्राह्मणे भीक्षा केली भटोबासापासीं घेउनि आले : अवधि व्यवस्था सांघीतली : तें आइकौनि भटोबासीं म्हणितलें : 'पंडीताचें गीत तें माझे हाकारें गा ' : ।। ९१ ।।

**नाथोबा-आव्हानि कटक देमाइसांचिये भेटि जाणें** : ।। एक वेळ नाथोबा हींडित हींडित कटक देवगीरीसि गेले : तेथ कटककारां देमाइसां आणि वंकीसि श्रवण केलें : तेहीं कांहीं संपादूं आदरीलें : तवं ते नाथोबा नेघतिचि : मग तेंहीं आग्रहो केला : मग नाथोबायें म्हणितलें 'देया : मा मीं हें भटोबासांसि देइन' : म्हणौनि घेतलें : तवं देमाइसीं म्हणितलें : 'हां बा : भटोबास ते कवण ': 'ना ते आमचे वडिल ': तेहीं म्हणितलें : 'तरि ते आम्हां भेटवावे' : नाथोबायें मानिलें : मग तेथौनि भटोबासांपासि निवेयासि आले : भटोबासांसि भेटले : मागील वृत्तान्त सांघीतले : मग भटोबासांतें प्राथिलें : भटोबासीं मानिलें : मग भटोबासांसि घेउनि कटकासी आले : देमाइसासि भटोबासांची भेटि जाली : ।। ९२ ।।

**तथान्यरसाशनीं नीरसास्वादन परीहारु सुचणें** : ॥ : मग देमाइसीं समस्तां भिक्षुकांसहीत : भटोबासाते अभ्यागतां प्राथिले : भटोबासीं मानिलें : मग देमाइसीं अवघी आइती केली : पांती जालीया : अवघेयां वाढीलें : भटोबासांसि ताट केलें : देमाइसीं विसरूनि भटोबासांचां ताटीं तूप म्हणौनि करडेल वाढीलें : मग दंडवत घातलें : देमाइसें भटोबासांचेया ताटापासि वैसली : भटोबास जेवितांति : तवं देमाइसांसि करडेलाची घाणि आली : तिये यैसी पाहाति : तवं ते करडेल जेवित असति : आणि तियें पोळलीं : 'आहा बा सांघाचि ना कैसें : मीयां वीसरौनि तूप म्हणौनि वाढीलें' : म्हणौनि बहुत दुख करूं लागलीं : 'आहा ऐसें म्या काइ केलें': तेविचि तूप वाढीलें : भटोबास जेवित असति : मागौतें तियें तैसेंचि म्हणति : 'कटकटा भटो : सांघतेति कां ' : मग भटोबासीं परीहारू दीधला : भटोबासीं म्हणितलें : 'करडेल यैसा काहीं मीं स्वादु जाणें तरि रूपैची आण: ' मग अवघेयां भोजनें जालीं : मग कटक देमाइसें आणि वंकी : यैसीं उभयें वर्गें भटोबासांची सिष्यें जालीं : नाथोबायें निरोविलीं : यावरि भटोबासीं समस्तांतें म्हणितलें: 'मज गोसावीं अधिकरण केलें असे : म्हणौनिचि मी अवघेयांचा गुरु : येऱ्हवि अवघिया श्रीचक्रधराचीया धुरा : आणि माझे हाकारे : आतां या नाथोसि कव्हणि हांसों नको गा ' : यैसें भटोबासीं म्हणितलें : ॥ तयाचिपरि उपाध्यें: कान्होपाध्ये : यांसि कोण्ही काहीं पुसति : तया भटोबासांपासि घेउनि येति : तयातेंही भटोबास हाकारे म्हणति : ॥ : शोधु : ॥ : मग मागौतें भटोबास निंबयासि आले : ॥ ९३ ॥

**केशव : पंडित येकवळा करणि अभिमानु-स्वीकारू** : ॥ भटोबासांपासि एकीं दंपतीं भीक्षा केली : तें वीकारवंतें होतीं : तयांची उठिबैसि वीलक्षण देखौनि केशोबासीं : पंडितबासीं भटोबासांतें म्हणितलें : 'भटो यें दवडावीं : यें सदोषें असति : तियें बहुतांमध्यें भटोबासांसि कळों नैयेति :' भटोबासीं म्हणितलें : 'हळुहळु गुणा येतिल : ना तरि आपुला अवगुणीं जातील : तुम्हीं आदि नको हो गा ' : तवं केसोबासीं : पंडितबासीं म्हणितलें: 'भटो हें दवडा : कां आम्हीं समस्तें जावूनि ' : भटोबासीं आवेशूनि म्हणितलें 'जा' : मग उभयवर्गीं समस्तांसि आण घालौनि म्हणितलें: 'आगा

एथौनि निगे ना तयासि भटोबासांचीचि आण ' : म्हणौनि अवघेचि निगाले :॥ ९४ ॥

**तथा केशवादिकागर्मानि केशव पंडित स्वनेत्रानुवादु** :॥ : मग अवघीं गेलेयां तियेंचि उरलीं : येतुलेनि तयांची उठ-बैस बाहेरी पडलीं : एकमेकांतें देखौनि सुरंगु मीरवीति : घोळिति : येतुलेनि भटोबासीं म्हणितलें: ' हें माझेयां कंथडीकारां मुळवणी कीं : ॥ फुका माझीं निगालीं: ' तयांतें म्हणितलें: ' बापें हो आतां तुम्हीं जा : मीयां तुम्हांकारणें वहुता तुटि केली ': मग तियें निगालीं :॥ : तें आइकौनि केसोबास पंडितबास समस्त आले : भटोबासांतें म्हणितलें : ' भटो आम्हीं पापीयें : तुमतें सांडूनि गेलों ' : म्हणौनि दंडवतें घातलीं : अनुताप करूं लागले : मग भटोबासीं उठउनि संभाषूनि म्हणितलें : ' पंडिता : केशवद्या : सर्वांगीं काइ देखणें असे : देखणें तें डोळेनिचि कीं : तैसे तुम्हीं माझ डोळे कीं गा पंडिता : केशवद्या: ' ॥९५॥

**धर्मबळवतरें वडिल धाकुटा निराकरणें** :॥ : मग यावरि भटोबासीं म्हणितलें : ' धर्में एकमुखता होआवी : धर्मु सिष्यु नव्हे : धर्मु तोचि गुरु : म्हणौनि धर्में वडिलेंहीं धाकुटेयाचें म्हणितलें करावें ' : यैसें भटोबासीं निरूपण केलें :॥ ९६ ॥

**लुखाइ अनुसरणदृढत्वीं परीहारार्थ संबंधा पाठवणें** : ॥ : लुखाइसें तियें बाबुळगांवंकरें : भटोबासांपासौनि श्रवण जालें होतें : तियें सकळ भोगापासौनि विरमलीं : उदासीनता असति : ताक भात जेवीति : संग्रहें तोडगळसुरीवांचौनि अवघेचि तेजिलें : भातारु वर्जिला : गंगे जाति : स्नान करीति : नावेक बैसति : अनुष्ठान करीति : यापरी असेति : आपणचि जाउनि भातारासि बरवी उपवर नोवरी पाहीली : भाताराचा वीवाहो केला : मग एकु दिसु गंगे आंघोळिसि म्हणौनि आलीं : तैसींचि बाहीर-वाहीरीं भटोबासांपासीं निंबेयासि आलीं : भटोबासांसि भेटलीं : भीक्षा केली : भीक्षा देता भटोबासीं शोधनी करवीली : तेहीं मागील व्रतनेमु सांघितला : मग बाइसांचेनि सांगातें परमेश्वरपुरा पाठवीलीं : सवेंचि मागीलाकडौनि धावणें आलें : भटोबासांतें म्हणितलें : ' भटो येथ लुखाइ आली: ते आम्हासि भेटवा ' : भटोबासीं म्हणितलें : ' येथ नाहीं : पाहा

पां ' : म्हणौनि परीहार दीधला : आणि ते निगाले : आपुलेया गावां गेले : लुखाइसें ऋद्धिपुरासि गेलीं : ऋद्विपुर नमस्करीलें : वरिष दीस उत्कर्षें वैराग्य केलें : देह थोर तुटलें : मग वरीखा एका भटोबासांचिये भेटीसि आलीं : भेटि जालीं : मग एकु दीसु तयांचें अती दृढत्व जाणौनि भटोबासीं म्हणितलें : ' लुखाइसें आतां यैसींचि तुम्ही बाबुळगावां जा : तेथ भीक्षा करा आणि या ' : मग लुखाइसें बाबुळगावां गेलीं : भीक्षाअवसरीं तयाचि घरा गेलीं : तवं तो दारीं बैसला होता : तेणें नोळखोनी म्हणितलें : ' आइ दंडवत ' : लुखाइसीं म्हणितलें : ' आमतें वोळखतां ' : आणि तेणें ऐसें वोळखौनि म्हणितलें : ' होय वोळखतों : आता दुसरें दंडवत ' : म्हणौनि साउमा आला : माथांची पाग फेडीली : आणि लुखाइसांचीया पायांवरि भावपूर्वक डोइ ठेविली : बैसों घातलें : ताटीं पाये धुतले : पायेवणि भीतरि घेतलें : कपाळीं लावीलें : मग लुखाइसीं माघौतें येउनी भटोबासांपुढां सांघीतलें : भटोबासां थोर सुख जालें : ॥ ९७ ॥

**खेइभटां प्रश्नें द्रावकानुवादु** : ॥ एकु दीसु सेगावंकरां खेइभटां भटोबासांचे दर्शन जालें : तेहीं भटोबासांसि पुसिलें : ' लोहोबंध गाडा जडीला असे : तो उजडे ऐसें काहीं असे ' : भटोबासीं म्हणितलें : ' असे : द्रावक भेटे तरि लोहासि झरा फुटे ' : यैसी भटोबासीं उपपति दीधली : ते खेइभटांचां मनि टिक यैसी बसली : मग आपुलां मनि म्हणितलें : ' आतां गावां जावों : वेवस्था करूं : मग भटोबासापासीं जाउं ' : मग भटोबासांची आज्ञा घेउनि कुटुंबें घेउनि गावांसि गेले : ॥ ९८ ॥

**तथा अनुसरण** : ॥ मग गावां जाउनि खेइभटीं द्रव्याचे सरीसे तीन वांटे केले : एकु पुत्रासि दीधला : एकु ब्राह्मणीसि दीधला : आपुला आपण घेउनि तयांतें पुसीलें : ' मीं भटोबासांपासीं जात असें : तुम्ही माझी अवसरि न करावि ' : यैसे म्हणौनि भटोबासांपासि आले : मागील अवघें सांघितलें : तें द्रव्य भटोबासांपुढां ठेविलें : तवं भटोबासीं तें यैसें पाये लोटूनि म्हणितलें : ' मी काइ येकाधा चोळीका माहात्मा : मां हें आणिलें ' : तें खेइभटासि अवघड वाटलें : भटोबासांतें म्हणितलें : ' तरी हें मी काइ करूं : येतुकेया दुरूनि माघौता कैसा जावों ' : काकुलती करूं लागले : मग

भटोबासीं म्हणितलें : ' तरि जाये घालि पैला मढांतु : मां मढुचि खाइल' : मग तें नेउनि मढांतु एकी कोनटां ठेवीलें : मग बरवी यथौचीत क्रीया केलि : बरवी भटोबासांसहीत वस्त्रपूजा केली : बरवे पदार्थ अभ्यागत केले : मग खेइभटांसि भीक्षा दीधली : श्रवण तियेचि काळीं जालें की मागां क्हीं जालें हें नेणिजे : ॥ ९९ ॥

**तथा अधिकारुप्रसंसा** :॥ मग खेइभटासि भटोबासीं काहीं शास्त्र श्रवण केलें : ते दसा वृद्ध होते : ते देखौनि एकु दीसु भटोबासीं म्हणितलें :' साटी वरीखाचीये दसेचेया पुरुषासि अनुसरणिं अधिकारु नाहीं : परि नेणिजे ईश्वरीची प्रवृत्ति : जैसे कीटकीये कोरीतां काष्टी ॐ पडे : तरी पडे ' :॥१००॥

**तथा कुहीरीसाधन निभर्षणपूर्वक पुरुषाचारु निरूपणें** :। एकु दीसु भटोबासातें पुसौनि वाळुके रामदेव अटनासि नीगाले : तयांसरीसे भटोबासीं खेइभटातें पाठवीलें : गेले : एकु दीसु तयां भीक्षाअवसरीं कुहीरी भिक्षे आली : भोजन करीतां ते वाळुके रामदेवीं टाकीली : मग दोघे जेवीले : मग खेइभटीं उठौनि ते वाळुवंटी पुरीली : तेथ दीवस एक दोनि होते : मग दिसवडी जेवितां म्हणति : ' का न गीळेसि : सांघों : कुहीरी ये पुढां ' : खेइभट ते माहासुरवाडाचे : मग किति एका दिसां भटोबासांचीये भेटिसि आले : मग रामदेवीं भटोबासांपुढां सांघितलें : भटोबासीं आइकौनि म्हणितलें : ' रामा वोखटें केलें : हां गा अष्टदश पक्वांनि जो जेवि तो जरि एकें साधने सीधी ने तरी तोचि भला किं गा ' : ॥ एकी वासना: ॥ ' तयासि कुहीरी कैसी वीखो : वीखो तो कवणा: जयासि घाटेयावरि मीठ नाहीं तयासीचि कीं ' : यावरि भटोबासीं निरोपण केलें : भटोबासीं म्हणितलें : ' अधीकारा अनधीकारा अनुरूप पुरुषें देहदमन : इंद्रियेदमन : मनोदमन करावें : तयातें त्रीदंडी यैसें म्हणितलें : जयापासौनि दातृत्व संभावना तया पुरुषाची नामना सारावी : येर धर्मद्वारार्थी उपकारक मानावें :' ॥ १०१ ॥

**ब्राह्मणा प्रश्नें अंतरप्रकाशानुवादु** : ॥ एकु दीसु ब्राह्मणें एकें भटोबासांतें पुसिलें: ' भटो तुमची मूर्ति झळझळित दीसे : तरि काइ तुम्हीं त्रीकाळ स्नान करीतां ' : तवं भटोबासीं म्हणितलें : ' गगनीं तारांगणें झळकताति तें काइ : तयाचें मंदिर झळकत दीसते : किं आंतु आहे तें

झळकताये ':' ना भटो आंतु आहे तें झळकताहे ' : भटोबासीं म्हणितलें : 'तैसे माझेया मंदिरांतु वस्तु आहे ते झळकताये ' : ॥ शोधु ॥ येतुलेनि तेहीं भीक्षा केली : ॥ १०२ ॥

**वृषभावरूनि गोपाळपंडितां रक्षणप्रसंसा** : ॥ एकवेळ गोपाळपंडित भटोबासांचीये भेटिसि आले होते : एकु दीसु भटोबास भीक्षा करूं गेले : ॥ शोधु : ॥ बारसिचां दीसीं ॥ सरीसें अनोबास : वासनिकाचि परी झोळी धरीली असे : तवं एकी घरीं महा प्रचंडु वसो तो भटोबासांसि डिवुं आला : तो येतांचि गोपाळपंडीतीं यैसा सींगीं धरिला : भटोबास ऐलाकडौनि निगाले : मग तेहीं येसा ढकलूनि सोडीला : मग भटोबासांतें टाकूनि आले : मग भटोबास बीढारा आले : ते गोष्टी सांघौनि मग म्हणितलें : 'यैसें आजि गोपाळातें माझेनि अभीमानियें राखिले गा ' : ॥ शोधु : ॥ अवघेयां आश्चर्यें जालें : ॥ १०३ ॥

**निद्राप्रसंगें माहादाइसीं केशोबासां सिक्षापणें** : ॥ एकु दीसु केसोबासीं दिवसा निद्रा केली होती : ॥ शोधु:॥ तवं काहीं काळातिक्रमु जाला : ॥ ते देखोनि माहादाइसीं म्हणितलें : ' हां गा केशवदेया जया एकु वैरीं तो दिहां निद्रा न करी : मां तुम्हां तंव चौदा वैरीं असति ' ॥ शोधु । कविबास : 'अशेष देवताचक्र वैरी असतां कैसें निजतां ': ऐसे माहादाइसें कोपली : ते केसोबासां थोर सुख जाले ॥ १०४ ॥

**अनिष्टत्यागीं केशवु सार्गरक्षणानुवादु** : ॥ एकवेळ केसोबास अटना एकलेचि गेले होते : तवं अवकाळ पाणि लागलें : एका गावां भीक्षे गेले : तवं एकी घरी वेव्हारेयाची कन्या तिया देखीलें : केसोबास रूपें सुंदर होतें: देहयुक्त होतें : तिया मनिं अभिळासीलें : आपणचि भीक्षा घातली : आणि पुसिलें : ' कोठें असणें ' : तिहीं यैसा माथेयाचा अनुकारु केला : आणि उदासीनताचि चालिले : तिया वीळवेऱ्हीं दृष्टीचें राखण घातलें : तवं वीळचां प्रजन्य आला : गावांतु वेसेंसि लिंगाचे देउळ होतें : तेथ वीळचां निद्रास्थाना आले : सरीसा इउला यैसा फुटा होता : तो पुढां ठेउनी एकी कोंणि बैसले : गुरवु रात्रीं घरा गेला : तेणें देखीलें होतें : परी उगाचि नीगाला : तवं केतुकेया एका काळा ते बाइ कांबळेयाची वुंथि घालूनि

देउळांतु आली : यैसें पाहीलें : तवं केसोबासांतें देखीलें : आणि जानुवरि बैसली : केसोबासीं म्हणितलें : ' उठा : तुम्ही म्हणाल तें आइको ' : म्हणौनि खालि बैसवीलि : आणि तिये बाइयेतें म्हणितलें : ' मीं उवायां जातों : तुम्ही येथ यैसीं बैसा ' : म्हणौनि फुटा : कांहीं परीग्रहो होता : तो तसाचि ठेवीला : तियेसि विस्वासु वाटला : ऐसे देउळाबाहीरीं निगालें: आणि तैसेचि ' श्रीचक्रधरु ' म्हणौनि चालीलें : तिया बाइया यैसीं नावेक वाट पाहीलीं : नैयेती यैसें मान जालें : आणि भीयाली : ते आपुलेयां घरा गेली : तिये दीसीं केसोबासीं राणि पाठीं घातली : आणि येरी दीसेंचि भटोबासांचीये भेटि निगाले : तव सकाळि भटोबास तथा समस्त मार्गु आस्थानि जाली असे : धर्मवार्ता होति असे : येतुलां काळीं भटोबासीं म्हणितलें: ' केशवद्या येतु असे : फुटा देउळीं सांडिला असे:' तवं समस्तीं म्हणितलें: ' भटो केवि जाणितलें :' भटोबासीं म्हणितलें : ' मी श्रीचक्रधराचेनि प्रसादे जाणे गा:' तवं केसोबास आले: भेटि जालीया : पुढां बैसों घातलें : मग भटोबासीं म्हणितलें : ' केशवदेव हो : तुम्ही कैसीयापरी आलेति तें आम्हा सांघा:' मग केसोबासीं अवघें वृतांत सांघितलें : येतुलेनि भटोबासीं म्हणितलें: ' एकें अनिष्ट आलेयां आपणयांतें राखीलें : एकें एकांतें राखीलें : केशवदेनि मार्गातें राखीलें गा:' यैसें भटोबासीं प्रसंसीलें : ॥ १०५ ॥

**तथा पुनरागमनि जोगीणि : पोतें अनुवादु :** ॥ मग भटोबासीं केसोबासातें म्हणितलें : ' आतां तूं माघौता तेथ जाये:' केशोबासीं मानिलें : केशोबासि आपुला मनि म्हणितलें : ' हें देह येतुलेयासि कारण:' मग माघौते गेले: अटनाचेनि क्रमे देह तुटलें : अत्यंत अप्रास्य केले : मग तयाचि गावां तिये बाइचेया घरा भीक्षे गेले : तवं समैचि ते उभी असे : केसोबासांतें देखीलें : आणि यैसी पचकरूनि थुंकली : भणंग म्हणौनि स्वभावीकचि : आणि घरांतु गेली : येतुलेनि केसोबासीं बाहे आफळीली : ' हा नव्हे मी श्रीचक्रधराचा केशवद्या ' : म्हणौनि नावं सारीलें : तैसेचि तया गुरवाचेया ठाया गेले : तेथ तेणें फुटामुख्य करूनि अवघेचि दीधलें : गुरवें ठेविलें होतें : ॥ मग केतुलेनि काळें भटोबासांचीये भेटी आले : तवं आधींचि भटोबासीं म्हणितलें : ' केशोद्या येतु असे गा : काळातें पाठिमोरें करूनि:' मग येउनि माघौतें सांघितलें : भटोबासां थोर सुख जालें : मग यावरूनि कितीएक

अटना गेले : कितिएकीं चर्या केलीया : ।। हे स्मृति मलेकोयाबा सांघति : आणि धर्मवार्ता करीति : ।। शोधु ।। यावरी भटोबासीं जोगणि : पोतेयाची गोष्टि सांघितली : ।। : ।। यावरी भटोबासीं म्हणितलें : " एकलेया अटन न करावें गा : एकवेळ मी अटनिं वीळीचां निद्रस्थाना एका देउळा गेलां: तवं तेथ जोगिणि एकि आली : तिया म्हणितलें : ' या : पिंडें पिंड खेळो ' : तवं मीयां म्हणितलें: 'जाये परतें ': आणि तेथौनि निगालां : तिया म्हणितलें : ' पळतां काइ : तुमचें पोतें जाइल ' : मीयां म्हणितलें : 'पोतें जाइल तें माझेचि किं : तुज असावें मां जात्रें' : यैसें म्हणौनि आणिका निद्रास्थाना गेलां " : म्हणौनि अनुभवीचि गोष्टि सांघीतली: ' म्हणौनि एकलेया अटन न करावें गा ' : मग दोघदोघीं दादां : आणि चौघचौघी बाइ : यैसी वेवस्था केली : ।। १०६ ।।

**म्हातारदामपूर्वक भटोबासीं मार्गा प्रार्थणें** :।। एक वेळ देसीं दृभीक्ष पडिलें : भिक्षुकासि भीक्षा नाहीं : भिक्षुकें भीक्षे जाति : झोळाये दोनि चारि कोरके येती : भटोबास भीक्षा थोडी देखतिल : आणि पचन घालीतील : म्हणौनि भिक्षुकें झोळीये तळीं चिंधिया घालीति : वरी भीक्षा ठेवीति : मग भटोबासां झोळीया दृष्टिपूत करीति : आणि गंगे भोजन करावेया जाति : यैसा एकीं दीसीं भटोबासीं एकाचिये झोळीयेसि तळीं हातु घालौनि भिक्षा उचलीली : तवं हळु लागली : ' काइ पां : हळु झोळी कां ' : म्हणौनि भितरील अन्न यैसे केलें : तवं तळीं चिंधिया देखिलीया : मग उगेचि यैसे राहींले : दृभीक्ष पडीलें असे यैसे कळलें : मग वीळचां निद्रास्थानि अवघे बैसले होते : आणि भटोबास आपुलां स्थानिहुनि उठिले : उभेयां ठाकौनि हात जोडूनि प्रार्थिलें : 'तुम्ही अवघिया श्रीचक्रधराचीया धुरा असा तरि मीं मागैन तें मज देयावें ' : यैसें म्हणौनि अवघेयां दंडवत घातलें : तवं अवघे गजबजौनि उभे ठाकले : अवघां म्हणितलें : ' उठा उठा भटो : मागाल तें देउनिं ' : भटोबासीं म्हणितले : ' मज म्हातारदाम आला असे तो विनयोगावा : आजिलागौनि माझी एकि भिक्षा घेयावी ' : मग अवघां मानिलें : मग भटोबास रंधन करवीति : भिक्षुकें भिक्षानेमु सारीति : मग भटोबासांची एकि भिक्षा घेति : एकि पोळी : वरण : कढी : भातु : काहीं

पत्रशाक : यैसी आपुलाली भिक्षा घेउनि गंगे जेवावेया जाति : ।। शोधु : यापरी भटोबासांचें द्रव्य उपेगा गेलें : तवं सुकाळु जाला : मग नेघति : ।। १०७ ।।

**साकाइपिते मृतानुवादीं दशक्रीया निराकरणें** : ।। साकाइसें तियें वासनिके : भटोबासांची सिष्यें : तयांचे पीते सरले : तिये तयांचा नेमु सारूनि भटोबासांपासि आलीं : येतांचि भटोबासीं म्हणितले : ' काइ करूनि आलींति साकाये ' : तिही म्हणितलें : ' बा आलीयें वडपींपळीं लावूनि ' : मग भटौबासांसि दंडवत घातलें : भेंटि जाली : सरीसें काही द्रव्य आणिलें होतें : भटोबासांते पुसिलें : ' भटो काहीं आणिले असे : तरि जेवण करूं ' : भटोबासीं म्हणितलें : ' तो वासनिक नव्हे : तयांचें अन्न कोण घेइल : कोन्ही नेघति ' : ।। शोधु :।: ' आपुलें म्हणौनि करींसील तरि दींस संख्या लोटलेयां घेतिल ' : ।। मग तियें उगीचि राहींलीं : ते दीस लोटलेयां भटोबासांतें मागुतें प्रार्थिले : भटोबासीं मानिले : मग तेहीं भटोबासांसि अवघेयांसहित अभ्यागत केले : तें अवघां घेतले : ।। १०८ ।।

**महात्मेयां विजन-निरोधानुवादु** : ।। कव्हणीं एकीं भटोबांसापासि भिक्षा केली : तयांसि विजनाची आवडि नाहीं : भिक्षु तयांतें बोलावूं बोलावूं विजना नेति : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : ' विजना जातां या यैसें होताये ' : म्हणौनि खळीयेचें प्रमाण उच्चारिलें : ।। १०९ ।।

**रांधवनकारी अन्नप्रदानि गौराइसां सिक्षापण** : ।। : एकवेळ बहुत समुचयो जाला : तें अन्न निफजावेया एकि ब्राह्मणी बोलाविलीं : तियेसि भटोबासीं च्यारि रुके देउं केलें : रंधन जालें : तियेसि च्यारि रुके देववीले : आज्ञा दीधली : मग पांति जालियां : अवघीं जेविलीं : तवं गौराइसीं तियेतें बोलावूनि आणिलें : आणि तिचीये वोटिये दोनि वेंठ मांडें पुरीया घातले : तें भटोबासीं देखीले : तियेसि जावों दीधलें : मग भटोबासीं पूसिलें : ' गौराइये हें इयेंचीये वोटीये काइ घातलें ' : ' ना हे मांडे ' : भटोबांसीं म्हणितलें : ' इयेसि तरि मीयां च्यारि रुके देवविले : तुवां मांडे कां घातले : हेचि माझे महात्मे खाते तरि देवातें आठवावेया दक्ष होते ' ।। शोधु :।: मग तैलागौनि काहीं न पुसत न घलीति : ।। ११० ।।

**केसोबा प्रश्नें आण निर्वचु करणें :** ।। भटोबास प्रस्तावेयावरि माहादाइसाची आण वाति : कां पांचास्यां गुरुकुळाची वाति : मग यैसा एकु दिसु केशोबासीं पुसिलें : 'तुम्ही रूपैचि आण : आणि पांचास्या गुरुकुळाचीं आण कां वां' : यावरि भटोबासीं म्हणितलें : "एकवेळ गोसावीं मातें म्हणितलें : 'येथौनि वानरेसांतें अधिकरण किजैल : सातां पाचां बोधु दीजैल : येथौनि एका दोघां : वानरेयापासौनि सातां पाचां' : तव मीयां म्हणितलें : 'हे काइ जी : गोसावियांपासौनि एकां दोघां आणि मजपासौनि सातां पाचां': तवं गोसावीं म्हणितलें : 'बोधदाता काइ तूं : बोधदाता परमेश्वर : अक्षरदाता जीवु : तरि हें अच्युताचें गोत्र' : म्हणौनि गुरुकुळाची आण वायें : ।। आणि रूपैया भानखेडांहूनि आणिलें : कडिये खांदीये घेउनि श्रीप्रभूचेया दर्शना नेलें : नेसवींलें : पांगुरविलें : येसणें सायास केले : इयेतें गोसावीं मज निरोवीले : म्हणौनि मीं रूपैयेची आण वाये" : येतुलेनी केसोबास उगेचि राहीले : ।। १११ ।।

**अटनि वीनायेकबासीं अनुकूळीं संभाषण फरणें :** ।। विनायेकदाए ते भटोबासांचे सिष्य : तयाचां ठाइं अत्यंत वैराग्यनिष्ठता विरामु होता : एकु दीसु ते भटोबासां पुसौनि अटनासि निगाले : तवं अटनवीशेषें एका मार्गीचेया अनुकुळांचिया घरा भिक्षे गेले : तयांतें पडिताळीलें : तवं तो गावीं नाहीं : तयांची स्त्री घरीं होती : तिएसि नेसावेया नाहीं : पाळणां लेंकरु ते उखरडि निजविलें होतें : तेहीं रडत होतें : काइसेनिही बुझावेना : तवं तिया विनायेकबासातें देखीलें : आणि तैसीचि फाटकेंनि वस्त्रेसि दंडवत केले : वीनायेकबासीं तया अनुकुळातें पुसीलें : तिया 'गावां गेला' म्हणौनि सांघीतलें : 'हें लेंकरु कां रडतें' : तिया म्हणितलें : 'बा उखरडि पाळणां असे म्हणौनि रडतें' : मग वीनायेकबासीं तियेसी झोळियेचें अन्न दीधलें : आणि आपणेयांपासौनि एक वस्त्र तयां लेंकरुवाखाली घालवीलें : आणि तें रडत राहीलें : आणि ते निगाले : उरली भीक्षा केली : गंगे जेवीले : तें भटोबासीं आइकिलें : अवघां गुरुभावंडीं आइकिलें : अवघेयां आश्चर्य जालें: भटोबास तोखले : ।। ११२ ।।

**नरींद्रबासां भेटि : अनुसरण :** ।। नरेंद्र कवि : सालकवि : नृसिंह कविः हे तिघे भाउ : नृसिंह कविन **'नलोपाख्यान'** केलें : सालकविन **'रामायण'**

केलें : तें आपुलालें रामदेवरायापुढां म्हणितलें : तेथ नरेंद्रकवि बैसले होते : तयांसि भटोबासांपासौनि श्रवण होतें : अवघें आइकौनि म्हणितलें : 'यैसा द्वारकेचा रामहाटु वर्णितेंति तरि तुमचेया पापा पुरश्चरण होतें ': यैसें राया-देखतां निर्भषिलें : तवं तेही म्हणितलें : 'तुम्ही एक कवीत्व करा : मां तुमची युक्ति पाहों ' : मग नरेंद्रबासीं तेणें सळें अठरासतें '**रुक्मिणीसैंवर**' ग्रंथु केला : करूनि तयांदेखतां रायापुढां म्हणितला : वाचितां ये वोवीपासि आले : "**देवाचेया दादुलेपनाचा उबारा : न साहावेचि साताहीं सागरा : भेण वोसरोनि राजभरा : दीधली द्वारावती ॥ १ ॥**"

यावरि रायें म्हणितलें: 'या ग्रंथाचा अभंगु मज देयावा : मी जेतुकीया वोवीया तेतुके सोनटके आणि चौथरीया आसू वोवाळणि घालीन ' : नरेंद्र-बासीं म्हणितलें : 'ना राजेहो : आमचेया कवीकुळा बोलु लागैल : मग तयाचे गर्व हरले : रायासी थोर चमत्कारु जाला : मग तें '**रुक्मिणीसैंवर**' नरेंद्र कवि भटोबासांपासि घेउनि आले : भटोबासांसि भेटि जाली : तैसीचि तेहीं भीक्षा केली : मग तैंहूनि '**रुक्मिणीसैंवर**' ग्रंथु मार्गासि आला : भटोबासां मागां केतुलेया एका काळां अनोबासांचां हरगर्वी भीक्षा केलेयां हे अवघे आइकौनि म्हणितलें : 'सकळां कवीपरीस हा कवि चतुर ': मग आपणही श्लोकबंध '**गद्य**' केलें : ॥ ११३ ॥

**काळे कृष्णभट गीतगायेनी प्रसंसणें**:॥ एक वेळ काळे कृष्णभटिं दसांके उद्धवदेवा गोकुळ पाडिताळणेयाचीं पदें केलीं : तें भटोबासांपासिं म्हणितलीं : तियें पदें ऐसि :

**पाळाति जवं नारी : श्रीउद्धवदेव पसाइता : क्षेणु एकु संभ्रमीता: आंगसीकें देखौनि : कोमाइलीं मुखकमळें : अती वियोगदुखानळें : कृष्णालागी उतावळें : गोपिवृंदें बोलतीं : ॥ १ ॥**

**ध्रुवपद ॥ काहचा त्येजियेलें : कृष्णें प्रियोतमें : म्हणति बाळा : आतां काइसा पडीताळा : कृष्णा मेळवी उद्धवा :नित्य स्मरों गोकुळ : बंधु सवंगडे खिरारी : आम्ही देवकिया किंकरी : कहीं न वीसरों गोविंदा : ॥ सकळ-कळांविदा सुंदरी : रायांरायांच्या कुमरीं : आमुतें सांडौनि मुरारी : त्या भ्रणील गोपाळ : ॥ २ ॥**

चंदन आणि हा चंद्र : निऱ्हा तावी कृष्णेवीन : जवं जवं देखो वृंदावन: तवं तवं अधीका आठवे : ॥ कृपादृष्टीची अवलोकनें : दुखिस्त जीवाकारणें : तया प्रियाचें गाऱ्हाणें : आम्हीं कवणा सांघावें : ॥ ३ ॥

जयाचेनि बळें त्यजौनि कर्मे : रास खेळों वृंदावनि: ते रात्री आठवीता काइ सांघो व्येथा : हरैल कृष्णदर्शनि : ॥ जीवीचे आरत : कवणा सांघों दातारा : काइ तूं नेणसि : सर्वज्ञ आर्तादानि उदारा : ॥ ४ ॥

तो देवो कइ मिळैल आम्हा : म्हणौनि थोरी अवस्था : हें आणिकां नैये पैं सांघतां : तुज भक्तावाचौनि : मना वाचे सर्व तो होआवा : नित्य वेधलें माझें मन : ठेवि ठेवि हे ब्रह्मज्ञान : काइ सांघसी मुनिवर्या : ॥ ५ ॥

अनिमीत बंधु आर्तादानि कृष्णु : जीवाचें जीवन: विनती करावी यादव-राया : आम्हां द्यावें सन्निधान : ॥ हे जाणवी गोपाळा : जवं ये मागौता पडिताळा : त्या आशा वांचौनि जीविता : ना तरि त्यजौनि प्राणातें ॥ ६ ॥

यैसी आइकोनिया विनति : उद्धव निगे वेगवतरे : कृष्णावियोगे तातलीं : देखोनि सकळां कळेवरें : ॥ म्हणे सभाग्य या बाळा : दैवें सकळां कैसा वेधु लागला : अनुमोदित त्यांचा भावो : जीवीं धरुनिया देवो : मथुरापुरी पातला : ॥ ७ ॥

देखावेया कृष्णनाथा: तयाही थोरी अवस्था: निमिष न वचे तयाविनः परी हे आज्ञा समर्था : ॥ देवा भक्ता होता मीळणि : सकळ सुखे ठेंगणी : अंतरीचें प्रणये अलौकिक : माये तें मी कैसें वाखाणि ॥ ८ ॥

दर्शनोत्कंठित चरणि अनुरक्त : उद्धवु जवळि पातला : सामर्थ्याचा रासी आनंदे पूर्ण : कृष्ण डोळां देखिला : ॥ नागदेवाचा दातारू : आलिंगौनि सर्वेश्वरू : परमानंदे तो किंकरू : आपणपें विसरला : ॥ ९ ॥

यें पदें गाइलीं : यावरी भटोबासीं म्हणितलें : 'कृष्णा तेव्हेळीं काइं तूं तेथचि होतासि' : म्हणौनि तोखले : ॥ ११४ ॥

स्थाननिर्देशें बाइदेवोबासां अटन सांघणें : ॥ एकवेळ बाइदेवोबास अटना निगाले : तेव्हेळीं भटोबासीं म्हणितलें : 'बाइदेया तुवां स्थाननिर्देशें अटन करावें : सकळ स्थानें नमस्करावीं' : म्हणौनि विधि विहीला : मग बाइदेवोबा स्थानें नमस्करीतचि अटना निगाले : ॥ ११५ ॥

**केशवाचार्य उद्ग्रहणिकें कवीस्वरीं पराजयो करणें :** ।। एकु दीसु कवीस्वरबास गंगेकडे गेले : तवं तयांचे आधिल गुरु केशवाचार्ये मार्गी भेटले : वोळखि जाली : उभया ठाकौनि कटाक्षें कवीस्वरांतें म्हणितलें : " तूं येसना विद्वांस आणि आमतें सांडूनि नागदेवभटांपासि आलासि : तरि आतां काइ तृतीय सींग निगालें ' : कवीस्वरबासीं म्हणितलें : ' मां तृतीय सींग निगालें कीं नाहीं निगाले : ऐसे पहा ना कां ' : केशवाचार्ये म्हणितलें : ' कैसें निगालें ' : यावरि उघाणि प्रवर्तली : केशवाचार्ये निरुतर केले: तयांचें अवघेंचि खंडिलें : मग सेवटिं कवीस्वरबासीं शीघ्रचि वाक्य करूनि भक्तिप्रतिष्ठा केली : कवीरस्वरबासीं म्हणितलें : ' **चेतश्चिन्तय चित्परं चितिहरं चिच्चेतनं चिन्मयम् । मोहं मुञ्च मनो मनोभवमहाकूपारपारंतरम् । अंतःकोशमकोशकोशनिकरं सन्मूलमुन्मूलिनम् । जीवं जीवयते जगज्जनिकरं चक्रेश्वरं तं परम्** ।। १ ।। ' हें आइकौनि परिसौनि केशवाचार्ये म्हणितलें : ' होयेः तृतीय सिंग निगालें : आतां चला नागदेवोभटांपासि : त्यांतें विनवा : मां मीही भिक्षा करीन ' : ते कवीस्वरबासीं मानिलें : दोघै निगाले : ।।११६।।

**तथा विज्ञापनीं भटोबासीं भिक्षा देणें :** ।। मग कवीस्वरबासि तयांते भटोबासांपासि आणिलें : मागील अवघे सांधितलें : तयांकरवि भटोबासां दंडवत घालवीलें : मग कवीस्वरबासि भटोबासांतें प्रार्थिलें : " भटो: केशवाचार्ये म्हणताति : ' मी भिक्षा करीन ' : तरी यांसि भिक्षा देयावी ": भटोबासीं म्हणितले : ' भटो हा नको गा : हा अनधिकार्या असे ' : कवीस्वरबासि म्हणितलें ' : ' भटो मज कारणे ' : मग भटोबासि तयातें श्रवण केलें : भिक्षा दीधली : ।।११७।।

**तथा परधर्म हरणें** : ।। मग भटोबासीं केशवाचार्यासि काहीं नमस्करावेया दीधलें : एकु दीसु तयातें ' **महावाक्य** ' घोकवीत होते : तवं तेहीं म्हणितलें : ' भटो विचारूनि पाहतां हें आमुचेया सिखासूत्रा मिळत असे ' : तवं भटोबासीं म्हणितलें : ' जळो जळो तुझें सिखासूत्र : घालि पाणियांतु : आतां तूं जाए : माझें आहे तें दे ' : मग काहीं नमस्करावेया दीधलें होतें : तें घेतलें : मग आज्ञा केली : गेले : जातां केशवाचार्ये म्हणितलें : ' भटो हें तुम्ही घेतलें : आतां माझां हृदइं असे तें काइसेनि घेयाल ' : भटोबासीं

म्हणितलें : ‘ तें माझें अभिमानिये घेइल ’ : मग गले : ॥ शोधु : ॥ मग तया तैसेंचि जालें : ॥ ११८ ॥

**विद्वांस उद्ग्रहणिकें बोरीकर भानु प्रकासणें** : ॥ एकु दीसु भटोबास बैसले असति : तवं एक विद्वांस आले : ते भटोबासांसीं चर्चा करूं लागले : चर्चा करीतां तेणें भटोबासातें म्हणितलें : ‘ हें ऐसें नव्हें किं : न घडे किं ’ : तेव्हेळीं कवीस्वरबास इतुकेया दुरि ऐसें आपुलें अंगवस्त्र सिवीत होते : तयासि तयांवरि लक्षचि नाहीं : तेथौनि कवीस्वरबासि म्हणितलें : ‘ हे कैसे न घडे ’ : विद्वांसें ऐसें पाहूनि म्हणितलें : ‘ मां यांतु तुम्ही काइ जाणा ’ : तवं भटोबासीं म्हणितलें : ‘ हा कैसा नेणे : हा बोरीकर भानु नव्हे : यासि बोला ’ : मग तो कवीस्वरबासांसि चर्चा करूं लागला : तवं कवीस्वरबासीं निरुतर करूनि अडिला : ॥ शोधु ॥ मग तया आश्चर्य जालें : ॥ ११९ ॥

**अन्यत्र कथारसावतारणनिषेधीं कवीस्वर भागवतव्याख्या सन्निधी नेमु करणें** : ॥ एकु दीसु गंगेकडे समीपचि कवीस्वरबास बैसले होते : ॥ शोधु : ॥ काहीं वाचीत होते : कवणांप्रति तें नेणिजे : परि संस्कृत व्याख्या करीत होते : तवं तेथ एकेएकु लोकु वेधला : ॥ थोर रसु अवतरविला : अवघें नगर आर्कषिलें : तवं कोण्ही एकी येउनि भटोबासांपसि सांघितलें : भटोबासीं म्हणितलें : ‘ हे काइं जालें या भटोसी : जा गा बोलावा ’ : म्हणौनि बोलावूं पाठवीले : मग तेहीं ते आर्कषिलें : आले : मग भटोबासीं म्हणितलें : ‘ भटो : तुज जरि ऐसें व्येसन तरि मजपुढां श्रीभागवत : गीता म्हणा ’ : कवीस्वरीं मानिलें : मग तैंलागौनि कवीस्वरबासीं भटोबासांपुढां श्रीभागवतरसवृत्ती वाखाणूं आदरीलें : तेणे भटोबासांचें अंतःकरण द्रवे : आणि अवघे चंद्रमये होये : ॥ १२० ॥

**तथा गीताव्याख्यानीं हरीभटां आज्ञा देणें** : ॥ कवीस्वरबास श्रीभागवत वाखाणूं सरले : मग भटोबासांतें म्हणितलें : ‘ भटो आतां गीताव्याख्यान म्हणों ’ : तव भटोबासीं म्हणितलें : ‘ भटो : तूं आतां नको म्हणों : तूं म्हणतासि आणि माझे अंतःकरण अवघे चंद्रमये होताये ’ : तवं कविश्वरबासीं म्हणितलें : ‘ तरि या हरीकरवि म्हणवूं ’ : भटोबासीं मानिलें : मग कवीस्वरबासीं वांकलेया हरिभटांतें म्हणितलें : ‘ हरी आतां गीता तूं वाखाणि ’ :

मग वांकले हरीबासीं गीता वाखाणिली : तेही विद्वांस होते : तयां शब्द नावेक ठसु : रसवृति तोकडि : आइकावेया तैसें गुरुकुल न बैसे : ।। १२१ ।।

**कविस्वरां सौकर्यत्वदर्शनें प्रावर्णविधि सांघणें** :।। : कविस्वरबास रूपें सुंदर होते : संग्रहें सीवणि आंतु घालूनि परावर्ण पांगुरति तवं सावेया बरवे दीसति : तें देखौनि एकु दीसु भटोबासीं म्हणितलें : 'भटो : तू वस्त्र दसीयांचांचि वाइ पांघुर : सौकर्यत्वें दीसतोसि ' : मग कवीस्वरबास सिवणि बाहीरि घालौनि थीगळाचे वस्त्र पांघुरति : अंतरीं थोर मानलें : सुख जालें : ।। १२२ ।।

**माहादाइ वोवीया गायनश्रवणिं रूपैची सीधवाणि म्हणणे** : ।। एकु दीसु महादाइसीं काइसेया प्रकरणावरूनि वोविया गाइलीया तें नेणीजे : । : महादाइसीं म्हणितलें :

**नागदेवाचेया खांदावरि करु : राजा चक्रधरू : बीजें करीं** : ।। १ ।।
**सोनेंसळा सेला : नेसला मालगंठीं : म्हाइया आला भेटी : प्रभूचीये** : ।। २ ।। :

तवं भटोबासी आइकीलें : आणि म्हणितलें : "नाथाची नाथवाणि : आणि रूपैची सिद्धवाणी': यैसे भटोबासीं प्रसंसीलें : ।। १२३ ।।

**वीजनि काळव्यतिरेकें चर्चाकरणीं केशव : पंडितां सिक्षापण** : ।। : एकु दीसु केशव : पंडितमुख्य विजनिं बैसले असति : तेथ कोण कैसें अनुष्ठानि बैसलें आहे : म्हणौनि भटोबास विजनें पडिताळीत आले : तवं पंडित : केसोबास विजनिं बैसोनि सकाळिचि घे-दे म्हणौनि थोरे जिज्ञासा करीत होते : भटोबासांतें आलेयांहीं न देखति : यैसें रसीं पडिले असति : तें देखौनि भटोब्रासां न मनेचि : भटोबासीं म्हणितलें : 'हां गा तुम्हीं सर्वकाळ एकमेका कैसा वादुविवादुचि करीता : हां गा सर्वकाळ जरि चर्चाचि करावी : तरि देवातें केधवां स्मराल ' : यैसे सिक्षापण केलें : ।। शोधु ।। : मग निरूपण केल : आणि जे काळींचें ते काळीं : ऐसें अनुष्ठान सांघितलें : ।। १२४ ।।

**भिक्षुपात्रीं सीतभोजनें मेरुभोजनानुवादु** : एकु दीसु कवणा प्रकरणावरूनि तें नेणिजे : भटोबासीं म्हणितले : "ये मार्गी केली क्रीया काइ वायां जाइल : एकां भक्तीसी कारण होइल : एकां ज्ञाना कारण होइल :

एकां वैराग्या कारण होइल : तें कां ना : या भीक्षुकाचां पात्रीं एक सीत संपादीलेयां मेरु संपादीलेयाचें गोमटें होये : तें केवि ना : गोसावीं दाइंबाप्रति म्हणितलें : ' भोजेया : तुमचां पात्रीं अवज्ञापूर्वक यैसीं च्यारि सीतें टाकूनि घालीति : तयाची थोरी येथौनि सांघों नेणिजे गा ' : यातवं " : यैसें मार्गमाहात्म्य : भोजनमाहात्म्य निरूपीलें : ॥ १२५ ॥

**भटनामश्रवणें ब्राह्मणा अज्ञाननिवृति करणें** : ॥ एकु दीसु भटोबास बैसले असति : जवळि एक ब्राह्मण बैसले असति : तवं कव्हणि भटोबासांतें म्हणितलें : ' भटो हें कैसें : भटो तें कैसें : भटो हें करूं : हें न करूं ' : ऐसें जयां जें प्रयोजन तें भटोबासांतें पुसपुसों करीति : तें आइकौनि ब्राह्मणें म्हणितलें : ' हां जी तुमचे सिष्यवर्ग तुमतें भटो ऐसें म्हणताति : ते हां जी भटो ऐसें कां न म्हणति ' : तवं भटोबासीं म्हणितलें : ' ना हें यांकरवि आम्हीचि म्हणवीतों ' : ' तें कां ना ' : ' जी जी वचनें ईश्वरींचि म्हणिजति : जीवातें म्हणों न येति ' : आणि तें उगेचि राहीले : ॥ १२६ ॥

**पायेवणि निराकर्णि वासनिक प्रत्योत्तरस्वीकार** : ॥ एकु दीसु येकें वासनिकें भटोबासांचे पाये धुतले : आणि पायेवणी घेतलें : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : ' पायेवणि तें देवाचें घेइजे किं गा : आणि उचीष्ट प्रसादु तोही देवाचाचि घेइजे किं गा ' : तेहीं म्हणितलें : ' होये भटो : देवाचेंचि म्हणौनि घेइजत असिजे ' : भटोबास उगेचि राहीले : ॥ १२७ ॥

**विसीष्ट नमस्कारीं आपणयातें धिष्करणें** : ॥ भटोबास आपणेयांसि साष्टांग दंडवत आणि पायांवरि डोइ ठेउनि दंडवत करूं नेदीति : मार्गु करी : परी नीरोध मानीति आणि म्हणति : ' हां गा ऐसीं दंडवतें गोसावीयांचेयां श्रीचरणा कीजेति : मज यैसें न करावें गा ' : यैसें आपणयांते धीष्करीति : ॥ १२८ ॥

**अन्य प्रश्नें स्वनिष्टीं भक्तानुवादु** : ॥ : एकी दीसीं भटोबास बैसले असति : तवं कव्हणि एक इतर दर्शना आले होते : तेहीं भटोबासांतें पुसिलें : ' भटो तुम्हीं काइ ईश्वर ' : भटोबासीं म्हणितलें : ' ना आम्हीं : ईश्वराचे भक्त ' : इतुकेनि ते उगेचि राहीले : ॥ १२९ ॥

**आकाइ नमस्कार–तिरस्कारीं पंडितप्रश्नें वाक्य विरोध स्वीकार :॥:**
एकू दीसु भटोबास बैसले असति: तवं आकाइसे आलीं: दंडवतें घातलीं : आणि दुश्चितपणेंचि भटोबासांचेया पायांवरि माथा ठेवूनि यैसें भावपूर्वक दंडवत केलें : तवं भटोबासि म्हणितलें : 'आकाये मज यैसीं दंडवतें नको करूं : म्हणौनि म्यां तुज येक वेळ वारीलें : दोनि वेळ वारीलें : आणि तूं करीतचि ससि ' : म्हणौनि कोपले : बाहीरी घातलीं : येरी दीसीं माघौतिं आलीं : दंडवतें घातलीं : आणि पंडितबासांपासि जाउनि बैसलि : हळुचि पंडितबासांतें म्हणितलें : "पंडितो धर्म तरि दैवगति : आणि भटां तरि नमस्कारें ये खंति : वीधि करीतां घडत असे अवीधि : तेणें वोखटें जडत असे : तरि पुसा पां भटांतें : 'श्रीचक्रधरारायाचा संबंधु नमस्करूं ये किं नैये " : मग पंडितबासीं भटोबासांतें म्हणितलें : "भटो आकाइसें यैसें म्हणत असति : 'धर्म तरि दैवगति : आणि भटां तरि नमस्कारें ये खंति : वीधि करीतां :॥: तरि आम्हां श्रीचक्रधरारायाचा संबधु नमस्करूं ये :' ॥ : यैसे पुसताति " : मग भटोबासीं म्हणितलें : 'या ' : मग आलीं : भटोबासांसि दंडवत केलें : ॥ १३० ॥

**कटक देमाइसें भेटि वीधांनि केसोबासीं वंकीं इष्टीं योजणें : ॥**
एकवेळ केसोबास कटक देमाइसांसि भेटावेया गेले : भेटि जाली : कटक देमाइसि केसोबासांसि अभ्यागता म्हणितलें : आणि केसोबासां विरहीत वंकीतेंही म्हणितलें : ते देमाइसांचे गुरुभाउ : पूर्वीं नाथोबापासौनि दोघां श्रवण : मग केसोबास आलेयावरि दोघीं केसोबासांसि दंडवतें घातलीं : परि वंकी ते अनेकां व्येसनांचें : राभस्य राहाटीचें : तयांतें गुरुकुळ न भेटे : परि देमाइसें झळंवति : म्हणौनि चोरूनि तयांहीं निमंत्रण दीधलें : मग भोजनाचां अवस्वरीं देमाइसीं केसोबासांतें पुसिलें : ' 'बा केसोबा : वंकीतें पांति बोलावूं ' : केसोबासीं म्हणितलें : 'नको : तो अनेका व्येसनांचा ' : देमाइसें उगीचि राहीलीं : मग केसोबासांसी भितरि ताट केलें : केसोबास बैसले : आणि वंकीतेंहीं बोलाउनि बाहीरि वांसरुवांचें कोठियेतु ठावो करूनि वाढिलें : देमाइसीं भितरि केसोबासां दंडवत घातलें : आणि बाहेरि येउनि वंकीसीही अनुज्ञा दीधलि : आणि आपण लवलवौनि भितरि आलीं : तवं घासु घेतां

समैं वंकीन 'श्रीचक्रधरु' ऐसें उच्चारीले : तें केसोबासि आइकीलें : आणि म्हणितलें : 'येथे गोसावियांचें नाम कोणे उचारीलें' : देमाइसीं म्हणितलें : 'बा निर्भयें द्याल तरि सांघैन' : 'ना सांघा' : "बा भटोबासीं म्हणीतलें : 'सृष्टीमध्यें ईश्वरु दुर्लभु : कां ईश्वरातें चिंती तो दुर्लभु' : म्हणौनि बा मीयां तुम्हा वारीत वंकीतें बोलावीलें' : मग केसोबासीं म्हणितलें : 'भलें केलें हो देमाइसें : आतां जा : तयातें बोलावा' : गेली : बोलाविलें : वंकी सेणेमातिया आंग माखौनि केसोबासां आड पडले : 'बा माझें सकळ उपसाहावे' : केसोबासीं म्हणितलें : 'उपसाहिलें : आतां येथौनि पुढीलाची रेघ आन मागीलाचा अनुतापु : परद्वारियांचां सप्तव्येसनियांचा संसर्गु न करावा : तेयांपासि उभें न ठकावें' : 'हो कां बा' म्हणौनि वंकीं मानिलें : मागौतें दंडवत घातलें : तेव्हेळीं केसोबासीं पांति दीधलि : देमाइसा सुख जालें : मग तैलागौनि वंकीन अवघीं डांढाळें त्येजिलीं :॥ शोधु :। मग तें येउनि केसोबासीं अवघें भटोबासांपुढां सांधितलें :॥ मग एकां दिसां वंकीही आले : भटोबासांपासि भिक्षा केली : अनुसरले : ॥ १३१ ॥

**उज्जनिनिषेधपूर्वकानुसरण निर्वचीं देमाइसां पुनःसंबंधानुवादु :।।**

एकवेळ उजनियेहूनि बंदीजन कटकदेवगिरीसि आले : ते कटक देमाइसासि भेटले : तेहीं देमाइसांपुढां सांघितलें : गोसावियाचें नाम उच्चारूनि म्हणितलें : 'गोसावी उजनिये असति' : मग देमाइसीं मनिं म्हणितलें : 'आता जाइन : भटोबासांपुढां सांघैन : भिक्षा करीन : आणि उजनियेसि जाइन' : म्हणौनि अवघी निर्वंडि करूनि भटोबासांपासि आलीं : भेटि जाली : येतांचि सांघितलें : 'तरि भटो तेथ मीं जाइन' : यावरि भटोबासीं म्हणितलें : 'जाउनि काइ कराल' : तिहीं म्हणितलें : 'कां भटो' : भटोबासीं म्हणितलें: "ना भेटि नाहीं : गोसावी असतां रूपैया गोसावियांतें पुसिलें : 'हां जी गोसावी बीजें करिताति : तरि माघौति कितां दिसां भेटि दीजैल जी' : तवं गोसावी म्हणितलें : 'बाइ आतां येणें भेटि नाहीं : आतां तुम्हां नवेयासि भेटि' : रूपैया म्हणितलें : 'तें कैसें जी' : गोसावी म्हणितलें : 'येथौनि म्हणितलें तें कराल : मग सुखीयां श्रीमंतांचां घरीं पुरुषु होउनि जन्मवीजालः मग बारां वरीखां तुम्हां नवेन भेटि दीजैल' : यैसें गोसावीं निर्वचीलें असें :

तरि तयांसि जें म्हणितले : तेचि आतां असन्निधानिचेयांसि म्हणितलें : श्रीमुखें दीधलें : अथवा अधिकारद्वारें दीधलें : मग तेहीं क्षेपावें : मग तयां नवेन भेटि " : येतुकेनि देमाइसीं मानिलें : दंडवत केलें : ।। १३२ ।।

**तथा अनुसरण** ।। मग देमाइसीं भटोबासांतें प्रार्थीलें : ' भटो आतां मज भिक्षा देया ' : भटोबासीं मानिलें : मग देमाइसें अनुसरलीं : भिक्षा केली : तापसें जालीं : ।। शोधु: ।। अनुसरलीं : आलीं तियेचि काळीं कि आणिका काळीं हें नेणिजे : मग गुरुकुळ तयांतें ' कटककारें देमाइसें ' यैसें म्हणति : ।। १३३ ।।

**तथा उपालंब परीहारार्थ कटका पाठवणें** : ।। देमाइसीं भिक्षा केलेया-वरि तयांचां गावीं थोरि निंदा प्रवर्तली : तें आइकौनि एक दिसीं भटोबासीं म्हणितलें : ' देमाये तूं गावां जाउनि आपणयांतें दावि : जाये : तुझी संबंधीयें निंदा बोलताति ' : तेहीं मानिलें : मग तियें कटका गेली : अवघेयापुढें आपणयांतें दाखवीलें : मग तयाची आचारनिष्ठा देखौनि तेयांसि थोर बुद्धि : शुद्धा बुद्धि उपनली : ।। शोधु : ।। यैसें परीहारपावेतों तेथ होतीं : मग भटोबापासि आली : भटोबासां सुख जालें : ।। १३४ ।।

**तथा भोजनिं आग्रहें कोंमळा रसु निराकरणें** : ।। शोधु : ।। एके दिसीं देमाइसीं भिक्षुकांसि अभ्यागत केलें : अवघें वाढीलें : ।। मग प्रबळ तूप वाढीलें : नेघेति तयां आग्रहो करीति : यैसें भलतेधवां : मग एकु दिसीं भटोबासीं म्हणितलें : ' देमाइये तुवां ऐसें आग्रहें भलतया तूप वाढावें : एकाधेंया कोमळा न खावेया : न पोयावेयाची वासना : तो परतौनि वास पाहील : तेव्हेळीं कोणे मायेचां पोटीं रीगसील ' : आणि तियें भीयाली : ।। शोधु : ।। यैसें भटोबासीं भोजनक्रियेचां ठाइं प्रवेसनिं जरठ कोमल पुरुषांचें तारतम्य सांघितलें : मग तियें तैसें न करीति : ।। १३५ ।।

**तथा भिक्षान्नदर्शनिं उष्ण सीळे म्हणणें** : ।। एकु दिसु देमाइसें भीक्षा करूनि आलीं : झोळी भटोबासांतें दृष्टपूत केली : भटोबासीं झोळी यैसी पाहीली : तवं अर्ध उन : अर्ध सीळें : यैसी भीक्षा आली असे : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : ' देमाये उन वेचि : सीळें ठेवि : सीळें तें आतां सीळें:

तैसें उदयां सीळें' : ॥ शोधु ॥ तीं तैसेंचि केलें : तियें नावेक सोपस्करें होतीं : रीगेना तें जाणौनि म्हणितलें : ॥ १३६ ॥

**रेमाइसां अनुसरणि 'कुमरें' नांव ठेवणें** : ॥ रेमाइसें तियें भटोबासांचीं सीष्यें : तयांचि माहेरीचीं रामपुरीएसि होतीं : आणि सासुरीचि खेडींचि होती : एकु दीसु तियें भ्रतारें मारीलीं : तयांचेया भ्रतारा नृसिंहाचीं भक्ती: तवं तियेंचि दीं तो रात्रीं स्वप्ना आला : तेणें म्हणितलें : 'हां रे तुवां यांतें कैसें मारीलें : यें राजकुमरें किं रे : आतां तूं एक संवत्सरु जीसील मां यें माहात्मीं होतील' : मग उदयांचि उठौनि तेणे आपुलेयां मायबापापुढां सांघितलें : मग तो एकचि वरीष जियाला : मग रेमाइसें रामपुरीयेसि आलीं : तेथौनि भटोबासांपासि आलीं : भिक्षा केली : मग स्वप्नपर्यंत अवघें सांघीतलें : तें आइकौनि भटौबासीं अवघेयांते म्हणितलें : "यांतें 'कुमरें रेमाइसें' म्हणा गा" : मग तैलागौनि तयांतें 'कुमरें रेमाइसें' यैसें म्हणति : ॥ १३७ ॥

**तथा उद्ग्रहणिकापूर्वक वांकुडे दाइंभट योग्य करूनि भटोबासीं भिक्षा देणें** : ॥ एकु दिसु कुमरें रेमाइसें तडसमुखांसि भिक्षे गेली : तवं भिक्षा करीतां वीद्वांसां वांकुडे दाइंभटाचेया घरा गेलीं : तेथ चाटे पढत होते : तेहीं रेमाइसांतें म्हणितलें : 'माहात्मेहो हे पेंडि वासुरुवांसि घाला : मग आम्हीं तुम्हांसि भिक्षा घालूनि : एरवीं आम्हां घालुं नैये' : तिहीं म्हणितलें : 'कां घालूं नैये' : चाटां म्हणितलें 'ना आमुचा उपदेसु तुम्हां नाहीं' : तवं रेमाइसीं म्हणितलें : 'सिवणियांसि पाणी घालीतां तेयांसि काइ तुमचा उपदेसु असे' : तवं तेहीं म्हणितलें : 'यैसीं तुम्ही तरि आमुचेया द्वारां का येतां' : रेमाइसीं म्हणितलें : "जया देवाचा हा मार्गु तेणें म्हणितलें : 'अन्नाचेयां चाडां तरि ब्राह्मणाचेया घरा जावें : वाहानाचीया चाडा तरि चर्मकारांचीया जावें" : येतुलेनि ते उगेचि राहीले : तेथ वांकुडे दाइंबास बैसले होते : तेहीं अवघे आइकीलें : मग रेमाइसें भिक्षा करूनि गंगेसि आलीं : अवघा विधि सारीला : तवं इतुका मार्नि वांकुडे दाइंभट आले : बैसले : रेमाइसासि पुसिलें : 'हां आइ हा मार्गु कवणा देवाचा' : रेमाइसीं म्हणितलें : 'गा परु परमेश्वरु तया देवाचा' : तवं वांकुडीं म्हणितलें : 'तो नित्य नैमित्यक कर्म करीतां काइ न पविजे' :

रेमाइसीं म्हणितलें : ' नित्य : नैमित्यकें : काम्यें : निषिधें : यैसें चतुर्विध कर्म : तयांतु नित्य : नैमित्यकें कर्मे तियें प्रतिदिनीचेया प्रतिवाया परीहारार्था गेलीं : एकें काम्यें तियें फळासि गेलीं : निषिधें तियें निरयासि गेलीं : तरि ईश्वरीं कवण कर्म अर्पिलें हें सांगा ' : आणि ते उगेचि राहीले : मग म्हणितलें : ' साच : ईश्वरीं अर्पे ऐसें कर्म न देखों : यैसें प्रत्यया आलें ' : मग रेमाइसातें म्हणितलें : ' तरि आइ तो काइसेनि पावीजे : तुम्ही मज सांघावें ' : तवं रेमाइसीं म्हणितलें : ' तें आम्हीं नेणों : तें भटोबास जाणेति ' : तीं म्हणितलें : ' ते कें असति ' : ' ना ते निंबां असति ' : ' तरि आतां कणव करूनि तुम्हीचि सांघा ' : म्हणौनि दंडवत करूनि घरा घेउनि गेले : मग तयां निर्धारु देखौनि दिसां चौं रेमाइसीं तयांसि धर्मु सांघीतला : मग भटोबासांपासि घेउनि आलीं : भेटि जाली : अवघे मागील सांघितलें : मग तेहीं भीक्षा केली : ॥ १३८ ॥

**अटनिं गदोनायेक दर्शनाप्रकासीं म्हाइंभटीं अपरीतोषु करणें : ॥**

एकु दीसु म्हाइंभट अटना गेले होते : ते एकी ठाइं विजनिं बैसले असति : तवं मार्गीं जातां गदोनायकीं दुरूनि देखीलें : आणि घोडेयावरूनि उतरले : म्हाइंभटांसि साष्टांग दंडवत घातलें : पुसीलें : ' तुम्ही कोण महात्मे ' : तवं म्हाइंभट मौन्य न भंगीतीचि : आणि गदोनायेक दंडवत करूनि निगाले : म्हाइंभट गदोनायकांतें नोळखतिचि : तवं मागीलाकडूनि तयांचा बडुवा येतु देखीला : मग साउमे जाउनि तयांतें पुसीलें : ' हां हो हे कोण ' : तेणें म्हणितलें : ' हे गदो भांडारी ' : इतुलेनि म्हाइंभटासि अपरीतोषु वाटला : मग म्हणों लागले : ' आहा कटकटा : मी पापीया बोलता कां तरि यांतें गोसावियांचीया लीळा पुसतां ' : यावरि म्हाइंभटीं प्रस्तावीक वाक्य म्हणितलें : " अपरीक्ष्य न कर्तव्यं कर्तव्यं सुपरीक्षितम् ॥ पश्चाद्भवति संतापो ब्राह्मणो नकुलो यथा " ॥ १ ॥ यैसें म्हणौनि राहीले : ॥ १३९ ॥

**तथा ईश्वरलीळा-श्रवणें प्रसादोदकपूर्वक खेइभट भोजनस्वीकारु : ॥**

तैसेंचि म्हाइंभट अटनवीशेषें खेइभटांचेया गावां गेले : तेथ तयांसि भेटि जाली : म्हाइंभटां हेतु : जें गोसावियांचीया लीळा शोधावीया : तवं खेइभट कृषी करावेया जाति : तयांसरीसे म्हाइंभटही जाति : खेइभट कृषीकर्म करीतिः आणि म्हाइंभट तयां मागां मागां गोसावियांचीया लीळा पुसति : खेइभट

सांघति : तिया म्हाइंभट नमस्करूनि घेति: मग भिक्षा करूनि जेवीति : तयांचें काही नेघेति : एकु दीसि म्हाइंभटीं म्हणितलें : 'खेइभटो तुम्हापासि प्रसादाचि रोटी असे ते मज धूनि पाणि पाजा' : तवं तेहीं म्हणितलें : 'आमचें काहीं घेयाल तरि पाजूनि' : मग म्हाइंभटीं म्हणितलें : 'घेइन' : मग तीं प्रसादाचि रोटी धूनि म्हाइंभटा उदक पाजीलें : मग म्हाइंभटीं तयांचें काहीं अंगीकरीलें : मग निगाले : भटोबासांपासि आले : ।। १४० ।।

**म्हाइंभटा लीळाश्रवणें भटीं लीळाशोधनानुज्ञा** : ।। मग म्हाइंभटीं भटोबासांपुढां अवघें सांघीतलें : गोसावीयांचीया लीळा सोधूनि आणिलीया : तिया संवादिलींया : होये तें भटोबास मानिति : नव्हें तेथ म्हणति : 'हे श्रीमुखीचे शब्द नव्हेति : हे होति' : मग म्हाइंभटातें म्हणितलें : 'उपाध्यांचिये अनुभवीचीया तिया उपाध्यांतें पुसावीया : नाथोचीये अनुभवीचीया तिया नाथोतें पुसावीया : साधांचीये अनुभवीचीया तिया साधांतें पुसावीया : यैसीयाचि परी जयाचीयें अनुभवीचीया तिया तयातेंचि पुसावीया': यैसें भटोबासीं भटातें विहीलें : मग म्हाइंभटबासीं तैसेंचि करूनि मागीलाचि परी भटोबासीं संवादिलीया : मग उतरार्ध–पूर्वार्ध दोनि विभाग केले : ।।१४१।

**तथा सारंगपंडित–क्षीरभोजन–परीत्यजर्नि अनुचितानुवादु** : ।। : एक वेळ म्हाइंभट लीळा शोधीत प्रतिष्ठानासि गेले : सारंगपंडितांसि भेटले : तेहीं अभ्यागता प्रार्थु आदरीलें : तवं म्हाइंभटीं म्हणितलें : 'आधीं मज गोसावीयांचीया लीळा सांघा : मग घेइन' : तीं आधीं गोसावियांचिया लीळा सांघितलीया : तवं उमाइसीं क्षीरप्राधान्य अवघें निफजवीलें : म्हाइंभटासि ताट केलें: अनुज्ञासमै म्हाइंभटीं म्हणितलें : 'गोसावियांचेया प्रसादाचा लाडु घालाल तरि जेवीन': मग उमाइसीं प्रसादाचा लाडु चूर करूनि क्षीरीवरि घातला : मग म्हाइंभटीं लाडुवाचिया सेवा वेंचूं वेचूं खादलीया : वरील क्षीर घांस दोनि जेवीले : आणि वमनाचेनि मीसें उठीले : भिक्षा करूनि गंगेसि जेवीले : मग भटोबांसांसि भेटावेया आले : अवघे सांघितलें : मग भटोबासीं म्हणितलें : 'आहा म्हाइंभटो अनुचित केलें:' ।। १४२।।

**म्हाइंभट अद्वैतसमर्थनप्रश्नें दैवाद्यव्यापारु कथन** :।। १४३ ।।

**तथा विपरीतानुष्ठानव्याख्यानकर्णि भटीं 'गोसावियांतें पुसों विसरलां म्हणणें** :।।: इया दोन्हीं स्मृती कविबासाचीया बासना :।। १४४ ।।:

**भद्रकार कामाइसां भेटि : श्रवण करणें** :॥: भद्रकारें कामाइसें तियें रामदेवो रायाचीं राणी : तयांचा व्यापारु आनोबासांसि होता : तियें दीसवडीं पुराण आइकति : आनोबास पुराणिकांसि आक्षेपु लावीति : तैं आनोबा वासनिक : तैं तयां नावं गोपाळपंडित : तयांचें आक्षेप पुराणिकासि न लोटेति : आणि तयां चमत्कारु होये : मग गोपाळपंडितातें पुसति : 'हें कैसें पंडितो': आनोबास आक्षेपु फेडूनि सांघेति : तें कामाइसाचीया प्रत्या ये : आणि म्हणति : 'पंडितो हें तुम्हीं केवि जाणा:' ते म्हणेति : 'ना आम्हां गुरुमुखः असे :' मग एकु दी पुसीलें : 'तुमचे गुरु कवणे ठाइं असतिः' तीं म्हणितलें : 'ना ते मुदगलाघासी निंबां असति': मग एकु दिसु कामाइसीं रायातें पुसीलें: 'मुदगल वांझांसि पुत्र दे : तरि तेथ मीं जाउं ': रायें म्हणितलें: 'जा': मग कामाइसीं आइत करूनि गोपाळपंडितातें म्हणितलें : 'पंडितो तुम्हीं भटोबासांसि माझीये निरउणुकेचें एक लिखितु द्या :' मग गोपाळपंडितीं भावपूर्वक पत्र दिधलें: मग तियें निंबेयासि आलीं : लीखीत भटोबासांच ां हातीं दिधलें : भटोबासीं पाहीलें : मग कामाइसां श्रवण केले : दिस दोनिच्यारि होतीं : मग निगालीं : निगतां म्हणितलें: 'भटो मी मागौती येइन ' : भटोबासीं म्हणितलें : 'न पुसत नको या : रावो पाठवील तरि या येऱ्हवीं आम्हां तुम्हां लीखीतें भेटि': इतुलेनि तियें निगालीं : ॥ १४५॥

**तथा आगमनीं विरोदी प्रकासणें** : ॥ रामदेव तो एके मार्गीचा उपदेशीया जाला : तयाउपरि कामाइसीं रायातें म्हणितलें: 'तरि आम्हीं वेधवंती नामदेवभट गुरु करूं': रायें म्हणितलें : 'करा': तेव्हेळीं मागौतीं निंबेयासि आलीं : तवं भटोबास मढीं नव्हते : विजना गेले होते : तैसीचि तेथ आलीं : भटोबासांसि भेटि जाली : बैसली : तवं पाइं सोनेयांचि वीरोदी होती ते वाटे पडली : पुढां बैसलीं: तवं आंगोळीये वीरोदी न देखतीचि : आणि तेचि आंगोळीं हातीं धरीली : ते भटोबासीं देखीलें : आणि म्हणितलें : 'काइ वीरोदी पाडिली :' तेहीं म्हणितलें : 'होयः जावों द्याः' भटोबासीं म्हणितलें: 'जावी कां : जा गणेसापासि गाडेयाचीये चाकारींये आंतु पडिली असे : आपुला विस्वासि पाठवा : घेउनि येइल' : तेंहीं आपला विस्वासि पाठवीला: तवं ते सांघीतलीं ते ठाइं तैसीचि होती : कामाइसीं म्हणितलें : 'भटोः

तुम्ही हें केवि जाणा: ' : भटोबासीं म्हणितलें : ' मी श्रीचक्रधराचेनि प्रसादें जाणें:' कामाइसां थोर आश्चर्य जालें : मग तयांसहीत भटोबास बिढारासि आले : ।। १४६ ।।

**तथा स्मरणप्रश्नें प्रतिष्ठान नाम स्मरणिये निरूपण :** ।। हे आदि कवीबास : याचि न स्मृति येचि : ।। १४७ ।।

**तथा भिक्षा निराकरण** : ।। : एकु दिसु कामाइसीं भटोबासांतें पुसिलें: 'भटो मीं भिक्षा करू: ' भटोबासीं म्हणितलें: ' तुम्हां भिक्षा करूं नैये:' : 'तें कां ना:' ' गोसावीं आम्हां जेतुका देसु वीहीला तेतुका रायाचा : आणि अविहीता देशा तरि आम्हां जावो नैये : म्हणौनि तुम्हांकरवि भीक्षा करउं नैये:' कामाइसें उगींचि राहीली : ।। १४८ ।।

**तथा अग्निप्रवेसि आदिभावो निराकरण** : ।। याउपरि मागौतें कामाइसीं म्हणितलें: ' भटो रावो मरैल: आणि मातें आगीआंतु घालीतील:' भटोबासीं म्हणितलें : 'तरि तुम्ही आपुला आदिभावो चुकवा:' 'मग ते बळाधिकारें घालीतील': 'तरि तुम्हां आत्महत्येचें नरक नाहीं:' इतुलेनि ते उगींचि राहिलीं : मग कांहीं पदार्थ आणिला होता : तो भटोबासांसि संपादिला मग आज्ञा घेंउनि गावां गेलीं : ।। मग कितीका दिसां रावो निवर्तला : मग तेहीं तैसेंचि केलें : बहुतापरी आपुला आदिभावो चुकवीला : परी येरीं बळाधिकारुचि केला : ।। १४९ ।।

**तथा अग्नीप्रवेसु-श्रवणे ईश्वरदान निर्वचु : ।।** मग तें अवघें भटोबासीं आइकलें : ।। शोधु : । पांचास्या गुरुकुळासि थोर दुख जालें : ।। तयांतु एकीं भटोबासांतें पुसिलें : 'भटो : कामाइसें यैसीं तळमळीतें सरलीं : तरि तयांसि काइ जालें ' : यावरि भटोबासीं धर्मवार्ता केली : भटोबासीं म्हणितलें : वेधु आणि बोधु : अनुसरणाची तळमळ : ऐसें असैल तरि देहविद्या होइल : अउनि अनुसरण प्रतीबंधलें तरि ईश्वरु होइल : ।। ना वेध : बोधु आहे : आणि अनुसरणाची तळमळ नाहीं : तरि तया सृष्टी सून्य जाइल : परि बोधाचें साध्य होइल : आणि बोधु राखीला तयाचा तोखु उरैल : ।। बोधु नाहीं आणि अनुसरणाची तळमळ असे : तरि पुत्र होउनि जन्मति : मग ईश्वर ज्ञान देइल : तरि थोरें साहचें उद्धरीति ' : यैसें भटोबासीं कामाइसेवरूनि निर्वचीलें : ।। १५० ।।

**पाठकसुतागमनीं पाठकज्ञान करणें** : ।। एकु वेळ सेगावींचां पाठकीं भटांपासि भिक्षा केली : मग विदेशा अटना गेले : यैसे मेघंकर प्रांता-येउतें : तवं सेगावींचां अधिकारी आइकीलें : जें पाठकीं भिक्षा केली : तया-वरि तयांचेया पुत्रांसि तयांची वृत्ति न पाळीतीचि : तेहीं त्यातें म्हणितलें : 'जाये त्यातें घेउनि ये : मग पाळूनि' : ते 'हो कां' म्हणौनि निंब्रेयासि आले : अवघी व्येवस्था भटोबासांपासीं सांघीतली : 'तरि भटो तयांतें पाठवावें' : भटोबासीं म्हणितलें : 'जा ते लोणारीं अनुष्ठान करीत असती' : तैसेंचि ते लोणारा आले : भेटि जाली : अवघें सांघितलें : 'तरि पाठको तो ठाव-वेऱ्हीं चाला' : तवं पाठकीं म्हणितलें : 'ते तुम्हां पाळितु अथवा न पाळितु : परि आम्हां संबंधा येउं नये : जा' : मग तो गावां गेला : अवघें अधिकार्या-पुढें सांघितलें : 'ते न येतिचि' : मग अधिकारीं म्हणितलें : 'होति निर्धाराचे : ते येते तरि तुम्हां वृत्ति न पाळितों : आतां वीशेषें पाळूनि' : मग त्यांची वृत्ति तेहीं पाळीलीं : ।। १५१ ।।

**अनुचित द्रव्यस्वीकारें दींडोरी गोंदोबा सिक्षापण :** ।। मग केतुलेनि एकें काळें दींडोरी गोंदोबायें भटोबासापासि भिक्षा केलीं : यैसां एकु दीसु तयांचीं मातापीता सरलीं : यैसे तेहीं आइकीलें : आणि बाहीरवाहीरीचि गोंदोबा स्वग्रांमा गेले : तेथ भावापासौनि आपुला वांटां द्रव्य घेतलें : आणि भटोबासांचीये भेटि आले : भटोबास क्षेम नेदीतीचि : भटोबासीं म्हणितलें : 'हां गा वमना कैसा हात वोडवीला : मळवत् सांडीलें : आणि मागौतें तेंचि हातीं घेतले' : म्हणौनि भटोबासीं सिक्षापण केलें : गुरुभांवडींहीं अवघां सिक्षापण केलें : मग तीं तें मागुतें जाउनि सांडिलें : मग स्वीकरिलें : ।। १५२ ।।

**ब्राह्मणा प्रश्नें सितोदकानुवादु** : ।। एकु दिसु सियाळिये रितु : भटो-बासांसि सकाळींचे भोजन जाले : बैसले असति : भटोबासांपुढां सगडी असे : यैसे हात सेकीत असेति : भटोबासांचीये हातीं संबंधाची मुदी होती : तिये मुदीयेसि एक सीत लागलें होतें : तवं ब्राह्मण एकु दर्शनासि आला : भटो-बासां नमस्कारू करूनि बैसला : तवं तेणें तें सीत देखीलें : आणि म्हणितलें : 'भटो हें काइं सीत' : भटोबासीं म्हणितलें : 'होये : सीत लागे तेव्हेळीं

सीत : उदक लागे तेव्हेळीं उदक ' : मग हातावरि उदक घेतलें : तो उगाचि राहीला : ॥ १५३ ॥

**सृष्टिनिर्वचीं शास्त्रअभ्यासु कथन** : ॥ कव्हणि एकीं नेणतां भटोबासांसि प्रश्नु केला : ' भटो हे सृष्टि नित्य कीं अनित्य ' : भटोबासीं म्हणितलें : ' अनित्य ' : येतुलेनि ते उगेचि राहीले : यावरि भटोबासीं म्हणितलें : ' आत्महीताकारणें हें शास्त्र अभ्यासीति ना : तरि हे सृष्टि कैसी रचली आहे : यैसे जाणावेयाकारणे तऱ्ही अभ्यासित कां : परि तेहीं नाहीं ' : ॥ १५४ ॥

**कटककारा भानुभटां अनुसरण** : ॥ भानुभट ते कटकदेवगिरीचे : तयांसि भटोबासांपासौनि श्रवण : धाकुटीयेचि दशेचे होते : ते एकु दीं भटोबासांपासि आले : भिक्षा केली : भटोबासांपासि असती : सेवादास्य करीति : भटोबास थोर स्नेहो करीति : तयांते ' भानु ' यैसें म्हणति : ॥१५५॥

**तथा प्रसादग्रंथिकाकरणि व्यक्तिभंगा भावो कथन** : ॥ एकु दिसु भानुभटीं जुनेया माचेयाचीया दोनि गांठिया केलीया : एकि पिंपळीयांचीये आकृतीची : एकि वाटोळेयां मणियांची : यैसीया दोनि : आणि दोनि बरवे वेढे केले : तेयांसि सोनयांचीया कडीया घातलीया : मग आणूनि भटोबासांचां हातीं दीधलीया : भटोबासीं नमस्करीलीया : आणि म्हणितलें: ' भानु गांठीया बरवीया जालीया : परि व्यक्तिभंगाचें काइ होइल तें मी नेणें ' : यावरि भटोबासीं म्हणितलें : ' प्रसादु जेणें जो दीधला : तो तैसाचि नमस्करीजे : तो प्रसाद उकलीजे तरि प्रसन्नता जाये : प्रसादत्व जाये : मग संबंधु उरे ' : यैसें व्यक्तिभंगाचें दूषण दाउनि भटोबासीं निरूपण केलें : भानुभटीं नमस्करूनि घेतलें : मग भानुभटीं पींपळीयाची गांठी भटोबासांचां गळां घातली : वेढे भटोबासांचां कानीं घातले : दुसरी गांठी ते साधाचां गळां घातली : आणि दंडवत घातलें : ॥ १५६ ॥

**तथा पोफळ फोडवणें** : ॥ एक वेळ भटोबास निंबाहूनि कवणा गावां गेले होते तें नेणिजे : मार्गी जातां एकि ठाइं जेवीले : सरीसे भानुभट असति : भटोबासीं म्हणितलें : ' भानु हें पोफळ फोडि ' : तिहीं घेतलें :

पाहातातित तवं दगड नाहीं : भानुभटीं म्हणितलें : 'भटो दगड नाहीं : काइसेन फोडूं' : भटोबासीं म्हणितलें : 'दांतें फोडि' : 'भटो दांते कैसें फोडूं : उसीटें होइल' : भटोबासीं म्हणितलें : 'सेवेसि उसीटा भावो नाहीं' : ॥ मग तीं फोडीलें : भटोबासीं मुखसुधि घेतली ॥ १५७ ॥

**तथा बुझावणिये 'पोफळ–फोडणा' म्हणणें** : ॥ एक वेळ भटोबास भानुभटावरि कोपले : तयातें म्हणितलें : 'भानु तूं जाये' : तवं तिहीं म्हणितलें : 'माझे सोनेयाचे वेढे द्या : मां जाइन' : तवं भटोबासी म्हणितलें: 'घे' : म्हणौनि कानु वोढविला : तिहीं काढीले : घेतले : मग गावां कटकदेवगीरीसि गेले : तेथ होते : एकु दीसु भटोबास तेथ गेले : भटोबासीं भानुभटातें कवळीये धरीलें : आणि म्हणितलें : 'भानु तूं माझा **पोफळ-फोडणा** कीं गा' : यैसें बुझाउनि घेउनि आले : परि ते न ऱ्हांतिचि : मागौते गेले : ॥ १५८ ॥

**झोळीये भोजनदर्शनीं केसोबासि माहात्मा सिक्षापणें** : ॥ गंगे एक माहात्मे झोळिये भोजन करीत होते : तिकडे केसोबास आले होते : तेहीं देखीलें : आणि केसोबास बीढारा आले : तवं मागीलाकडूनि तेही आलें : मग भटोबासां देखताचि केसोबासीं म्हणितलें : 'हां हो तुम्ही झोळियेसि कैसे जेविलेति' : तवं तीं म्हणितलें : 'मज काइ कोण्ही देखीलें' : तवं केसोबासीं म्हणितलें 'म्यां कैसें देखीलें : यैसेंचि आणिक देखतील : तेव्हेळि मार्गा दूषण ठेवीतील : आजिलागौनि झोळिये कोण्हीं जेवी तयासि भटोबासांची आण' : यैसें केसोबास कोपले : यावरि भटोबासीं म्हणितलें : 'अवघें अन्न पात्रीं घालूनि भोजन करावें गा : परि झोळिये ना' : मग कोण्ही न जेवीति : ॥ १५९ ॥

**तथा कदर्यशाकनिषेधीं भटोबासांची आण घालणें** : ॥ एकु दिसु गौराइसीं बरवे कांदे रांधीले : मग भटोबासांचिये पांतीं अवघेयां वाढिले : केशव : पंडित-मुख्य अवघे बैसले : तवं केसोबासीं यैसें पाहूनि म्हणितलें : 'हे काइ रांधीलें' : गौराइसीं म्हणितलें : 'हे कांदे' : केसोबासीं म्हणितलें : 'हें न रांधावें : आजिलागौनि रांधा तरि भटोबासांची आण' : यैसे केसोबासीं भटोबासांदेखत वारीलें : मग तैलागौनि न रांधीति : ॥ १६० ॥

**अन्य वार्ताश्रवणें रंभाइये दवडणें**:।। एकु दिसु भटोबास बैसले असति : तव रंभाइसें काइ नेणों : कवणेसीं कटकट करीत होतीं : तें भटोबासीं आइकीले : आणि म्हणितलें : 'हां वो रंभाइ : तूं अखंड कटकट करीतेसि : तूं जाये ': म्हणौनि दवडीलीं : सिवीया दीधलीया : यैसे कोपले: मग तियें विजना गेलीं : विजन केलें : माघौति वेळेसि आली : भटोबासां दंडवत केलें : ।।१६१।।

**तथा उचिष्टाज्ञाकरणिं मी तियेचा धर्मु म्हणणे** : ।। मग भटोबास जेउं बैसले : पांति जाली : जेवीले : आंचवले : जेवीतां उचिष्ट उरलें तें गौराइसांतें म्हणितलें : 'गौराये धरि : हें इतुके उचिष्ट रंभायेकारणें ठेवि': गौराइसीं म्हणितले : 'भटो : ते तुम्ही दवडीली कीं' : भटोबासीं म्हणितलें : 'तऱ्हीं वोहटळिची गोटि वोहटळां येइल कीं वो : जरि मी तीएचा धर्मु : तरि माझें मजपासि येइल कीं ' : तवं तियें विजनिहूनि आलीं : भटोबासांसि दंडवत केलें : भटोबासीं म्हणितलें : 'रंभे जाये : म्यां उसिटें ठेविलें आहे तें घे ' : 'हो कां ' : मग गेलीं : घेतले : जेवीलीं : ।। १६२ ।।

**नाइकबाइया आग्रहीं माहादाइसीं श्रवण करणें** : ।। एकु दिसु माहादाइसें नौगावा गेलि : तवं तेथचि अधिकार्ये नाइकबाइ : एकु दिसु तयांसि माहादाइसांचें दर्शन जालें : तीं माहादाइसांतें म्हणितलें : 'आइ पींपळगावीं श्रीचांगदेवोराउळ राज्य करीत होते : तैं म्या गोसावियातें झळकतां देखीलें : तरि ते कैसे ईश्वरु : तें मज सांघावें ' : येसा आग्रहो घेतला : मग माहादाइसीं तयांसि श्रवण केलें : तयां वोधु जाला : ।। १६३ ।।

**तथा भिक्षा देणें** : ।। मग केतुकेयां एकां दिसां तेहीं भिक्षा केली : माहादाइसांपासि अनुसरलीं : ।। १६४ ।।

**तथा वियोगपूर्वक पदें महादाइसीं आइकणें** : ।। एकू दिसीं नाइकबाइयें अप्राप्तिपरें पदें केलीं : आणि महादाइसापुढां म्हणितलीं : महादाइसें तोखलीं:।। तियें पदें यैसी :

**एकी सांघे एकीप्रति : आइक वो कृष्णाची वेधशक्ती : ।। तया रूपाची झळकली अभिव्यक्ती : तिया मनोवृति : भ्रमत असे : ।। पैं चमत्कारु मज**

अंतःकरणा : जेहीं अनुभवीला कृष्णराणा : त्याते कैसे वाचे प्राण : त्या तत्क्षेणा न निगतीचि : ।। १ ।। ध्रुवपद : ।।

विपरीत वेधले माझें मन : सखी ये स्वप्नीचें दर्शन : तैंलागौनि दिस गमेना : जन्म मी यैसें गमीत असे : ।। म्हणसी असे दृष्टीची प्रीति : अभिळासीं असे अधिक रती : तरि हा अर्थु न धरी चित्तीं : येणें तो जीवपति न पविजे : ।। म्हणसि पद पढीये निर्वाण : तरि हेंही ना संसी तुझीचि आणः परि तुज वेधले अंतःकरण : हें तुजविण कवण जाणे : ।। २ ।।

नाना तपें व्रतदानें : येमनेम पुण्यसाधनें : वेदा आगमें श्रुती पुराणें : तो कृष्ण काइसेनि न पविजे : ।। तयालागीं कवणा रीगों सरण : विनतीये धरूं कवणाचे चरण : कवण राखैल संतप्त हे प्राणः तो कृष्णराणा मेळउनी : ।। ३ ।।

विपरीत हें प्रेमाचे पीसें : वेधलीं नेणौनि कैसीं मानसें : दुःष्प्राप्त जो सिद्धा सायासें : तया मी कैसें देखों इच्छी ।। सेवा ना श्रद्धा भावो ना भक्ति : खांवणि नाहीं चित्तवृती : आता तो जीवपति : केवि पावे : ।। ४ ।।

यैसें पुण्य न देखों आन : जेणें देखिजति तयाचे चरण : जरि तोचि कृपा करी आपण : तरि दर्शन लाहिजैल : ।। हे कैं पुरती मनोरथ : जऱ्ही जाले जीवा थोर आरतः जें रूप अव्यक्त अनंत : तें प्रेमहीना मज प्राप्त : केवि होये ।। ५ ।।

प्रकृतीं लागलें हे पापीये मन : एकांती करूं म्हणे तयाचें ध्यान : तवं हे दाखवी आनेंआन : तेणें माझें मन भ्रमताये : ।। परि दृष्टी दिसताये एकी खूण : जें तोचि हा होये यादवराणा : अति सुजाणा जाणविलें : ।। ६ ।।

आतां असो तयें सकळै बोलणीं : माझी सखी तेचि निर्वाणी : जिया जाणवीला श्रीचक्रपाणी : तियेवीण आन कव्हणि न देखों वो : ।। आतां नमो त्या यादवतिलका : मी दैवेंहीन माजि सकळिकां : परि तुज आठवण जाली ज्या आणिका : त्यांतु घालौनि राखैं मज : ।। ७ ।।

यैसी पदें गाइलीं : एकी वासना : श्रवणाउपरि केलीं : मग अनुसरली : ।। १६५ ।।

**माहादाइसीं भिक्षुकाचारु सोधूनि बाइयां सिक्षापणे** :॥ भिक्षुकें विजना जाति : विजनिं बैसति : आणि महादाइसें जाउनि अवघेयांचीं वीजनें सोधीति : जो दादा जे बाइ जेथ बैसलीं असति : तेथ तेथ तयां चुकि सांघति : सावधां करीति : येकमेकांचे सांघातु सोधिति : यैसे निच करीतां एकु दी एकि बाइया वीजन करूनि बिढारा आलीया : मागीलाकडूनि महादाइसें तेथ गेलीं : तवं तेथ कुहीरीयांचीया बीयां आणि चींधीया ऐसें पडीलें असे : ते देखौनि महादाइसांसि न मनेचि : बिढारा आलीं : आणि भटोबासांदेखत तयां सिक्षापिलें : बाइं दंडवत करूनि मानिलें : ॥ १६६ ॥

**तथा 'रुक्मिणिसैंवर' गायेनीं बाइयां अव्हेरणें** : ॥ महादाइसें अटणा गेली होतीं : तयांपुढां एकी बाइया अटणि होतीया : तेहीं रात्रीं वोसरीयेवरि 'रुक्मिणिसैंवर' गाइलें : सकाळि निगालीया : तवं एरी दीं : तया निद्रास्थाना महादाइसें आली : घरींचां म्हणितलें : 'आइ काही गीत गा कां' : तवं महादाइसीं म्हणितलें : 'आइ आम्हीं गीत नेणों' : तवं तीं म्हणितलें : 'कालि एकें आइसें आलीं : तेहीं कैसे बरवें गीत गाइलें' : तें महादाइसीं आइकीलें : आणि न मनेचि : मग पुढां तिया महादाइसांसि भेटलीया : तवं महादाइसें संभाषण न करीतिचि : विभागु केला : ॥१६७॥

**म्हातारी धर्मरक्षणानुवादें भटीं बाइया सिक्षापणें** : ॥ महादाइसें तयां बाइयां न भेटतीचि यैसे भटोबासीं आइकीलें : आणि तोखौनि म्हणितलें : 'म्हातारी माझेया धर्मासि रक्षण गा' : मग केतुलेनि काळें या बाइया आलीया : तिया भटोबासीं सिक्षापिलीया : मग तैंलागौनि कव्हणि कोठें काहीं गाति ना : ॥ १६८ ॥

**अटनिं वीजनप्रसंगें म्हाइंभटा महादाइसीं सिक्षापणे** : ॥ महादाइसें अटना गेलीं होतीं : आणि म्हाइंभटही गेले होते : गावां एकी म्हाइंभटातें आइकौनि महादाइसें भेटावेया आलीं : उचितें वीजनें पाहिलीं : तवं तेथ म्हाइंभट नव्हते : ते एकी मळां होते : तेथ भेटी जाली : अवघी क्रीया जाली : धर्मवार्ताप्रसंगें महादाइसीं म्हणितलें : 'ईश्वरविरह्या पुरुषाचीं यें तवं वीजनें नव्हति : यें सलागां पुरुषांची वीजनें' : यैसें धर्मद्वारें महादाइसीं दाखवीलें : तें म्हाइंभटीं मानिलें : थोर सुख जालें :॥ १६९ ॥

**गळितफळानुवादु** : ।। एक वेळ कोण्हा एका प्रस्तावेयावरि भटोबासीं म्हणितलें : 'ब्रह्मविद्येचा उपदेशिया साधन चरितार्थ करी तरि ईश्वरप्राप्ति होये : ना गळीत होये तरि मुख्य देवतेचें फळ होयें :' यैसें भटोबासीं अनुवादीलें : ।। १७० ।।

**बाइयां शब्दार्थ घोकवणें** : ।। एकु दिसु भटोबासीं म्हणितलें : 'बाइयां व्याख्यान न धरे : शब्द शब्दार्थ सर्वेचि घोकवा:' ।। १७१ ।।

**म्हाइंभटीं ब्राह्मणा प्रत्योतर देणें** : ।। म्हाइंभट एकी ठाइं पोथी वाचीत होते : तवं तेथ एक विद्वांस आला : तेणें उभया ठाकौनि एकु दोनि शब्द आइकीले : आणि म्हणितलें: 'अबद्ध अबद्ध अबद्धः' यैसी त्रीसुधी :।: म्हाइंभटीं यैसें पाहूनि म्हणितलें: 'तोंड अबद्ध तरि वाचिजाये : पोथी अबद्ध तरि फाडिजाये :' आणि तो क्षोभला : ।। १७२ ।।

**तथा शूद्रा 'शुभं नास्ति' श्रवणें : ब्राह्मणाप्रति वाक्य देणें** : ।। गावीं एकी म्हाइंभट भिक्षा करूनि नदी उदका गेले: वाळुवंटि विहीरां उदक भरीत होते : तेथ विद्वांस एकु होता : तेणें म्हणितलें: 'शूद्रस्य शुभं नास्तिः' म्हाइंभटीं यैसें पाहूनि म्हणितलें : 'ब्राह्मणस्य विशेषतः' : येतुलेनि तो क्षोभला : ।। १७३ ।।

**म्हाइंभटीं 'रुक्मिणिसैंवर' करणें** : ।। एकु दीसु म्हाइंभटीं : लक्ष्मीधरभटीं महादाइसांतें म्हणितलें: 'समोरें **रुक्मिणिसैंवर** कां न करा:' महादाइसीं म्हणीतलें : 'मज काइ करवैल : तैं गोसावीं वरु दीधला म्हणौनि स्फुरलें:' म्हाइंभटीं : लक्ष्मीधरभटीं म्हणितलें : 'तरि आम्हीं शब्द घडउनि : तुम्हीं गा:' महादाइसीं मानिलें : मग तेहीं शब्द घडउं घडउं पदें बांधिलीं : आणि महादाइसीं गाइलीं : यापरी दुसरी माळ केली : ।। १७४ ।।

**महादाइसा-प्रश्नें जेचि गति बाइसां तेचि असन्निधानिचेयां म्हणणें** : ।। : एकु दीसु महादाइसीं नवेयांची वैराग्यनिष्ठता देखौनि भटोबासांतें म्हणितलें : 'नागदेया आमतें गोसावीं लाळीलें : ताळीलें : म्हणौनि अनुसरलो : आणि यें न देखतया देवाकारणें अनुसरलीं असति : हळवैलीं : पळवैलीं : तरि यांसि काइ होइल:' भटोबासीं म्हणितलें : 'रूपै जेचि ग.त बाइसांसि होइल : तेचि यांसि होइल :' यैसी भटोबासीं थोरी प्रसंसीली : ।। १७५ ।।

**तथा प्रश्नें पर्वागमनीं द्विगुणानुष्ठान कथन** :॥: एक वेळ पर्वाचां दिसीं महादाइसीं भटोब्रासांतें पुसिलें : 'हां गा नागदेया : पर्व आलेयां काइ करावें:' भटोबासीं म्हणितले: 'पर्वाचा दीसीं दुना जाप्य करावा : दुनि प्रसादसेवा करावी : ईश्वरपरायेणा परमेश्वरस्मरणिं सदा पर्व असे : हा महात्मेयांचा वीधि :॥: आतिया अवस्वरू: अभ्यागत: वस्त्रपूजा: हा वासनिकाचा वींधि :॥: असतेनि पदार्थे असीकेयाचा वीधि' :यैसें भटोबासी सांघितलें : तें महादाइसीं नमस्करूनि मानिलें :॥ १७६॥

**नौगावीं महादाइसां भेटि: दिवससंख्यावीधानिं कोथळेनसीं वीधान सांघणें** :॥: महादाइसें नौगावीं होतिं: एकु दिसु भटोबास निंबाहूनि महादाइसांसि भेटावेया आले: भेटि जाली : बारा दिस भेटीचें वीधान जाले : तवं कोथळोबास अभ्यागता आले : भेटि जाली : श्रमनिवृति जाली : मग भोजनाचां अवसरीं भटोबासीं म्हणितलें: 'रूपै माझीये भेटीचे दीस जाले : आतां तुम्हा कोथळेनिसीं वीधान' : तवं कोथळोबासीं म्हणितलें : 'भटो भेटीचे दीस कीती:' भटोब्रासीं म्हणितलें : 'बारा दिस हा पाठ : अठरा दिस हा अर्थु':॥ शोधु: । 'दोष न निफजत: अपूर्वचि साधे तवं असावें हा सिधांत: '॥ मग माहादाइसीं कोथळोबासासीं एकत्र खानपान केलें: वस्त्रें पालटीलीं : मग भटोबास निंबेयासि आले :॥ १७७॥

**भिक्षु वराडागमनीं श्रीप्रभुकन्या आउ बळवतरें सांघणें** :॥ भिक्षुकें वराडासि जाति : तयांतें भटोबांस म्हणति : 'आधीं गोसावियांचिये कन्येसि भेटावें : मग ऋद्धिपुरा जावें : ऋद्धिपुरीं आधीं आउवेसि भेटावें : मग मढु नमस्करावा : मग प्रदेसीं अटन करावें' : यैसें जे जाये तयांतें निरूपीति : मग भिक्षुक तैसेचि करीति :॥ १७८॥

**उपानौह सांघणें** :॥ भटोबासांचिया उपानौह सिष्य झाडूनि यत्न करीति : कदाचित कोण्ही वीसरति : तरि पंडितबास झाडूनि ठेवीति : एकु दीं कव्हणी ठेवीलीया नाहीं : ते एकीं उपानौ स्वानें नेली : अवस्वरीं पाहीलीया तवं एकि नाहीं : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : 'माझिया वाहाना पंडित ठेवी म्हणौनि जतन होति : आतां जा : पैले गारीआंतु सुनेन

नेली आहे : ते घेउनि या ' : एक गेले : तवं गारीआंतु होति : आणिलीं : अवघेयांसि आश्चर्य जालें : ।। १७९ ।।

**गौराइ भिक्षासीधि कथन** : ।। एकु दिसु इंद्रभटांचां गौराइ भिक्षा केली : भटोबासीं म्हणितलें : 'गौराइ तुझी भिक्षा सीधि जाइल : तुझा मनोधर्म गोसावीं सांघीतला आहे ' : गौराइसां सुख जालें : ।। १८० ।।

**लखुदेवोंबा झोळीये लग्नानुवादु** : ।। एकु दिसु भटोबासीं लखुदेवोबासांतें म्हणितलें : ' लखुदेया तुज आणि झोळीये लग्न लावीलें आहे ' : ।। १८१ ।।

**उपाध्यां रावंसगांवीं वासु सांघणें** : ।। उपाधीं भटोबासांपासि भिक्षा केली : बहुत अक्षम जाले : मग भटोबासीं म्हणितलें : ' उपाध्यहो तुम्ही रावंसगांवीं राहा : तुमची निंदा कोण्ही न करी : तुम्हा गोसावीं वरु दिधला असे ' : मग ते रावंसगावीं असति : ।। १८२ ।।

**तथा कमळाइसां अनुसरण** : ।। कमळाइसें तियें उपाध्यबासांची धाडी : तयांचे हातरीते आइकौनि उपाध्यबास तयांतें घेउनि आले : मार्गी श्रवण केलें : मग भटोबासांपासि आणिलीं : निरोवीलीं : मागौते भटोबासांकरवि श्रवण करवीलें : झोळी देववीली : श्रवण करितां भटोबासीं म्हणितलें : ' दादो तुम्ही काइ आणिक देवो सांघीतला : आणि मी काइ आणीक देवो सांघैन ' : ' ना भटो तुम्हांसि गोसावीं अधीकरण केलें असें : तुम्हा देवें देवो सांधितला तो सांघाल ' : मग भटोबासीं मागौतें श्रवण देउनि भीक्षा दीधलि: केतुले एक दी भटोबासांचिये सन्निधीसी होति : परि गुरुकुळ तयांतें उपाध्यबासांचीचि सिष्ये म्हणति : मग रावंसगावां गेलीं : तेथ तेहीं उपाध्यबासांची सुश्रूषा केली : ।। १८३ ।।

**अभ्यागतागमनिं धर्मवार्ताभविष्य कथन** : ।। एकु दिसु सकाळिचि भटोबासीं समस्तांतें म्हणितलें : ' आजि कव्हणि विजना जावों नको गा : आजि अभ्यागत एतील : थोर धर्मवार्ता होइल ' : यैसें भविष्य सांघितलें : मग कव्हणी विजना न वचेचि : तवं केसोबास आणि गोपाळपंडित यैसें

एकत्र मिळौनि आले : भेटी जालीया : संभ्रमु जाला : मग बरवी अपूर्व धर्मवार्ता जालि : अवघेंयां मंगळ काळु जाला : आश्चर्यें जालें : ।। १८४ ।।

**रिक्तोदकपानभावणि आनोबाणित जळुस्वीकारु** : ।। रात्रीं भटोबासांतें तृषा लागली : उदकपात्रीं उदक पाहीलें : तवं उदक नाहीं : मग रांजनां भरूं गेले : तवं तेथही नाहीं : मग म्हणितलें : 'रांजणिं पाणि नाहीं मां' : तें आनोबासीं आइकीलें : आणि घागरि घेउनि उदकां गेले : गंगे भरूनि घेउनि आले : भटोबासांचें उदकपात्र भरीलें : दंडवत करूनि भटोबासांतें म्हणितलें : 'भटो हें उदक घेयावें' : भटोबासीं घेतलें : ।। मग उरलें तें रांजणिं घातलें : आणिकी घागरि भरूनि आणिलें : तेंही रांजणि घातलें : आणि भटोबासांची वास पाहीली : तवं भटोबांस पुरे न म्हणतिचि : मग आणिकि भरूनि आणिली : तेही रांजणि रीचवीली : माघौतिं भटोबासांची वास पाहिली : तऱ्ही भटोबांस उगेचि : मग गोपाळपंडितीं अवघाचि रांजणु भरीला : ।। शोध् : ।। वासनिक धर्माचि आंतु ।। १८५ ।।

**तथा पुनरागर्मानं जायादुःखनिवृत्ति** : ।। गोपाळपंडित गावां गेले : तवं तयांचि ब्राह्मणी सरली : तयांसि थोर दुख जालें : मग भटोबासांचिये भेटीसि आले : आणि तें दुख निरपौनि काढलें : ।। १८६ ।।

**अनंतकोचा पैकु अनुसरणानुवादु** : ।। एकु दी भटोबासीं म्हणितले : 'हा अनंतकोचा पैकु मज अवघा कानाखुरांसकट अनुसरला गा' : यैसे भटो– बासीं अनुवादीलें : अनंतकोचे ते आनोबासांचे आजे : आणि सारंगपाणि ते पिते : यां अवघेयां गोसावियांचे दरिसन जालें होतें : ।। १८७ ।।

**ब्राह्मणा प्रत्युतर प्रदायेनीं भीक्षा देणें** : ।। एकु दी भटोबास बैसले असति : तवं ब्राह्मणु एकु भटोबासांचेया दरिसना आला : तो नमस्कारु न करीतु उगाचि बैसला : तवं एकीं म्हणितलें : 'भटो नमस्कारु न करा' : तेणें म्हणितलें : 'यांहांसि सीखासूत्र नाहीं : यांहांसि दंडवत न करूं' : तवं भटोबासीं म्हणितलें : 'तुम्ही आपुलेयां मायाबहिणीते दंडवतें करीता : तेयांसि काइ सीखासूत्रें असेति' : आणि तेणें येउनि दंडवत केलें : भिक्षा केली : अनुसरला : ।। १८८ ।।

**महात्मेया गौराइ सदृशाचारु-कथन** :॥ एकु दिसु भटोबासीं एका-वरूनि म्हणितलें : 'यें उंबरीं गौराइसें उठीतील बैसतील तैसेयां उठावें बैसावें': ॥ शोधु : ॥ यांतु ऐसें सांघितलें : 'आपणयां स्वता आचारु न ये : नुमटे : तरि वृद्धासारीखे वर्तावें ' : ॥ १८९ ॥

**ऋद्धिपुरा प्रयाण** : ॥ एकवेळ भटोबास ऋद्धिपुरा निगाले : समस्तां-समवेत क्रमोपक्रमें सावळापुरा आले : तैं तेथ गोसावीयांची लेकी होती की नव्हति : हें नेणिजे : होति तिया वासना : तियेसि भेंटौनि ऋद्धिपुरासि आले : ॥ १९० ॥

**आउ भेटि : मढु नमस्करणें** : ॥ तवं तेथ आउसें होति : आधी त्यांसि भेटले : मग मढु जगति नमस्करीलि : मग कीती एक दीस राहीले : ॥१९१॥

**ईश्वरसदृश पुरुषागमनिं म्हाइंभटांकरवि पूर्वप्रश्न करवणें** : ॥ एक वेळ भटोबास यैसें तीर्थवीशेषें अटना गेले होते : समीपचि तळेगावांकडे होते: म्हाइंभट मुख्य अवघेचि मढीं होते : तवं गोसावियांसारिखे पुरुषु एक आले: येउनि आबाइसांचिया ओटेयावरि निवांत बैसले : म्हाइंभट मुख्य अवघींचि हरीखैलीं : आपलवले : यैसें प्रत्यया आलें : जें गोसावी होति : मग म्हाइंभटीं भटोबासांतें बोलावूं पाठवीलें : भटोबास तेथचि तळेगावांपासि होते : भटो-बासांपुढां सांघितलें : भटोबासीं आइकौनि म्हणितलें : "जा तेथ म्हाइंभट असति तयांतें यैसें म्हणावे : 'तुम्हांसि गोसावीं प्रथम भेटिं जो प्रश्नु केला तो तयां करावा : तयासि जरि तेहीं प्रत्योतर दीधलें : तरि मागुतें मातें बोलावूं पाठवावें ": मग ते गेले : तैसेंचि म्हाइंभटांपुढें सांघितलें : तीं म्हणितलें : 'हो कां ' : मग म्हाइंभटी तयासि प्रश्नु केला : म्हाइंभटीं म्हणितलें : 'संसृती-छेदु होये : यैसीं काहीं प्रतीति आति ' : तवं तेहीं पुरुषीं म्हणितलें : 'तें नाथ जाणे ' : म्हणौनि कानावरि हातु ठेविला : मग ते म्हाइंभटीं बुधीचि बाहीरी नेले : मग भटोबासांतें सांघौनि पाठवीलें : भटोबास आले : अवघ सांघितलें : तें आइकौनि भटोबासी म्हणितलें : ' हा मढु नागवला होता ' : ॥ १९२ ॥

**कोथळोबा जळावग्रहणीं उमाइकोपनिं म्हाइंभटीं सिक्षापण** : ॥ कोथळोबा तान्हैले एकु दीं उमाइसांचीये करवतीयेचें पाणी न पुसत पियाले : तवं

उमाइसें कोपली : ' तूं शूद्र माझीये करवतीयेचें पाणि कां प्यालासि ' : तवं तें म्हाइंभटीं आइकीलें : मग म्हणितलें : ' हें यैसें काइ उमाइसें : तुम्हा दोहीं देवांचा संबंधु : आणि आबाइसांसारिखी माता : भटोबासांसारीखे बंधु : आणि तुमचें आझूनि अज्ञान फिटलें नाहीं : आहा यैसें तुम्हा काइ जालें : कोथळेयासारीखें पात्र जरि तुमचीये करवतीयेचें पाणी पी तरि तुझें दैवभाग्य नव्हे ' : यैसी सिक्षापीलीं : मग तियें अनुतापलीं : म्हाइंभटीं म्हणितलें : ' घाला कोथळेयांसि दंडवत ' : ' हो कां ' : मग उमाइसीं कोथळोबासांसी दंडवत घातलें : ' नेणेंचि बा : चुकलीयें पापीणि ' : मग कोथळोबान तयांतें उठवीलें : ॥ १९३ ॥

**तथा म्हाइंभट विज्ञापनीं ' महावाक्य ' सांघणें** : ॥ म्हाइंभटीं तियेचि काळीं भटोबासांसि दंडवत घातलें : आणि म्हणितलें : ' भटो : तुम्ही उमाइसांसि ' **महावाक्य** ' सांघावें ' : भटोबासीं म्हणितलें : ' तुम्ही कां न सांगा' : तीं म्हणितलें : ' तुमतें गोसावीं अधिकरण केलें असें ' : तवं भटोबासीं म्हणितले : " म्हाइंभटो : गोसावियांपासौनि नव्हेचि तें मजपासौनि कैसें होइल : पूर्वि गोसावीं मातें म्हणितलें : ' येथचें गोमटें तें काइ तुझेनि भाउपणें होइल " : तवं म्हाइंभटीं म्हणितलें : " गोसावीं बेलोपुरीं यैसें म्हणितलें असें कीं : ' तुम्हांपासौनि सातांपांचां होइल " : मग भटोबासीं उमाइसां धर्मु घोकविला : मग तैंपासोनि उमाइसां मार्गावरि थोरु बुधि आली : ॥ १९४ ॥

**निरालंबनता श्रवणें कोथळोबा निर्गमेंनि एकांतस्थानप्रसंसा** : ॥ : एकु दिसु भटोबास धर्मवार्ता करीत होते : प्रधानत्वें ' **असतीपरि** ' : भटोबासीं म्हणितलें : ' कोण्हांसि प्रसादु आलंबन : कोण्हांसि शास्त्र आलंबन : कोण्हांसि येल्हो आलंबन : कोण्हांसि मी आलंबन : परि यैसा कोण्ही मायेचां पोटीं जन्मला नाहीं : जो देसावरि खांडें काढूनि जाये ' : यैसें निरूपण करीताति : तवं कोथळोबायें म्हणितलें : ' नाहीं कैसा : हा नव्हे मी कोथळा ' : म्हणौनि बाहे आफळीली : आणि भटोबासांसि दंडवत घालूनि नीगाले : भटोबासीं म्हणितलें : ' कोथळा तेथ जाइल : जेथ पायें हाणीतलेयां सीस नेणिजे ' : ॥ ऐसें एकांती स्थान प्रसंसिलें : ॥ १९५ ॥

**आउ अभ्यागत निराकरणीं म्हाइंभटां सीक्षापणें** : ॥ : एकवेळ आउसीं म्हाइंभटातें प्रार्थिलें : ' माझें काहीं घेयावे :' तें म्हाइंभटीं निराकरीलें : : ॥

भटोबास अटना गेले होते : तेथ तेहीं आइकिलें : जें म्हाइंभट आउवेचें न घेतीचि : ।। मग म्हाइंभट अटनिं भटोबासांतें भेटले : मग भटोबास कोपले : भटोबासीं म्हणितलें : 'हां गा जे आउ पुढां पळे : आणि गोसावी बुझावेया पाठीं लागति : आउवेचें अन्न स्वीकरीलेयावीण आरोगण न करीति : यैसी लाळीली : ताळीली : ते आउवेचें नेघीजे : तरि देवाचेंचि नेघीजे म्हणा ' : यैसी म्हाइंभटाप्रति आउसांची प्रसंसा बोलिले :।। १९६।।

**तथा अनुतप्त म्हाइंभटीं आउसां भोजन मागणें** : ।। येतुलेनि म्हाइंभट अनुतापले : मग भटोबासातें पुसौनि म्हाइंभट मागौते गेले : आउसांसि साष्टांग दंडवत घातलें : आणि म्हणीतलें : 'आउवे तुम्हीं मज जेउं घाला : तुम्हीं म्हणत होतीति तैं मीं जें नेघेंचि : तें माझें अनुचीत हो : आतां घाला ' : आउसीं म्हणितलें : 'हो कां रे उठि उठि ' : म्हणौनि उठवीलें : 'तुम्हीं माझेया चक्रस्वामीचीया धुरा ' : म्हणौनि आउसीं अन्न केलें : मग म्हाइंभटां प्रसादावां पात्रीं वाढीलें : मग म्हाइंभट तृप्तिपर्यंत जेविले : ।। तें भटोबासीं आइकिलें : मग सुख जालें : ।। १९७ ।।

**म्हाइंभटा देहावसान** : ।। एक वेळ म्हाइंभट अटना गेले होते : तवं अटनिं तयांसि असवित उपनली : तेणेंचि प्रांतें उमाइसें आलीं होति : तवं म्हाइंभटांसि भेटि जाली : तयांतें म्हाइंभटीं म्हणितलें : 'उमाइ तुम्हीं मज ऋद्धिपुरासि नेयावें ' : तिहीं म्हणितलें: 'हो कां म्हाइंभटो : नेइन ' : मग उमाइसांपासि वांकि सांखळेयाची मुदी होति : ते तिहीं गाहाण घातली : म्हाइंभट आले आइकौनि भटोबास साउमे आले : माहाद्वारापासि भेटि जाली : भटोबासांतें म्हाइंभटीं म्हणितलें : 'भटो निडळावरि पावो ठेवा ' : म्हणौनि भटोबासांचा पावो हातीं धरीला : भटोबासीं म्हणितलें: 'निडळावरि श्रीचरणु तो गोसवियांचा कीं : मियां निडळावरि हातु ठेवावा कीं ' : म्हणौनि हातु ठेवीला : मग जगतीआंतु आणिले : बरवियें ठाइं ठावो केला:।। मग एकु दीसु म्हाइंभटीं भटोबासातें म्हणितलें : ' भटो मज देवो होइल ' : तवं यैसें येंहीं कां म्हणितलें : म्हणौनि भटोबास नावेक उगेचि राहीले : तवं तेणें तयां अधिकचि दुःख वाटलें : म्हाइंभटीं म्हणितलें : ' मीं पापीया : मज देवो काइ होइल ' : म्हणौनि दुःख केलें : मग भटोबासीं म्हणितलें :

' म्हाइंभटो तुम्हासि दोहीं देवांचें सन्निधानदास्य : आणि तुम्ही ऐसें कां बोलीलेति ' : म्हाइंभटीं म्हणितलें : ' भटो तुमचेनि मुखें अन्यथा न निगे कीं ' : भटोबासीं म्हणितलें : " जैं गोसावी निवासां राज्य करीत होते : तैं तेथ तुम्ही महाजनांसरिसे आले होतेति : आणि गोसावियांचें दर्शन नेघत गेलेति : तेव्हेळी मीयां कटाक्षूनि गोसावियांतें म्हणितलें : ' जी जी गोसावियांचा म्हांयां आला होता : परि दर्शना न यचि ' : यावरि गोसावी म्हणितलें : ' न यो कां गा : येइल तैं तोचि येउं जाणैल कि ' : यैसा गोसावीं तुमचा निर्वचु केला : तुम्हां जरि देवो नव्हे : तरि कोण्हाहीं देव नव्हे : म्हणौनि तुम्हां देवो होइल " : यैसें भटोबासीं निर्वचीलें : मग म्हाइं-भटीं म्हणितलें : ' माझें काहीं वोखटें नेघावें ' : म्हणौनि हात जोडूनि निडळावरि ठेविले : आणि ' माझा निक्षेपु चणाख्यपासि करावा ' : येतुलेनि म्हाइंभटांचे देहावसान जालें : मग भटोबासीं तेथ निक्षेपु केला : भटोबास-मुख्य अवघेया थोर दुख जालें : मग तैसेचि भटोबास गंगातीरा निगाले : ॥ १९८ ॥

**गंगातीरा प्रयाणीं 'आउ चाल' म्हणणें** : ॥ भटोबास गंगातीरा निगाले : निगतां आउसातें म्हणितलें : ' आउवे गंगातीरा चाल जाउं ' : तवं आउसीं म्हणितलें : ' न ये रे बा नागणा : चक्रस्वामीविण ते गंगातीर तांबाजाळि जळताये रे ' : यैसें म्हणितलें : परि न येतिचि : मग भटोबास मढु नमस्करूनि निगाले : ॥ १९९ ॥

**मार्गी परंडकर गौराइदत्त डोचें उदकस्वीकारु** : ॥ परंडकर गौराइसें : ॥ : कवीबासांचिया वासना पोमाइसें : ॥ तिये भटोबासांचीं सिष्यें : तेहीं नारियेळीं पाणि घालूनि मेणें तोंड लिंपौनि परवंटीं सा मास वाहीलें : प्रतीदीनि एक फेडीति : एक भरीति : परि कव्हणिचि नेणति : यैसा एकु दीसीं भटोबास मार्गी जात असति : तवं तहान लागली : अवघेयांतें पुसीलें : ' कोण्हाजवळि पाणि आहे गा ' : आपुलालां उदकपात्रीं पाहीलें : तवं पाणि नाहीं : मग गौराइसांतें पुसीलें : ' गौराइ तुजपासि पाणि आहे ' : ' होय भटो आहे ' : म्हणौनि परवंटीचा डो काढीला : भटोबासांतें उदक संपादिलें : भटोबासीं उदक घेतलें : आणि तो डो हातीं

धरूनि म्हणितलें : 'हा पाणिये भरला डो : हे सा मास वाहाते गा : तें साही मासांचे स्वीकारांतु पडीलें गा' : तें अवघेयां आश्चर्य जालें : मग वसतीचेया गावां आले : ॥ २०० ॥

**प्रतिष्ठाना येणें** : ॥ मग तैसेंचि भटोबास क्रमेंक्रमेंचि प्रतिष्टानासि आले : प्रतिष्टान नमस्करीलें : आणि सवेंचि निगों आदरीलें : तवं केसोबासीं म्हणितलें : 'भटो येथ राहों' : भटोबासीं म्हणितलें : 'पैठण रुधिपुरीचे मात मज वेळवति ना गा : येथ मज नमस्कारु घेववेति ना : म्हणौनि येथ मज बहुत दी वास्तव्य होववेना' : मग एकु दोनी दीस होते : ॥ २०१ ॥

**प्रतिष्ठानीं भटाज्ञा भास्करभटीं संन्यासीयां पराजयो करणें** : ॥ कवीश्वरबास : ॥ एकु दीसु कवीस्वरीं म्हणितलें : 'भटो संन्यासियांसि गोष्टि करूं' : भटोबासीं म्हणितलें : 'भानुभटो : तूं म्हणौनि नको करूं : तेचि पदन पाडीति तरि करी' : परि तवं एकु दीसु कोठें नेणों योगु पुरला : कवीस्वरीं निरोतर केलें : संन्यासीयां दैन्य जालें : ॥ २०२ ॥

**तथा पींपळेस्वरां न वच म्हणणें** : ॥ मग तियेचि काळीं कीं आणिक काळीं जालें तें नेणिजे : एकु दिसु भटोबासीं कवीस्वरबासांतें म्हणितलें : 'भटो : तूं पींपळेस्वरां न वच' : परी कवीस्वरांसि अंतःकरणें जावें ऐसेंचि होतें : ॥ २०३ ॥

**पींपळेस्वरीं कवीस्वरचर्चा** : ॥ एकु विद्वांस प्रतिष्ठानासि आला : तो सकळ विद्वांसांसि तन वोरिलें ऐसें ब्रीद पढवी : परि तयासि कोण्ही पुरे नव्हे : तो पींपळेस्वरीं पुराण सांवों लागला : भटोबासीं कवीस्वरांसि वारीलें होतें : परि कवीस्वरबास कव्हणा न कळत तेथ गेले : तवं तो पींपळेस्वरीं पांडित्य करीत असे : सभा घनदाटली असे : कवीस्वरबास द्वारसंकेसि टेकूनि आइकों लागले : तवं एकिं ठाइं चुकि देखीली : आणि कवीस्वरीं म्हणितलें : 'अबध : अबध अबध :' : तेणें म्हणितलें : 'यैसें सामोरे येइजो : कैसें अबध' : मग तयांपासि गेले : बैसले : मग जो श्लोकु वाखाणित होता तोचि त्याकरवि म्हणविला : मग म्हणितलें : 'हा पाठुचि यैसा नव्हे' : मग आपण म्हणितला : तो तयाचां कळांसि बैसला : मग

म्हणितलें : 'आतां वाखाणा' : मग तेणें वाखाणिला : तो कवीस्वरबासीं वीतंडीला : तेणें कवीस्वरबासांतें म्हणितलें : 'आतां तुम्ही वाखाणा' : मग कवीस्वरबांसी श्लोक वाखाणिला : तयांतें म्हणितलें : 'कां हा अर्थु आतां जाला' : तेणें म्हणितलें : 'होये जाला' : कवीस्वरबासीं म्हणितलें : 'अर्थु नाही जाला' : मग तोही अर्थ दूषीला : मग म्हणितलें : 'अर्थ तो ऐसा कि' : म्हणौनि आणिकीपरी वाखाणिला : 'का आतां अर्थु जाला' : 'ना होये जाला' : मागौतें म्हणितलें : 'नाहीं जाला' : यैसा दाहींपरी वाखाणूनि दाखविला : यैसें तयाचे अंतःकरण चंद्रमय जाले : सभेसि थोर आश्चर्य जाले : ।। मग तेणें विद्वांसें म्हणितलें : 'तुम्ही कवण' : कवीस्वरबासीं सीघ्रवाक्येंचि उत्तर दीधलें : हा श्लोकु म्हणितला : " **केचित्खंडनगंडदंडितजगद्वीराधिपस्संस्फुरत् । तर्काखर्वकुगर्वपर्वतसमारूढा विमूढा भृशम् ।। काव्याळापकळापकेळिकुशळाः श्रृंगारवीरावृताः । केचित्कृष्णकथासु सुंदरमतिस्तद्भास्करोऽहं कविः ।। १ ।।** तो मी कवि भास्करु " : ऐसें सांघितलें : मग तेणें विद्वांसें म्हणितलें : 'तुम्ही मनुष्य नव्हां : तुम्ही येथची अधिष्ठाती देवता मूर्तिधारी जालीं : माझा गर्व झाडावेया' : तवं कवीस्वरबासीं म्हणितलें : 'आम्ही देवता नव्हों : आम्ही वेधवंती नागदेवभटांचे' : यैसा तयांचा गर्व हरीला : मग बीढारा आले : भटोबासांपासि आपण सांघीतले कीं नाहीं : हे नेणिजे : परि नगरजना थोर आश्चर्ये जालें :।।२०४।।

**निंबेयागमनीं पुडती दास करणें** : ।। मग भटोबास निंबेयासि आले : मागुते निंबा राहीले : हें तिसरेनि येणें : आणि अटनिहूनि जाणें येणे : तें बहुत वेळां असे : ।। २०५ ।।

**विहीटेकारां गौराइसां संबंधूनि बोलावणें** : ।। विहीटेकारीं गौराइसीं भटोबासांपासि भीक्षा केली : एकु दीसु तियें भटोबासांतें पुसौनि अटनासि गेली : अटन करीत करीतां विहीटेयासि गेलीं : तेथ संबंधियांचां गांवि राहीलीं : केतुलेयां एकां दीसां तयां सांघातें होतीं : तियें भटोबासांसि भेटावेया आलीं : तयांतें भटोबासीं म्हणितलें : 'गौराइ कें वो' : तियें म्हणितलें : 'तियें संबंधियाचां गांवि असति' : भटोबासीं म्हणितलें : 'धर्मा-कारणे माहारवाडा तरि संबंधु : आणि तियेचा धर्मु तो मी येथ असे : ते

तेथ कां गेली : जा बोलावा ' : मग तियें गेलीं : बोलावूनि आणिलीं : मग भटोबासीं निरूपण केलें : प्रधानत्वें संबंधात्ते : ॥ मग तिहीं म्हणितलें : 'भटोः 'सेवट ' केतुकियांतें म्हणितलें ' : भटोबासीं म्हणितलें : ' आपुलां गावींहूनि सात मंडळें सांडूनि जाइजे : यातें सेवटु म्हणिजे ' : ॥ (शोधु) ' मंडळ प्रदेशु ' : ॥ यैसें भटोबासीं निरूपण केलें : ॥ २०६ ॥

**काळाक्षरीं वेधुबोधु निराकरण :** ॥ एक वेळ धर्मवार्ताप्रसंगीं भटोबासीं म्हणितलें : 'हें शास्त्र आपुलीया युक्ति न घोकावें : काळाक्षरापासौनि वेधुः बोधु नाहीं : गुरुमुखें शास्त्रश्रवणा सबीजता होये : तें का ना : स्वयं परमेश्वरु ब्रह्मविद्या देति : कां अधिकरणातें अधिकरूनि देति : म्हणौनि काळाक्षरीं वेधुबोधु नाहीं : एवं आपुलीया युक्तीं शास्त्र न अभ्यासीजे : जेथ शास्त्राचें मुख तेथ अभ्यासीजे : चर्चिजे ' : यैसें सांघितलें : ॥ २०७ ॥

**रजतमाश्रयें धर्महानिकथन :** ॥ एकु दीसु धर्मावार्ताप्रसंगें भटोबासीं म्हणितलें : ' राजसें : तामसें : जें मनुष्यें : तयांचा संसर्गु न करावा : विषयेंरूप मनुष्यें : विषयेरूप पदार्थ : यांचा आश्रो धरीलेया तात्काळिकचि धर्महानि होइल ' : पाठांतर : । ' राजसां तामसांचे रजतम : येमनेम शास्त्रें झाडावें : मग तयांचा संसर्गु करावा ' : ॥ २०८ ॥

**नागाइ शास्त्रसंवाद शोधनि उभयां लाभानुवादु :** ॥ नागाइसें तियें भटोबासांची नाति : महेश्वरपंडिताची कन्या : तयांसि भटोबासांपासौनि श्रवण : अनुसरण : भटोबास सपरिवारीं विजना जाति : आणि नागाइसांतें बीढार राखावेयां ठेविती : भटोबास कांटियेचेनि भावें एकि रुइ प्रधान करूनि विजन करीति : कदाचित एकाधीया खडकावरि बैसति : मग तेथ धर्मवार्ता होये : पहारा दीढा बिढारा येति : आणि नागाइसें पंडितां : केसोबासां : कवीस्वरबासांतें पुसति : ' आजि काइ काइ धर्मवार्ता जाली ' : मग ते जाली असे ते सांघति : तें नागाइसें भटोबासांसीं जाउनि संवादति : एकु दीसीं संवादितां नागाइसीं म्हणितलें : ' आजि हें पंडितीं ऐसें म्हणितलें : केशवें ऐसें म्हणितलें : कवीस्वरीं ऐसें म्हणितलें ' : याउपरी भटोबासीं म्हणितलें : ' तयांसि म्यां ऐसें ज्ञान केलें : आतां हें अपूर्व जालें : येणें उभया लाभु जाला ' : ॥ २०९ ॥

**तिर्येंच अवतार कथन :** ।। एकु दीसु भटोबासीं केसोबासां पंडित–बासांप्रति म्हणितलें : ' देवगीरीसि सामान्य स्त्रीयेचां घरीं रावा असे : तो ईश्वर अवतारु गा ' : तवं केसोबासीं पंडितबासीं म्हणितलें : ' भटो पाहों जावों ' : भटोबासीं म्हणितलें : ' नको जावों : श्रीप्रभूची सेवा आमुचां गोसावीं विहीली : म्हणौनि आम्ही केली : तो ईश्वर अवतारु होये : परि विहीत नव्हे' : ऐसें भटोबासीं निरूपण करूनि निराकरीलें : ।। २१० ।।

**अनृत्य भाषण निषेधु :** ।। एक वेळ धर्मवार्ता प्रसंगीं भटोबासीं म्हणितलें : ' सुहृदेसीं : गोत्रिजेंसि : मार्गीचां परीवारीया आदिकरूनि लटिकें न बोलावें : परि पुढीलाचां मरणप्रवेसीं : अभिळासीया : तामस हे वांचौनि:' ऐसें निरुपिलें : ।। २११ ।।

**बाइया अटन प्रश्नीं ग्रामेग्रामा दर्शनकथन :** ।। एक वेळ एकि बाइया अटना निगालीया : तेव्हेळीं तिहीं भटोबासांतें पुसिलें : ' भटो अटन कैसें कीजे ' : भटोबासीं म्हणितलें : ' गाउनि गावां जाइजें : गावं गावांतें सांघैल : भिक्षा करीतां घर घरातें सांघैल ' : मग ते अटना निगालीं : ।। २१२ ।।

**बाइ–प्रत्यजित शाकावग्रहणि 'अर्ध सुपीं अर्ध कुपीं' म्हणणें :** ।। बाइया भाजीं निसीति : तिया पानें सांडीति : कोवळे देंठ सांडीति : तवं ते भटोबास देखति : आणि तेथचि बैसौनि वेचीति : आणूनि बाइयांचां हातीं देति : आणि म्हणति : ' अर्ध कुपीं : अर्ध सुपीं : यैसें कां करीतां वो : हेंचि माझे महात्मे खातिल : तरि स्मरणिं दक्ष होतील ' : मग तैंलागूनि कव्हणि न संडी : सावधेया करीति : ।। २१३ ।।

**माहात्मेया नित्यार्टनि अवस्थानसंख्या कथन :** ।। एकु दीसु एकीं भटोबासांतें पुसिलें : ' भटो अटनिं कोणा गावीं केतुका काळ असावें ': भटोबासीं म्हणितलें : " ग्रामेक रात्रं : नगरे पंचरात्रं : आणि गोसावीं म्हणितलें: ' आपुलें श्रेष्ठत्व : नष्टत्व : न प्रकासें तवंपर्यंत असावें " : तेंहीं नमस्करूनि घेतलें : ।। २१४ ।।

**ब्राह्मणा गीतुनिर्भर्त्सणिं भिक्षा देणें :** ।। एकु दिसु भटोबास वेदिकें वीजनिं बैसले असति : तवं ब्राह्मणु एकु आला : तेणें आपुलेया कवीत्वाचा

गीतु भटोबासां पुढां म्हणितला : मग पुसीलें : ' भटो गीतु कैसा जाला ' : भटोबासीं म्हणितलें : ' जेणें केला तयासि नरक होति : ऐसा जाला ' : मग तयासि निरूपण केलें : आणि तेणें तैसीचि भिक्षा केली : ।। २१५ ।।

**सारंगपंडित देहावसानीं उमाइसां भेटि : अनुसरण :** ।। : प्रतिष्ठानि सारंगपंडिताचें देहावसान जालें : मग उमाइसीं अवघि वेवस्था केली : ।। शोधु : । : सारंगपंडित असक्त होते : उमाइसें बाहीर गेलीं होतीं : बाहीरूनि आली : तवं तयांचें देह गेलें : आणि तैसेंचि चौकिचें कवाड घातलें : ।। मग प्रसादाचा चौरंगु : आणि धानाइसें घेउनि भटोबासांपासि आलीं : ।। निगालीं तो काळु सांघितला : ।। मग भटोबासांपासि दोघीं भीक्षा केली : धानाइसां भीक्षा करीतां भटोबासीं म्हणितलें : ' धानाये तुवां कांस साच केली ' : यैसें भटोबास तोखले : ।। २१६ ।।

**शास्त्राचार निरूपणें :** ।। एकु दीसु धर्मवार्ताप्रसंगें भटोबासीं म्हणितलें : ' अधिकरणें वरीषसंख्या निरूपिलें : मग पुरुषें बिदेसीं आपणयां आपण राहावा करावा : नुमटे तें अधिकरणा येउनि पुसावें : कां आपणयाहूनि वडील असतील तयांतें पुसावें : सांगोपांग क्रिये काळु वाटूनि घालीजे : तैं आचारीं विचारीं निलळता नुपजे ' : यैसें निरूपिले : ।। २१७ ।।

**अन्यदूषणश्रवणें केशवदेव उपानहौ त्यागी ' तूंचि माझा महात्मा ' म्हणणें :** ।। एकवेळ केसोबास : पंडितबास : कवीस्वरबास : हे मुख्य दोघ-चौघ मार्गीं जात असति : तयांतु केसोबासांचां पाइं वाहाना होतीया : येर अवघे अन्हवानी होते : तवं एकें वाटाउवें देखौनि म्हणितलें : ' हे अवघे भटमार्गीचे महात्मे होति : हा एकु नव्हे : याचां पाइं वाहाना आहाति ' : तें केसोबासीं आइकीलें : ' यैसा येहीं वाहानि मी भटमार्गीचा महात्मा नव्हें ' : म्हणौनि तेथचि तोडूनि सांडोलीया : मग येउनि भटोबासांपुढें सांघितलें : तयावरि भटोबासीं म्हणितलें : ' केशवद्या : माझीये मार्गीचा महात्मा यैसा तूंचि कीं ' : यैसे तोखले : ।। २१८ ।।

**भटां भिक्षायाचीनं जनां वेधु :** ।। भटोबास भिक्षे जाति : भटोबासांचा भिक्षा शब्द गुजरध्वनि घोळिला उमटे : शब्द आइकिलेयां रडतें लेंकरुं हावरु सांडि : तोंडिचें स्तन सांडूनि भटोबासांकडे पाहों ठाके : कव्हणि

दु:ख भोगीतां आपुलें दुख वीसरे : एकां दर्शनें प्रसस्ती होति : भांडेतें असति तयांचे रोख जाति : मग उभये गंगातीरें भटोबांसांतें 'वेधवंती नागदेवोभट' म्हणति : यैसीं प्रसीधि : ॥ २१९ ॥

**साधां निरयेज्ञानें पुरुषुज्ञान करणें** : ॥ साधीं कळंकी–नारायेणिचे निरये गोसावीं पाहाविले होते : तेणें तयांसि थोर दुख भरलें : मग गंगातीरां आलीं : तैं भटोबासापुढां सांघितलें : यावरूनि भटोबासीं म्हणितलें : 'कळंक-नारायेणि चौऱ्यासि नरकांचे भेद जयाचिपरि ईश्वरें पाहाविले : तयाचिपरी परमनिष्ठा पुरुषातें पाहावें : आइकावें : तेणें विरामु उपजे : अनुरागासि ये': यैसें साधांसि निरूपण केलें : ॥ २२० ॥

**दादोसां देहावसानि उपाध्यीं नाथोबायें सांभाळणें** : ॥ दादोस पिंपळ-गावीं होते : एकु दिसीं तयांसि थोर असक्ति आली : आइकौनि उपाध्यबास: आणि नाथोबास सांभाळू आले : उपाध्यें म्हणितलें : 'दादो मी कवण': दादोसीं म्हणितलें : 'तूं जानो': उपाध्यबासि म्हणितलें : 'दादो गोसावि-यांचें नाम आठवतें': तवं रामदेवीं म्हणितलें : 'नाम नामीयें ते तूं आणि तुझा नागदेवो कीं रे': तवं उपाध्यबासीं म्हणितलें : 'हुं तथास्तु': आणि तैंसेचि उठीले : निगाले : मग तयांचें देह गेले : ॥ शोधु : । : सोमनाथापूर्वे वोत : तेथ तयांचा निक्षेपु : यैसी मार्गरूढि : ॥ २२१ ॥

**उपाध्यां देहावसान** : ॥ : एक वेळ उपाध्यांसि असक्ति आली : तेणें तयांचें देहावसान जालें : कमळाइसीं बरवा निक्षेपु केला : मग तिये तेथौनि निगालीं : ते वालसयासि गेलीं : वालसां राहीलीं : तेथचि तयां देहावसान जालें : ॥ शोधु : ॥ हें भटांमागां : ॥ २२२ ॥

**नाथोबा लोहेदर्शनें अवकास करणें** : ॥ : नाथोबा कवणिये गांवि तें नेणिजे : एक वेळ ऐसे अवकासाकडे गेले होते : तवं तेथ लोहें उघडी पडलि होति : नाथोबायें देखीली : आणि म्हणितलें : 'आतां काये दीसतीसि; तैं सांपडतीसि तरि गोसावियांचेया विनयोगां नेतां : तैं सातरा पसरीला : तो मी नव्हें नाथो': म्हणौनि तिचिवरि अवकास केला : ॥ आणि निगाले : ॥ ते भटोबासीं आइकिले : तोखले : ॥ २२३ ॥

**नाथोबा देहत्यागु : भुवनीं निद्रास्वीकारु :॥ :** भटोबास राक्षसभुवनासी आले : तवं तेथ नाथोबाचें देह गेलें आइकिलें : मग भटोबासीं म्हणितले : ' जेथ नाथोचें देह गेलें : तेथचि माझें आंथरुतें घाला गा : ते भूमिका सत्वस्थ : तेथ गोसावीं बीजें केलें असें : माझेया हृदयासि देवो येईल ' : घातलें : ॥ २२४ ॥

**केशवदेवोद्यमें मार्गी उपयोगानुवादु :॥ :** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें : ' केशवद्या : माझेनि मुखें जें निरूपण तेथ संशयो नाहीं : मजमागां शास्त्र जाये ना ऐसें तुवा केलें : येणें शास्त्रें पुढां मार्गाचे. झगडे तुटतील ' : ऐसी केसोबासांची उहापोहा देखौनि भटोबासीं प्रसंसा केली : ॥ २२५ ॥

**अधिष्ठानसंबंधें वडीलु म्हणणें :** ॥ एकु दीसु भटोबासीं म्हणितलें : ' मानापमाना पाप चुकवावेयालागिं तऱ्हीं आपणयांहूनि एकि चातुर्मासिं वडीलु तो वडीलु कीजें : आपण तयां अधिन होइजे : ये=र्हवि अधिष्ठान-प्रयुक्तीं वडीलु तो वडीलु : आणि ज्ञानवृद्धवचनें सकळांपासौनि वडीलु ' : यैसें अनुवादीलें : ॥ २२६ ॥

**वीजनीं भिक्षुदर्शनें दंडवत घालणें :** ॥ एकु दीसु भटोबास मार्गी जात होते : तवं एकु भिक्षु वीजनीं वैसला देखीला : आणि म्हणितलें : ' आम्ही देवो देखीला : म्हणौनि प्रवर्तलों : हा न देखतेया देवाकारणे कैसा बैसला असे : यैसा तूं ' : यैसें म्हणौनि दुरौनि दंडवत घातलें : तोखलें : मग भेटि जाली : ॥ २२७ ॥

**धर्मवार्ताश्रवणें ब्राह्मणा वेधसंचारु : भिक्षाप्रदान :** ॥ एकु दीसु भटोबास मढांतु बैसोनि आपलेया सिष्यांसि धर्मवार्ता करीत होते : थोरी घे—देहोत होती : तवं वीद्वांसु एकु मढाबाहीरि आइकौनि उभा ठाकला : तो आइके आणि तेविचि म्हणे : ' भटीं यैसें निरूपीलें : तरि आतां भटांचे सिष्य कैसें म्हणतील ' : तवं तयांसि उत्तर देउं सरलें : आणि तो आपणेयां आपण यैसी यैसी मान हालवी : यैसें येरयेरांचां बोलणा प्रहरू एकुपर्यंत वेधौनि मान हालवीली : तवं धर्मवार्ता पुरे जालीं : मग भितरि आला : भटोबासां साष्टांग दंडवत घातलें : सिष्यत्व अंगीकरूनि म्हणितलें : ' भटो तुमची

तरि जिज्ञासा : परि आम्हां उपदेशु जाला ' : मग तेहीं तैसीचि भिक्षा केली : ॥ २२८ ॥

**आश्चर्यार्थ तऱ्हीं अनुसरा म्हणणे :** ॥ : एकु दीसु धर्मवार्ताप्रसंगें अपूर्व सीधांतप्रतीष्ठा बोलीलि : आणि अंति म्हणितलें : ' जीवोद्धरण वेवस्थेचां देवाचां आर्ती ननुसरवे : तऱ्हीं आत्मदर्शनार्थ तऱ्हीं सकळ लोक आश्चर्याकारणें अनुसरीजो कां ' : यैसें म्हणितलें : ॥ २२९ ॥

**केली क्रीया वायां न वचे म्हणणें :** ॥ : एकु दिसीं भटोबासीं म्हणितलें: ' ये मार्गी केली क्रिया इउलीही वायां न वचे : एकां अनधिकार निवृतीकारण : एकां अधिकारा कारण : एकां आर्ति कारण : एकां सन्निधि कारण होए ' : ॥ २३० ॥

**धडवस्त्रनिषेधें भिक्षेचें अन्नवस्त्रप्रसंसा :** ॥ : एकु दीसु भटोबासीं म्हणितलें : ' धड वस्त्र न पांगुरावें : थिगळांचें प्रावर्ण : भिक्षेचें अन्न : यें दोन्हीं अवीटे गा : येणें बहुत चुके ' : ॥ २३१ ॥

**उजनिये अवस्थानश्रवणें : आज्ञा वीशेषु पाळणें :** ॥ : एकु वेळ एक उजनियेहूनि आले : तेथ गोसावी राज्य करीतातिं यैसें तेहीं सांघितलें : तवं एकीं म्हणितलें : ' भटो तरि तेथ जावों ' : भटोबासीं म्हणितलें : ' हा गा : पिसेया पिंपळगावों काइ दुरि : परि गोसावीं आज्ञा केली असे : ते आज्ञाचि पाळिलेयां तोख आति ' : मग ते उगेचि राहीले : ॥ २३२ ॥

**लक्ष्मीधरबा अनुवादें अनिष्टत्यागिं स्वल्पाचारें ईश्वरगति मानणें :**॥: एकु दिसु भटोबास बैसले असति : लक्ष्मीधर मुख्य अवघेचि माहानुभाव: घनदाट आस्थानिं बैसली असे : तवं धर्मवार्ता प्रसंगीं लक्ष्मीधरबासिं बोलिलें: ' हे तीनही निषेध चुकवूनि :: ॥ एकी वासना : हे च्यान्ही निषेध जया न घडेति : ॥ : तया स्वल्पधर्मानुष्ठानेंही ईश्वर होये ' : यैसें लक्ष्मीधरबासीं बोलिले : तें भटोबासीं मानिलें : चौथा निषेध तो देवतेचा क्षेदु : ॥२३३॥

**परस्परें सांघातु-निष्ठानुवादु :** ॥ : एक वेळ धर्मवार्ताप्रसंगें भटोबासीं म्हणितलें : ' वडिलें धाकुटेया सांघातु द्यावा : धाकुटेनि वडिलांचा सांघातु करावा : येर येरां रक्षण : म्हणौनि सांघातु देयावा करावा ' : ॥ हे स्मृति आनोबासिं आइकौनि जीवीं धरीलीचि होति : मग इयेचा विनयोग

आनोबासीं दाखवीला : जैं आइकीली तैं वासनिक होते : मग भटोबासांमागां भीक्षा केलेयां यैसा एक दीं : एके गावीं निद्रासमै आपुलेया सिष्यांतें म्हणितलें : ' मजभवतें तुम्हीं निद्रा करा : मज तुम्हीं रक्षण : मी तुम्हां रक्षण : एकमेकांचेनि सांघातें धर्मु सीधी नेवो ' : म्हणौनि निद्रा केलीया : ।। २३४।।

**उजळनें मैळनें अनुवादु :** ।। एकु दीसु धर्मवार्ताप्रसंगें भटोबासीं म्हणितलें : ' एकांकी पुरुषु आचारु करितां त्रसें : मैळे : अधिकरणाजवळि उजळे : तैसेंचि बहुतांमाजि जीज्ञासीतां उजळे : आणि निलळतेतवं मैळे : तो एकांकीं आचारें उजळे : हें जै क्रिया काळपरत्वें वांटली होये : तैं दाहें प्रकारीं उजळे ' : ।। २३५ ।।

**शास्त्रस्थळनियेमें अर्थनिष्पत्यनुवादु :** ।। : तरि प्रकरणावरूनि भटोबासीं म्हणितलें : ' श्रुतीचा अर्थु श्रुतीं निर्वचावा : लीळेचा अर्थु लीळें निर्वचावा : दृष्टांतांचा अर्थु तो दृष्टांतें निर्वचावा : गीतेचा अर्थु गीतें निर्वचावा: भागवताचा अर्थु भागवतें निर्वचावा : एकु अर्थु तो अवघांचि निर्वचावा : एवं जे स्थळिचें ते स्थळिं तया प्रकरणानुरूप निर्वचु ' : ऐसें सांघितलें : ।।२३६।।

**धर्मवार्ताप्रसंगीं केशवदेवीं कवीस्वरां कोपणें :** ।। : एक वेळ भटोबास धर्मवार्ता करीत असति : तिये धर्मवार्तेसि प्रधानत्वें भटोबास : कवीस्वरबास बोलत असति : आक्षेप-परिहारीं थोरी चर्चा केली : तयावरूनि केसोबासीं कवीस्वरबासांतें म्हणितलें : ' भटो अधीकरणेंसि इतुकें वाढवितां दूषण असे: अधीष्टानिंची प्रसन्नता जाये : यैसीयापरी काइ अर्थसीधि होइल : भटोबासांचें बोलणें ईश्वरवाणि कीं : तें आइकीलें तैसें सिरसा नमस्करूनि घेयावें : न परीसवे तरि आपणचि विमर्शावें : मग अनधिकार निवर्तलेयां काळेंकरूनि उमटैल ' : यैसें कवीस्वरां केसोबास कोपले : ।। २३७ ।।

**गति गोंदोबा श्रवण :** ।। : गति गोंदोबा ते कवीस्वरबासांचीं नागाइसें तयांचे आजे : ते रामपुरीयेसि असति : एकु दीसु तयांसि भटोबासांपासौनि श्रवण जालें : एक म्हणति : भीक्षा केली : ।। २३८ ।।

**वेधाचार्यें श्रवणें वीद्वांसा उद्ग्रहणिके भिक्षा देणें :** ।। : वीद्वांसु एकु तेणें म्हणितलें : ' हे कैसे पां वेधवंती नागदेवोभट ' : म्हणौनि दर्शना आले : भटोबासीं थोरि चर्चा केली : भटोबासीं निरुत्तर केलें : तेणें म्हणितलें :

' होति वेधवंती नागदेवोभट ' : तेव्हेळींसीचि सर्वसंगपरित्यागु करूनि भीक्षा केली : ॥ २३९ ॥

**मात्रा-शब्दु-समर्थन** :॥ वैयाकरणनिषेधें युक्तित्रयें निराकरणीं चतुर्युक्ति पर्यायें ईश्वरोक्ति ' **असतीपरी** ' मध्यें मात्रा शब्द केशवदेवो : पंडितांप्रति समर्थन :॥ हें यथाप्रती : ॥ २४० ॥

**हीराइ विरक्तां कसवटी म्हणणें** :॥ हीराइसें तियें पंडितबासांचीं : तियें भलतेथ भलतया चुकी सांघति : आचारु सांघति : भलतीये क्रीये थोरि कसकस करीति : तें आइकौनि भटोबासीं म्हणितलें : ' हीराइये विरक्ताची कसवटी गा : इचां कसीं उतरला तो वीरक्त ' : ॥ २४१ ॥

**भटो 'श्रृंघारिया कवी' कथन** : ॥ एकु दीसु काइसेयावरूनि तें नेणिजे : भटोबासीं कवीस्वरबासांतें म्हणितलें : ' भटो : तूं शृंघारीया कवीः' यैसें प्रसंसीलें : ॥ २४२ ॥

**वरवडाची क्रीया भितरा येइल म्हणणे** : ॥ एकु महात्मा तेणें असिका भिक्षुधर्म सांडिला : वेषु उतरीला होता : तवं एकिं म्हणितलें : ' हा धर्मापासौनि गेला ' : भटोबासीं म्हणितलें : ' निषेधु न सेवितां वेषु असे : तवं नाहीं गेला : वरवडाची क्रीया भितरा यइल ' : ॥ २४३ ॥

**विष्णुदास नामदेया पंडितमुखें वेधुसंक्रमण** : ॥ एकु दीसु नामदेव सींपा पंडितबासांसि भेटला : चर्चा केली : पंडितबासीं खंडिला : मग उपदेसु मागों लागला : परि नेदीतीचि : मग कृष्ण-अवतारावरि बुधि आणिली : मग तेणें ' **दिस गेले वायांवीण** ' यें पदें केलीं : ॥ २४४ ॥

**मान्यता : संग्रहीया पुरुषा शास्त्रसंवादा बैसों नेदा म्हणणे** : ॥ एकु दिसु कवणा प्रकरणावरूनि तें नेणिजे : भटोबासीं केसोपंडितादिकांतें म्हणितलें : ' मान्यता आणि जाणिवेया संग्रहो : हें जया असे : तो शास्त्रसंवादा बैसों नेदा गा ' : तें अवघेयां मानलें : ॥ २४५ ॥

**गंगातीर आचारनिष्ठें कन्यासूनदृष्टांतु कथनीं सासुरें अनुवादु** : ॥ केसोबासांचीया वासनावरूनि भटोबासीं म्हणितलें : ' वराड माहेर : गंगातीर सासुरें गा : येणेंकरूनि येथ जैसा धर्मु सीधि जाये : तैसा तेथ न वचे' : ऐसें सांघितलें : ॥ २४६ ॥

**म्हाइंभटदास्या 'होड घाली' म्हणणें** :॥ एकु दिसु भटोबासीं म्हणितलें : ' म्हाइंभटातें श्रीप्रभुदास्यावेगळें जो दाखवी : तयांसि मी '**महावाक्य**' वाखाणिन ' :। हें यथाप्रति :॥ हे स्मृति श्रीप्रभुगोसावी असतां ऋद्धिपुरीं जाणावी : चरीत्रीं मांडीतां न ये : म्हणौनि निंबा घातली :॥ २४७ ॥

**आचरतेया पुरुषा शाब्दींचि अपरोक्ष म्हणणें** :॥ एकु दिसु कवणा प्रकरणावरूनि तें नेणिजे : भटोबासीं म्हणितलें : ' आचरतया पुरुषा शाब्दींचि अपरोक्ष गा ' :॥ २४८ ॥

**वीशेष चरीतार्थी जीवु अवताराचा म्हणणें** :॥ एकु दिसु भटोबासीं म्हणितलें : ' वीशेष चरीतार्थ जालेयां मग जीवु अवताराचा : आणि अवतारु जीवाचा गा ' :॥ २४९ ॥

**वचनार्थ अन्यथात्वीं वचनपतीत म्हणणें** :॥ एकु दिसु भटोबासीं एका प्रकरणावरूनि म्हणितलें : ' वचनरूप परमेश्वर : तें जैं वचन अन्यथा वाखाणिजे : तरि तो तया वचनरूपा परमेश्वराचा पतीत बोलिजे : तो ईश्वरु तेणें दुरावीला गा ' :॥ २५० ॥

**घटीकेचीया जिज्ञासा अटनचरीत म्हणणें** :॥ एकु दिसु एकु महात्मे अटना निगाले : तयांतें भटोबासीं म्हणितलें : ' राहा : आजि अटना नको जावों : आजि धर्मवार्ता होइल ' : मग ते राहीले : तवं अपूर्व धर्मवार्ता जाली : मग तयांतें भटोबासीं म्हणितलें : ' घटिकेचीया जिज्ञासा तुझें अटन अवघेंचि चरीतार्थ होइल ' :॥ २५१ ॥

**अनुसरण निर्धारीं ईश्वरगति निर्वचु** :॥ एकु दिसु धर्मवार्तासमैं भटोबासीं म्हणितलें : ' तोंडि तांबुळ : माथां फुलें : यैसा उपभोगी अनुसरणा निगे आणि तेधवांचि सरे : तया नाचरतांचि ईश्वरगति गा ' : यावरि सामान्य स्त्रीचा दृष्टांतु वाखाणणे :॥ २५२ ॥

**केशवादिकां अनुद्यमीं होड अनुवादु** :॥ एकु दिसु केसोबास : पंडित-बास : राघोभट : शास्त्र संवादत होते : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : ' केशव : पंडित : रामातें शास्त्रसंवादेवीण जो उठितां : बैसतां रिकामेया दाखवील : तयासि होड सारीन गा ' : यैसें प्रसंसिलें : आणि एकत्र तीघांते सारिखेनि वर्तणें : उठितां बैसतां देखति : तेधवांही ऐसें म्हणति : ' एकि मूर्ति त्रये भागा : राम : पंडित : केशवद्या ' :॥ २५३ ॥

**नौगावीं महादाइसा देहावसान :** ।। महादाइसें नौगावीं होतीं : एकु दिसु तयांसि खांडूकनिमित्तें असक्ति उपनली : तें आइकौनि भटोबास निंबाहुनि सांभाळवेयां आले : भटोबासांसीं भेटि जाली : भटोबास काहीं उपाव करीत होते : तवं महादाइसीं म्हणितलें : ' नको गा नागदेया : मी वांचे ना ' : मग भटोबास न करीतीचि : मग एकु दिसु बहुत राहीलीं : भटोबासीं पुसिलें: ' रूपै : देवो आठवतो ' : ' हो नागदेया : आठवतो ' : भटोबासीं म्हणितलें : ' कैसा आठवतो आइ ' : महादाइसीं म्हणितलें : ' श्रीमुकुटावरि फुटा : वारीतुरंग वज्री घडित असति ' : म्हणौनि बेलोपुरींची क्रिडा सांघितली : यावरि भटोबासीं म्हणितलें : ' रूपै : देहपर्यंत उचीत स्मरण न चुकसीचि : पहिलेया दीसापासौनि सेवटील दीसपर्यंत देवो तो तुवांचि आठविला ' : आणि भटोबासांसि सुख उपनलें : येतुलेनि महादाइसां देहावसान जालें : नौगावीं निक्षेपु केला : भटोबासीं म्हणितलें : ' म्हातारी धर्मरक्षक : प्रीतिरक्षक : सुहृदत्वें दुःखनिर्वेदु ' : यैसें अनुमोदूनि दुःख केलें : मग निंबेयासि आले : ।।२५४।।

**हीराइसां सिक्षार्पण गौराइसां मार्गाभिमानु कथन :** ।। यें कवणे हीराइसें तें नेणिजे : परि वासनिकें : एकु दिसु उंबरी गौराइसें अटनवीशेषें तयासि भेटावेया गेलीं : तवं आंगणि चणयांचे गणंग वाळों घातले देखिले : मग गौराइसीं म्हणितलें: 'हें यैसें काइ हीराइये:' म्हणौनि सिक्षापीली : तें भटोबासीं आइकिलें : आणि म्हणितलें: 'महादाइसां मागां : गौराइयेसि मार्गाचा अभिमानु असे:' ।। २५५ ।।

**भटोबासां ज्वरागमनिं पंडितसय्या स्वीकारु :** ।। एक वेळ भटोबासांसीं ज्वरु आला : पंडितबास एकि पाटबाज विकत घेउनि आले : बरवे आंथुरीलें : भटोबासां म्हणितलें: 'भटो यावरि निद्रा करावी:' भटोबास उगेचि निजैले :।। २५६ ।।

**मार्गसिहावलोकनें ज्वरनिवृति :** ।। मग तिसरां दीसीं भटोबासीं म्हणितलें: 'आजि माझेया ज्वरासि कीती दीः' पंडितबासीं म्हणितलें: 'आजि तीसरा दिसु:' भटोबासीं म्हणीतलें : 'मज गोसावीं अधिकरण केलें : तरि जें म्यां पंडित : केशवद्यासि सांघितलें : तेंचि सेवटीये म्हातारीएसि सांघितलें : मज ज्वरु कां आला : तें मी नेणें ' : म्हणौनि सींहावलोकन केलें :

केसोबासीं म्हणितलें : 'भटो काहीं भये नाहीं कीं ' : भटोबासीं म्हणितलें 'ना गा पंडिता नाहीं :' येतुलेनि अवघेयांसि सुख जालें : मग भटोबासीं म्हणितलें: 'कव्हणि बोलों नको गा : उगेचि असा : मीं गोसावियांची लीळा आठवीनः' मग पंडितबासिं अवघेयांतें वारीलें: मग कैसें आठवीलें तें नेणिजे : निवांत उगेचि राहीले: आणि म्हणितलें : ' हा मी श्रीचक्रधराचा वानरा ': म्हणौनि आंग मोडूनि 'श्रीचक्रधरु' म्हणौनि थोरें शब्दें उठौनि बैसले : इतुलेनि निशेष ज्वरनिवृति जाली : केशव : पंडितांदिकां थोर सुख जालें : ॥ २५७॥

**पंडितीं स्वप्नश्रवण** :॥ एकु दिसु पंडितबासीं स्वप्न देखीलें: मढाबाहीर कोणिं खळीव साउला : मोकळे केश: यैसी स्त्री एकि मढाबाहीरि : **पौळीचां** कोणिं : 'आतां काइ करीन वो :' यैसें पुनःपुनः शब्दीं रडों लागलीं : ते शब्द पंडितबासांचां कानिं पडति : 'कैसे काइ पां देखीलें ' : म्हणौनि गजबजौनि उठीले : बैसले : तवं ते शब्द कानिं पडतचि होते : मग तेथ जाउनि पाहीलें : तवं प्रकासु वेखीला : येर कोण्हीं नाहीं : मग येउनि बैसले : उदयांसीचि भटोबासांपुढें सांघितलें : 'तरि भटो म्यां कैसे काइं देखीलें :' यावरि भटोबासीं म्हणितलें: 'आतां मज गोसावियांचा हाकारा येइलः ते ये स्थळींची देवता : तुम्हां सुचीक दाखवीलें ': तवं अवघेयांसि दुख वाटलें : ॥ २५८॥

**ज्वरागर्मांनं भटीं गुरुकुळीं क्षेमानुवादु** :॥ एकु दिसु भटोबासीं म्हणितलें : 'आजि मज गोसावियांचा हाकारा येइल गाः' तवं पंडितमुख्य : अवघे गजबजीले: कोण्ही काहीं निरुवणुकेचें पुसे : भटोबासीं म्हणितलें : 'हें यैसें मज पुसों नको : काहीं मज '**निर्वचन**' : '**महावाक्य**' : '**उधरणी**'चें पुसा :' मग पंडित पुसति : भटोबास निरूपिति : मग केतुलेनि काळें म्हणितलें: 'पंडिताः आतां पुसों नको : आतां अति सम्येक वर्तत असे : आतां तुम्हां पांचास्या गुरुकुळातें हात जोडूनि म्हणत असें : गोसावियांचा व्यापारु चालवितां कोण्हा माझें वेकास गेलें असैल : तरि तुम्हीं समस्तीं क्षेमा करावी ' : यैसें म्हणौनि जयें केले : ॥ २५९॥

**भटोबासां ईश्वरदर्शन** :॥ मग भटोबासीं म्हणितलें : 'आतां कोण्ही बोलों नको : रडों नको : अवसान जालेयां पाहार दीं हात लावूं नको : आतां

मी श्रीचक्रधरा बाइसांचेया देवातें आठवीतों ': ऐंसें म्हणौनि निजैले : आणि निगाले : ।। मग वासनिकीं वीमान केलें : विमानिं ताट-तांबीये लाविले : वोवाळनिया घातलीया : वाद्यें लावीलीं : यैसें गंगेचिये थडिये आणिले : योगुसंस्कारु केला : ।। शके ।।१२२४।। सुभकृत नाम संवत्सरे :।।: भाद्रपद वधि द्वादसि : भटोबासांसि ईश्वरदर्शन जालें : बतीसां वर्षां अनुसरण : च्यारि वर्षे गोसावियांचे सन्निधान : त्यांतु सा मास श्रीप्रभूचां सन्निधानि : मग गोसावियां मागां श्रीप्रभूचां सन्निधानि वर्षे १४ : मागां वर्षे १६ : यैसें सासटि वर्षे राज्य केलें : लीळादार्निचें आयुष्य ३४ वर्षे ।।२६०।।

□ □ □

# टीपा

१. या पहिल्या स्मृतीत 'स्मृतिस्थळा'चा चरित्रविषय नागदेव किंवा भटोबास यांचे चक्रधरांच्या 'उत्तरापंथें' गमनापर्यंतचे चरित्र अगदी थोडक्यात सांगितले आहे. **गोसावी** म्हणजे श्रीचक्रधर, महानुभाव पंथाचे संस्थापक. त्यांच्या परिवारात **'अनुसरले'** (म्ह. संन्यासदीक्षा घेतलेले), **'बोधवंत'** (म्ह. केवळ उपदेशी) व **'दर्शनीये'** (म्ह. दर्शनेच्छु) अशा तीन प्रकारचे भक्त होते. त्यांपैकी नागदेव किंवा भटोबास हे सर्वश्रेष्ठ असून त्यांच्या ठिकाणी **'प्रवृत्तीचा विशेष,'** म्ह. पंथविस्ताराचा प्रवृत्तिधर्म होता. **कां जे मुळीहूनि घडीले मढीले:** कारण भटोबासांना चक्रधरांनी प्रथम-पासूनच त्या दृष्टीने तयार केले होते. **दादोस** (किंवा रामदेव) : चक्रधरांचा एक अहंमन्य भक्त, व नागदेव–कुटुंबाचा पूर्वाश्रमीचा गुरु. त्याच्यामुळेच भटोबास प्रथम चक्रधरांच्या भेटीसाठी श्रीनगरास (म्ह. सिन्नरास) गेले. **सा भेटी:** भटोबास चक्रधरांना एकदम 'अनुसरले' नाहीत. तर ते ईश्वरी अवतार आहेत अशी पूर्ण खात्री झाल्यावरच त्यांनी त्यांचे शिष्यत्व पतकरले. **श्रीप्रभू :** ऋद्धिपूरचे गोविंदप्रभू; चक्रधरांचे गुरु. भटोबासांना चक्रधरांनी त्यांच्याकडे सहा महिने सेवेसाठी पाठविले होतें. त्यामुळे भटोबासांचे एकूण चार वर्षांचे चक्रधरसान्निध्य तितके कमी होऊन प्रत्यक्षात ते 'आउठ', म्ह. साडेतीन वर्षांचे झाले. **आचार्य करूनि...**चक्रधरांनी जातांना भटोबासांना आपल्या मार्गाचे आचार्यपद दिले होते व महादाइसेला त्यांच्याकडे सोपविली होती ("आतां म्हातारी तुम्हांसि लागे कीं गा:" ली. उत्तरार्ध ४७१, ४७७). **शके ११९४ :** चक्रधरांचा प्रयाणकाल. डॉ. कोलते यांच्या मताने तो ११९६ असा आहे.

२. या स्मृतीत चक्रधरांच्या विरहाने दुःखाकुल झालेल्या भटोबासांचे वर्णन आहे. **बीजें करणे :** जाणे; गमन करणे. **अवस्था प्रकटणे:** दुःखाने विमनस्क होणे. **माहादाइसे :** भटोबासांची चुलत बहीण व 'धवळचां'ची कर्त्री.

**गंगातीर**: गोदाकाठ. **परमेश्वरपुर**: ऋद्धिपुर. **श्रीप्रभुगोसावी**: गोविंदप्रभू.

३. भटोबासांची चक्रधरनिष्ठा त्यांच्या तोंडून 'मी गोविंदप्रभूस ओळखत नाही' असे वदवते. पण स्वत: चक्रधरांनींच जातांना आपणास त्यांच्याकडे सोपविले होते याची आठवण करून देताच ते त्यांच्या आश्रयाला जाण्याचे मान्य करतात. ("तुमतें यासि नीरोविलें : आणि हा श्रीप्रभूसि नीरोविला:' ली. उत्तरार्ध ४८०)

४. **पांचपिंपळी** : रिधपुरातील गोविंदप्रभूंचे एक क्रीडास्थान. **आवो मेला जाए**: गोविंदप्रभूंच्या तोंडचा एक शिवीवजा वाक्प्रचार. **श्रीचांगदेओ राउळ**: चक्रधरांचेच दुसरे नाव. या चांगदेव राउळांनीच प्रधानपुत्र हरपाळदेव याच्या मृत शरीरात प्रवेश करून नवीन अवतार स्वीकारला. त्यामुळे चक्रधर त्या नावाने ओळखले जात. **अवघींचि भक्तिजनें आलीं**: भटोबासांच्या पाठोपाठ चक्रधरांची सर्व भक्तमंडळी रिधपुरास येऊन गोविंदप्रभूंच्या आश्रयाने राहिली. कारण जातांना चक्रधरांनीं 'आतां तुम्हांसि गोविंदीं गति' असे सर्वांना सांगितले होते. (ली. उत्तरार्ध ४८५).

५-८. गोविंदप्रभू शके १२०९ मध्ये निधन पावल्यावर ही सर्व भक्तमंडळी चक्रधरांच्या निवासाने पुनीत झालेली गोदाकाठची ठिकाणे पहात पहात डोंबेग्राम (सध्याचे कमालपूर, जि. नगर) येथे आली. 'एथिचेया संबंधा गेले तितुके ओटेगोटे तुम्हां नमस्करणीय कीं गा' या चक्रधरांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची प्रत्येक संबंधी वस्तू भक्तजनांना वंद्य होती. त्यातही **बाइदेव** ('पूजावसरा'चे कर्ते) हे भावनाप्रधान असल्याने त्यांना या 'संबंधी' वस्तू पाहून विशेष दुःख होई. (६) **विजन करणें** : रानात ध्यानाला जाणें. **राजमठ** : डोंबेग्रामचे नरसिंहाचे देऊळ. (८) या देवळात चक्रधरांचे वास्तव्य दीर्घकाळ झाल्याने भटोबासांनी त्याच्या लाकडाच्या प्रसादवस्तू तयार करवून त्या भक्तजनांना दिल्या. **चक्रपाणि** : भटोबासांचा नातू. **छिन्नस्थळी काढिली** : 'छिन्नस्थळी' हे डोंबेग्रामच्या नदीकाठचे चक्रधरांच्या वास्तव्यानें पुनीत झालेले एक खडकाळ स्थान. त्या खडकाचे कपचे काढून ते भक्तजनांना 'संबंधी पाषाण' म्हणून पूजेसाठीं दिले.

९. **बेलोपुर** : चक्रधरांनी जेथून अखेरचे प्रयाण केले ते स्थान (जि. नगर). बाइदेवास त्याचे दर्शन दु:सह होईल असे वाटल्यामुळे भटोबासांनी तेथे जाण्याचे टाळले.

१०. **आचारविचार लक्षणें** : चक्रधरांच्या सूत्रपाठातील आचार व विचार या प्रकरणांचे विवेचन.

११. गोविंदप्रभूना एकदा विवाहाची प्रवृत्ती होऊन रिधपूरच्या ईश्वर-नायकाची मुलगी वधू म्हणूनही ठरली. पुढे प्रत्यक्षात विवाह झाला नाहीं व ती मुलगी अविवाहित राहिली, तरी तिच्या बापानें गोविंदप्रभूंच्या पश्चात् त्यांच्या भक्तजनांकडून तिची वाटणी मागितली. ते प्रकरण व्यवहारात, म्हणजे न्यायालयात गेले व निवाडा ईश्वरनायकाच्या विरुद्ध झाला. तरी-सुद्धा गोविंदप्रभूंना एकदा त्या मुलीशीं लग्न करण्याची प्रवृत्ती झाली होती हे ध्यानात घेऊन म्हाइंभटांनी पुढे तिला वाटा दिला. **म्हाइंभट** : 'लीळा-चरित्र' कार. **आउसे** : चक्रधरांची एक निष्ठावंत शिष्या.

१२–१७. **केसोबास** : सूत्रपाठ, दृष्टान्तपाठ व मूतिप्रकाश या ग्रंथांचे कर्ते. (१३) केसोबासांनी पुन्हा संसारात यावे म्हणून त्यांच्या आप्तांनी पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्यांचे वैराग्य प्रखर असल्याने ते कोणत्याही प्रलोभनास वश झाले नाहीत. **तेथ दृष्टीची राखणें घालीति** : गोदेच्या काठावर दक्षतेने ध्यान करीत बसत. **रत्नमाळास्तोत्रें** : 'लीळाचरित्रा' चा संस्कृत श्लोकबद्ध अनुवाद. (१५) **उद्धरण** : 'सूत्रपाठा' तील एक प्रकरण. **नको गा केशवदेवा** : भटोबासांचे हे प्रसिद्ध वचन त्यांची सामान्य जनांविषयींची आस्था व प्रेम दर्शविते. (१६) **शास्त्रप्रकरणान्वय** : 'सूत्रपाठा' तील पहिल्या नऊ प्रकरणांची जुळणी. (१७) **दृष्टांतप्रकरण** : यात चक्रधरांनी आपली तत्त्वे विशद करण्यासाठीं दिलेले ११४ दृष्टांत आहेत. ते एकत्र करून त्यांवरील '**दार्ष्टान्तिक**' केसोबासांनी स्वत: रचिले. हे प्रकरण 'दृष्टांतपाठ' म्हणून प्रसिद्ध असून ते 'सूत्रपाठा' चे दहावे प्रकरण म्हणून समजण्यात येते. एकंदर 'सूत्रपाठा' ची जुळणी केसोबासांनी भटोबासांच्या साहाय्याने कशी केली त्याचा इतिहास या चार स्मृतींतून सांगितला आहे.

१८. **ज्ञानभास्कर** : लक्ष्मीधरभट वाडेगावकरकृत १२४ श्लोकांचे संस्कृत स्तोत्र. (पहा : रेसाइड–कृत ग्रंथसूची, BSOAS, २३·३).

१९. **चीमुटीलेयां** : देहदुःख सहन करवते तो योगभ्रष्ट. भटोबास म्हणतात, ही स्थिती विरळा.

२०. **अटना जाणे** : रानावनात भ्रमंतीसाठीं जाणे. **वोखटी क्रिया** : मारहाण करणें. **ज्वरो वा शस्त्रो वा** : या प्रसंगातून सुटण्यास एक शस्त्र तरी किंवा ज्वर आल्याचे सोंग तरी उपयोगी पडेल. (वास्तविक हे वाक्य तितके अर्थपूर्ण नाहीं. पण ते ऐकून हे दोघेजण कोणी विद्वान आहेत असा समज होऊन त्यांची सुटका झाली.)

२१. **इंद्रभटांना** (ते 'दर्शनीये' होते) चक्रधरांचा उपदेश होता व **काळे कृष्णभट** हे भटोबासांचे शिष्य होते. म्हणून त्या दोघांत एक प्रकारे गुरुशिष्यांचे नाते मानावयाचे. **श्रमनिवृत्तिचेनि वचनें** : दोन पथीयांनी भेटल्यावर एकमेकांची 'श्रमनिवृत्ति' करावी असे 'सूत्रपाठा'त म्हटले आहे (आचार, १३०). त्या सूत्रानुसार इंद्रभटांना काळे कृष्णभटांचे पाय धुण्याचा अधिकार होता.

२२. '**प्रसादें प्रसाद बांधिजताये**' : 'प्रसादाचे वस्त्र' म्हणजे चक्रधरांचे वस्त्र, आणि भटोबास म्हणजे तर त्यांचा मूर्तिमंत प्रसाद ! ("गोसावीं नागदेवो आपणया समान केला :" ली. उत्तरार्ध ४७१). त्यामुळें महादाइसेचे करणे आक्षेपार्ह होत नाहीं.

२३. **आपलो** हा महादाइसेचा भाऊ. त्याला चक्रधरांचा सहवास लाभला असला तरी तो हीन दैवतांचीच भक्ती करीत असे. तरीपण त्याच्या मनात शेवटी शेवटी परमेश्वरभक्ती निर्माण होईल असे चक्रधरांनी महादाइसेपाशींच म्हटले होते ("सेवटीं सेवटीं तुम्हांचिपासौनि होइल :" ली. उत्तरार्ध, ५.). स्वामींची ही भविष्यवाणी त्यांच्या पश्चात् खरी ठरली व आपलो त्यांच्या मार्गात आला.

२४. **अर्धोदक** : पूर्ववयात संन्यासदीक्षा घेणे म्हणजे सर्व संसारावर उदक सोडणे. अर्थात् आयुष्याच्या अखेरीस ती घेणे म्हणजे अर्धोदक सोडणे होय.

२५. **माहादेवोबा** : एकदा गोविंदप्रभूंनी याचा हात धरून ' वेढे केले ', म्हणजे फेऱ्या घातल्या. तेव्हापासून त्याला " देवतासंबंधीं माहादेवोबा " असे म्हणू लागले.

२६. चांगदेवभट सात वासनिकांच्याकडे जेवला; पण शेवटी त्याने भिक्षान्नच मागितले. म्हणून तो ' सूचक ', म्हणजे जाणता. कारण, " भिक्षा मागौनि नदीचां तीरीं भोजन कीजे : " असा चक्रधरांचा आदेश होता. (सूत्रपाठ, आचारमालिका ५९.)

२८. " तुम्हां बोडी गंगा समानचि होआवी कीं गा : " (सूत्रपाठ-आचार ११५.) पण हे तत्त्व स्वत:साठी आहे; इतरांच्या संबंधात भेदाभेद केलाच पाहिजे.

३०. **सरीर संपादिलें** : अंग सुजले. **माहात्मावेषु** : याविषयी ' अज्ञात-स्मृती ' तील पुढील तपशील श्री. वा. ना. देशपांडे यांनी दिला आहे :— "याउपरि भटोबासीं म्हणीतलें: 'आतां तीरुपतीया सीवावीया : धौ घालावी : काठीये कौपीन बांधावा : कंथा सीवावीया : आंचळे नेसावे : यैसा वेखु धरावा : मग तैलागौनि वस्त्रा गेरु घातली : " यावरून ' असन्निधान वेष ' (म्हणजे चक्रधरांच्या पश्चात्) भगवा होता असे वाटते.

३२. **पांचैं नामिं** : महानुभावांच्या पंचकृष्णांची नांवे (१. श्रीकृष्ण चक्रवर्ती; २. श्री दत्तात्रेयप्रभु; ३. श्री चांगदेव राउळ; ४. श्री गुंडम राउळ; ५. श्री चक्रधर.)

३३. 'झाडातळि विजन कीजे' असे चक्रधरांचे सांगणे होते (सूत्रपाठ, आचारमालिका ४३). त्यानुसार भटोबास साकाईला रानात जाऊन ईश्वर-स्मरण करण्यास सांगतात. **बोविया** : यावरून तिचा मुलगा भक्तिहीन असावा असे दिसते.

३४. भटोबास येथे चक्रधरांच्याच भीक्षाविषयक सूत्रांचा अनुवाद करीत आहेत. उदा०, " वोळखतेयाचेया घरा न वचावे : ।। तोरणमंडळा-चेया घरा न वचावे : ।।" इ० (सूत्रपाठ, आचार ८१–९१.)

३६. **रूपदेया:** भटोबासांचे शिष्य. **मिठाची पीसवी:** " मीठाचा खडा आदिकरौनि विखो: " असे चक्रधरांचे वचन आहे (सूत्रपाठ, आचारमालिका २५३).

३७. **महात्मा** हा 'अनुसरलेला' असतो, तर **वासनिक** हा केवळ उपदेशी, म्हणजे संन्यासदीक्षेची इच्छा धरणारा असतो. म्हणून या दोघांनी एकत्र 'खानपान' करू नये. '**विषयाचियें एकासनीं न बैसावे :** " (सूत्रपाठ, आचार १४).

४०. '**असतीपरी**' म्हणजे 'कसे आचरण करावे' यासंबंधीचे चक्रधरांनी प्रयाण करण्यापूर्वी भटोबासांना केलेले निरूपण. त्यातील पहिलेच सूत्र 'विकारविकल्पशून्य (असावे)' असे आहे. अर्थात् मानसन्मानादि गोष्टी त्यांना वर्ज्य होत्या.

४१. महात्म्याचे मुख्य ध्येय ईश्वरप्राप्ति. त्यात व्यत्यय येईल अशा प्रकारची निरर्थक कामे करीत न बसता त्याने आपला प्रत्येक क्षण परमार्थात घालवावा. तुळा 'रिकामा जाऊं नेदी क्षण।' (रामदास)

४२. '**पथि शूद्रवदाचरेत्**' : प्रवासात नित्यनेम नाही, तर आपद्धर्म पाळावयाचा.

४४. **कीर्तीचें वैराग्य** : म्हणजे केवळ लौकिकासाठी धारण करावयाचे वैराग्य. पण केवळ आळसात काळ घालविण्यापेक्षा ते चांगले. कारण ते अंगवळणी पडल्याने पुढेमागे ते अंगी बाणण्याची शक्यता असते.

४५. **अभ्यागत केलें** : भोजनास बोलाविले. **वैराग्याचेनि भरलेपणें** : वैराग्याच्या अहंकाराने एक महात्मा भोजनास गेला नाही व जे गेले त्यांचा उपहास करू लागला. **प्रीतीचें प्रमाण** : " तुम्ही अच्युतगोत्रीय कीं गा: तुम्हां परस्परें परमप्रीति होआवी : " अशी चक्रधरांची शिकवण होती. (सूत्रपाठ, आचार १३६). वरील महात्म्याचे करणे याविरुद्ध झाले. **एकु सेवित जाये** ... विषयसेवन व विषयत्याग ही दोन्ही घातक ठरू शकतात (सूत्रपाठ, आचरमालिका २६.)

४६. मुलीला जसे माहेर–सासर दोन्ही आवश्यक, किंवा **जासलवट,** म्हणजे स्वैंपाकातील पळी जशी सर्व पदार्थांत घालतात, त्याप्रमाणे साधकाने

नित्य-नैमित्तिक दोन्ही विधी पाळावे. **सेनपुंजी** जशी अहमहमिकेने शेण गोळा करते, त्याप्रमाणे साधकाने देवाचे दास्य करावे.

४७. साधकाचा नित्यविधि म्हणजे अटन, विजन, प्रसादसेवा, ईशचिंतन इत्यादि व नैमित्तिक विधि म्हणजे प्रसंगोपात्त गुरुबंधूंची सेवा-शुश्रूषा इत्यादि. येथें भटोबास नैमित्तिक विधीचे महत्त्व सांगतात. तो पाळल्यामुळेच त्यांना साडेतीन वर्षांत चक्रधरांकडून जे मिळाले ते भांडारेकार नीळभट ('एकांका'त भेटलेला पहिला शिष्य) याला सोळा वर्षांतही मिळाले नाही. कारण त्याच्याकडून नैमित्तिक सेवा घडली नाही. **जैसें कोथळेनि केलें श्रीप्रभूचें** : कोथळा (अंगाने स्थूल होता म्हणून हे नाव) याने श्रीगोविंदप्रभूंचे दास्य जीवेभावे केले (पहा : गोविंदप्रभु-चरित्र, लीळा १९३-१९८). **अधिकरण** म्हणजे नेमलेला आचार्य, येथे स्वत: भटोबास.

४८. "अधिकरण भज्य होए : पूज्य होए ": (आचारमालिका ३५) व "अधिकरणाते अधिकरौनि परमेश्वरुचि उद्धरीति " (विचार ११३) अशी चक्रधरांची दोन सूत्रे आहेत. त्यांतील आशय असा, की अधिकरणाच्या, म्हणजे आचार्याच्या मुखाने प्रत्यक्ष परमेश्वरच बोलत असतो. म्हणून त्याचा शब्द प्रमाण.

४९. **भीक्षा देणे** : संन्यासदीक्षा देणे, मार्गात घेणे.

५१. सूत्रपाठाच्या आचार भागातील "गडींसिडीं असावें" व " हाळियां पाळियां असावे " या दोन सूत्रांवर (३५, ३६) हे भाष्य आहे. त्यांतील गडी, सिडी, हाळी, पाळी, पुर, पाटण, गाव व गव्हाण या शब्दांतील कल्पना भटोबास स्पष्ट करीत आहेत.

५२. **छर्दोबा** नावाच्या एका चक्रधरशिष्याची विरक्ती छर्दितान्न, म्हणजे ओकून टाकलेले अन्न, खाण्यापर्यंत गेली होती. त्यामुळेच त्याचे नाव ' छर्दोबा ' असे पडले. पण तोच पुढे संसार थाटून त्यात इतका रमला, की चक्रधरांच्या नावाचाही त्याला विसर पडला. सारांश, आयुष्य संपेपर्यंत कोणीही स्तुतीस पात्र नसतो.

५३. **अदृष्टार्थी** म्हणजे मुमुक्षु, मोक्षाची इच्छा करणारा. त्या शूद्र शिष्याचे वर्तन त्याच्या मुमुक्षुत्वाला साजेसेच झाले.

५४. **हिराइसा** ही दामोदरपंडितांची ('वच्छहरण'कर्ते) बायको. प्रथम ती पंथात आली व दामोदरपंडित मागाहून आले. (पुढे स्मृ. ५८ पहा.) **'श्रवण'** म्हणजे केवळ उपदेश ऐकणे व **'अनुसरण'** म्हणजे संन्यासदीक्षा घेऊन पंथात प्रविष्ट होणे.

५६. रामदेव वयाने लहान असूनही त्याने भटोबासांकडून दीक्षा घेऊन खाण्यापिण्याविषयी अत्यंत कडक असे व्रत स्वीकारले ( **"तेहीं अत्यंत परीछेदु केला:"**). प्रत्यक्ष भटोबासांनी आग्रह करूनही त्याने आपले भीक्षाव्रत सोडले नाही. ते पाहून इतरांना आश्चर्य वाटले; पण भटोबास मात्र त्याचा निग्रह पाहून मनातून संतोषले. **परतारकु** : हा शब्द येथे 'घातकी' या विरुद्धार्थाने वापरलेला आहे. भटोबास म्हणतात, "मी काय दुसऱ्यांचे कल्याण (म्ह. अकल्याण) करणारा आचार्य आहे काय?" त्यांच्याकडे पंथाचे आचार्यत्व सोपवितांना चक्रधरांनी हेच उद्गार काढले होते (ली. उत्तरार्ध ४७७).

५७. भटोबास निरूपणात चक्रधरांच्या 'निजैल्या-बैसल्या', म्ह, संबंधी स्थानांची महती सांगत होते. तरुण रामदेवाला त्यात गोडी वाटेना. म्हणून त्याने विरोध दर्शविला. त्यावर भटोबासांनी "माझ्याबरोबर या ब्रह्मविद्येच्या दाट झाडीत दोन पावले या; मग पुढे सुखाचे साम्राज्य लागेल" असे म्हणून त्याला आंधळा व पांगळा यांची गोष्ट सांगितली. तुळा : "एकएका करूं साहय। अवघे धरूं सुपंथ" (तुकाराम)

५८. **"जिये चुलीची खीर"** जेथे आपण कर्तेपणाने वावरलो तेथील कर्तेपण दुसऱ्याकडे गेल्यावर आपली पूर्वीची किंमतही राहात नाही, या मानवी व्यवहाराची आठवण करून देऊन हिराइसा आपल्या नवऱ्याला प्रपंचातून पंथात आणते. ही हिराइसा मोठी कर्तृत्ववान निघाली. तिला संपूर्ण 'लीळाचरित्र' मुखोद्गत होते.

५९–६०. **जोगिया-जंगमाचें मरे** : जोगीजंगमांना त्यांचे शारीरिक सुखस्वास्थ्य किंवा दुखणेबाहाणे पाहणारे त्यांच्यावाचून दुसरे कोणी नसल्याने भटोबास अंगात ताप असलेल्या रामदेवाला भ्रमंतीस जाण्यापासून परावृत्त करू पहात होते. पण तो म्हणाला, "मी कोणाचे ऐकावे?

तुमचे, की शरीराकडे दुर्लक्ष करून 'नित्याटन करावे' (सूत्र. आमा. १३२) असे सांगणाऱ्या चक्रधरांचे ?" **दृष्टीचीये आळवीं राखा** : त्याच्यावर लक्ष ठेवा, त्याची काळजी घ्या.

६१. **एकु रूं रूं करी**...वरील स्मृतीतील अटनास निघालेल्या रामदेवापुढे दामोदरपंडित धावे, चौपद्या वगैरे म्हणून 'रूं रूं' करीत व केसोबास प्रवचन करून 'ठकठक' करीत. रामदेवास त्यांचे हे करणे मुळीच आवडत नसे. तेच माइदेवाकडून चक्रधरांच्या लीळा ऐकून मात्र त्याचे अंतःकरण निवले व त्या समाधानात त्याने देह ठेवला. **महावाक्य** : 'सूत्रपाठा'-तील एक भाग. त्यात "जीवप्रपंचव्यतिरिक्त सच्चिदानंदस्वरूप परमेश्वरु एकु आति : तो सर्वशक्तियुक्त" हा महासिद्धांत आला आहे. **निक्षेप करणे** : मृतास पुरणे. **काहाळेकांड पडिले** : मरण आले.

६३. **आपोसन धरिलें** : आपोष्णी घेऊन भोजनास प्रारंभ करण्याचे थांबविले.

६४. **नुपलखत** : कळू न देता.

६५. **साधे** ही चक्रधरांची एकनिष्ठ शिष्या. तिचेच दुसरे नाव एल्हो किंवा येल्हाई. **संग्रहो भंगैल** : व्रतस्थपणा मोडेल. **राहावा करीति** : अधून-मधून जाऊन रहात, वसती करीत.

६७. **पंडितबास** : दामोदर पंडित. **यत्क्रियते तत्कर्म** : ही कर्माची व्याख्या 'सूत्रपाठा'च्या 'उद्धरण' भागातच आहे (उ. ४६). **परावाचा** म्हणजे परमेश्वराची वाचा. "चैतन्योद्भव परा : यंत्रोद्भवा वैखरीः" (सूत्रपाठ, विचार १६). '**जवं जवं जाणता...**' सूत्रपाठ, विचार १६४. तुळा : To know that one does not know is to know.

६९–७०. हा 'फुटा' (वस्त्रविशेष) चक्रधरांनी इंद्रभटांना प्रसाद म्हणून दिला होता (पहा– "इंद्रभटां फुटा विधानपूर्वक प्रसाददान :" ही लीळाचरित्राच्या उत्तरार्धातील १५ वी लीळा). या फुटयाची काळजी भटोबास किती घेत ते ७० वी स्मृती सांगते. **म्हाइंभटासारीखे पात्र** : म्हा. सारखा श्रेष्ठ महात्मा.

७४ : **कवीश्वर** : भास्करभट बोरीकर. **सत्वा नैएचि** : सात्त्विक भाव उत्पन्न होईना; प्रसन्नता वाटेना. **बीजन न पळे** : एकान्तात जाऊन ईशचिंतन करण्याचा हेतू सफळ होईना.

७५. **धाकुटेचि परायेचे** : वयाने लहान. **माझेनि निमित्तें** : माझ्यामुळे. **पोटीं सुरीं सोये** : जीव दिला असता. **पुरुष होउनि** : योगभ्रष्ट म्हणून.

७६–७७. हीं **उंबरीची गौराइसा** इंद्रभटपत्नी गौराई हिच्यापासून निराळी आहे. **कोथळोबास** : स्मृ. ४७ पहा. **असतीपरी** : स्मृ. ४० पहा.

८०. **वृद्धानुक्रमें वर्तावे** : भटोबासांच्या 'भटमार्गा'त एक प्रकारची शिस्त किंवा नियमबद्धता होती, श्रेष्ठ-कनिष्ठ किंवा वडील-धाकटा हा भेद होता. जो प्रथम 'अनुसरला' तो वडील ठरून त्याला त्याप्रमाणे स्थान मिळत असे, या गोष्टीची ही स्मृती सूचक आहे.

८२. '**हें माहात्मेपण विकणें म्हणा**' : आपले महात्मेपण विकून, म्हणजे त्या नावावर मिळालेली वस्तू आपणांस नको.

८३–८७. या पाच स्मृती तत्कालीन राजकीय उलाढालीच्या द्योतक आहेत. त्यातील (८३) **दीलीचा सुलतान** म्हणजे बहुधा मलीक काफूर असावा. त्याने दक्षिणेवर शके १२३२ त दुसरी स्वारी केली. **अवघें मंडळ हालवलें** : 'मंडळ' म्हणजे देश, अर्थात् महाराष्ट्र देश (पहा "ऐसें युगीं परि कळी। आणि महाराष्ट्र मंडळीं। श्रीगोदावरीच्या कूलीं। दक्षिणीलीं॥" ज्ञानेश्वरी १८. १८०३). **गोसावीं संबंधु वारीला असे** : भटोबास आपली आई आबाइसे हिला भावाच्या, म्हणजे वैजोबाच्या घरी राहण्यास सांगतात तेव्हा ती चक्रधरांच्या 'संबंधियांचा संबंधु तो विशेषतां त्याज्य :' (सूत्र० आचार १) या वचनाची अडचण सांगते. ज्याने एकदा संसारत्याग करून पंथाची दीक्षा घेतली त्याने पुन्हा तिकडे वळून पाहू नये असा स्वामींचा स्पष्ट आदेश होता. **हे एकि अडणि** : आपद्धर्म म्हणून संबंधी जनांच्या गावी जाण्यास हरकत नाही. **देसु उचलला होइल** : सर्वत्र धामधूम माजून देश उध्वस्त होईल. **गुढयासरिसें यावें** : 'गुढी' म्हणजे पताका, निशाण. शरणागतीचे किंवा शांततेचे द्योतक निशाण लागल्यावर तुम्ही परत यावे. (८४) **तुज गोसावी वरद असति** : साधे किंवा येल्हो या शिष्येला

चक्रधरांनी एका प्रसंगी "न भीया साधे हो: तुम्हांवरि एथौनि वाजत वारा धरीजैल:" असे आश्वासन दिले होते (ली० उत्तरार्ध १५२). त्याची तिला आठवण देऊन भटोबासांनी आपल्यापैकी अशक्त मंडळींना साधेच्या जवळ परळी येथे ठेवले व इतरांना घेऊन ते पुढे गेले. (८५) **माझीया स्मरणा खंडना नव्हेचि** : इतक्या धामधुमीतही भटोबासांच्या ईश्वरस्मरणात खंड पडला नाही. त्यामुळे, त्यांच्या ईश्वरनिष्ठेमुळे त्यांचे कुळ यवनांच्या तावडीतून वाचलें. (८६) **मी वर्ते तवं मऱ्हाटें वर्तैल** : भटोबासांची ही भविष्यवाणी बरोबर असेल तर ज्या अर्थी शके १२३२ मध्ये रामदेवराव यादवाच्या निधनसमयी भटोबास जिवंत होते (स्मृ. १४९, कामाइसेचा अग्निप्रवेश), त्या अर्थी त्यांचे निधन त्यानंतर व शके १२३४ मध्ये यादवांचे राज्य नष्ट झाले त्यापूर्वी झाले असणार. त्यांच्या हयातीत यादवांचे राज्य बुडाले नाही एवढे निश्चित आहे. म्हणून पुढे २६० व्या स्मृतीत दिलेला त्यांचा शके १२२४ हा निधनकाळ मान्य करता येत नाही. **संतामहंतांचेया वोखटेया प्रवर्तला** : चक्रधरांचा शेवटी वध झाला व त्यात रामदेवराव यादवाचा हात होता या मताला पोषक असा हा उद्गार आहे. **हे हातवणी** : हा नुसता प्रारंभ आहे; मुख्य भाग अजून पुढेच आहे.

८९–९१. पंडितबास म्हणजे दामोदर पंडित. त्यांना गाण्याचे अंग चांगले होते. त्यामुळे ते 'विजना'त म्हणजे रानात जाऊन मोकळेपणाने धावे, चौपद्या वगैरे गात बसत. भटोबासांनी प्रथम त्यांना गाण्याची बंदी केली. कारण '**गीत विखो**' असे चक्रधरांचे सांगणे होते (सूत्रपाठ, आचारमालिका १७१). (९०) परंतु पुढे एकदा त्यांना भावपूर्ण रीतीने देवाची करुणा भाकतांना पाहून भटोबासांनी ही बंदी दूर केली व त्यांना गाण्याची अनुज्ञा दिली. तसे करतांना पूर्वी चक्रधरांनी अशीच देमाइसा नावाच्या शिष्येला ती निर्विकार असल्यामुळे गाण्याची अनुज्ञा दिली होती (लीळाचरित्र, उत्तरार्ध ३००) त्या प्रसंगाचा निर्वाळाही भटोबासांनी दिला. **श्रुति** : श्रीचक्रधरांचे वचन म्हणजे 'श्रुति'. (९१) इतकेच नव्हे तर पंडितांचे गाणे म्हणजे आपल्या मार्गाचे '**हाकारें**' ( = बोलावणे ) आहे असे गौरवाचे उद्गार भटोबासांनी काढले.

७४ : **कवीश्वर :** भास्करभट बोरीकर. **सत्वा नैएचि :** सात्त्विक भाव उत्पन्न होईना; प्रसन्नता वाटेना. **बीजन न पळे :** एकान्तात जाऊन ईशचिंतन करण्याचा हेतू सफळ होईना.

७५. **धाकुटेचि परायेचे :** वयाने लहान. **माझेनि निमित्तें :** माझ्यामुळे. **पोटीं सुरीं सोये :** जीव दिला असता. **पुरुष होउनि :** योगभ्रष्ट म्हणून.

७६–७७. ही **उंबरीची गौराइसा** इंद्रभटपत्नी गौराई हिच्यापासून निराळी आहे. **कोथळोबास :** स्मृ. ४७ पहा. **असतीपरी :** स्मृ. ४० पहा.

८०. **वृद्धानुक्रमें वर्तावे :** भटोबासांच्या 'भटमार्गा'त एक प्रकारची शिस्त किंवा नियमबद्धता होती, श्रेष्ठ-कनिष्ठ किंवा वडील-धाकटा हा भेद होता. जो प्रथम 'अनुसरला' तो वडील ठरून त्याला त्याप्रमाणे स्थान मिळत असे, या गोष्टीची ही स्मृती सूचक आहे.

८२. '**हें माहात्मेपण विकणें म्हणा**' : आपले महात्मेपण विकून, म्हणजे त्या नावावर मिळालेली वस्तू आपणांस नको.

८३–८७. या पाच स्मृती तत्कालीन राजकीय उलाढालीच्या द्योतक आहेत. त्यातील (८३) **दीलीचा सुलतान** म्हणजे बहुधा मलीक काफूर असावा. त्याने दक्षिणेवर शके १२३२ त दुसरी स्वारी केली. **अवघें मंडळ हालवलें :** 'मंडळ' म्हणजे देश, अर्थात् महाराष्ट्र देश (पहा "ऐसें युगीं परि कळी। आणि महाराष्ट्र मंडळीं। श्रीगोदावरीच्या कूळीं। दक्षिणीलीं ।।" ज्ञानेश्वरी १८. १८०३). **गोसावीं संबंधु वारीला असे :** भटोबास आपली आई आबाइसे हिला भावाच्या, म्हणजे वैजोबाच्या घरी राहण्यास सांगतात तेव्हा ती चक्रधरांच्या 'संबंधियांचा संबंधु तो विशेषतां त्याज्य :' (सूत्र० आचार १) या वचनाची अडचण सांगते. ज्याने एकदा संसारत्याग करून पंथाची दीक्षा घेतली त्याने पुन्हा तिकडे वळून पाहू नये असा स्वामींचा स्पष्ट आदेश होता. **हे एकि अडणि :** आपद्धर्म म्हणून संबंधी जनांच्या गावी जाण्यास हरकत नाही. **देसु उचलला होइल :** सर्वत्र धामधूम माजून देश उध्वस्त होईल. **गुढयासरिसें यावें :** 'गुढी' म्हणजे पताका, निशाण. शरणागतीचे किंवा शांततेचे द्योतक निशाण लागल्यावर तुम्ही परत यावे. (८४) **तुज गोसावी वरद असति :** साधे किंवा येल्हो या शिष्येला

चक्रधरांनी एका प्रसंगी "न भीया साधे हो: तुम्हांवरि एथौनि वाजत वारा धरीजैल:" असे आश्वासन दिले होते (ली० उत्तरार्ध १५२). त्याची तिला आठवण देऊन भटोबासांनी आपल्यापैकी अशक्त मंडळींना साधेच्या जवळ परळी येथे ठेवले व इतरांना घेऊन ते पुढे गेले. (८५) **माझीया स्मरणा खंडना नव्हेचि** : इतक्या धामधुमीतही भटोबासांच्या ईश्वरस्मरणात खंड पडला नाही. त्यामुळे, त्यांच्या ईश्वरनिष्ठेमुळे त्यांचे कुळ यवनांच्या तावडीतून वाचलें. (८६) **मी वर्ते तवं मऱ्हाटें वर्तैल** : भटोबासांची ही भविष्यवाणी बरोबर असेल तर ज्या अर्थी शके १२३२ मध्ये रामदेवराव यादवाच्या निधनसमयी भटोबास जिवंत होते (स्मृ. १४९, कामाइसेचा अग्निप्रवेश), त्या अर्थी त्यांचे निधन त्यानंतर व शके १२३४ मध्ये यादवांचे राज्य नष्ट झाले त्यापूर्वी झाले असणार. त्यांच्या हयातीत यादवांचे राज्य बुडाले नाही एवढे निश्चित आहे. म्हणून पुढे २६० व्या स्मृतीत दिलेला त्यांचा शके १२२४ हा निधनकाळ मान्य करता येत नाही. **संतामहंतांचेया वोखटेया प्रवर्तला** : चक्रधरांचा शेवटी वध झाला व त्यात रामदेवराव यादवाचा हात होता या मताला पोषक असा हा उद्‌गार आहे. **हे हातवणी** : हा नुसता प्रारंभ आहे; मुख्य भाग अजून पुढेच आहे.

८९–९१. पंडितबास म्हणजे दामोदर पंडित. त्यांना गाण्याचे अंग चांगले होते. त्यामुळे ते 'विजना'त म्हणजे रानात जाऊन मोकळेपणाने धावे, चौपद्या वगैरे गात बसत. भटोबासांनी प्रथम त्यांना गाण्याची बंदी केली. कारण '**गीत विखो**' असे चक्रधरांचे सांगणे होते (सूत्रपाठ, आचारमालिका १७१). (९०) परंतु पुढे एकदा त्यांना भावपूर्ण रीतीने देवाची करुणा भाकतांना पाहून भटोबासांनी ही बंदी दूर केली व त्यांना गाण्याची अनुज्ञा दिली. तसे करतांना पूर्वी चक्रधरांनी अशीच देमाइसा नावाच्या शिष्येला ती निर्विकार असल्यामुळे गाण्याची अनुज्ञा दिली होती (लीळाचरित्र, उत्तरार्ध ३००) त्या प्रसंगाचा निर्वाळाही भटोबासांनी दिला. **श्रुति** : श्रीचक्रधरांचे वचन म्हणजे 'श्रुति'. (९१) इतकेच नव्हे तर पंडितांचे गाणे म्हणजे आपल्या मार्गाचे '**हाकारें**' (= बोलावणे) आहे असे गौरवाचे उद्‌गार भटोबासांनी काढले.

९२–९३. **नाथोबा :** चक्रधरशिष्य. यांच्याकडे रोजचे पंचांग सांगण्याचे काम असे. **कटक-देमाइसा :** ही चक्रधरशिष्या देमाइसा नव्हे. ही कटक-देवगिरीची राहणारी. **संपादूं आदरिलें :** काही खाद्यपदार्थ वगैरे देऊ केले. **भटोबासीं परीहारु दीधला :** निर्वाळा दिला; संशयाचे निरसन केले. (९३) भटोबासांनी रसना किंवा रुची इतकी जिंकली होती, की आपण तुपाऐवजी करडेल खात आहो याची त्यांना जाणीवही नव्हती. हे त्यांनी **'रुपैंची आण'** म्ह. महादाइसेची शपथ घेऊन सांगितले. **नाथोबायें निरोविलीं :** नाथोबाने देमाइसा व वंकी यांना भटोबासांकडे सोपविली. कारण ती दोघे त्याच्यामुळे मार्गात आली असली तरी शेवटी पंथाचे 'अधिकरण' म्हणजे आचार्य भटोबासच होते. '**अवघिया श्रीचक्रधराचीया धुरा...**' भटोबासही नम्रपणाने म्हणतात, " चक्रधरांनी माझ्याकडे आचार्यपद दिले, म्हणून मी गुरु. एरव्ही तुम्ही सर्वजण पंथाचे धुरीणच; आणि तसेच स्वामींचा संदेश सर्वत्र पसरविणारे माझे 'हाकारे."

९४–९६. **हळुहळु गुणा येतील :** त्या जोडप्याचे वागणे भटोबासांच्या मठातील विरक्तीच्या वातावरणाशी विसंगत होते. पण ते हळू हळू सुधारेल अशी त्यांना आशा होती. म्हणून त्या दांपत्याला मठातून एकदमच बाहेर काढणे त्यांना अयोग्य वाटलें. (९५) **सुरंगु मीरवीति :** शृंगारचेष्टा करीत. '**हे माझेया कंथडीकारां मुळवणी कीं**': ही दोघे आम्हां विरक्तांच्या मुळावरच आली. त्यांच्यामुळे आमचे वैराग्य मलिन होईल. (९६) **धर्मे एकमुखता होआवी :** धर्माच्या बाबतीत सर्वजण सारखे असल्यामुळे त्यात हा गुरु व हा शिष्य असा भेद नाही. धर्म हाच सर्वांचा गुरु. म्हणून 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' या न्यायाने वडिलांनीही धाकट्याचे ऐकावे.

९७. **शोधनी करवीली :** चौकशी केली; पूर्ववृत्त विचारले. **धावणें आलें :** लुखाईच्या पाठोपाठ तिच्या घरची माणसे तिच्या शोधार्थ आली. **तो दारीं बैसला होता :** लुखाईचा नवरा. **आतां दुसरें दंडवत :** लुखाईच्या नवऱ्याने पहिले दंडवत तिला न ओळखताच एक जोगीण म्हणून केले, व दुसरे दंडवत तिची व तिच्या योग्यतेची ओळख पटल्यावर केले.

९८-१०१. या चार स्मृती सेगावच्या खेइभटाविषयी आहेत. **लोहोबंध गाडा जडीला असे** : जीवरूपी गाडा प्रपंचरूपी लोहशृंखलांनी जखडला आहे. **मनि टिक यैसी बैसली** : 'टीक' म्ह. जडावाचे काम. त्यात जसे रत्न कोंदणात अचूक बसते, त्याप्रमाणे भटोबासांची उपपत्ती खेइभटांच्या मनावर ठसली.

९९. '**मी काइ चोळीका माहात्मा**' : चोळीपंथ म्हणजे शाक्तांतील एक वाममार्ग. भटोबास म्हणतात, मी त्यातला नव्हे ! (१००) **साटी वरीखाचीये.. अधिकारु नाहीं** : अनधिकारी कोण ते सांगतांना चक्रधरांनी 'जरठां धर्मी अधिकारु नाहीं' असे म्हटले होते (सूत्रपाठ, विचार २५७). कारण, जरठ हा अविद्यायुक्त असतो. **जैसे कीटकीये कोरीतां...** घुणाक्षर-न्यायाने खेइभटासारख्या वृद्धासही ज्ञान होण्याचा योग असला तर तसे होईलही. (१०१) '**कां न गीळेसि..**' खेइभट 'माहासुरवाडाचे,' म्हणजे सुखप्रिय होते. त्यामुळे भीक्षान्न जेवतांना त्यांना भिक्षेत आलेली 'कुहिरी' (च्या शेंगा) डोळ्यापुढे दिसू लागे व त्यामुळे त्यांना ते अन्न जात नसे. '**वीखो तो कोणा...**' साधकाने नीरस, जाडेभरडे अन्न सेवावे असे चक्रधरांचे सांगणे होते. पण त्याबरोबरच असे रुक्षान्न जात नसेल तर 'सी : बी : चूळ : चिमुटी' (म्हणजे अनुक्रमे भाजी, डाळ, ताकवणी व मीठ) यांपैकी एखादे साधन वापरण्यास त्यांची हरकत नव्हती (सूत्रपाठ, आचार १०५-११२). पण हा नियम सुद्धा कोणाला ? तर ज्याला घाटचावर घालायला मीठही नसते त्याला; खेइभटासारख्या पंचपक्वान्नांची सवय असणाऱ्यासाठी तो नव्हे. भटोबासांच्या मते त्याने कुहिरीच्या शेंगा खाण्यास हरकत नाही. तात्पर्य, प्रत्येकाने आपल्या अधिकारानुसार यमनियम आचारावे. **नामना साराबी** : कीर्ती वाखणावी.

१०२. **मंदिरांतु वस्तु** : देहरूपी मंदिरातील आत्मा. चक्रधरांनीही एका प्रसंगी "भीतरीं क्रीडत असे तें अलौकिक:" असे म्हटले होते. तुळा: "देह ते पंढरी आत्मा हा विठ्ठल।" (तुकाराम)

१०३. **गोपाळ पंडित** म्हणजेच आनोबास. हे राजसभेतील 'शास्त्रवक्ते' होते.

१०४. **चौदा वैरी** : पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, मन, बुद्धि, अहंकार आणि चैतन्य मिळून चौदा. **देवताचक्र** : महानुभाव तत्त्वज्ञानात ८१ कोटी, ११ लक्ष व १० इतक्या देवतांचे मिळून एक 'देवताचक्र' आहे. त्याला वैरी म्हणण्याचे कारण म्हणजे देवता या स्वतः नित्यबद्ध असल्याने त्या मोक्ष देऊ शकत नाहीत.

१०५–१०६. या दोन स्मृती केसोबासांचा निग्रह दाखवितात. **अवकाळ पाणी** : अकाळी पाऊस. **माथेयाचा अनुकारु केला** : मानेच्या खुणेने सांगितले. **वीळवेऱ्हीं दृष्टीचें राखण घातलें** : सायंकाळपर्यंत वाट पाहिली. **राणि पाठीं घातली** : रात्र सारली. **केशवदेनि मार्गातें राखीलें** : केसोबासांनी मोहाला बळी न पडून महानुभाव पंथाचे नाव राखले. (१०६) '**हें देह येतुलेयासि कारण**:' हा देह आपल्याच (म्ह. भटोबासांच्या) सेवेसाठी आहे. **काळातें पाठीमोरें करून** : पंथाचा नाश करण्यास आलेल्या काळाला पराभूत करून. **पिंडें पिंड खेळों** : विषयसेवन करू.

१०७. **पचन घालीतील** : स्वयंपाक करावयास लावतील.

१०८. **वडपींपळी लावूनि** : अंत्यक्रिया करून. '**तो वासनिक नव्हे...**' साकाईच्या बापाचा आपल्या मार्गाशी कोणत्याही प्रकारे संबंध नसल्यामुळे त्याच्या पैशाने केलेले जेवण भटोबासांनी परान्न मानले. मात्र '**दीससंख्या**' म्ह. सुतकाचे दिवस झाल्यावर ते साकाईचे जेवण म्हणून घेण्यास त्यांची हरकत नव्हती.

१०९. **खळीयेचें प्रमाण** : 'विजनां जातां जैसा कांही खळीये बैसावेया नेइजताए:' (सूत्रपाठ, आचारमालिका १८८). विजनास, म्ह. रानात ईश्वरध्यानास जातांना आपणास जणु मानाच्या जागेवर बसविण्यास नेत आहेत असें वाटले पाहिजे, असे चक्रधरांनी म्हटले होते.

१११. **आन वाति** : शपथ घेत. **पांचास्य गुरुकुळ** : पंचकृष्णांनी (१. श्रीकृष्ण चक्रवर्ती, २. श्रीदत्तात्रेय प्रभु; ३ श्रीचांगदेव राउळ; ४. गोविंदप्रभु; ५. श्रीचक्रधर) युक्त गुरुकुळ **एक वेळ गोसावीं मातें म्हणीतलें**: हा प्रसंग 'लीळाचरित्रा'च्या उत्तरार्धातील (क्र. ४७८) आहे. त्यावेळीं चक्रधर भटोबासांना म्हणाले होते, "देता काइ तूं : देतें तें आणिक असें

कीं गा : अधिकरणातें अधिकरूनि परमेश्वरुचि उद्धरीति :" तसेच आपण सर्वजण 'अच्युत गोत्रा' चे आहोत असेही त्यांनी भटोबासांना म्हटले होते (ली. उत्तरार्ध ४७१). या दोन कारणांमुळे भटोबास 'पांचास्या गुरुकुळा'ची आण घेत. **वानरा :** चक्रधरांनी भटोबासांना ठेवलेले नाव. **रूपै:** म्ह. महादाइसा. तिचे उपकार स्मरून भटोबास तिची आण घेत ('स्मृतिस्थळा'-तील क्र. २, ३ व ४ या स्मृती पहा.)

११२. **वैराग्यनिष्ठता विरामु :** वैराग्यात स्थिरता. **मार्गीचा अनुकुळ :** भटमार्गाविषयी अनुकूल मत असणारा; मार्गाचा हितचिंतक.

११३. नरेंद्रकवीच्या 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्याचा इतिहास सांगणारी स्मृती. **द्वारकेचा रामहाटु :** द्वारकाधीश श्रीकृष्ण याचे चरित्र. नरेंद्रास भटोबासांकडून 'श्रवण' घडलेले असल्यामुळे त्याने आपल्या भावांना इतरांची चरित्रे न गाता श्रीकृष्णचरित्र गाण्याविषयी सांगितले. **अठरा सतें :** नरेंद्राचे मूळ काव्य १८०० ओव्यांचे होते. परंतु ते सर्वच्या सर्व पंथात आले नाही. तर त्यातील पहिल्या ८७९ ओव्याच तेवढ्या आल्या. म्हणजेच ते अपूर्ण आहे. '**या ग्रंथाचा अभंगु मज देयावा :**' 'अभंग' म्हणजे कर्तृत्व, कर्तेपण. अभंगात कवीची नाममुद्रिका येते त्यावरून. येथे या या शब्दाचा छंदाशी संबंध नाही. **हरगर्व** म्हणजेच हयग्रीवाचार्य. त्याने हे निर्यमक श्लोकबद्ध 'गद्यराजस्तोत्र' शके १२४० च्या सुमारास रचिले. (पहा: 'महाराष्ट्र-सारस्वत', आ. ५ वी, पृ. ७४८; रेसाइड: महानुभाव ग्रंथसूची, BSOAS, २३. ३. ४७९).

११४. **काळे कृष्णभट :** भटोबासांचे काळे कृष्णभट व गोरे कृष्णभट असे दोन शिष्य होते. त्यांपैकी पहिले. **दसांक :** ध्रुवपद धरून दहा कडव्यांची रचना. या पदांत विरही गोपी, उद्धवाने आणलेल्या श्रीकृष्णाच्या प्रसादवस्त्रांनी समाधान न होऊन, त्याच्यापाशी कृष्णभेटीचे आर्त व्यक्त करीत आहेत. (३) **चंदन आणि चंद्र :** तुळा : "चांद वो चांदणें चांपे वो चंदन। देवकीनंदनेंवीण नावडे वो॥"– ज्ञानदेव गाथा, ६६४. **नागदेवाचा दातारु :** श्रीचक्रधर. '**कृष्णा तेव्हेळीं काइ...**' कृष्णभटाने रचिलेली ही पदे

इतकी सरस वठली, की ती ऐकून जणु काही तो वरील उद्धव-गोपी प्रसंगाच्या वेळी स्वत: उपस्थित होता असे भटोबासांना वाटले.

११५. **स्थाननिर्देशें** : श्रीचक्रधरांच्या 'संबंधी' स्थानांच्या अनुरोधाने.

११६–१२२. या स्मृती **कवीश्वरबास** ( म्ह. भास्करभट,'शिशुपालवध'-कर्ते) यांच्याविषयी आहेत. **भक्तिप्रतिष्ठा** : चक्रधरांच्या भक्तिमार्गाची प्रतिष्ठा. '**चेतश्चिन्तय...**' या श्लोकाच्या प्रत्येक चरणात एकेक अनुप्रासालंकार साधला आहे. ( ११८ ) **सिखासूत्र** : केशवाचार्य भटोबासांच्या मार्गात आले तरी अजून त्यांचा कर्मठपणा (शेंडी व जानवे) कायमच होता. **कांही नमस्कारावेया दीधलें** : श्रीचक्रधरांचा 'प्रसाद' किंवा संबंधी वस्तू. '**तें माझें अभिमानियें घेइल**' : वरील प्रसादाच्या वस्तू भटोबासांनी परत घेतल्या व उपदेशिलेले तत्त्वज्ञान त्यांच्या अभिमान्याने, म्हणजे श्रीचक्रधरानी परत घेतले. (अर्थात् केशवाचार्यांना त्या तत्त्वज्ञानाचा पूर्ण विसर पडला.) (१२२) भटोबासांचा मार्ग निवृत्तांचा असल्याने आपल्या शिष्यांनी चांगली वस्त्रे घालून मिरविण्याच्या ते विरुद्ध होते. **दसीयांचांचि वाइ** : दशांच्या कडेने.

१२३. **महादाइ** किंवा महदंबा ही आद्य मराठी कवयित्री. 'धवळे' तिचेच. **म्हाइया** : म्हाइंभट ('लीळाचरित्र' कार). तो श्रीप्रभूंच्या, म्ह. गोविंदप्रभूंचा भेटीस आला तो प्रसंग गो. चरित्रात वर्णिला आहे ( ली. ९७). **नाथाची नाथवाणी** : हा उल्लेख नाथपंथाचा असणे शक्य आहे.

१२४. **घे–दे म्हणौनि** : अटीतटीने. **रसीं पडिले असति** : वाद करण्यात रंगून गेले होते.

१२५. **दाइंबा** म्हणजेच **भोजा**; चक्रधरशिष्य. तो सुखलोलुप होता. त्याला भिक्षेचे महत्त्व सांगतांना चक्रधर एकदा म्हणाले होते, की साधकाच्या झोळीत कोणी अवज्ञापूर्वक अन्नाची चार शिते टाकली तरी तेवढ्यानेही त्याला पुण्य लाभेल. सारांश, केलेले सत्कृत्य वाया जात नाही.

१२६. '**जी जी वचनें ईश्वरींचि...**' 'हां जी' हे संबोधन ईश्वरी अवताराला, म्हणजे चक्रधरांना उद्देशून वापरावयाचे, जीवाला म्ह. सामान्य माणसाला उद्देशून नाही.

१३०. '**बोधि करीतां...अबोधि**' : सूत्रपाठ, आचारमालिका, २२५. **श्रीचक्रधररायाचा संबंधु**...चक्रधरांची 'संबंधी' वस्तू जर नमस्करणीय ("एथिचेया संबंधा गेले तेतुके ओटेगोटे तुम्हां नमस्करणीये कीं गा : "), तर ज्यांचा त्यांच्याशी सतत साडेतीन वर्षे निकट संबंध आला अशा भटोबासांना नमस्कार करण्यात चूक काय ? आकाइसेचा हा प्रश्न बिनतोड असल्याने भटोबासांनी तिला नमस्कार करू दिले.

१३१. **राभस्य राहाटीचे** : अविवेकी आचाराचे. **सप्तव्यसने** : द्यूत, सुरापान, वेश्यागमन, चौर्यकर्म, हिंसा, परनिंदा व असत्य भाषण.

१३२–१३६. या स्मृती कटककार देमाइसेविषयी आहेत. (१३२) '**आतां तुम्हां नवेयासि भेटि**' : चक्रधरांनी 'उत्तरापंथें गमन' केले होते. त्यामुळे त्यांच्याविषयी अधूनमधून काही अफवा उठत. अशीच एकदा ते उज्जैनीत असल्याची अफवा उठली. पण त्यामुळे भटोबास फसले नाहीत उलट, "आता यापुढे आपण 'नवेयासि', म्हणजे नवीन अवतारात तुम्हांस भेटू" या स्वामींच्या वचनाची आठवण करून देऊन त्यांनी देमाइसेची उज्जैनीस जाण्याची कल्पना मोडून काढली. **मग सुखीया श्रीमंताचां घरीं**... (सूत्रपाठ, आचार २६२) हे आश्वासन स्वामींनी पूर्वी महादाइसेला दिलेले होते. **असन्निधानिचा** : चक्रधरांचे सान्निध्य नसलेला; त्यांच्या पश्चातचा. (१३४) **परीहारपावेंतों** : त्यांची संशयनिवृत्ती होईपर्यंत. (१३६) '**सीळें तें आतां सीळें...**' जे अन्न आज शिळे ते उद्याही शिळेच असल्यामुळे आधी ताजे अन्न खर्च करावे असे भटोबास सांगतात.

१३७–१३८. **कुमरें रेमाइसें** : या शिष्येचे हे नामकरण भटोबासांनी तिने सांगितलेल्या स्वप्नावरून केले. मात्र श्री. वा. ना. देशपांडे सुचवितात तसा याचा आणि 'सूत्रपाठा'तील "बाइ : तुम्ही राजकुमरें कीं : " या सूत्राचा (आचार २४३) मुळीच संबंध नाही. ते सूत्र चक्रधरांनी महादाइसेला अनुलक्षून म्हटले होते. (१३८) **यैसें चतुर्विध कर्म** : 'कर्म' विचाराचा निरास यापूर्वी स्वतः चक्रधरांनी म्हाइंभटाजवळ त्याच्या पहिल्या भेटीत केला होता (ली. उत्तरार्ध ११३). तोच येथे रेमाइसे करीत आहे. या मतानुसार चतुर्विध कर्मे मोक्षदायक होऊ शकत नाहीत.

१३९–१४२. या चार स्मृती म्हाइंभटांच्या 'लीळाचरित्रा 'चा इतिहास सांगतात व त्यावरून त्यांनी या कामी घेतलेल्या परिश्रमांची कल्पना येते. ( १३९ ) **गदोनायक** : हे यादवराजांचे भांडारी असून चक्रधरांनी त्यांची एकदा कारावासातून सुटका केल्यामुळे ते त्यांचे भक्त झाले होते (ली. पूर्वार्ध ७५, ७६; उत्तरार्ध ११४, २३९–२४२). साहजिकच त्यांच्याकडून चक्रधरांच्या काही 'लीळा' मिळणे शक्य होते. त्या आपण अनवधाने मिळवू शकलो नाही याचे म्हाइंभटांना वाईट वाटते. ( १४० ) या स्मृतीतील **खेइभट** हे चक्रधरशिष्य असून ९८–९९ व्या स्मृतींतील सेगावकर खेइभटाहून ते निराळे आहेत. (१४१) **उपाध्ये** म्ह. जानोपाध्ये, नाथो व साधे हे सर्व चक्रधरांचे शिष्य व त्यांच्याजवळ बरेच दिवस राहिलेले. त्यामुळे आपल्या अनुभवाच्या लीळा ते बरोबर सांगू शकत. ( १४२ ) **सारंगपंडित** हा वरील गदोनायक भांडाऱ्यांचा पुराणिक असून चक्रधरांचा भक्तही होता. पण त्याची ही भक्ती वरवरची होती. म्हणूनच म्हाइंभटांनी त्याच्याकडे खाल्लेले अन्न नंतर ओकून टाकले असावे. **उमाइसा** ही त्याची बायको मात्र स्वामींशी एकनिष्ठ होती. म्हणूनच तिने पुढे सारंगपंडित वारल्यावर सरळ भटोबासांच्याकडे येऊन पंथाची दीक्षा घेतली ( स्मृ. २१६ ).

१४३–१४४. या दोन स्मृती कवीश्वरबासांच्या पाठातील असल्यामुळे त्या येथे दिलेल्या नाहीत.

१४५–१५०. या स्मृती यादवनृप रामदेवराव याची राणी कामाइसा हिच्याविषयी आहेत. ( १४५ ) **त्यांचा व्यापारु अनोबासांसि**...तिचा संबंध कामाच्या निमित्ताने अनोबास किंवा गोपाळपंडित यांच्याशी येत असे. **निरउणकेचें लिखित** : भलावणीचे परिचय-पत्र. ( १४६ ) **वेधवंतो नागदेवभट** : भटोबास आपल्या बोलण्याने सर्वांना वेध लावीत व त्यामुळे त्यांचे हे नावच पडून गेले. (१४८) **'गोसावीं आम्हां जेतुका देसु वीहीला...'** 'महाराष्ट्रीं असावें : कानडेदेसां तेलंगदेसां न वचावें ' असे चक्रधरांचे सांगणे होते (सूत्रपाठ, आचार २३–२५). त्यामुळे महाराष्ट्रात राहून महाराष्ट्राच्या राणीलाच संन्यासदीक्षा देणें अयोग्य होईल. ( १४९ ) **आदिभावो** म्ह. स्वतःची इच्छा. स्वेच्छेने सती जाऊ नका. या संबंधात, कामाइसेला तिचा

सावत्र मुलगा सिंघण याने बळजबरी करून सती जाण्यास लावले अशी माहिती 'अज्ञात स्मृती' वरून मिळते. ( १५० ) भटोवासांची **धर्मवार्ता** : महानुभाव तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक जीवाला मरणोत्तर त्याच्या अधिकारानुरूप फळ प्राप्त होत असते. 'वेध' म्ह. ईश्वराचे आकर्षण, 'बोध' म्ह. जीव, देवता, प्रपंच व ईश्वर या चार तत्त्वांचे ज्ञान, आणि 'अनुसरण' म्ह. संन्यासग्रहणाची तळमळ, ही तीन ज्या मानाने असतील त्या मानाने जीवाला गती मिळणार. **देहविद्या** : संन्यासदीक्षा घेतल्यानंतरही ज्यांच्या हातून प्रमाद घडतात अशांनी पुन्हा धर्माचरण केल्यास त्यांचा देह ईश्वरी शक्तीने सतेज होऊन सृष्टिसंहारापर्यंत तो तसा राहतो. हीच देहविद्या [illegible]
**सृष्टी सून्य जाइल** : ईश्वरप्राप्ती होणार नाही. " ( सूत्रपाठ, उद्धरण २३).
बोलिजेति : तेयां सृष्टि सून्य होए : "

१५१. **तयांचि वृत्ति न पाळीतिचि** : पाठकांकडील वंशपरागत वृत्ती किंवा वतन त्यांच्यामागे त्यांच्या मुलाकडे जावयाचे. पण त्यासाठी पाठकांनी स्वतः येऊन ग्रामाधिकाऱ्यास तसे कळविणे आवश्यक होते. पण पाठकांचा वैराग्याचा निर्धार एवढा, की त्यांनी तसे करण्याचे साफ नाकारले व आश्चर्य म्हणजे त्यांचा हा निर्धार पाहूनच त्या अधिकाऱ्याने त्यांची वृत्ती मुलाकडे '**विशेषें**' म्ह. निःशंकपणे सोपवली.

१५२. वरील स्मृतीतील पाठकांच्या उलट गोंदोबांचे झाले. '**मळवत् सांडीलें...**' चक्रधरांचे 'मलवत्त्यागु तो निर्गुण' असे एक सूत्र आहे (आचारमालिका १०९). त्यानुसार गोंदोबांचा त्याग झाला नाही. कारण त्यांनी 'वमना हात वोडविला,' म्हणजे जे सोडले त्याची पुन्हा इच्छा धरली.

१२५. **संबंधाची मुदी** : चक्रधरांचा संबंध आलेल्या धातूची केलेली आंगठी.

१५४. प्रश्न करणाऱ्याच्या ठिकाणी एक आत्महिताची तरी तळमळ असावी, किंवा जिज्ञासा तरी असावी. यांपैकी काहीच नसतांना उगीच काही तरी विचारण्यात काय अर्थ ?

१५५–१५८. या स्मृतींतील **भानुभट** कवीश्वर भास्करभटाहून अर्थात् निराळे आहेत. **धाकुटियेचि दशेचे** : वयाने लहान (१५६) **व्यक्तिभंगाचें दूषण** : प्रसादाची 'संबंधी' वस्तू आहे तशीच घ्यावयाची. ती 'उकलल्या'ने, म्ह. तिची मोडतोड केल्याने, तिच्यातील प्रसादत्व जाते. (१५७) '**सेवेसि उसिटा भावो नाहीं**' : "सेवकासि अविधि नाहीं : " ( सूत्रपाठ, आचार २७९ ).

१६२. **बोहटळिची गोटी...**' उतारावर उंच ठेवलेली गोटी घरंगळत खाली येणारच.

१६३–१६५. **श्रीचांगदेवो राउळ** : चक्रधरस्वामी. **राज्य करीत होते** : तेथे रहात होते. **अप्राप्तिपरें पदें** : या पदांत नाइकबाइयाने स्वतःकडे विरहिणी गोपीची भूमिका घेतली आहे.

१७०. साधन यशस्वी झाले तर ईश्वरप्राप्ती, व मध्येच गळित झाले तर मुख्य देवता जी चैतन्यमाया तिचे फळ मिळेल. अर्थात् ते विनाशी होय.

१७१. स्त्रियांना, त्यांचे शिक्षण बेताचे असल्याने, तत्त्वज्ञानासारखा विषय लौकर समजत नाही. म्हणून त्यांच्याकडून प्रथम त्यातील शब्द-शब्दार्थ पाठ करून घ्यावा.

१७२. '**तोंड अबद्ध तरि...**' पोथी अबद्ध असेल तर ती फाडून टाकता येईल. पण अबद्ध तोंडाचे काय करणार? ते अभ्यासाने, वाचनानेच सुधारणार.

१७४. '**तैं गोसावीं वरु दीधला ..**' महादाइसेने यापूर्वी एका प्रसंगाने (स्मृ. ११ पहा) 'रुक्मिणीस्वयंवरा'चा, म्हणजे 'धवळचां'चा पूर्वार्ध रचिला होता. त्या वेळी तिला स्फूर्ती श्रीगोविंदप्रभूकडून मिळाली होती. आता ते नसल्याने आपल्या हातून काव्यरचना कशी होणार अशी तिला भीती वाटते. या वेळी म्हाइंभट व लक्ष्मीधरभट यांनी तिला साहाय्य केले व अशा रीतीने 'धवळचां'चा उत्तरार्ध सिद्ध झाला. अर्थात् त्याचे श्रेय मुख्यतः या दोघांच्याकडे जाते.

१७५. '**यें न देखतया देवाकारणें...**'भटोबासांची शिष्यमंडळी की ज्यांनी देवाला, म्हणजे चक्रधरांना पाहिले नव्हते. **जेंचि गति बाइसांसि...**बाइसा,

म्हणजे नागांबिका, ही चक्रधरांची सर्वश्रेष्ठ वृद्ध शिष्या. तिने त्यांच्या निधनाची खोटी वार्ता ऐकून दुःखाने नदीत उडी घेतली. तिला जी गती मिळाली तीच या नवीन भक्तांनाही मिळेल.

१७६. **ईश्वरपरायेणा** : जे ईश्वरपरायण आहेत अशा एकनिष्ठ भक्तांना सदाच पर्वकाळ असतो. त्यांना निराळे पर्व करावे लागत नाही.

१७७. **भेटीचे वीधान** : दोन पंथीय भेटले असता त्यांनी करावयाचा विधी. त्यात श्रमनिवृत्ती करणे, एकत्र खानपान करणे, वस्त्रांची अदलाबदल करणे वगैरे गोष्टी येतात. याबाबत चक्रधरांची आचारसूत्रे पुढीलप्रमाणे आहेत :–" एकमेकां भेटलेयां हें (म्ह. चक्रधर) भेटलेयाचा पाडु जाए : श्रीमनिवृत्ति कीजे : एकत्र खानपान कीजे : फाळुकीं (वस्त्रें) पालटीजेति : एथीचिया कथावार्ता कीजेति : पूर्वोत्तर क्षण (भेटीचा व वियोगाचा) दुर्लभ : " (सूत्रपाठ, आचार १२९–१३५). **दोष न निफजत**...भेटीचे दिवस किती ? तर जोपर्यंत त्या भेटीतून काहीतरी अपूर्व लाभ होत आहे व एकमेकांचे दोष पाहण्याकडे प्रवृत्ती होत नाही तोपर्यंतच एकत्र असावे.

१७८. **गोसावीयांची कन्या** : श्रीगोविंदप्रभूंची मानलेली मुलगी. ती खरी सावळापूरच्या एका ब्राह्मणाची सून. पण सासरी छळ होत असल्यामुळे व माहेरचे कोणी नसल्यामुळे ती रिधपूर हेच आपले माहेर समजून गोविंदप्रभूकडे आली व त्यांनीही पोटच्या लेकीचे करावे तसे तिचे माहेरपण केले. पुढे गोविंदप्रभू वारल्याचे ऐकून 'माझें माहेर गेलें' या शब्दांत तिने शोक केला (पहा : श्रीगो. चरित्र, लीळा १५६, ३२३). **आउसे** : गोविंदप्रभूंच्या पश्चात् रिधपुरातच राहिलेली चक्रधरांची ज्येष्ठ भक्त. या स्मृतीत सांगितलेला आचारधर्म स्वतः भटोबासांनीही पाळला आहे ( स्मृ. १९०, १९१).

१८२. **उपाध्ये** म्हणजे जानोपाध्ये किंवा दादो. चक्रधरांचा एकनिष्ठ भक्त; पण दीक्षा भटोबासांकडून घेतली होती. **तुमची निंदा कोण्ही न करी** : वार्धक्यामुळे 'अटण' होत नसल्याने आपण रावसगावी, म्हणजे एका ठिकाणी राहतो व आपली तरुण विधवा पुतणी कमळाइसे ही आपली सेवा करते यामुळे उपाध्यांना लोकनिंदेची भीती वाटली.

१८३. **कमळाइसे** : ही पुढे उपाध्ये आम्नायाची प्रवर्तक झाली. '**तुम्हां देवें देवो सांघितला ..**' तुम्हांस 'देव' (म्ह. देवाचे ज्ञान) देवाने (म्ह. प्रत्यक्ष श्रीचक्रधराने) सांगितला आहे, तो सांगा.

१८४. या स्मृतीत 'केसोबास व गोपाळपंडित हे दोघे वरखेडच्या चक्रपाणीचे मुलगे' अशी भर 'स्मृतिसमुच्चय' हा ग्रंथ घालतो.

१८५. **वासनिक धर्मीचि आंतु** : आनोबास, म्ह. गोपाळपंडित, हे अजून साधे 'वासनिक'च होते, अनुसरलेले नव्हते. तरीसुद्धा ते भटोबासांची सेवा एकनिष्ठतेने करीत होते.

१९२. **आबाइसा** ही भटोबासांची आई. तिच्या नावाचा ओटा. **आपलवले** : चक्रधरांसारखा दिसणारा पुरुष आलेला पाहून 'शेवटी स्वामींना आपली करुणा येऊन ते परत आले' या कल्पनेने भक्तजन आनंदाने हुरळून गेले. **प्रथम भेटिं जो प्रश्नु केला...** पहिल्या भेटीत चक्रधरांनी म्हाइंभटांना जो संसृतिछेदाविषयी प्रश्न विचारला होता (ली. उत्तरार्ध ११३), तो विचारून भटोबासांनी या तोतयाचा खोटेपणा उघडा केला. तो नाथपंथी असल्याने त्याने 'तें नाथ जाणे' असे म्हणून कानावर हात ठेवले. **मढु नागवला होता** : या तोतयाच्यामुळे आपल्या मार्गाचा सर्वनाश झाला असता, तो सुदैवाने टळला.

१९३–१९४. **दोही देवांचा संबंधु** : श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर यांचा. **कोथळोबा** : स्मृ. ४७ पहा. (१९४) **महावाक्य** : स्मृ. ६१ वरील टीपा पहा. **येथचें गोमटें तें काइ...**कोणत्याही जीवाचा उद्धार केवळ परमेश्वराच्या कृपेने होतो, त्यासाठी भाऊपणासारखी नातीगोती उपयोगी पडत नाहीत. उमाइसे ही भटोबासांची बहीण म्हणून तिचा उद्धार होईल असे नाही, तर परमेश्वराची इच्छा झाली तरच होईल. हे तत्त्व चक्रधरांनी भटोबासांना उमाइसेच्या संबंधातच सांगितले होते. '**तुम्हांपासौनि सातापांचा होइल**' : लीळाचरित्र, उत्तरार्ध ४७८ पहा.

१९५. **असतीपरी** : स्मृ. ४० वरील टीपा पहा. **कोण्हासि प्रसादु आलंबन**..साधकांत अनेक प्रकार संभवतात. कोणाला कशाचा आधार

वाटतो. उदा०, चक्रधरांचा प्रसाद, त्यांचे शास्त्र, येल्हो (म्ह. साधे, चक्रधर-शिष्या) व भटोबास, यांचा. **जो देसावरि खांडें काढुनि जाए** : (सूत्रपाठ, आ. मालिका २१५) 'देशावर' करणे म्हणजे देशान्तर करणे, स्वदेश सोडून परदेशात जाणे. (पहा-स्टीफन्सचे 'क्रिस्तपुराण' १. ११. ३२ 'ते उदेमी देसोरी । वाणिये वणजारे ॥ '). भटोबास म्हणतात, की कोणाच्या तरी आधाराने साधन करणारे पुष्कळ आहेत; पण 'खांडें' म्ह. खड्ग उपसून (म्ह. जीवावर उदार होऊन) 'देशावर' करणारा विरळा. **जेथ पायें हाणीतलेयां**...जेथे पायाची व्यथा डोक्यास कळणार नाही अशा निर्जन स्थळी.

१९६–१९७. **आउसे** : स्मृ. ११ पहा. **जे आउ पुढां पळे** ..आउसे ही निष्ठावंत, पण बालिश वृत्तीची होती. त्यामुळे ती साध्या कारणानेही रागावून चक्रधरांच्या मठातून निघून जाई. अशीच एकदा ती निघून गेली असता चक्रधर तिच्या मागोमाग तिची समजूत काढण्यास गेले होते (ली. उत्तरार्ध ३२९). जिच्यावर स्वामींचे इतके प्रेम तिचा पाहुणचार कसा नाकारायचा? भटोबास म्हणतात, तो देवाचाच पाहुणचार!

१९८. 'लीळाचरित्र'कार म्हाइंभटांच्या देहावसानाची ही स्मृती अत्यंत हृदयस्पर्शी आहे. '**मज ऋद्धिपुरासि नेयावें**' : म्हाइंभटांनी दीक्षा गोविंदप्रभूंकडून घेतलेली व त्यांचे सेवादास्यही केलेले (गो. चरित्र, लीळा ९७). त्यामुळे अंतसमयी रिधपुरास असावे त्यांना वाटले. '**निडळावरि श्रीचरणु**..' निढळास चरणस्पर्श करण्याचा अधिकार आपला नव्हे; तो श्रीचक्रधरांचा. '**मज देवो होइल**' : मला ईश्वरप्राप्ति होईल काय? **दोहीं देवांचें** : गोविंदप्रभू व चक्रधरस्वामी यांचे. **जैं गोसावी निवासां राज्य**... चक्रधरांकडे येऊन त्यांची भेट घेण्यापूर्वी म्हाइंभट एकदा त्यांच्या मुक्कामाच्या गावी येऊन गेले होते. परंतु त्यावेळी कामाच्या गडबडीत त्यांना स्वामींना भेटणे जमले नाही. तेव्हा स्वामी म्हणाले होते, "येइल तैं तोचि येऊं जाणे" (म्हणजे, जेव्हा येईल तेव्हा तोच खऱ्या निष्ठेने येईल.) सारांश, म्हाइंभटांची योग्यता चक्रधर तेव्हापासून ओळखून होते. अशा श्रेष्ठ भक्ताला ईश्वरप्राप्ती कशी होणार नाही? **चणाख्य** : रिधपुरातील गोविंदप्रभूंचे निक्षेपस्थान.

१९९. **'स्वामीविण तें गंगातीर...'** आउसे गोविंदप्रभूंच्या निधनानंतरही रिधपुरासच राहिली होती. कारण चक्रधरस्वामींच्या वियोगामुळे गंगातीरी (म्ह. गोदाकाठी) राहणे तिला असह्य वाटत होते.

२००. **तें साही मासांचें स्वीकारांतु पडीलें :** गौराईची सहा महिन्यांची तपश्चर्या कारणी लागली आपले गुरु भटोबास यांना कधीतरी उपयोगी पडेल म्हणून ती सहा महिने पाण्याने भरलेला नारळ लुगडयाच्या परवंटयात वागवीत होती.

२०१. **पैठण रुधिपुरीचे भात** पैठण हे चक्रधरांचे व रिधपूर हे गोविंदप्रभूंचे. त्यामुळे या दोन ठिकाणी भटोबासांचे तांदूळ शिजत नसत व तेथे त्यांना आपल्या शिष्यवर्गाकडून नमस्कार करवून घेणेही अवघड जाई.

२०२–२०५. या तीन स्मृती कवीश्वर भास्करभट यांच्या वादपटुतेविषयीच्या आहेत. त्यांना 'मी मी' म्हणविणाऱ्या पंडितांशी वाद करून त्यांना जिंकण्याची खुमखूम असे. पण भटोबास त्यांना सहसा तसे करू देत नसत. (२०२) **तूं म्हणौनि नको**...आपण होऊन तू वाद करू नको. त्यांनीच पदन, म्ह. प्रसंग आणला तर गोष्ट वेगळी. (२०४) **तन बोरिलें :** तृणवत् लेखले. **कळांसि बैसला :** बरोबर पटला. **दैसा दाहीपरी वाखाणूनि दाखवीला :** कवीश्वरांनी एकाच श्लोकाचा अर्थ दहा निरनिराळ्या प्रकारांनी लावून दाखविला. **अंतःकरण चंद्रमय जालें :** रसमय झाले; द्रवले.

२०६. **धर्माकारणें माहारवाडा** चक्रधरांचे 'माहारवाडाहौनि धर्म काढावा' असे एक सूत्र आहे (आचार १४९). त्याचा अर्थ, धर्मसिद्धीसाठी महारवाडयात जाण्यासही हरकत नाही. पण केव्हा? तर धर्मसिद्धीचे साधन जवळ नसेल तेव्हाच. येथे तर भटोबासांसारखे धर्मसाधन निकटवर्तीच होते. मग गौराइसेने त्यांना सोडून आपल्या संबंधियांच्या गावी का जावे? **प्रधानत्वें संबंधाचें :** 'सूत्रपाठा'च्या आचार–प्रकरणातील संबंध–त्यागाची सूत्रे ("स्वदेशसंबंधु त्याज्य : स्वग्रामसंबंधु त्याज्य : संबंधियांचा संबंधु तो विशेषतां त्याज्य" : १ :) **सेवट :** मग साधकाने कोंठे राहावे? तर 'देसाचां सेवटीं झाडातळीं जन्म क्षेपावें' : (सूत्रपाठ, आचार २६).

२०७. **काळाक्षरीं वेधु बोधु नाहीं** : ' काळाक्षर ' म्हणजे पोथीतील काळी अक्षरे. केवळ पोथी वाचून ' वेधबोध ', म्हणजे ईश्वराचे प्रेम व ज्ञान ही मिळणार नाहीत. त्यासाठी गुरुमुख पाहिजे. तेच ' शास्त्राचे मुख ' होय.

२०९. **कांटियेचेनि भावें**...' झाडातळीं विजन कीजे ' या चक्रधर-सूत्रानुसार ( आचारमालिका ४३ ) भटोबास एखाद्या काटेरी झाडाचा आश्रय करीत.

२१०. देवो ' तिर्यंचामध्यें ( म्ह. तिर्यक् योनीत ) अवतरेति ' असे चक्रधरांचे सूत्र आहे ( विचार १०६ ). पैठणच्या सामान्य स्त्रीच्या, म्ह. वेश्येच्या घरातील पोपट हाच तो अवतार होय. **परि बिहित नव्हे** : परंतु तो अवतार (पोपटाचा ) चक्रधरांनी सांगितलेला नसल्यामुळे तो सेव्य किंवा भज्य नव्हे.

२११. सर्वसाधारणपणे खोटे बोलू नये; पण दुसऱ्याचे मरण चुकविण्या-साठी, किंवा मोहातून सुटण्यासाठी, किंवा तामसी प्रकृतीच्या माणसापासून बचाव करण्यासाठी खोटे बोलणे हे अपवादात्मक होय.

२१२. **अटन कैसे करावे** : " अटन तें निरुद्देशें करावें : गांउनि गांवा जावें : इ० " ( सूत्रपाठ, आचार ४०, ४१ ). तात्पर्य, एका गावात राहू नये. कारण त्यामुळे प्रसिद्धी होते.

२१३. **अर्धं कुपीं, अर्ध सुपीं** : अर्धे घ्यावयाचे व अर्धे टाकून द्यावयाचे, हे बरोबर नाही.

२१४. **आपुलें श्रेष्टत्व**...आपल्या गुणदोषांची लोकांना जाणीव होण्याच्या आत तो गाव सोडावा. साधकाने झाकून असावे, प्रकट होऊ नये.

२१६. **सारंगपंडित–उमाइसे** : स्मृ. १४२ वरील टीपा पहा. **धानाइसे** : त्यांची मुलगी. **तुवां कांस साच केली** : तू जिच्या पोटी जन्म घेतलास तिची कूस या परमार्गात येऊन, धन्य केलीस.

२१७. **अधिकरणें वरीषसंख्या**.. गुरूने शिष्याला साधनेसाठी घालून दिलेली कालमर्यादा. **सांगोपांग क्रिये**...साधकाने अभ्यासाची निरनिराळी अंगे साध्य करण्यासाठी काळाची वाटणी करावी. म्हणजे, एकाच अंगावर अधिक भर देऊन इतर अंगे उपेक्षू नयेत. साधना सर्वांगीण व्हावी.

२१९. भटोबासांना 'वेधवंती नागदेव' हे नाव पडण्याचे कारण सांगणारी स्मृती. **गुजरध्वनि घोळिला उमटे :** भटोबास भिक्षा मागतांना जी हाळी देत ती गुंजारव केल्याप्रमाणे घुमून उठे.

२२०. **साधीं कळंकी ..गोसावीं पाहाविले होते :** चक्रधरांनी साधे नावाच्या शिष्येला एकदा अळजपुरास जाऊन तेथील कळंकेश्वराच्या देवळात शिळेवर लिहिलेंले चौऱ्याशी नरक (त्यांचे वर्णन) पाहून येण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे ती त्यांच्या पश्चात् ते पाहून आली, व त्यामुळे तिला फार दुःख झाले. '**तयाचि परी परमनिष्ठा...**' त्याप्रमाणे अत्यंत एकनिष्ठ अशा भक्ताचे दर्शन–श्रवण घडल्यास ते नरकांचे वर्णन पाहून होणारे दुःख नाहीसे होईल. भक्ताचे दर्शन हा त्या विषावरील उतारा होय.

२२१. **दादोस,** म्हणजेच रामदेव, हा चक्रधरांचा जुना भक्त. पण स्वतःच्या गुरुत्वाच्या अहंकारामुळे तो त्यांना शेवटपर्यंत 'अनुसरला' नाही. '**नाम नामीयें ..**' हे त्याचे मरणकाळचे उद्‌गारही त्याची चक्रधरांविषयीची उपेक्षाबुद्धीच सुचवितात. 'नाम–नामीये' हे तर भक्तिमार्गातील परवलीचे शब्द. महानुभावांच्या नित्याच्या पठनातील 'नामाच्या दहा ठायां'त नाममहती सांगितली आहे. ("साकारा निराकारा नामचि कारण : नाम आठवीजे : स्मरीजे : ध्याइजे : तैंचि या संवसारापासौनि मुचीजे :") परंतु दादोस शेवटीही परमेश्वराच्या नामाची उपेक्षाच करतो. **यैसी मार्गरूढी :** मग दादोसांचे देहावसान झाले इतके सांगून 'स्मृतिस्थळ' थांबते. त्यांच्या निक्षेपस्थानाची माहिती 'मार्गरूढी' देते. 'मार्गरूढी'त नागाइसेनंतरचा व गुर्जर शिवबासापर्यंतचा वृत्तांत येतो (प्रस्तावना पहा).

२२३. **तैं सातरा पसरीला :** नाथोबा हे चक्रधरांचे शिष्य. ते एकदा रानात शौचाला गेले असताना त्यांना एक द्रव्याची कढई दिसली. ती पाहून त्यांना पूर्वी चक्रधरांच्या सांगण्यावरून त्यांनी बाजारात वस्त्र पसरून भिक्षा मागितली होती त्या प्रसंगाची आठवण झाली, व ही कढई तेव्हा सापडती तर तिचा उपयोग स्वामींच्या सेवेसाठी करता आला असता या विचाराने त्यांना खेद झाला (ली. उत्तरार्ध २०३).

२२४. या स्मृतीच्या 'स्मृतिसमुच्चया'तील पाठात 'तेथ गोसावीं देहान्तीं बीजें केलें असे' असे असल्याने 'ते भूमिका सत्त्वस्थ' हे म्हणणे सार्थ ठरते असे श्री. वा. ना. देशपांडे यांनी मार्मिकपणे दाखविले आहे.

२२५. '**मज मागां शास्त्र जाये ना...**' 'लीळाचरित्रा'तील चक्रधरांच्या तोंडची वचने निवडून त्यांतून त्यांचा 'सूत्रपाठ' सिद्ध करणे व अशा रीतीने त्यांचे तत्त्वज्ञान अक्षरांकित करून ठेवणे हे केसोबासांचे मुख्य कार्य. त्यामुळे पुढे होणाऱ्या वादविवादांना व झगडयांना आपोआपच पायबंद बसला.

२२७. ज्याने चक्रधरांना कधीही पाहिले नव्हते असा एक भिक्षू एकान्तात ईश्वराचे ध्यान करीत बसलेला पाहून भटोबासांना आनंद झाला व त्यांनी त्याला देव समजून दुरूनच दंडवत घातले.

२२८. '**तुमची तरी जिज्ञासा ..**' भटोबास व त्यांची शिष्यमंडळी यांच्यात जी चर्चा चालू होती ती अमुक एक पक्ष प्रस्थापित करण्यासाठी नसून केवळ जिज्ञासापूर्तीसाठी होती. कारण त्यांच्यात मतभेद असा कोणताही नव्हता. पण हा गुरुशिष्यांतील सुखसंवाद त्या त्र्यस्थाला उपकारक झाला.

२२९–२३०. महानुभाव तत्त्वज्ञानानुसार परमेश्वराला जीवोद्धरणाचे व्यसनच असते. परमेश्वराची ही जीवोद्धाराची 'आर्ति', म्हणजे तळमळ पाहून वास्तविक जीवाने त्याला 'अनुसरले' पाहिजे. पण ते होत नसेल तर निदान स्वतःच्या हितासाठी किंवा आश्चर्यपूर्तीसाठी तरी त्याने पररमेश्वराला अनुसरावे. या व पुढील स्मृतीत भटोबास परमार्थप्रवृत्तीची कारणे ( Incentives to Spiritual Life ) सांगत आहेत.

२३१. **येणे बहुत चुके** : जाडेभरडे वस्त्र व भिक्षेचे अन्न यामुळे अंगी वैराग्य बाणून साधक अनेक मोहांपासून दूर राहतो.

२३२. मागील १३२ वी स्मृती पहा. '**पिसेया पिंपळगावो...**' वेडयाला काय दूर? त्याप्रमाणेच कल्पनेला काय उणे? ती कोठेही जाऊ शकते. पण शेवटी ती कल्पनाच !

२३३. तीन्ही निषेध : विषय, अन्य धर्म व हिंसा. देवतेचा खेद हा चौथा निषेध.

२३५. ही स्मृती सत्संगाचे महत्त्व सांगते. एकाकीपणाने केलेल्या साधनेत कधी कंटाळा येतो, त्रास येतो. तीच साधना जर गुरूच्या किंवा गुरुबंधूंच्या सहवासात केली तर ती अधिक उज्ज्वल होते. मात्र 'निलळता', म्ह. शैथिल्य हे स्वतःच्या आचारानेच दूर होणार असल्याने त्यासाठी एकाकी साधनाच पाहिजे. सारांश, साधनक्रिया ही 'काळपरत्वें' वाटली गेली म्हणजे ती दहा प्रकारांनी उजळते. हे दहा प्रकार असेः– १. अटन, २. विजन, ३. भिक्षा, ४. भोजन, ५. निद्रा, ६. स्मरण, ७. प्रसादसेवा, ८. उचित अन्न, ९. उचित वस्त्र, १०. अलिंग वृत्ती.

२३६. ज्या ग्रंथाचा अर्थ त्या ग्रंथावरून करावा हे भटोबासांच्या विवेचनाचे सूत्र आहे. 'श्रुती' म्ह. चक्रधरांची वचने, 'लीळा' म्हणजे त्यांचे चरित्र, व 'दृष्टान्त' म्हणजे त्यांनी निरूपण करतांना दिलेले व्यावहारिक दाखले. एकु अर्थु तो . वरील सूत्राला अपवाद ब्रह्मविद्येच्या अर्थाचा. तो मात्र वरील सर्व प्रकरणांच्या आधारे करावा.

२३७. अधीकरणेंसि इतुकें वाढवीतां दूषण असे : गुरूशी अतिवाद घालून त्याची प्रसन्नता जाईल असे करू नये. आपला अनधिकार गेला म्हणजे सर्व गोष्टी आपोआप कळू लागतात.

२४०. वैयाकरणांच्या उक्तित्रयाचा निषेध करून, चक्रधरांच्या 'सूत्रपाठा 'तील 'असती परी ' या भागापैकी 'स्वभावमात्रें ' या दुसऱ्या सूत्रामधील 'मात्रा ' या शब्दाचे समर्थन भटोबासांनी केले.

२४१. याच हीराइसेने आपल्या नवऱ्याला कडक निरोप पाठवून प्रपंचातून काढून पंथात आणले होते. (स्मृ. ५८ पहा).

२४२. भास्कर कवीविषयीचा हा अभिप्राय त्याच्या 'शिशुपाळवधा'-वरून सार्थ ठरतो.

२४३. निषेधु न सेवितां..साधक जोवर निषिद्ध आचार न करता बाह्य वेष सांभाळून आहे तोवर तो धर्मनष्ट झाला असे म्हणता येणार नाही. कारण बाह्य क्रिया थोडी तरी आत उमटेलच.

२४४. 'स्मृतिस्थळा'च्या काळातील एकच 'नामदेव सींपा' आपणांस ठाऊक आहे, व तो म्हणजे प्रसिद्ध संत नामदेव. त्यामुळे त्याच्याविषयीच असेल तर ही स्मृती काल्पनिक वाटते.

२४५. ज्याला मानमान्यता आणि स्वतःच्या ज्ञानाचा अहंकार आहे त्याच्याशी शास्त्रसंवाद करू नये.

२४६. **वराड माहेर**..वऱ्हाड माहेर, कारण गोविंदप्रभूंचे लीळाचरित्र रिधपुरात (जि. अमरावती) घडले. आणि गंगातीर, म्हणजे गोदाकाठ, सासर, कारण चक्रधरस्वामींनी अखेरचे प्रयाण तेथून केले. म्हणून गंगातीर दुःखदायक.

२४७. ही स्मृती गोविंदप्रभूंच्या वेळची असल्याने ती वास्तविक त्यांच्या ऋद्धिपुरचरित्रात यावयास पाहिजे. परंतु तेथे नसल्याने ती येथे घातली आहे.

२४८. **शाब्दींचि अपरोक्ष** : शाब्द हे चार प्रमाणांपैकी (१. प्रत्यक्ष २. अनुमान, ३. उपमान, ४. शाब्द) एक आहे. अपरोक्ष, म्ह. साक्षात्कार वास्तविक प्रत्यक्ष प्रमाणात संभवतो. परंतु आचारनिष्ठ पुरुषाच्या बाबतीत तो शाब्द प्रमाणातही संभवू शकतो.

२४९. साधन कृतार्थ झाल्यावर देव व भक्त हीं एकमेकांचीं होतात. तुळा : "देव माझा, मी देवाचा।" –तुकाराम. (मात्र येथे देवा–भक्तांचे ऐक्य अपेक्षित नाही. कारण महानुभाव तत्त्वज्ञान द्वैती आहे.)

२५०. **वचनरूप परमेश्वर** : अखेरचे प्रयाण करण्यापूर्वी चक्रधरस्वामी भटोबासांना दुःखी पाहून म्हणाले होते, "वचनरूप परमेश्वरु तो तुम्हां जवळींचि असे कीं :" (ली. उत्तरार्ध ४७६). मात्र त्याच्या वचनांचा योग्य तोच अर्थ केला पाहिजे. नाहीतर परमेश्वर दुरावेल. (तुळा : "आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ॥" –रामदास).

२५१. घटकेच्या धर्मचर्चेने सबंध दिवसाच्या अटनाचे श्रेय मिळेल.

२५२. **सामान्य स्त्रीचा दृष्टान्त** : 'अनुसरलेयाचिया दोनिचि घडिया पुरेति' या सूत्रावर (सू. आचार २८२) चक्रधरांनी सामान्य स्त्रीचा,

म्हणजे वेश्येचा दृष्टान्त दिला आहे (दृष्टान्तपाठ ६१). ती ज्याप्रमाणे जन्मभर जगाच्या पैशावर जगून शेवटी जरी एकाची झाली तरी पतिव्रता ठरते, त्याप्रमाणे सारे आयुष्य विषयोपभोगात घालवून शेवटी परमेश्वराला शरण गेल्यासही सद्‌गती मिळते. **तोंडीं तांबुळ माथां फुलें :** सुखलोलुपता-वाचक. (तुळा : "अन्तकाले च मामेव.." गीता ८·५)

२५४. **देवो आठवतो :** ' देव ' म्ह. श्रीचक्रधर. **बेलोपुरिंची क्रीडा :** बेलापुराहून अखेरचे प्रयाण करण्यापूर्वी स्वामींनी अंग घासण्याची ' वज्री ' घडविण्याची एक लीळा केली होती. महादाइसेला अंतकाळी स्वामींचे ते ध्यान आठवते ( " महादाइसीं वज्री घडतां पाहाणें : " लीळाचरित्र, उत्तरार्ध ४८३).

२५५. चक्रधरांचे ' चणा विखो ' असे एक सूत्र आहे (सू. आचार-मालिका १४३). चणा प्रत्यक्ष आक्षेपार्ह नसला तरी तो दान करणाऱ्याने मानमान्यता करून दिला की तोच ' विषय ' होतो, आणि कोणताही विषय वर्ज्य, म्हणून चणा वर्ज्य. गौराइसेला हे ठाऊक असल्यामुळे ती हिराइसेच्या चण्यांवर आक्षेप घेते.

२५७. **' मज ज्वरु कां आला...'** भटोबास म्हणतात, की चक्रधरांचा उपदेशच मी आयुष्यभर सर्वांना सांगत आलो, त्यांची आज्ञा शेवटपर्यंत पाळली. मग मला ज्वर का यावा ?

२५९. **कोण्ही कांही निरुवणुकेचें पुसे...**भटोबासांसारख्या सत्पुरुषांना शेवटी निरवानिरव अशी कोणतीच करावयाची नसते. म्हणून त्याविषयी काहीही न बोलता ते ' निर्वचन ', ' महावाक्य ', ' उद्धरण ' या ' सूत्रपाठा 'तील प्रकरणांची चर्चा करू इच्छितात. सॉक्रेटिसाने विषप्राशन केल्यानंतर मरणापूर्वी अशीच आत्म्याच्या अमरत्वाविषयी चर्चा केली होती. **गोसावियांचा व्यापारु ..** " स्वामींचे कार्य पुढे चालवितांना कोणी नकळत दुखावले गेले असतील तर त्या सर्वांनी मला क्षमा करावी ! "

२६०. या स्मृतीत शेवटी भटोबासांच्या एकंदर आयुष्याची कालगणना दिली दिली आहे. ती अशी : ३२ व्या वर्षी-अनुसरण, म्ह. दीक्षाग्रहण; ३२ ते ३६ चक्रधरांचे सान्निध्यात ( मधील सहा महिने गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात काढले ते सोडून); चक्रधरांच्या पश्चात् गोविंदप्रभूंच्या सान्निध्यात वर्षे १४, म्हणजे वयाच्या ५० व्या वर्षापर्यंत; त्यांच्या पश्चात् भटोबास १६ वर्षे जिवंत होते. याप्रमाणे एकूण आयुष्य ६६ वर्षांचे. पैकी '**लीळादानीं**'चे, म्ह. चक्रधरांकडून दीक्षाग्रहण केल्यानंतरचे आयुष्य एकूण ३४ वर्षांचे.

# व्यक्तिनामसूची

# शब्दकोश

(मूळ शब्दापुढील कंसातील संक्षेपचिन्हांचे स्पष्टीकरण :–**अ** =अव्यय; **अव** = अनेकवचन; **कृ** = कृदन्त; **क्रि** = क्रियापद; **क्रिवि** = क्रियाविशेषण; **धावि**=धातुसाधित विशेषण; **नपु** = नपुसकलिंगी; **ना** = नाम; **पा**=पारिभाषिक संज्ञा; **पु** = पुल्लिंगी; **भ** = भविष्यकाळ; **भू**= भूतकाळ; **व**= वर्तमानकाळ; **वि** = विशेषण; **स्त्री** = स्त्रीलिंगी)

## अ

**अंगवस्त्र** ११९. अंगावरील वस्त्र.
**अटन** (पा.) १८ इ. भ्रमन्ती; फिरती.
**अठरा सतें** ११३. अठराशे.
**अडणि** ८३, १५०. अडचण; संकट.
**अतीत** ६९. आदरातिथ्य; पाहुणचार.
**अदृष्टार्थिचे** (अव.) ५३. ईशप्राप्तीची इच्छा करणारे.
**अधिकरण**(पा.)४७, ४८, ९३, १११. आचार्य; गुरु; आचार्यपद.
**अधिकार्या** १६३. अधिकारी; अंमलदार.
**अनस्फूर्ति** ७१. बुद्धिमांद्य.
**अनिमीत** (वि.) अनिमित्त; अकारण; अहेतुक.
**अनुकार** १०५. अभिनय; खूण.
**अनुकूळ** (पा.) ११२. महानुभाव मार्ग मानणारा.
**अनुतापणे** ४५. पश्चात्ताप करणे.
**अनुमोदणे** ११४, २५४. प्रशंसा करणे.
**अनुवाद** ८६, ८८. विवेचन.
**अनुष्ठता** ५७. श्रद्धा; भक्तिभाव.
**अनुसरणे** (पा.) १, २, इ. संन्यासविधिपूर्वक पंथाची दीक्षा घेणे.
**अनुसरले** (वि.अव.) १, इ० पंथाची दीक्षा घेतलेले.
**अन्याकार** ८०. खिन्न.
**अन्वय** (लावणे) १६, १७. क्रमवार, सुसंबद्ध रचना करणे.
**अन्हवाणी** २१८. पादत्राण न घालता.
**अपरीतोष** १३९. खेद; दुःख.
**अपरोक्ष** २४८. प्रत्यक्ष; साक्षात.
**अप्रास्य** १०६. कडक व्रत; उपासतापास.
**अभंग** (देणे) ११३. ग्रंथान्तीची कर्तृत्ववाचक नाममुद्रिका.
**अभिमानिया** ११८. अभिमान धरणारा.
**अभिळासणे** १०५. अभिलाष धरणे.
**अभिळासिया** (वि) २११. अभिलाष किंवा इच्छा धरणारा.
**अभ्यागत** ४५. पाहुणचार.

अमोघ १४, ६१. परिणामकारक.
अर्धोदक २४. अर्धवट केलेला त्याग किंवा घेतलेला संन्यास.
अवकाळ पाणी १०५. अकाली पाऊस.
अवकास २२३. शौचविधी.
अवचटे ५३. अकस्मात्; योगायोगाने.
अवसर ३४, ९९, १७७. वेळ; समय; प्रसंग.
अवसान २६०. मरण; अन्त.
अवस्था २, ११४. चित्ताची तळमळ; व्याकुळता; विमनस्कता.
अवस्थान (पा.) वास्तव्य; वसती.
अवस्वर १७६ ('अवसर' पहा.)
अवीट २३१. उत्कृष्ट; अत्यंत आवश्यक.
असन्निधान १३२, इ० अवताराची अविद्यमानता; त्याच्या पश्चातचा काळ.
असिक / असेख (वि.) १३, ६९, ८५, १७६. सर्व; निःशेष.
अस्तीति (पा.) २६१. स्थिती; स्थित्यानंद; उन्मन अवस्था.
अक्षेम ३४, ६५, ८४. अशक्त.

## आ

आइत–ती ६४, १४५. तयारी; सिद्धता.
आइसे–६२, ७७. प्रौढ स्त्री.
आउठ–१, ४७. औट; साडेतीन.
आकर्षिणे–१२० आवरते, आटोपते घेणे.
आखर–७७. गावाबाहेर पण गावाला लागून असलेली जमीन.
आगळें ५६. अधिक.
आंगसीक–११४. अंगावरील वस्त्र.
आंगोळी ११६. बोट.
आड पडणे १३१. क्षमायाचनार्थ लोळण घेणे.
आण ५६, इ० शपथ.
आदरणे–१३, २०. मनात आणणे; प्रवृत्त होणे.
आदि ९४. कारण; निमित्त.
आदिभाव–१४९. स्वतःची इच्छा; स्वयंप्रेरणा.
आन–(वि.) १६५. अन्य; दुसरे; निराळे.
आनेआन–(वि) १६५. निरनिराळे.
आंथरुतें–२२४. आंथरूण.
आपजौनि–६०. आवर्जून; साक्षेपाने.
आपणपें–११४. स्वतःला.
आपलवणे–१९२. आपुलकी वाटणे.
आपोसन धरणे ६३. जेवण्यास आरंभ करण्याचे खोळंबणे.
आफळणे–१०६, १९५. थोपटणे; ठोकणे.
आफाविणे २६१. बोलविणे.
आरत–११४, १६५. आर्त; उत्कंठा; व्यथा.
आर्तिया–(वि.पु.) १७६. व्यथित; दुःखी.
आलंबन १९५. आश्रय; आधार.
आवांका–२७. मर्यादा.
आसु–११३. यादवकालीन सोन्याचे नाणे.
आस्थानि–१०५, २३३. सभा.
आस्वपात–४०. अश्रू.
आळंगिणे– ६२. आलिंगन देणे.
आळीव–(सप्तमी) ६०. टप्प्यात.

आळुमाळ–(वि.) ३२,३६. अल्प; थोडे.

आक्षेप–(लावणे) १४५. हरकत घेणे; विरोध करणे.

## इ–ई

इउल (वि.) १०५, २३०. अल्प; लहान.

इटोला ४१. तीन विटांची चूल.

ईश्वरदर्शन (होणे) २६०. मरणे.

## उ–ऊ

उकलणे–१५६. सुटे भाग करणे; मोडतोड करणे.

उखरड–११२. खडबडीत जागा.

उघाणि–११६. वाद; चर्चा.

उचलणे ८३, ८५. उध्वस्त होणे.

उजडणे–९८. बंधनातून मोकळे होणे; सुटणे.

उजळणे ६८. तेज येणे

उजळता–७१. तेज; उजळपणा.

उठिबैसि–९४, ९५. वागणूक.

उद्ग्रहणिका–१३८. वादातील उत्तर पक्ष.

उदयां (सि) १३७, २५८. उजाडताच.

उपनणे–१९८. उत्पन्न होणे.

उपलखणे–६४. कळणे; जाणीव होणे.

उपानौह–१७९. वहाणा.

उपावो–६०. उपाय.

उबारा–११३. उष्णता.

उमट–६७. ज्ञान; उलगडा.

उंबरवट–८. उंबरठा.

...८

उवाय–१०५. आवेग; (येथे लघुशकेचा.)

उसीटें–(वि.) २७, ५६. उष्टे.

उहापोहा–२२७.व्यवस्थापन; रचना; मांडणी.

## ए

एकवट–५६. एकत्र.

एकांकी–२३५. एकाकी; एकटा.

## ओ

ओं–१००. ओंकाराचे चिन्ह.

ओळंबा–२. भुईछत्री; एक वनस्पती.

## क

कटकटा–(उद्गार. अ.) ९३, १३९. हायहाय! अरेरे!

कटाक्षूनि, कटाक्षें–११६, १९५. कटाक्षून; खोचून; आवर्जून.

कणव–१३८. दया; कृपा.

कंथडीकार–९५. कंथाधारी; सांप्रदायिक.

करडेल–९३. करडईचे तेल

करवती–३८, १९३. कापडाचे केलेले भांडे.

कवडा–५०. नाण्याप्रमाणे वापरात असलेली मोठी कवडी.

कवळी–१५८. कव; हाताची मिठी.

कवाड–८. दार.

कसवटी–२४१. कसोटी; परीक्षा.

कसकस–२४१. कचकच; वादावादी.

कळासि बैसणे–२०४. बरोबर पटणे; मनात ठसणे.

**कळेवर**–११४. कलाहीन, निस्तेज देह.
**काज**–६४. लग्नकार्य इत्यादि.
**कांटी**–२०९. काटेरी झाड.
**कानाखुरांसकट**–१८७. सर्वस्वासुद्धा; संपूर्णतः.
**कांबि**–८. काठी.
**काला**–२७. एकत्र कालविलेले अन्न.
**कास**–२१६. कासोटा.
**काहाळेकांड पडणे**–६१. मरून पडणे.
**काह्या**–(च.)–११४. कशास; कशासाठी.
**काळातिक्रम**–१०४. उशीर.
**काळाक्षर**–२०७.पोथीत शाईने लिहिलेले अक्षर, अर्थात् लिखित.
**कुरंधन**–२. एक प्रकारची वनस्पती.
**कुहिरी**–१०१, १६६, १६८. एक प्रकारच्या शेंगा.
**कें**–(अ.) ३, १३८. कोठे.
**केतुक**–(सा. वि.) २१४. किती.
**केतुल**–(सा. वि.) १८३ काही.
**केधवां**–(क्रि. वि.) १२४. केव्हा.
**केसतोड**–२२ एक त्वचारोग.
**कैं**–(क्रि. वि.) ६, १६५. केव्हा; कधी.
**कोचा**–१८७. कोशाध्यक्ष (?).
**कोठी**–१३१. गुरांचा गोठा.
**कोण, कोनटा**–९९, २५८. कोपरा.
**कोरका**–१०७. कोरड्या अन्नाचा तुकडा.

## ख

**खंति**–१३०. खेद; अप्रियता.
**खळी**–१०९. मानाचे स्थान.
**खळीव**–२५८. खळ असलेले, कोरे (वस्त्र).
**खाणे**–२५. चावणे; दंश करणे.
**खांडदेउळी**–७१. आत मूर्ती नसलेले भग्न देऊळ.
**खांडूक**–२५४. व्रण; फोड.
**खांडें**–१९५. खड्ग; तलवार.
**खानपान**–१७७. खाणें पिणें.
**खावणी**–१६५. इच्छा; प्रेरणा
**खिरारी**–११४. गोपाळ; गुराखी.
**खीतीं**–(स.) २६१. क्षितीवर; पृथ्वीवर.

## ग

**गंगातीर**–१९९, २४६. गोदावरीच्या काठचा प्रदेश.
**गजबजणे**–१०७, २५८. गडबडणे; गोंधळणे.
**गडद**–५२. खड्डा.
**गडी**–५१. अन्नवस्त्र मिळू शकते असे ठिकाण.
**गणंग**–२५५. दाणा.
**गव्हान**–५१. बाजार नाही असे ठिकाण; अगदी लहान खेडे.
**गांठी**–१५६. गळ्यात घालण्याची गाठवलेली (गाठीगाठीची) माळ.
**गाडा**–८५, १४६. खटाऱ्यासारखी मोठी बैलगाडी.
**गारी**–१७९ खड्डा.
**गाहाण** १९८. गहाण ठेवलेली वस्तू
**गीतमात**–८९. गाणे; गायनादि कला.
**गुजरध्वनि**–२१९. घुमून उठणारा (Resounding) आवाज.

**गुढी**–८३, ८५. ( शांततादर्शक ) ध्वजा.

**गुणा येणे**–९४. मार्गावर येणे; सुधारणे.

**गुंफा**–१ इ० पर्णकुटी; झोपडी.

**गोटि**–१६२. वाटोळा, गुळगुळीत दगड.

**गोमटें**–(वि.) १. ४७.कल्याणकारक; चांगले; भले.

**गोरूं**–(अव.) ७४. गुरे; जनावरे.

## घ

**घनदाटणे**–२०४. गच्च भरणे; दाटी.

**घाटा**–१०१. घुगऱ्या; शिजवलेला हरबरा.

**घे–दे** १२४, १२८.हिरिरी; अटीतटी.

**घोळिला**–(विपु.) २१९. घुमणारा (आवाज.)

**घोळणे**–९५. चाळविणे; शृंगारिक हावभाव करणे.

## च

**चंद्रमय होणे**–१२०, २०४. द्रवणे; रसार्द्र होणे.

**चरित**–२५१. सिद्ध; पूर्ण; यशस्वी.

**चरितार्थ**–१७०, २४९ कृतार्थ; सफळ; पूर्ण.

**चर्या**–१०६ साधना; आचार.

**चवथी**–५ चतुर्थी (तिथी).

**चांग**-(वि.) ४७ चांगले.

**चाटा**–१३८ वेदाध्ययन करणारा विद्यार्थी.

**चाड**–१३८. इच्छा; आवड.

**चीमुटलेयां**–(क्रि.) १९. चिमटा घेतला असताना; दुखावले असताना.

**चीरा**–६ दगड; शिळा.

**चोखाळणे**–२६१. शुद्ध किंवा पवित्र होणे.

**चोजविणे**-२. सांत्वन करणे; समजूत घालणे.

**चोळीका**–(महात्मा) ९९. वाममार्गी; शाक्त संप्रदाय.

**चौं**–१३८. चार.

**चौक**–४०. रांगोळी भरलेली आकृती; रांगोळीचा चौक.

**चौकी**–२१६. घराबाहेरील देवडी.

**चौथरी**–(आसू) (वि.) ११३. चार थरांची, जाड.

**चौपदी**–६०, ८९. एक पद्यप्रकार.

## छ

**छिन्नपाप-छिन्नस्थळी**–५. डोंबगावाजवळचे कपारीत खोदून केलेले एक स्थान.

## ज

**जगती**–६, १९१, १९८. देवळाचे आवार, त्याची भिंत.

**जवळीक**–४७. सान्निध्य.

**जाडी**–८. अंथरण्याचे जाड वस्त्र.

**जाणवणे**–११४. जाणीव करून देणे.

**जासवट**–४६. मोठ्या आकाराची पळी.

**जिणणे**–१३. जिंकणे.

**जिणे**–१३७. जगणे.

जें–(अ.) १५०. की.

**जोगी-जंगम** ५९. साधू, बैरागी इ०

### झ

**झळंबणे**–१३१. धरून राहणे; लोभ करणे.

**झोळी**–( घेणे ) २४. संन्यास.

### ट

**टाकणे**–२६१. ठाकणे; पोचणे.

**टिक**–९८. कोंदणात जडवलेला खडा किंवा रत्न.

### ठ

**ठकठक**–(करणे) ६१. त्रास देणे; कटकट लावणे.

**ठसु** – (वि.) १२१. कठोर; खडबडीत.

**ठाय**–१४, ७४. ठिकाण; स्थान.

**ठावो**– (१) १३१. जेवणाचे पान; (२)१९८. राहण्याचे ठिकाण.

### ड

**डांढाळ**–१३१. छंद; व्यसन.

**डिंभ**–९०. लेकरू.

**डिवणे** – १०३. धडक मारणे; टक्कर देणे.

**डो**–२००. नारळाचे केलेले उदकपात्र.

### ढ

**ढसढसां**–(ध्व.) ४५. घाईने पाणी पितांना होणारा आवाज

### त

**तन**–(वोरणे)२०४. तृणप्राय लेखणे.

**तपविणे** ७३. वाळवणे.

**तवं**–(श.अ.) १२५, इ० मुळे; साठी; पर्यंत.

**तातल**–(धावि ) ११४. तप्त; तापलेले.

**तापसें**–(स्त्री.) ११३. तपस्विनी.

**तांबाजाळ**–१९९ तांबडा लाल जाळ.

**तावणे** ११४. जाळणे.

**ताळणे (ताळीले)**–१७५. जोपासना करणे.

**तिर्यंच** २१०. तिर्यक् योनी; पशुपक्षी.

**तुटी**–९५. वियोग; ताटातूट.

**तुरुक**–८४, ८५. मुसलमान.

**तेउत**–२६१. तिकडे.

**तैं**–१७४, २२३. तेव्हा.

**तैंलागौनि**–१३७, १६५, २१३. तेव्हापासून.

**तोकड**–(वि.) १२१. अल्प; थोडे.

**तोख**–१५०, २३२. संतोष; आनंद.

**तोखणे**–१६८, २१६. संतोष होणे.

**तोडगळसुरी**–९७. सौभाग्यदर्शक अलंकार

**त्रीसुधी**–१७२. त्रिवार; तीनदा.

### द

**दर्सनीए** (पा.)–१. दर्शनेच्छु.

**दवडणे**–९४, १६१. घालवून देणे.

**दसा**–(१) वय–५६, १००, १५५. (२) स्थिती, योग्यता–१९.

**दसांक**–११४. दहा कडव्यांचे (पद)

दसी–१२२ वस्त्राचा लोंबणारा धागा, सूत.
दाटी–८४ स्वारी; हल्ला.
दांडी–१९८ पालखी.
दातार–११४ दाता.
दादा–१०६, १६६ पुरुष.
दादुलेपन–११३ पराक्रम.
दारवठा–६, ५७. दार; दरवाजा.
दिहां–१०४ दिवसा.
दी–१२, २५७ दिवस; दिवशीं.
दीढु–२५ दीड.
दीसवडी–१०१ प्रतिदिनी; रोज.
दुना–( वि. पु.) १७६. दुप्पट.
दुरांतरें–८४ दूरवर; लांब.
दुश्चितपणें–१३० अभावितपणाने; अजाणतेपणाने.
दूषणे–२०४ दोष काढणे; त्याज्य ठरविणे.
दृभीक्ष–१०७ दुर्भिक्ष; दुष्काळ.
दृष्टांतिक–१७ दृष्टांतावरून काढलेले तात्पर्य.
देउळी–१८ लहान कोनाडेवजा देऊळ.
देव्हारा–(करणे) २३ देवतांच्या मूर्तीची केलेली मांडणी
देसावरि–१९५ परदेशीं; देश सोडून.
देहपर्यन्त–८, २५४ आमरण; मरेपर्यन्त.
देहयुक्त–१०५ सशक्त.
देहविद्या–१५० देह चिरायू होण्याची विद्य .
द्वारसंका–८, २०४ दाराची फळी किंवा चौकट.

## ध

धाकुनली–(वि. स्त्री.) ८३ धाकटी; वयाने लहान.
धाडी–(१) स्वारी; हल्ला. ७७.
(२) पुतणी. १८३
धावणें–(ना.) ९७ बोलावणे; निरोप.
धीष्करणे–१२८ धिक्कारणे.
धुरा–९३, १०७, १९७ धुरीण, प्रमुख, श्रेष्ठ.
धुवा–६०, ८९, ९१, २६१ धावा; एक काव्यप्रकार.

## न

नवेयां–(स.) १३२ नवीन.
नागवणे–१५, १९२ मुकणे; हानी होणे.
नातोंडु–३३ नातवंड.
नामना–१०१ नाव, कीर्ती.
नामीयें–२२१ नाम धारण करणारे.
नावेक–५, ६४, ८० क्षणभर, अल्पकाळ.
निक–(वि.) ३३ चांगले.
निच–१६६. नित्य; नेहमी.
निडळ–१९८. कपाळ.
निफजविणे–५६, ११०, १४२. (अन्न) शिजवणे.
निफन्नले–(भू.) ३३. निपजले; जन्मले.
निरउणुक–(१) सोपवणे १४५.
(२) निरवानिरव २५९.
निरपौनि–(क्रि.) १८६. निपटून; धुवून-पुसून.
निरय–१३८, २०. नरक.

**निरोविणे**–१, ३, ९३. सोपविणे; स्वाधीन करणे.
**निर्भर्षिणे**–११३. छेडणे; टाकून बोलणे.
**निर्वच**–१९८. निवाडा; निर्णय.
**निर्वचिणे**–७५, १३२, १५०, २३६. स्पष्टीकरण करणे; विवेचन करणे.
**निर्वंडी**– १३२. आवराआवर; व्यवस्था.
**निलळता**–२१७. शंथिल्य; मलीनता.
**निऱ्हां**–(क्रिवि.) ११४. अतिशय
**निसणे**–२१३. निवडणं.
**निक्षेप**–(करणे) ६१, १९८ मृतास पुरणे.
**नुपलखणे**–६४. कळू न देणे.
**नेम**–५३, १०८. विधी; क्रियाकर्म.

## प

**पचन**–१०७ अन्न शिजवणे.
**पडिताळणे**–(१) शोधणे; परीक्षा पाहणे. ८९, ९०. (२) चौकशी, विचारपूस करणे. २३, ११४.
**पडिताळा** – ११४ चौकशी; विचारपूस.
**पढियणे**–१२, ५५. प्रिय असणे.
**पत्रशाक**–१०७. पालेभाजी.
**पदन**–२०२. प्रसंग; योग.
**परतारक**–५६. दुसऱ्याचा नाश करणारा (विरुद्धार्थाने.)
**परमार्ग**–२६१.परमेश्वराचा मार्ग; महानुभाव पंथ.
**परवंट**–२००. लुगड्याचा पोटावरील वरंवटा.
**पराय**–७५ वय.
**परावर्ण**–१२२. उपरण्यासारखे वस्त्र.
**परावाचा**–६७. ईश्वरी वाणी.
**परीछेद**–५६. उपोषणादि कडक नेम.
**परीहार**–२०, ९३, ९७, १३४. निर्वाळा; निरसन; फेड.
**पर्व**–१०६. पर्वणी; पुण्यकाळ.
**पसाइता**–(वि.पु.) ११४. प्रसाद देणारा.
**पसि**–(श.अ.) २, ३३, इ० पेक्षा.
**पळवंलीं**–(वि. नपु. अव.) १७५. दुःखाने पोळलेलीं.
**पां**–(पाद० अ.) ९७, इ० पहा; बा; इत्यादी.
**पाग**–९७. शिरोवस्त्र; पागोटे
**पांचास्य**–(गुरुकुळ) १११, १५०, २५९. पंचमुखी.
**पाटण**–५१. नगर; शहर.
**पाटबाज**–२५६. नवारीने विणलेली बाज.
**पाटावु**–४०. रेशमी वस्त्र.
**पाठकुळीये**–(स.) २, ३. पाठुंगळी; पाठीवर.
**पांति**–३८, ५६, ६४. जेवणाची पंगत.
**पातृली**–८. लहान पातेली.
**पात्र**–६९, १९३. श्रेष्ठ व्यक्ती; महात्मा.
**पाथर**–३३. फत्तर; दगड.
**पानकापड**–२२. ओल्या कापडाची पट्टी.
**पायेवणी**–९७, १२७. चरणांचे तीर्थ.

**पासवडी**–४०. पासोडी; जाडसर वस्त्र.

**पाहार**–७१. प्रहर.

**पाहार दी**–२६० प्रहरभर.

**पाळणे**–(१) न्याहाळून पाहणे. ११४. (२) सोपविणे; एकाकडून दुसऱ्यास देणे १५१.

**पाळी**–५१. वसती; लहान खेडे.

**पिंड**–१०६. शरीर; देह.

**पिसें**–(१) ना. वेड. १६५. (२) वि. वेडे माणूस. ४, २३२.

**पीक**–६. विडयाची थुंकी.

**पुढार**–२६१. वचन; दिलेला शब्द

**पुढील**–(वि.) २८, ७३. अन्य; दुसरे.

**पुरश्चरण**–११३. नाश; लोप.

**पुसपुसों** (क्रि.) १०, १६. पुन्हा पुन्हा विचारून.

**पैल**–(वि.) ७७. पलीकडील.

**पैऱ्हां**–(क्रिवि.) ८०. पलीकडे.

**पैकु** – १८७. आडनाव किंवा पदाधिकार.

**पो**–४६. शेणाचा गोळा.

**पोतें**–१०६ सामानाचे गाठोडे.

**पोफळ**–५०, १५७. सबंध सुपारी.

**पोफळफोडणा**–१५८. सुपारी फोडणारा; अडकित्ता.

**पोळणे**–९३. तळमळणे; चुटपुट लागणे.

**पौळी** – २५८. आवाराची किंवा तटाची भिंत.

**प्रणील**-(भ.) ११४. विवाह करोल.

**प्रतिवाय**–१३८. पाप; पातक.

**प्रबळ**–१३५. भरपूर.

**प्रवृत्यंतर**–१, ५. प्रमाण; मृत्यू.

**प्रस्तावा**–२४, ४१, ८८, १११. प्रसंग; समय.

## फ

**फुटा**–८, ६९, ७०, १९५. उपरण्यासारखे पांघरण्याचे वस्त्र.

**फोक**–३०. शिपटी; साल.

## ब

**बडुवा** १३९. नोकर.

**बंदीजन**–१३२. कैदी; बंदी.

**बरव**–(वि.) ५६, ७३, ९९, १२२. चांगले; सुंदर.

**बळवतर**–१७८. श्रेष्ठ; वंदनीय.

**बळाधिकार** १४९. बलात्कार; सक्ती.

**बाइल**–४९. बायको; पत्नी.

**बांधणे**–१४, १५. श्लोकबद्ध करणे.

**बारसी**–३४ १०३. द्वादशी.

**बाहीरवाहीरीं**–(क्रिवि.) ९७, १५२. बाहेरच्या बाहेर; परस्पर.

**बाहे**–१०६, १९५. बाहू; भुजा.

**बिढार**–५८,७४, १०३, इ० बिऱ्हाड.

**बीजें** (–करणे) २, १२३, १३२. जाणे; गमन करणे.

**बुझणे**–१९, ७२, ११२. समजूत पटणे.

**बुझावणी**–६४. समजूत.

**बुझावणे**–१५८. समजून घालणे; पटविणे.

**बुंथि**–१०५. तोंडावरून घेतलेला वस्त्राचा पदर; बुरखा.

बेंबीळ–८३. अशक्त; नित्राण.
बोडी–२८. पाण्याचे डबके.
बोधवंत–१. भटमार्गाचा उपदेशी.
ब्राह्मणी–९९, १८६. बायको (ब्राह्मणाची).
ब्रीद–(पढवणे) २०४. शेखी मिरवणे; अभिमान धरणे.

### भ

भटमार्ग–५३, २१८. भटोबासांचा मार्ग; महानुभाव पंथ.
भनंग–१०६. दरिद्री; भिकारी.
भर (–धरणे) ८९. नाद; छंद
भरलेपण–४५. ऐट; अहंकार.
भलता–(वि.पु.) १३५, २४१. कोणीही; वाटेल तो.
भलतेथ–(क्रिवि.) २४१ कोठेही; वाटेल तेथे.
भलतेधवां–(क्रिवि.) ३४, १३५ केव्हाही; वाटेल तेव्हा.
भाउपण–१९४ भावाचे नाते, संबंध.
भातार–९७ नवरा.
भानवस–४१ स्वयंपाकघर.
भावें–(तृ.) १४ कल्पनेने; समजुतीने.
भितभंग–६ भिंतीचे खिंडार.
भीतर-रीं–९७, १०७, १३१. आत; आतील भाग.
भिक्षा–(करणे) १०, १३ इ० संन्यासदीक्षा (घेणे).
भिक्षुक–१७८ मार्गाची दीक्षा घेतलेला.
भेण–(तृ) ११३ भीतीने.

### म

मढ–(१) मठ ९९, १४६.
(२) पंथ, संप्रदाय. १९२.
मढीले–(भू.धावि.अव.) १ मढवले; तयार केले.
मंडळ–८३, २०७ प्रांत; प्रदेश.
मर्गळा–२६१ एकनिष्ठ सेवक; गुलाम.
मऱ्हाटी–६६, ८८ मराठी भाषा.
मऱ्हाटें–८६ यादवांचे मराठी राज्य.
महाजन–१९८ ग्रामप्रमुख, गावातील प्रतिष्ठित लोक.
महात्मा–५३, ७० संन्यास घेतलेला भिक्षुक.
महात्मी–१३७ संन्यासिनी; स्त्री-भिक्षुक.
मळधाणि–७३ मळ; घाण.
मळवत्– त्याग) १५२ विष्ठेप्रमाणे केलेला त्याग.
मा–(अ) ३, ९२ आणि; मग; तर.
माघौते–(१) पुन्हा ५८, ८७
(२) परत. ९७, ९९
माचा–१५६ लाकडी उच्चासन.
माट–५७ दाट.
मान–१३८ समय; वेळ.
मानणे–१६ मान्य करणे; संतोष होणे.
मायेचां पोटीं–(१) अशक्यत्ववाचक १९५. (२) आश्चर्यवाचक. २५, १३५.
मार्ग–(समुदायवाचक) १२८ भटमार्गातील लोक; पंथीय.

**मार्गरूढी**–२०१ महानुभावांच्या चार प्रमाणांपैकी चवथ्या कालखंडातील वृत्तांत ( 'प्रस्तावना' पहा. )

**मालगंठी**–१२३ वस्त्र नेसण्याची विशिष्ट पद्धत.

**मासादीसां**–५६, ७१ महिना-पंधरा दिवस.

**माहारवाडा**–२०४ महारांची वसती.

**महासुरवाडाचे**– (चान्त वि.) १०१ अतिशय सुखप्रिय; सुखात वाढलेले.

**माहो**–१ माघ महिना.

**मीस**–१४२ मिष; निमित्त.

**मुखसुधि**–१५७ भोजनोत्तर सुपारी वगैरे खाणे.

**मुदी**–१५३ अंगठी.

**मुरडणे**–९ माघारी फिरणे; परतणे.

**मुळवणि**–९५ मुळापासून उचकटणे; सत्यानाश.

**मैळणे**–४७, २३५ मळणे; पाप लागणे.

**माहेर**–२६१ सन्मुखता.

**म्हातारदाम**–१०७ म्हातारपणासाठी केलेली खर्चाची तरतूद.

**म्हातारीया**–(अव.) १५ सामान्य जन; अशिक्षित भाळीभोळी माणसे.

## य

**यत्न**–१७९ जतन.

**येउतें**–१५१ पर्यन्त.

**येंकवळा**–९४ ऐक्य; एकजूट.

**येर**–२९ इ० इतर; अन्य.

**येरयेर**–२२८ एकमेक; परस्पर.

**येसण**–(सा वि.) ११६, इ० एवढे; इतके.

## र

**रंधन**–१०७, ११० स्वयंपाक.

**रवणी**–१८ मोकळी जागा.

**रसों पडणे**–१२४ रंगून जाणे; तन्मय होणे.

**राखण**–(घालणे) १३ पाळत, लक्ष (ठेवणे).

**राजभरा**–(वि. स्त्री ) ११३ वैभवसंपन्न.

**राजीक**–८३ परचक्र; राजकीय उठाव.

**राज्य**–(करणे) ५३, १६३, १९८ काळ कंठणे; नांदणे.

**राणा**–१८ देवळातील गुरव.

**राणि**–१०५ रात्र.

**रांधणे**–१६० अन्न शिजवणे.

**रांधवनकारी**–११० स्वयंपाकीण.

**राभस्य**–४५, १३१ अविचार.

**रामहाट**–११३ द्वारकेची पेठ; (श्लेषार्थाने) श्रीकृष्णचरित्र.

**रावा**–२१० पोपट.

**रावो**–१४५, १४९ राजा.

**रास**–११४ एक नृत्य प्रकार

**राहाटी**–१३१ राहाणी; आचार.

**राहाण**–२३ अंगात येणारे दैवत.

**राहावा**–६५, २१७ वसती; मुक्काम.

**रिगणे**–२३, १३६ शिरणे; प्रवेश करणे.

**रिचवणे**–१८५ रिकामे करणे.

वितंडणे--२०४ विरोध करणे; आक्षेप घेणे.
विद्वांस–१२, १३ विद्वान.
विधान–१७७ उपचार; क्रिया; विधी.
विभाग–१६० निर्गमन; ताटातूट.
विमर्शणे--२३७ विचार करून पाहणे; बुद्धी चालवणे.
विमान–२६० प्रेत नेण्याचे वाहन.
विराम–५६, ११२ स्थैर्य; स्थिरता.
विरोदी–१४६ स्त्रियांचा पायाच्या बोटातील एक अलंकार.
विवर्ण–८० खिन्न.
विसंवाद–६४ विरोध, भांडण.
विस्वासी–१४६ विश्वासू नोकर; हुजऱ्या.
विहिणे–४०, १४१, १४७, २१० आदेश देणे; विधी सांगणे
विळचां–७, १०५ रात्रीच्या वेळी.
वीखो–८१, ८९, १०१ विषय.
वीळवेऱ्हीं–१०५ सायंकाळपर्यंत.
वृति–१५१ वृत्ती; वतन.
वेकास–२५९ विरुद्ध; उणेअधिक.
वेगवतरें–११४ वेगाने.
वेंचणे–१३६ खर्च करणे.
वेंठ–(वि.) ११० वळलेले; घडी केलेले.
वेढा–१५६, १५८ एक कर्णालंकार.
वेधवंती–(वि.) १४६, २१९ वेधून घेणारा; आकृष्ट करणारा.
वेऱ्हि–(श. अ.) १५१ पर्यन्त.
वेवहार, वेव्हार--११ दावा; फिर्याद.
वेव्हारा–१०५ सावकार.
वेळविणे–२०१ शिजविणे.
वोखट–(वि) ४७, इ० वाईट.
वोखटी क्रिया–२० मारहाण वगैरे.
वोडवणे–१५२ पुढे करणे.
वोपवणे–७३ उजळ करणे; स्वच्छ करणे.
वोवाळणी–(१) दान; पारितोषिक ११३. (२) ओवाळून टाकलेले द्रव्य. २६०.
वोवी–३३, ६०, ८९, ११३, १२३ ओवी, एक छंदप्रकार.
वोहटळ–१६२ उतार.
वोळगणे--२६१ आश्रय करणे.
व्यक्तिभंग–१५६ प्रसादाच्या वस्तूची मोडतोड.
व्यवस्था–९१ वृत्तांत; हकीगत.
व्यापार–१४५ संबंध; व्यवहार.

## श

शोधनी–९७ चौकशी; विचारपूस.
श्रवण–१०, ९१, इ० उपदेश.
श्रुति–९० श्रीचक्रधरांचे वचन.

## स

सगडी–१५३ शेगडी.
संग्रह–६५, ७८, ७९, ९७ रीत; पद्धती; आचार.
सद्यस्त–(वि.) ७२ भरपूर; यथास्थित.
सन्निधान–(पा) १, इ० सहवास.
समुचय–११० जनसमूह; लोकांची दाटी.
संपादणे–(१) देणे; मिळवणे २०, २८, ९२ (२) सुजणे ३०.

सेवट–(पा.) २०६ प्रदेशाची किंवा मंडळाची सीमा, हद्द.
सेवै–४१ शेवई; वळिवटाचा एक प्रकार.
सोनटका–११३ सोन्याचे एक नाणे.
सोनसळा–(वि.पु.) १२३ सोनसळई; जरतारी (वस्त्र).
सोपस्कर–(१) चांगले; रुचकर (अन्न) ६०. (२) वि. चोखंदळ; चवीने जेवणारा. १३६
सौकर्यत्व–१२२ सौंदर्य.

## ह

हरिखणे–१९२ हर्ष होणे.
हळवैलीं–(वि. नपु. अव.) १७५ दुःखाने हळवी झालेलीं; दुःखीकष्टी.
हळु–(वि.) १०७ हलके (वजनाने)
हाकारा–९१, ९३, २५८, २५९ बोलावणे.
हाट–११३ बाजारपेठ.
हातरीती–(वि.स्त्री.) १, ३३, १८३ विधवा.
हातवणी–८६ हात धुण्याचे पाणी; (ल.) प्रारंभ.
हारी–६१, ७४ ओळ, रांग.
हावरु–२१९ हट्ट; नाद.
हाळी–(पा.) ५१ अगदी लहान वसतीचे खेडे.
हीमट–(वि.) ८० हिरमुसलेले; खिन्न.
हेळा–२६१ क्षुद्र, तुच्छ विषय.
होड–२४७, २५३ पैज.

## क्ष

क्षेण–६४ आमंत्रण; बोलावणे.
क्षेद–२३३ खेद; दुःख.
क्षेपणे–(१) काळ कंठणे. ३२ (२) वागणे. १३२
क्षेम–५९ आलिंगन.

# आमची काही पुस्तके

| | |
|---|---|
| सभासद बखर | रु. चार |
| आज्ञापत्र | रु. दोन |
| भाऊसाहेबांची बखर | रु. सहा |
| दृष्टांत पाठ | रु. चार |
| लोकहितवादींची शतपत्रे | रु. सहा पैसे पन्नास |
| श्लोक केकावली | रु. तीन पैसे पन्नास |
| ज्ञानेश्वरी अध्याय २ रा | रु. तीन |
| ज्ञानेश्वरी अध्याय ३ रा | रु. तीन |
| ज्ञानेश्वरी अध्याय ५ वा | रु. दोन पैसे पन्नास |
| ज्ञानेश्वरी अध्याय ९ वा | |
| ज्ञानेश्वरी अध्याय १२ वा | रु. तीन |
| ज्ञानेश्वरी अध्याय १६ वा | रु. पाच |
| विराट पर्व | रु. सहा |